म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०८५

भारतीय

# ग्राम शिक्षण

☆

लेखक

चंद्रकुमार डांगे,
एम्. ए., एम्. ईडी.
प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

चंद्रकांत दत्तात्रय इंदापूरकर
एम्. ए., एम्. ईडी.
उपप्राचार्य, जनता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चांदा

☆

REFBK-0015964

नीलकंठ प्रकाशन : पुणे ९

निबंध
६४८८८
१५।३।६१
२०५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६५८८८ विः निबंध
स्थळ २०५५ नोंः दिः १५।३।६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्ध योजना
१९६०

भारतीय

# ग्रामशिक्षण

REFBK-0015964

लेखक

चंद्रकुमार डांगे,

एम्. ए., एम्. ईडी.

प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

चंद्रकांत दत्तात्रय इंदापूरकर

एम्. ए., एम्. ईडी.

उपप्राचार्य, जनता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चांदा

दा. क्र. १५९६४

नीलकंठ प्रकाशन, पुणे ९

प्रकाशक :
प्रकाश दामोदर रानडे
नीलकंठ प्रकाशन
१६४३, सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ९

सर्व हक्क लेखकाधीन

किंमत : रु. दहा फक्त

मुद्रक :
राजाराम नागेश सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे २

ग्राम-शिक्षणाच्या क्षेत्रातील एक
महान प्रयोगशील तपस्वी
कर्मवीर **मामासाहेब जगदाळे**
यांना सादर समर्पण

मित्रहो,

'**भारतीय ग्रामशिक्षण**' या पुस्तकाच्या निमित्ताने आपल्याशी हितगुज करण्याची जी ही संधी मिळाली त्याचा आम्हांला फार आनंद झालेला आहे. भारतातील शिक्षण-विषयक प्रश्नांचे आम्ही नम्र विद्यार्थी आहोत. आपणही शिक्षणविषयात रस घेता हाच उभयतांमधील बळकट दुवा. तशातच केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या महामंडळाचा प्रचंड अहवाल आपल्यासमोर आला आहे. या अहवालाच्या निमित्ताने पुनः एकदा विचारांची वादळे उठली आहेत. देशातील विद्यापीठांचे कुलगुरु, विविध राज्यांचे शिक्षणमंत्री, विद्यापीठे, सार्वजनिक व्यासपीठे आणि वृत्तपत्रांचे स्तंभ, परिषदा, चर्चा, कृति-सत्रे व लेखन याद्वारे पुनः एकदा भारतीय शिक्षणाबद्दल चिंतन करीत आहेत. अशी वैचारिक जागृती देशाच्या सुदृढ प्रकृतीचे लक्षण मानली पाहिजे. परंतु हेही खरे की, या चर्चेत आपण वास्तवाचे भान कधीही विसरता कामा नये. असे भान नेहमीच राखले जाते असे नाही. वर उल्लेखिलेल्या विमर्शातदेखील हे वास्तवाचे भान नेहमीच राखले गेले असे म्हणवत नाही. हे न घडल्याने गैरसमज वाढले, टीका-प्रतिटीका झाल्या, ऐतिहासिक दाखले दिले गेले, राष्ट्रीय भविष्याबद्दल दारुण निराशा व्यक्त केली गेली. स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व लाभल्यानंतर शिक्षण हा प्रश्न आम्ही सर्वार्थाने **राष्ट्रीय-प्रश्न** करू शकत नाही हेही दुर्दैवाने खरे ठरू पाहत आहे. असे का होते हे पाहणे अगत्याचे आहे. संरक्षणाचा प्रश्न नाही म्हटला तरी गुंतागुंतीचा, तांत्रिक, खास अभ्यास केलेल्या व्यक्तींचा होतो. सामान्य मनुष्य जयापजयाच्या भाषेत हा प्रश्न न्याहाळतो. त्याला अधिक भावनात्मक बनवतो. चीनच्या आक्रमणाच्या वेळी भारताचे काय चुकले याबद्दल सर्वसामान्यांचे मत-प्रदर्शन मर्यादित राहाते. किंबहुना ते तसे मर्यादित असणे अपरिहार्य आहे. आधुनिक युद्ध-शास्त्र इतके प्रगत आणि विज्ञानाधिष्ठित झाले आहे की, सामान्यच काय परंतु बहुश्रुत वाचकदेखील भांबावतो, भावनात्मक बोलतो, गप्प बसतो. अन्नधान्याचा प्रश्नही असाच पण सामान्याच्या दृष्टीने अधिक निकटचा. ज्यांनी बोलायचे ते बहुसंख्य भारतीय शेतकरी अज्ञान, निरक्षरता, मागासलेपणा यांच्या धुक्यात सापडलेले. रोजचे मिळणारे रेशन बरे-वाईट झाले, पाऊस-पाणी कमी जास्त झाला तर तक्रार नोंदवून गप्प राहणारे इतरेजनही तसेच. कारण भारतातील अन्न-धान्याच्या प्रश्नातही अशीच फार मोठी गुंतागुंत आहे. विज्ञान, अर्थशास्त्र यांसारख्या अनेक शास्त्रांचा अन्न-प्रश्नाशी संबंध आहे. लोकसंख्येचा फार मोठा प्रभाव या प्रश्नाला अधिकच किचकट करीत आहे. याही प्रश्नाची चर्चा सर्व सामान्यांत भावनात्मक पातळीवरून होत असल्यास नवल नाही. या मतप्रदर्शनालाही मर्यादा पडताना दिसतात. पण तसे शिक्षणविषयक प्रश्नाचे नसते. अगदी सामान्यातल्या

सामान्यालादेखील हा प्रश्न जिव्हाळ्याचा, सहज सोडविता येईल असा वाटतो. या शिक्षणक्षेत्राविषयी लिहिताना किंवा बोलताना पुष्कळसे सुशिक्षित लोकही काही पूर्वाभ्यासाची, तज्ज्ञतेची, विशेष ज्ञानाची गरज आहे असे मानीत नाहीत. या दृष्टीने शहरे, जिल्हा किंवा तालुका पातळीवरून प्रकाशित होणाऱ्या- नियतकालिकांतील ( वृत्तपत्रे, पाक्षिके, साप्ताहिके, पत्रिका, मासिके इ. ) शिक्षण- विषयक लेखन या दृष्टीने अभ्यास करण्यासारखे आहे. याला अर्थातच सन्माननीय अपवाद आहेत. पण त्यांना वगळून ऐकू येत असलेला प्रचंड मतप्रदर्शनाचा डिंडिम कानी आला की शिक्षणविषयक प्रश्नाचे वरवरचे दिसणारे स्वरूप स्पष्ट होते.

भाषा, पास-नापास, परीक्षा, फी, सुट्ट्या, पाठ्य-पुस्तके, शिक्षक, प्राध्यापक आदि घटकांबद्दल प्रत्येक जण, मग तो निरक्षर असो, साक्षर असो किंवा सुशिक्षित असो, आपले मत द्यायला एका पायावर तयार असतो. अगदी ताजे उदाहरण द्यायचे तर डॉ. कोठारी महामंडळाच्या भाषाविषयक प्रश्नावर इंग्रजी, मराठी, हिंदी वृत्रपत्रांतून आलेला 'वाचकांचा पत्रव्यवहार' पहाणे मनोरंजक ठरेल. कारण प्रत्येक जण शिक्षणाच्या क्षेत्राशी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे निगडित झालेला असतो. हे लेखन केवळ भावनेच्या पातळीवरून होते किंवा हे मत-प्रदर्शन उल्हासाने होते असे नव्हे. त्यातही एक ठाम पूर्वग्रह, एकांगी विचारसरणी असते. पण जेव्हा तज्ज्ञ मंडळी या धर्तीवर मत-प्रदर्शन करतात तेव्हा मन खिन्न होते. " आजच्या विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचे मूळ गांधीजींनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्यात ओढले त्यात आहे.", " इंग्रजी कमी करून एका पिढीचे वाटोळे केलेत तेवढे पुरे, आता नको.", " संस्कृत हीच राष्ट्रभाषा होण्याला लायक भाषा आहे.", " विद्या- पीठांत सर्वांना प्रवेश देऊन खूष करण्याच्या राजकीय पुढाऱ्यांच्या धोरणाने देशातील शिक्षणाचा दर्जा खालवला. ", असे काही अगदी निवडक नमुने तज्ज्ञांच्या लेखनात पाहिले की, मग पट्ट लागते की या ठिकाणी वास्तवाचे भान सुटलेले दिसते. हे खरेच की शिक्षणाबद्दलचा असंतोष हा कधीहा न संपणारा असतो. अगदी प्रगत राष्ट्रांत देखील शिक्षणाबद्दल सर्व संतुष्ट आहेत असे नाही शिक्षणाची प्रक्रियाच मुळी जीवनप्रक्रियेशी अशा रीतीने निगडित झाली आहे की, एकमेकांचे व्यवच्छेदक लक्षण मांडणे कठीण होऊन बसते. राजकीय परिस्थितीचा प्रभावही शिक्षण आणि जीवन यांच्या स्वरूपावर पडतो. लोकशाहीत कोणत्याही प्रश्नाला राजकारणाचे अंगडे-टोपडे घालून तो प्रश्न ज्वलंत करता येतो, धुमसता ठेवता येतो. भारतासारख्या अविकसित देशात केवळ शैक्षणिक प्रश्नावर निवडणुका लढविल्या जाण्याचा काळ बराच दूर आहे हे स्पष्ट आहे. संरक्षण, अर्थ, अन्न यांसारख्या प्रश्नांना महत्त्व देऊन निवडणुका लढविल्या जाणार हे दिसतच आहे. त्याच्याही पुढे जाऊन असा प्रश्न विचारता येतो की, खरोखर हे तरी प्रश्न समोर ठेवून राजकारण होते का सत्तास्पर्धा,

जातीयता, प्रांतीयता, पंथीयता यांचाच प्रभाव पडतो? लोकशाही जीवनपद्धतीत शिक्षणाला मूलभूत स्थान आहे हे सुशिक्षितांना पटूनही हा प्रश्न राष्ट्रीय का होऊ शकत नाही? शिक्षण ही राष्ट्रीय गुंतवणूक आहे हे मान्य होऊनही एक धोरण का निर्माण होत नाही? **तीन पंचवार्षिक योजना झाल्यावरही तज्ज्ञांच्या पाहणीत असे आढळून आले आहे की, सर्वसामान्य माणसांना नियोजना-संबंधी 'उत्साह' वाटत नाही.** मग तपशिलाची गोष्टच सोडा. या संदर्भात वर्धाशिक्षण—योजनेचा दाखला अधिक मार्गदर्शक ठरतो. १९३७ झाली गांधीजींनी ही देशव्यापी शिक्षण-योजना मांडली. काही मधली वर्षे सोडली तर गेल्या तीस वर्षात या योजनेचे फलित काय झाले? अपयश येईना का पण ते प्रयोगशाळेच्या वस्तुनिष्ठ निष्कर्षातून सिद्ध झाले का? या योजनेच्या सांप्रतच्या फलिताला अनेक गोष्टी कारणीभूत असतील. त्याची मीमांसा इथे अभिप्रेत नाही. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, वर्धाशिक्षण योजनेच्या स्वीकाराला वा त्यागाला **वातावरणच** तयार केले गेले नाही. वातावरण केवळ भाषणांनी, समारंभांनी, उद्घाटनांनी तयार होत नाही हा धडा आता तरी आपण शिकला पाहिजे. कोणत्याही गोष्टीच्या स्वीकाराला प्रयोगसिद्ध पुराव्याने वातावरण निर्माण करता येते हे विज्ञानयुगाचे, आधुनिक जीवनाचे सूत्र आहे. भावनेने, अगदी सद्भावनेतून निर्माण होणाऱ्या तळमळीने देखील अनुकूल वातावरण लाभत नाही. निर्माण होतो तो आभास. योजनांच्या संबंधी 'उत्साह' नसल्याचा निष्कर्ष निघाला तो नेमक्या याच कारणामुळे. निरनिराळी मंडळे, समित्या, महामंडळे शिक्षणासंबंधी नेमली गेली. त्यांच्या शिफारसी आल्या की लगेच शिक्षणखात्यांनी देशात फतवे काढून अंमलबजावणीला लागायचे. ही रीतच शिक्षणविषयक प्रगतीच्या आड आली. फतवा आला आहेना, मग तो पटो, न पटो, कसा तरी राबवायचा या दृष्टीने विद्यापीठे, संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक आणि मग विद्यार्थी देखील वागू लागला. सरकारी फतवा आणि अनुदान यांच्या साहचर्यामुळे ही मानसिक वृत्ती बनून गेली. डॉ. कोठारी यांच्या महामंडळाच्या अहवालात निष्कर्ष काढला आहे :

"Attempts to train for Vocational competence in forming through formal schooling in agriculture at primary and lower secondary levels have failed and further efforts should be held in abeyance." (पृ. ६५७)

हा निष्कर्ष कशाचा द्योतक आहे? शेतकी शाळांबाबत ही दारुण अवस्था समजून यायला ३० वर्षे लागली. हे का घडले? मूलोद्योगी शिक्षणाचा गौरव करून महामंडळाने निदान कोणते केले?

"We believe that the essential elements of the system are fundamentally sound, and that with necessary modifications these can form a part of education, not only at the primary stage, but at all stages in our national system." (पृ.२०८)

म्हणजे सारे भारतीय शिक्षण आता 'बेसिक' झाले ! आणि "With necessary modifications" म्हणजे नेमके काय ? आपले आजचे राष्ट्रपती डॉ. ज़ाकीर हुसेन यांनी काढलेले उद्‌गार तर प्रसिद्धच आहेत. राष्ट्रपती म्हणाले, "प्रचलित मूलोद्योग शिक्षण म्हणजे त्या योजनेची शुद्ध विटंबना आहे." या सर्व क्रिया-प्रतिक्रियांचा मेळ केवळ मतप्रदर्शनाने, युक्तिवादाने, चतुर वाक्‌पांडित्याने घालणे सोपे आहे. पण अमंलबजावणी ? भारतातील विविध प्रांत जो आणि जसा सोइस्कर अर्थ लावतील तशी अंमलबजावणी. ही तज्ज्ञांची मतप्रदर्शनाची रीत तर सामान्याने काय बोलावे आणि शिक्षकाने काय व कसे राबवावे ?

बोधभाषेच्या बाबतीत हीच तऱ्हा आहे. ७० टक्के निरक्षरांचा हा देश आहे. २ टक्क्यांहून कमी लोकांना इंग्रजी भाषा येते. हे विसरून "बुद्धिवाद्यांचे विश्व रसातळाला जाईल", "भावनात्मक ऐक्य नष्ट होईल," "भारत जगापासून अलग पडून मागासलेपणाच्या खाईत जाईल." अशी टीका जेव्हा विचारवंत करतात तेव्हा मन व्याकुळ होते. डॉ. कोठारी यांच्या महामंडळाने आणि सध्याचे केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन यांनी वास्तव भूमिकेवरून जो निर्णय सुचविला त्याचे होणारे विपर्यास पाहून कालपुरुष हसत असेल. सर्व जगाने मान्य करून रूढ केलेले सूत्र सांगताना देखील डॉ. त्रिगुण सेन यांना गांधीजी, टागोर, भावनात्मक ऐक्य, समिती आदींचा आधार घेऊन कळवळून बोलावे लागले हे कशाचे द्योतक ? दि. ११ ते १३ सप्टेंबर १९६७ या काळात दिल्लीत झालेल्या विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या परिषदेत, डॉ. त्रिगुण सेन यांनी केलेले उद्‌घाटनाचे भाषण अनेक दृष्टीने लक्षणीय, स्मरणीय आहे. पण आमच्या नम्र मते खरी अडचण पुढेच आहे. देशातील सामान्य जन आणि काही जाणकार यांच्या मनात एक मूलभूत घोटाळा आहे तो दूर झाला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यांची भाषिक शक्ती ( Language ability ) वेगळी असते. आपण एक किंवा अनेक भाषा शिकविण्याचा कोणत्याही सबळ कारणाने ठरविले तरी जो तो आपल्या कुवतीप्रमाणे हे भाषाप्रभुत्व संपादन करणार. सर्वांना एकाहून नव्हे तर एकाच भाषेत देखील प्रभुत्व संपादन करता येईल असे नाही. अत्यंत सामान्य भाषिक शक्ती असलेला विद्यार्थी आपली मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा कशीबशी शिकेल. तर कोणी अनेक भाषांत प्रभुत्व मिळवू शकतील. एकाच वेळी सर्वांना समान असे भाषाप्रभुत्व मातृभाषा, सखी किंवा ग्रंथालय भाषा ( ज्ञानभाषा ) यांत मिळवून देणे शक्य नाही. यातूनच पुढचा

महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो तो असा की शालेय शिक्षणाच्या शेवटी जी सार्वजनिक परीक्षा येणार ( कोठारी महामंडळाने १० वर्षे शालेय शिक्षणानंतर अशी परीक्षा यावी असे सुचविले आहे. ) तिला आपण किती भाषा **सक्तीच्या** करणार ? कोठारी महामंडळाची भाषा योजना स्वीकारली तरी सर्व तीनही भाषा आपण या **शालान्त** परीक्षेला सक्तीने ठेवणार काय ? याला जर होकारार्थी उत्तर असेल तर मग या देशातील माध्यमिक शिक्षणाचे दुर्दैव अजून संपले नाही असेच म्हणावे लागेल. माध्यमिक शिक्षण **भाषा-जड** आहे, हा महत्त्वाचा दोष दूर न झाल्याने माध्यमिक शिक्षण पुनः **भाषामयच** होणार. यासाठी आपण हे स्पष्ट म्हटले पाहिजे की या **शालान्त** परीक्षेला प्रत्येक विद्यार्थ्याने किती भाषा घ्याव्यात हे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर, मुख्याध्यापकाच्या त्या विद्यार्थ्यांच्या शालेय नोंदीवर ठेवावे. **एकच** भाषा घेऊन, मग ती कोणतीही घ्यावी, त्या विद्यार्थ्याला या शालान्त परीक्षेला बसता आले पाहिजे. **उच्च शिक्षणात भाषाभ्यास सक्तीचा नसावा ही कोठारी महामंडळाची सूचना अत्यंत स्वागतार्ह आहे.** तशी कोणतीही शिफारस या शालान्त परीक्षाबाबत सुस्पष्टपणे केलेली नाही. तशी असणे आवश्यक आहे. याचा अर्थ महामंडळाने सुचविलेल्या रचनेप्रमाणे **तीन** भाषा त्याला परीक्षेसाठी घ्याव्या लागणार. आमच्या मते या ठिकाणी विद्यापीठाच्या प्रवेशाचा विचार आणून हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा करून उपयोग नाही. **परीक्षेसाठी कोणतीही भाषा सक्तीची केली की ती महत्त्वाची ठरते हा लोकभ्रम आपण टाकून दिला पाहिजे.** भारतासारख्या अप्रगत देशात परीक्षाविषयक जो दृष्टिकोण आहे तो संपूर्ण निवळण्यास कालावधी लागेल. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी म्हणून जी भाषाभ्यासाची शक्ती खर्च केली जाते ती वाया न जाऊ देणे अगत्याचे आहे. मातृभाषा अगर प्रादेशिक भाषा, हिंदी किंवा इंग्रजी यांपैकी कोणतीही एक, दोन किंवा तीन भाषा घेऊन परीक्षेस विद्यार्थ्याला बसता यावे. ज्या कारणासाठी आपण या **तीन** भाषा स्वीकारल्या त्यांचा हेतू त्या परीक्षेला सक्तीच्या करून अधिक साध्य होणार नाही किंवा उणाही पडणार नाही. थोडे अधिक स्पष्ट बोलायचे तर हिंदी भाषा सक्तीची करून भावनात्मक ऐक्य वाढणार नाही, इंग्रजी सक्तीची करून अधिक ज्ञानभांडार उपलब्ध होणार नाही किंवा मातृभाषा अगर प्रादेशिक भाषा सक्तीच्या करून आविष्कारसामर्थ्य अधिक प्रगत होणार नाही. भाषा हे अखेर साधन आहे साध्य नव्हे हे कोठारी महामंडळाने म्हटले आहे ते सर्व भाषा सक्तीच्या करून खरे ठरणार नाही तर भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य देऊन सिद्ध होणार आहे. परीक्षेला भाषा सक्तीच्या केल्या की सारे वातावरणच, सारा मार्ग, सारी उद्दिष्टेच वेगळा संदर्भ घेऊन समोर उभी ठाकतात. यात ज्यांची भाषिक शक्ती बेताची आहे त्यांचा चुराडा होतो. कारण त्याला कोणतीच एक भाषा धडपणे येत नाही.

त्याला कमीत कमी मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा धडपणे आली तरी पुरे आहे. गरज निर्माण झाली तर तो दुसरी भाषा शिकेल. सर्वजणच विद्यापीठात जाणार नाहीत गेले तरी विद्यापीठाची बोधभाषा मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा आहे. त्यांच्या प्रगताच्या अभ्यासाचा मार्ग रोखलेला नाही. आपण त्याच्या हाती हिंदी व इंग्रजी या भाषांची साधने दिलेली आहेतच. जीवनात तो या साधनांचा उपयोग करील. हा विचार आमच्या मते प्रचंड निरक्षरता असलेल्या देशातील शिक्षण विषयक वास्तवतेचा गाभा आहे. यात अद्‌भुत असे काही नाही. हा जगात रूढ झालेला विचार आहे. याच्या बरोबरीने आपण हेही विसरता कामा नये की निरक्षरांना साक्षर करण्याचे कार्य आपण त्यांच्या मातृभाषेतून करणार आहोत. हिंदीतून नाही किंवा इंग्रजीतूनही नाही. या कामात विद्यापीठांनीही आता काला-नुरूप सहभागी होणे आवश्यक आहे. हे काम केवळ सरकारचे नाही, समाज-शिक्षणाचे नाही, सर्वांचेच आहे. या विचारांत भाषांच्या उच्च नीचतेचा संबंध नाही. या दृष्टीने भाषांचे शत्रुत्व नाही. राष्ट्रभाषा ( lingua franca ) कोणाला म्हणावे हा प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. १४ राष्ट्रभाषा मानलेल्या आहेत हे पालुपदही दर वेळी घोळवून सांगण्याची आवश्यकता नाही. ज्या क्षणी सर्व भारत शभर टक्के साक्षर होईल त्या वेळी या सर्व भाषा, आज प्रयत्न केले तर संपन्न राहतील. पण याकडे जे अक्षम्य दुर्लक्ष झाले त्याची पुनरावृत्ती करून चालणार नाही. ही दुरवस्था का झाली याचीही नोंद करणे आवश्यक आहे.

१९३७ साली देशातील सर्व राज्यांत माध्यमिक शिक्षण त्या त्या प्रादेशिक भाषेतून देण्यात प्रारंभ झाला. त्या वेळी पाठ्य-पुस्तके, शिक्षक अशी कोणतीही अडचण निर्माण करून सुदैवाने या सुधारणेला विरोध झाला नाही. सर्वांनी ही योजना अमलात आणण्यास प्रारंभ केला. त्याच वेळी देशातील विद्यापीठे या प्रश्नावर स्वस्थ बसून राहिली. यापुढे विद्यापीठांत येणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व विषय इंग्रजीतून शिकविणे, विद्यार्थ्यांनी ते नीट आकलन करणे हे शक्य होणार नाही हे विद्यापीठांशी संलग्न असणाऱ्यांनी हेरणे आवश्यक होते. याकडे लक्ष दिले गेले नाही. १९३७ ते १९४७ हा कालखंड अनेक घटनांनी गजबजून गेला. दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यलढे यांनी हा काळ व्यग्र झाला. इंग्रजी राजवटीला व विद्यापीठांतील पारंपरिक दृष्टीच्या अध्वर्यूंना या प्रश्नाबद्दल कसलीच चिंता नव्हती. १९४८ पासून जी नवी प्रादेशिक विद्यापीठे ( Regional universities ) निर्माण झाली, त्यांचे ध्येय जरी प्रादेशिक भाषा व संस्कृतिसंवर्धनाचे होते तरी वास्तवात हीही विद्यापीठे आपले वेगळेपण निर्माण करू शकली नाहीत. १९४८ ते १९६७ या १९ वर्षांच्या कालखंडात प्रादेशिक विद्यापीठांनी प्रादेशिक भाषांच्या साठी जे केले ते इतके अत्यल्प किंवा अगण्य आहे की त्याचा निर्देशही करता येत नाही. बहुतेक विद्यापीठांची बोधभाषा इंग्रजी राहिली आहे.

ग्रंथ-निर्मितीचे, प्रादेशिक भाषेतील प्रयत्न तर अत्यंत तोकडे झाले, किंबहुना झालेच नाहीत. इकडे माध्यमिक शिक्षणात, विशेषतः महाराष्ट्रात-इंग्रजी भाषेसंबंधी जे धरसोडीचे धोरण स्वीकारले गेले ते क्षणभर बाजूला ठेवूनही असे विचारता येईल की, इतर विषयांच्या बाबतीत या विद्यापीठांनी द्रष्टेपण दाखविले काय? वस्तुस्थिती स्पष्ट. आहे की विद्यापीठांनी काहीही केले नाही. जे केले ते अधर्वट स्वरूपाचे, पूर्वग्रह मनात ठेवूनच. कोणी काही विषय प्रादेशिक भाषेत शिकवायला मान्यता दिली, कोणी फक्त उत्तर-पत्रिकाच प्रादेशिक भाषेत लिहायला परवानगी दिली, कोणी इंग्रजी व प्रादेशिक भाषा अशा जोड-भाषा अमलात आणल्या, कोणी प्रादेशिक भाषेतील ग्रंथलेखनाला अनुदाने द्यायला कशीबशी मान्यता दिली. हा सारा प्रयत्न अर्धवट झाला. शिक्षकांचे पूर्वग्रह, विद्यापीठ अधिकाऱ्यांच्या समजुती, विद्यापीठाशी संबंध आलेल्या इतर क्षेत्रातील व्यक्तींचे मनोगंड यामुळे या प्रादेशिक विद्यापीठांनी प्रादेशिक भाषांच्या विकासासाठी काहीही मनापासून, जिद्दीने, ध्येयवादाने, ईर्ष्येने पावले उचलली नाहीत. दाराशी आलेला विद्यार्थ्यांचा सागर हिंदकळत होता. त्यांना इंग्रजी बेताचे येत होते. इतर विषय प्रादेशिक भाषेतून या विद्यार्थ्यांनी शिकले होते. मग या प्रवाहावरच दगडफेक सुरू झाली. इंग्रजी कच्चे हा पहिला दगड फेकला गेला. शिक्षक प्रादेशिक भाषेतून शिकवू शकत नाही, ही दुसरी कपारी भिरकावली गेली. प्रादेशिक भाषेत पुस्तकेच तयार नाहीत या विटा भिरकावण्यात आल्या! मग उच्च शिक्षणाच्या दर्जाचा अडसर आणून हा लोंढा थोपविण्याचे यत्न झाले. तशातच ग्रामीण भागात महाविद्यालये निघाली. ग्रामीण विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवेशद्वारी आले. हा दारुण इतिहास आहे. राष्ट्रीय एकता, भावनात्मक ऐक्य, कडवा प्रांतवाद, राजकीय सत्ता-स्पर्धा यांनी हे शिक्षणक्षेत्र यादवीचे क्षेत्र बनविले गेले. प्रादेशिक संस्कृतीसाठी तरी या प्रादेशिक विद्यापीठांनी काय केले? मराठे, पेशवे, मोगल यांच्या इतिहासाच्या अभ्यासाची, संशोधनाची दालने उघडली? वास्तुशिल्पाचा संघटित अभ्यास सुरू केला? लोककलांच्या रूपाचे संशोधन हाती घेतले? प्रादेशिक भूगर्भाचे, जमिनीचे, हवामानाचे अन्नधान्याचे, नव्या उद्योगांचे, अर्थव्यवस्थेचे, जाति-जमातींचे, संकेतांचे, धर्माच्या स्वरूपाचे संशोधन-समीक्षेचे काम हाती घेतले? या क्षेत्रातील अज्ञात अभ्यासकांना, संशोधकांना, संस्था-कार्यकर्त्यांना विद्यापीठात आणून त्यांच्या अंगीकृत उद्योगाचे महापर्व सुरू केले? दुर्मिळ झालेल्या ग्रंथांच्या नव्या स्वस्त, संपदित आवृत्त्या काढल्या? कलावंतांची गाणी, अभिनय, रंग-रेखन, शिल्प, यांचे संग्रह केले? वृत्तपत्रे, राजकारण, क्रांति-कार्य, समाज-प्रबोधन यांसारख्या कार्यात आयुष्य बरबाद करून अनिकेत, अप्रतिष्ठित, उपेक्षित राहिलेल्या व्यक्तींना पुनर्जीवन दिले? वस्तु-संग्रहालय ही चीज एका तरी प्रादेशिक विद्यापीठाने स्वीकार्य मानली का? देशातून हिंडणाऱ्या

किंवा परदेशाहून येणाऱ्या प्रवाशांनी, निरीक्षकांनी, संशोधकांनी आमच्या विद्यापीठांना भेटी देऊन काय पहायचे ? आम्ही त्यांना संस्कृतांची मानचिन्हे कोणती दाखविणार ? प्रत्येक प्रांतात अशा किती तरी संस्था व त्यांचे कार्यकर्ते आहेत की ज्यांची सक्रीय बूज विद्यापीठांनी राखली पाहिजे. सांस्कृतिक, वाङ्मयीन, संशोधन आदि कार्यात एक तर सरकारने काही तरी करावे किंवा जे खासगी प्रयत्न चालले आहेत ते पाहात बसावे ही विद्यापीठांची भूमिका नसावी. अगदी ताजे उदाहरण द्यायचे तर केशवसुत-जन्मशताब्दी राज्य सरकारने पुढाकार घेऊन साजरी केली हे आहे. शाळा-महाविद्यालये विद्यापीठे यांना फतवे काढून कार्यक्रम करण्याचे आवाहन केले. ही विद्यापीठांच्या दृष्टीने स्पृहणीय गोष्ट नाही. सरकारने हे फार मोठे कार्य केले अशा स्वसंतुष्ट वृत्तीने शासनानेही स्वतःलाच धन्य मानण्याचेही कारण नाही. ललितकलांचे सरकारी खाते चालविणे हे शासनाचे कार्यच नाही. विद्या, कला, संस्कृती, संशोधन, यांसारख्या क्षेत्रात स्वायत्त विद्यापीठांचे नेतृत्व हाच समग्र प्रबोधनाचा मार्ग आहे. विद्यापीठे, शासन, लोक आणि जीवन यांच्यातील परस्परसंबंधाविषयीच्या योग्य दृष्टिकोणावर हे मापन केले गेले पाहिजे.

ग्रामशिक्षणाच्या क्षेत्रात जगात जे कार्य झाले व चालू आहे त्याची धावती रूपरेषा या पुस्तकात आली आहे. याचा मुद्दाम निर्देश करण्याचे असे की, जगात या गोष्टी प्रथम **प्रयोग** ( Experiment ) म्हणून हाती घेतल्या गेल्या. एखादी धुरंधर व्यक्ती, संस्था त्यामागे होती. पूर्ण स्वातंत्र्य घेऊन हे प्रयोग केले गेले. मग त्याचे कठोर, वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले गेले. म्हणूनच त्या देशाची भूमी आणि लोकमानस यात ते प्रयोग रुजले गेले. या उलट परिस्थिती आपल्या देशात आढळते. आपल्याकडे प्रयोग करण्याचे स्वातंत्र्यच नाही. एखाद्या संस्थेने तसे करण्याचे ठरविले तर सरकार मुक्त हस्ताने मदत करायला तयार नाही. सधन लोकांना त्यात गोडी नाही, म्हणून त्यांचा हात आखडलेला. स्वातंत्र्यपूर्व-काळात परके सरकार म्हणून प्रयोग नाही, तर स्वातंत्र्यकाळात आपले सरकार म्हणून प्रयोग नाहीत. एखादी समिती, मंडळ, महामंडळ नेमले की, त्याने आधारभूत मानावा असा प्रयोगच नाही. मग केवळ शिफारसी. त्यांची अंमल-बजावणी सरकारी फतव्याने करायची किंवा त्या शिफारसी बासनात बांधून ठेवायच्या. धर्म-शिक्षण, नीती-शिक्षण, भाषा-शिक्षण, अभ्यासक्रम, पाठ्य-पुस्तके, शाळांच्या वेळा, इमारती अशा अनेक बाबतीत प्रयोग करून काही निश्चित अनुमाने बांधता आली असती. पण सारे उजाड आहे. जे संशोधन शिक्षण-क्षेत्रात उपलब्ध आहे त्याचे स्वरूपही त्यामुळे एकांगी राहिलेले आहे. डॉ. कोठारी महामंडळाने **श्रमानुभवाच्या** संदर्भात जे विवेचन केले आहे त्याच्या अखेरीस एक मोठे अर्थपूर्ण वाक्य आहे. भारतातील प्रयोगरहित

निर्मितीचे ते निदान आहे. डॉ. कोठारी महामंडळाच्या अहवालात पृ. २०१ ते २०३ मध्ये श्रमानुभवासंबंधी ( Work Experience ) विवेचन करण्यात आलेले आहे. त्यातील निर्देशनीय ओळी अशा :

" If in practice basic education has become largely frozen around certain crafts, there is no denying the fact that it always stressed the vital principle of relating education to productivity. " ( पृ. २०२ ).

पुढे ८. ७७ परिच्छेदात पहिलेच वाक्य येते ते असे : " We realize how difficult it is to make provision for the forward-looking type of work experience for every child. " ( पृ. २०२ ).

—आणि मग प्रत्येक राज्याने या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत असे आवर्जून सांगितले आहे. याच आठव्या प्रकरणाच्या शेवटी एक उपयुक्त कृती-कार्यक्रमाच्या उद्योगाची यादी जोडली आहे. ( पुरवणी टीप १. पृ. २१० ). श्रमानुभवासंबंधीच्या या साऱ्या विवेचनाला इतके तात्त्विक स्वरूप आले आहे की हा चोथा आता चावून चिकट झालेला आहे कारण १९३७ ते १९६७ या प्रदीर्घ तीस वर्षांत वस्तुनिष्ठ प्रयोगच झाले नाहीत की ज्यांच्या आधारावर वरील ओळींना वास्तवाचा भक्कम आधार मिळेल. याचा अर्थ भारतात शैक्षणिक प्रयोग करण्यास समर्थ संस्था किंवा व्यक्ती नाहीत असा नाही. या संस्थांनी वा व्यक्तींनी हे स्वातंत्र्य हिसकावून घेऊन, अनुदानाची, मान्यतेची पर्वा न करता कार्य केले असते तर ? शासनाने दूर दृष्टीने त्यांना हे आवश्यक स्वातंत्र्य दिले असते तर ? तर भारतात एखादा **निकोलाय ग्रंट्विग्**, एखादा **हंफ्रे बोमन**, एखादा **राल्फ् एच्. अली**, एखादा **हेन्री मॉरीस**, एखादा **ॲपोस्टोलोज् कोस्कीनिडेज्** खचित निर्माण झाला असता. या महापुरुषांनी सरकार, सत्ता, मान्यता यांना आपल्या पायाशी खेचून आणले. आपल्या प्रयोगांनी नव्या वाटा निर्माण केल्या. नवी क्षितिजे साकार केली. जगाला नवा प्रकाश दिला आणि आपण काय केले ? लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाची चतुःसूत्री समूर्त केली ? टागोरांच्या श्रीनिकेतन किंवा शांतिनिकेतनला स्वीकृत करून नव्या संस्था उभारल्या ? गांधीजींच्या मूलोद्योगी शिक्षणाची कोणती दशा करून टाकली ? कर्मवीर भाऊराव पाटील यांनी माळरानावर फुलविलेल्या निसर्गोद्यानाचे अनुकरण केले ? शंभर शंभर वर्षांची परंपरा असलेल्या देशातील संस्था आज ' जड ', ' चैतन्यहीन ', ' निर्मितीस अक्षम ', चाकोरीत रुतलेल्या; महामंडळाचा शब्द योजून बोलावयाचे तर ' Frozen ' का झाल्या ? महर्षी डॉ. कर्वे यांच्या

विद्यापीठाच्या पदव्यांना समान दर्जा ( Equivalence ) देण्यास देखील किती वर्षे खळखळ केली ? जी. ए. ( गृहीतागमा ), पी. ए. ( प्रदेयागमा ) या उपाधी देखील नावानेसुद्धा नकोशा होऊन. नामांतर का केले गेले? आजीव सेवक संघटना निर्जीव का झाली ? आपले सर्व अभ्यासक्रम काल-विसंगत का ठरले ? शिक्षणक्षेत्राशी निगडित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने अंतर्मुख होऊन विचार करण्यासारखे हे प्रश्न आहेत.

भारतासारख्या अप्रगत देशात शासनाने, मग ते मध्यवर्ती असो की राज्यशासन असो आपली भूमिका वारंवार तपासून घेतली पाहिजे. इंग्रज राजवटीने निर्माण केलेल्या शासनांतर्गत नोकरशाहीची लोकशाही शासनयंत्रणेत भूमिका कोणती हा प्रश्न आता पुन्हा एकदा घासूनपुसून सोडविला पाहिजे. एखाद्या मध्यवर्ती सरकारातील सचिवाला वाटले की, इंग्रजी भाषेने भारतात ऐक्य राखले, एकजिनसीपणा निर्माण केला आणि तदनुसार तो लोकप्रतिनिधी मंत्र्यावर जर स्वमत लादून फतवे काढू लागला तर त्याला रोखणार कोण हा सवाल आहे. इतर कोणी काय करावे हा प्रश्न वेगळा. इथे शिक्षकांनी त्याला रोखायला हवे. हे रोखण्याचे स्वातंत्र्य मागून मिळत नसते हे खरे. पण लोकशाहीचा, असे स्वातंत्र्य, ही स्वायत्तता तर प्राण आहे. स्वायत्तता ही केवळ विद्यापीठाची जन्मसिद्ध मत्ता आहे ही समजूत अव्याप्त आहे. शिक्षणातील प्रत्येक शिक्षणावस्थेला ही स्वायत्तता नैसर्गिक न्यायाने मिळालेलीच आहे. अशी स्वायत्तता संगोपन न केल्याने जे घडते त्याचा इतिहास म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षणाचा इतिहास आहे. भारतातील शैक्षणिक प्रशासनानेही नवी भूमिका मनोमन स्वीकारली आहे काय ? शासन खऱ्या अर्थाने शिक्षणाचे ‘ Operational Critic ’ झाले आहे काय ? शाळा–तपासणी–अधिकारी खऱ्या अर्थाने शिक्षकांचे मित्र, तत्त्वज्ञ-भाष्यकार व मार्गदर्शक झाले आहेत काय ? याचे वस्तुस्थिती निदर्शक उत्तर द्यायचे तर ते नकारार्थी द्यावे लागेल. ‘ सत्तेचे विकेंद्रीकरण केले ’ असे म्हणून सत्ता विकेंद्रित होत नाही. लोकशाहीत कोणत्याही दानापेक्षा सर्वश्रेष्ठ, मौलिक, कसोटी पाहणारे दान असेल तर ते **सत्तादान** होय. या सत्तादानात, शिक्षणाच्या संदर्भात बोलायचे तर प्रयोगस्वातंत्र्य अभिप्रेत आहे. आमच्या शिक्षण सोपानात हे कुठे आढळते ? याचा एक भयावह परिणाम असा झाला आहे की, सर्वत्र वैफल्याची भावना शिक्षणक्षेत्रात साचू लागली आहे. शिक्षकाला नुसता उपदेश करून हे वैफल्य जाणार नाही. जे नवनिर्मितीला उत्सुक आहेत त्यांच्या सर्जनशीलतेला आवाहन करणे, आव्हान देणे, भक्कम आधार देणे हे खरे शासनाचे काम आहे. राज्य सरकारचे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी उचलली याचा अर्थ खासगी प्रयत्नांतील प्रयोगांना बंदी झाली असा होणे हे शिक्षणाच्या विकासाच्या दृष्टीने मारक आहे. माध्यमिक शिक्षणातही राज्यसरकारचे किती बारीक–सारीक

गोष्टींवर देखील बंधन आहे याची यादी–देण्याची आवश्यकता नाही. आता तर सरकार माध्यमिक–शिक्षकांचा पगार अनुदान रूपाने देणार आहे. नियोजन ( Planning ) आणि एकपक्षीय राज्यकारभार ( Totalitarian Government ) या दोन्ही प्रकारच्या शासन व्यवस्थेतील फरकाची सीमारेषा अत्यंत तरल स्वरूपाची असते. आपण नियोजन स्वीकारिले याचा अर्थ स्वातंत्र्य नष्ट झाले असा होऊ लागला तर लोकशाहीच नष्ट झाली असे म्हणावे लागेल. माध्यमिक शिक्षणाची वाढ ज्या गतीने झाली ती गती कितीही स्तुत्य असली तरी त्या गतीला दिशा होती काय हा महत्त्वाचा प्रश्न होय. इतिहासाची साक्ष अशी आहे की या वाढीला दिशा नव्हती. अशा अवस्थेत सरकारने आर्थिक जबाबदारी स्वीकारली ही अभिनंदनीय घटना नाही. तो फार तर काळाने लादलेला आपद्धर्म म्हणू. पण म्हणून शिक्षणाच्या या विकासावस्थेत सरकार जर माध्यमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी घेत असेल तर ते युक्त ठरणार नाही. आता तर–पाठ्यपुस्तक ' निर्मिती मंडळ–स्थापन करून सरकार खोल पाण्यात शिरलेले आहे. इथेही तात्त्विक भूमिका नाही. स्वस्त पुस्तके, भरपूर पुस्तके, खासगी प्रकाशकांची मक्तेदारी हे प्रश्न या संदर्भातील गौण मुद्दे आहेत. गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके तयार करणे हा अधिकार सरकारनिर्मित स्वायत्त मंडळाचा का ठरावा ? इतर कोणालाही गुणवत्तापूर्ण पाठ्य–पुस्तके निर्माण करण्यास प्रतिबंध का असावा ? हे सारे कर्तृत्व त्या स्वायत्त–संस्थेमार्फतच प्रकट व्हावे ही अपेक्षा का ? आणि हीच मंडळाने निर्माण केलेली पुस्तके माध्यमिक शाळांतून वा प्राथमिक शाळांतून वापरण्यची सक्ती का ?

असे मंडळ स्थापून सरकार पाठ्य पुस्तकांच्या बाबतीत काही प्रयोग ( Experiments ) करणार असते व खासगी प्रयत्नांना अधिक डोळस बनविणार असते तर गोष्ट वेगळी होती. पण ही भूमिकाच नाही. खासगी प्रयत्नातून निर्माण झालेली पुस्तके बंद करून या संस्थेमार्फत पुस्तके तयार करून वापरायची येवढेच धोरण आणि हेच उद्दिष्ट. हे मंडळ पुस्तके तयार करील, खासगी प्रयत्नांतूनही पुस्तके निर्माण होतील, जे सरस असेल, जे गुणवत्तापूर्ण असेल ते निवडण्याचे स्वातंत्र्य का नाही ? पाठ्य-पुस्तक-योजना ही काय दूध-वाटप-योजना आहे का सहकारी भांडार आहे ? पाठ्य-पुस्तक लेखन ही एक निर्मिती ( Creative activity ) आहे हेच मुळी योजकांना ज्ञात नाही. उलट शासनाने ही संस्था एक **प्रयोगशाळा** ( Laboratory ) म्हणून स्थापन केली असती तर तिचे स्वागतच झाले असते. मग त्या संस्थेची संघटना ( Organization ) अगदी वेगळी झाली असती. मग या प्रयोगशाळेने प्रचलित पाठ्य–पुस्तकांचे संशोधन ( Research ), पृथक्करण ( Analysis ) हाती घेतले असते. ग्रामीण-नागरी विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीचा अभ्यास हाती घेतला असता. सर्वांना असे आवाहन केले असते की तुमची पाठ्य–पुस्तके आम्ही तपासून ( Diagnosis )

देऊ. आम्ही तुम्हाला सर्व सहाय्य करू. पण हे काहीही नाही. या मंडळाच्या पुस्तकांना मंजुरी ( Sanction ) कोण देणार ? या पुस्तकांची परीक्षा ( Testing ) कोण करणार ? सरकारने निर्माण केलेली ही स्वायत्त संस्था पुस्तके तयार करते, तिला मंजुरी कशाला ? ती पाठ्य–पुस्तके स्वीकार्यच होणार. या सर्व प्रक्रियेलाच शिक्षणाचे लष्करीकरण ( Regimentation ) म्हणतात. या पुस्तकांवर पुढे टीका झाली तर शासन टीकाकारांना लोकशाहीविरोधी म्हणणार. सामान्यजन निमूटपणे ही प्रतारणा, पहात बसणार. माध्यमिक शिक्षण क्षेत्रातले उरले-सुरले, पाठ्य पुस्तक-निवडीचे स्वातंत्र्यही हिरावून घेतले जाणार. ग्रामीण, नागरी विभागात सरसकट हीच पाठ्य-पुस्तके वापरली जाण्याने जे भयावह शैक्षणिक परिणाम होतील ते वेगळेच. एका असह्य तोचतोपणाचा ( Monotony ) जन्म या व्यापातून निर्माण होईल. विविधतेतून एकता हे सूत्र नष्ट होऊन एकांगी कंटाळवाणी एकता साऱ्या शिक्षणाला व्यापून राहील. तीच गोष्ट अभ्यासक्रमाच्या निर्मितीची. या नव्या संस्थेने मार्गदर्शक शोध-योजना ( Pilot study ) आधी हाती घेऊन, त्याची वस्तुनिष्ठ तपासणी करून ( Evaluation ) अभ्यासक्रम तयार करायचा का समिती नेमून अभ्यासक्रम तयार करायचा ? हा फार मूलभूत फरक आहे. ही दृष्टी सर्व जगाने स्वीकारलेली आहे. म्हणून जगात प्रयोग होत आहेत. आमची अवस्था प्रयोगशून्यतेची आहे. विद्यापीठीय क्षेत्रातही असे करण्याचा मनसुबा आहे असे ऐकिवात आहे. **मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नानासाहेब तावडे यांना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अशी पाठ्य–पुस्तके या पद्धतीने निर्माण करणे अहितकारक वाटते. त्यांनी स्पष्टपणे हे व्यक्त केले आहे. डॉ. कोलते, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु, यांनी, विद्यार्थ्यांना चांगली पाठ्य-पुस्तके मिळाली पाहिजेत, मग ती कोणीही तयार करावीत ही न्याय्य भूमिका मांडलेली आहे.**

हे सारे विस्ताराने सांगायचे कारण असे की, आमच्या भारतीय युवक-युवतींवर याचा फार विपरीत परिणाम होत आहे. माध्यमिक शिक्षण आणि विद्यापीठीय शिक्षण हे अनेकार्थाने युवक वृत्ती-निर्मितीचे, युवक-संगोपनाचे शिक्षण असते. नवी परिभाषा योजून बोलायचे तर हे कार्य उच्च प्राथमिक, माध्यमिक कक्षांतून होऊन ते पूर्ण व्हायचे. भारतातील माध्यमिक शिक्षणाचा इतिहास म्हणजे खासगी संस्थांचा ( Private agency ) इतिहास आहे. त्या संस्थांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही शासनाची भूमिका हवी. आर्थिक दावणीत या शाळा बांधल्या गेल्या तर त्यांची होत असलेली दुरवस्था शीघ्र गतीने प्रलयाप्रत जाईल. मग मागे येता येणार नाही. एकदा शासनाचा विळखा अंगावर बाळगण्याची सवय जडली की लोह-शृंखला देखील नूपुरासारख्या सह्य करण्याची खोड माणसाला

जडते. " दो आँखे बारह हाथ " या विख्यात हिंदी चित्रपटातील मुक्त केलेले सहा कैदी, रात्री मोकळ्या पायांनी झोप येत नाही म्हणून, कुदळी-फावडी, दोर, तिफण सर्वांच्या पायावर बांधून झोपतात. त्यांना नवे जीवन देण्याची प्रतिज्ञा केलेला तरुण जेलर आदिनाथ विचारतो, " बाबांनो, अरे हे काय ? " ते ओशाळून उत्तर देतात, " बाबुजी, यही हमारी बरसोंकी आदत है ! बिगर बेडी नींद नहीं आती ! "

पोटाला चिमटा घेऊन, सर्वस्वाचा त्याग करून, प्रसंगी हाताने शाळा सारवून, अत्यंत कमी वेतन घेऊन माध्यमिक क्षेत्र अनेक जातिवंत शिक्षकांनी वाढीला लावले. त्यांच्या असीम त्यागावर आज खासगी संस्थांच्या उत्तुंग इमारती, भव्य क्रीडांगणे उभी आहेत. काळाने आणि शासनाने त्यांना हतप्रभ करून टाकले हे कठोर सत्य आहे. आता शासन वर उद्‌धृत केलेले नवे उद्योग हाती घेऊन त्यांना पूर्ण बंदीवान करून टाकीत आहे. याचा परिणाम असा झाला आणि यापुढे होईल की, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्यातील उरले-सुरले नेतृत्व पूर्णपणे लयाला जाईल. आजचे हे शिक्षक प्रभावी ठरत नाहीत त्याचे हे खरे कारण आहे. वन्य:प्राणी सप्ताह, यू. नो. दिन, अल्पबचत-योजना, साधु-संत-नेते यांच्या जन्म-मृत्यू शताब्दी, नाट्य-स्पर्धा, वन-महोत्सव, एकात्मता दिन, फ्लॅग् डे, अशा अनंत गोष्टी फतव्यांच्या ( Circular ) साहाय्याने अमलात आणण्याची शासनाची रीत आहे. त्यात उत्स्फूर्तता, आवेश, उत्साह येणार कसा ? याचा परिणाम या शाळांना अगतिक करण्यात नाही का होणार ? हे सारे ज्यांच्यासाठी करायचे त्या कुमार-वयोमान अवस्थेतील ( adolescent period ) मुलां-मुलींना यात रस कसा वाटणार ? वाढत्या वयाच्या आणि अदम्य उत्साहाच्या या नव्या अंकुरांना आपल्या गोटात ओढायला युवक-चळवळीचे नेते टपलेले असतात. त्याला विशिष्ट तत्त्वज्ञान, राजकारण, गणवेष इत्यादी गोष्टींची जोड असतेच. ही तरुण मुले-मुली शाळेच्या बाहेरील संघटनांत जातात, त्या संघटनेला आपले सर्वस्व अर्पण करतात. भारतात गेल्या पाच वर्षांत युवकांनी काय केले याची नोंद ताजी आहे. युवक-संघटना आणि राजकीय पक्षांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष दडपण शिक्षणक्षेत्रावर कसे वाढत आहे हे अगदी स्पष्ट झालेले आहे. या साऱ्या घडामोडींत शिक्षक निष्प्रभ होऊन काम करीत राहातो किंवा एखाद्या संघटनेचा घटक बनून जातो. या विलक्षण गुंतागुंतीची एकदम उकल होणार नाही हे खरे. पण या कोंडीतून मार्ग तयार करण्याची सुरुवात शासनाने करणे आवश्यक आहे, नव्हे, ते शासनाचे कर्तव्य आहे.

डॉ. कोठारी महामंडळाच्या अहवालात विद्यार्थ्यांच्या कल्याणाबाबत जे विस्ताराने लिहिले आहे त्यात नवे असे काहीच नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठात एक स्वतंत्र प्रमुख ( Dean ) असावा अशी कल्पना मांडलेली आहे.

या संदर्भात एक मोठे विनोदी वाक्य आलेले आहे : " विद्यार्थ्यांमध्ये दिसून येणाऱ्या अनुशासनहीनतेची जबाबदारी अनेक घटकांवर आहे आणि विद्यार्थी, पालक, शिक्षक, राज्यसरकार व राजकीय पक्ष यांनी आपापली जबाबदारी नीट पार पाडल्याशिवाय अनुशासनहीनतेच्या प्रश्नावर परिणामकारक इलाज सापडणार नाही." या वाक्याने काय साधले ? परिस्थितीचे निदान झाले ? प्रत्येकाने आपापली जबाबदारी पार पाडायची हा नवा शोध आहे ? राज्य–सरकार व राजकीय पक्ष यांनी काय करायचे ? असे गोलमोल लिहावे लागले याचा अर्थच मूलभूत प्रक्रियेची कल्पना नाही. अनुभूती हा शिक्षणाचा प्राण आहे हे नुसते आकलन होऊन, मान्य होऊन चालणार नाही. अशी अनुभूती देण्याचे स्वातंत्र्य राज्यसरकार महाविद्यालय–शाळांना, आणि मुख्याध्यापक–प्राचार्य आपल्या शिक्षकांना देणार काय, हा प्रश्न आहे. आज प्राथमिक कक्षेपासून तो विद्यापीठीय कक्षेपर्यंतही अनुभूती दिली जात नाही हे वास्तव आहे. **सर्व प्रक्रियांवरून वरून खाली सर्व कार्यक्रम राबविण्याची प्रवृत्ती आहे, म्हणजेच प्रयोगशीलतेचे स्वातंत्र्य नाही.** सर्व अभ्यासानुवर्ती उपक्रम शिक्षक–प्राध्यापकांच्या आज्ञेने होतात. त्यात अनुभूतीला स्थान नाही. बरी–वाईट अनुभूती का होईना युवक–चळवळीचे नेते देतात. हे कृतीचे, जोषाचे, आव्हानाचे कार्यक्रम कोवळ्या मुलांना जबरदस्त आकर्षण ठरते. यातून विद्यार्थ्यांच्या संघटना पोसल्या जातात. आमचे सर्व अभ्यासानुवर्ती उपक्रम ( Co-Curricular activties ) शाळा, मुख्याध्यापक, महाविद्यालय, प्राचार्य, विद्यापीठ यांपैकी कोणाच्या तरी प्रतिष्ठेसाठी, बक्षिसासाठी, क्रमांकासाठी, लौकिकासाठी, शिक्षणाधिकाऱ्यांच्या संतोषासाठी घडविले जातात. त्यात भाग घेणारे– विद्यार्थी मनाने वृत्तीने अलिप्त ( detached ) राहतात. या पोकळीतून, अकर्मातून अनुशासनहीनतेचा जन्म होतो. हा असंतोष राजकीय पक्ष का राबवून घेणार नाहीत ? बाबांनो, राजकारणापासून पवित्र शिक्षणक्षेत्र बाजूला ठेवा हा उपदेश करून ही प्रक्रिया थांबेल काय ? ' बंदी ' घालून हा प्रवाह रोखता येईल का ? विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य–सरकारने एक उपसमिती नेमली व या उपसमितीचा अहवालही नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. ( Report of the Sub-committee of the Maharashtra Srate University youth welfare committee, June 1967 )

महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांशी संलग्न असलेल्या २६७ महाविद्यालयां-पैकी फक्त ९० महाविद्यालयांनी अंगीकृत उपक्रमाबद्दल, विनंतीनुसार माहिती धाडली. कोणकोणते विविध उपक्रम या महाविद्यालयांनी हाती घेतले याचे वर्गीकरण अहवालाच्या शेवटी आहे. या उपसमितीने ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांतील पुढील एक पहा :

( ii ) No outside students' organization should be recognised and allowed to work within a college or university.

ही शिफारस का करावी लागली ? बाहेरील युवक-संघटना अशा मान्यतेची ( recognition ) वाट पहातात काय ? त्यांना परवानगी द्यायची नाही म्हणजे काय करायचे ? या अहवालाच्या प्रारंभीची महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण मंत्र्यांची प्रस्तावना, पृष्ठ ७ वरील Concept of student welfare, पृ. १२ वरील Teacher Orientation या व इतरत्र ठिकाणी केलेल्या विवेचनात हे उपक्रम राबविण्याच्या स्वातंत्र्याचा, अनुभूती देण्या-घेण्याचा, दुर्दैवाने कोठेही उल्लेख नाही. संघटना ( Organization ) कशी असावी, घटना ( Constitution ) कशी असावी, कोणते उपक्रम हाती घेता येतील यासंबंधीचे सर्वज्ञात विवेचन आहे. याचा अर्थ असा की, आम्ही शिक्षणातील मूलभूत वास्तवाला अजूनही मोकळ्या मनाने सामोरे जात नाही. अजूनही सारा भर घटना करण्यावर आहे, संघटनेची चौकट ठोकण्यात आपण गर्क आहोत. या गोष्टी मामुली आहेत. संस्था-चालक मंडळावर प्रतिनिधी नेमून, विधीसभेवर ( Court ) प्रतिनिधित्व देऊन किंवा निवडणूक-पद्धती ठरवून युवकांचे प्रश्न सुटणार नाहीत. या गोष्टी काळाबरोबर होतील. महत्त्वाचा प्रश्न अनुभूती देणार का नाही हा आहे. ही अनुभूती देण्याचे सामर्थ्य शिक्षकांत व्याख्याने ऐकून येणार नाही. त्यांना प्रत्यक्ष अनुभवच हवा. ही स्वायत्तता हवी. यासाठी शासनाने आपली भूमिकाच मुळापासून बदलली पाहिजे. मग ते शासन राज्य सरकारचे असो, विद्यापीठाचे असो, संस्था-चालकांचे असो, मुख्याध्यापकांचे असो की, प्राचार्यांचे असो. कारण अखेर शिक्षकाला सदैव विकास पावणाऱ्या मुलांशी रोज व्यवहार करायचा आहे. इथे त्याचे Orientation होणार आहे. संकुचित, सत्ता केंद्रित राजकारणापासून युवक-युवतींचे रक्षण, स्वायत्त, स्वतंत्र, प्रयोगानुकूल असे दैनंदिन अध्यापन करणारा शिक्षकच करू शकेल. त्याचे अवघे व्यक्तित्व प्रभावी, सामर्थ्यशाली घडावे असे वाटत असेल तर त्याला हे क्रियाशील स्वातंत्र्य हवे.

शाळा-महाविद्यलयातील युवक-युवती आणि त्याबाहेरील युवक-युवती उभयतांसाठी ग्रामीण परिसरातील महाविद्यालयांनी, जिल्हा परिषदांनी नव्याने अनेक शैक्षणिक उद्योग हाती घेणे अगत्याचे आहे. सामाजि कपहाणी ( Sociological survey ) प्रथम करून या युवक-युवतींची सर्वांगीण माहिती मिळवून त्या आधारावर सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांची आखणी करणे हे पहिले कार्य आहे. या पहाणीला केंद्रबिंदू मानून सर्व उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. या संदर्भात एका वैशिष्ट्याचा, जाणवणाऱ्या प्रवृत्तीचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. पुणे, मुंबई, नागपूर, यांसारखी शहरे सोडून दिली तर इतर ठिकाणी एक विलक्षण उत्साह ( Robust curiosity ) आढळून येतो. व्याख्याने,

कविसंमेलने, चर्चा, प्रदर्शने या बाबत एक विलक्षण ओढ आहे, अपूर्वाई वाटत आहे. पाहुण्या विद्वानांचे मनःपूर्वक आतिथ्य करण्याची ईर्षा आहे. या साऱ्या प्रबोधनाला ( awakening ) विचारांची स्थिर बैठक देणे अगत्याचे आहे. वास्तविक यासाठीच अनेक विद्यापीठांत बहिःशाल उपक्रम ( Extra mural activities ) हाती घेतलेले आहेत. पण विद्यापीठांतील व त्यांच्याशी प्रत्यक्ष निगडित असलेल्या विद्वानांनी या उपक्रमात केवळ नाममात्र भाग घेतलेला दिसतो. सामान्यतः बरे वक्तृत्व करणारी मंडळीच व्याख्याने देऊन या मंडळाचे कार्य करतात. या बहिःशाल मंडळांचे अहवाल जर लक्षपूर्वक अभ्यासिले तर ही वस्तुस्थिती कळून येते. शिवाय सारा भर व्याख्यानांवरच आहे हाही एकांगीपणा खुपणारा आहे. ग्रामीण भागांतील सर्व प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांना या मंडळांनी सदैव सचेतन राखणे, नवे विचार देणे, परीक्षण करणे हे खरे कार्य आज निकडीचे झाले आहे.

याच्या जोडीनेच ग्रामीण परिसरातील सर्व कक्षांतील शिक्षण-संस्थांना, म्हणजे प्राथमिक, माध्यमिक, तांत्रिक, महाविद्यालयीन इत्यादींना प्रत्यक्ष मार्ग-दर्शनाची, सहाय्याची गरज आहे. त्यासाठी अगदी नजीकच्या किंवा सोईस्कर केंद्रांतून किंवा त्या कक्षेतील विद्यापीठाने, शिक्षक-विनियम ( Exchange of teachers ) करणे ही अत्यंत निकडीची गरज आहे. या शिक्षण-संस्थांतून अननुभवी लोक आहेत एवढेच त्याचे कारण नाही. हे केवळ संघटनात्मक वा शासनात्मक ( administrative ) कार्य नव्हे. तर नव्या दृष्टिकोणाची जाणीव करून देणे ही तातडीची गरज आहे. अनेक पूर्वग्रहांनी येथील अध्यापन करणारा वर्ग ग्रस्त झालेला आहे. प्रतिष्ठा, ग्रंथालय, अध्यापन, सांस्कृतिक उपक्रम, सहकाऱ्यांशी वर्तन, इमारती, शैक्षणिक साधने, पोशाख, अभ्यासानुवर्ती उपक्रम यांसारख्या अनेक गोष्टींत केवळ मागासलेपणा नाही तर जबरदस्त मनोगंड मने व्यापून राहिलेले आहेत. हे काम जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांचेच केवळ नाही तर प्रगत शैक्षणिक संस्था व विद्यापीठातील विचारवंत यांचे आहे. विशिष्ट विषयांच्या अध्ययन-अध्यापनाच्या दृष्टीने तर हे उपयुक्त ठरेलच. पण एकूण सर्व प्रकारच्या, विशेषतः सांस्कृतिक मागासलेपणाच्या ( Cultural lag ) दृष्टीने हे अत्यंत उपकारक ठरणार आहे. सांस्कृतिक मागासलेपणा याचा सरधोपट अर्थ असा नव्हे की, नागर भाग अधिक सुसंस्कृत व ग्रामीण कमी सुसंस्कृत. यात यथार्थ, आधुनिक दृष्टीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. आर्थिक दृष्ट्या मागास देशातील हा दृष्टिकोणाशी निगडित असलेला प्रश्न फार मूलगामी आहे. याची काळजी घेतली नाही तर त्याचा परिणाम शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांवर होतो. हे विद्यार्थी केवळ पोषाखातच पुरोगामी ठरतात. पण त्यांची मने, सारी व्यक्तित्वे पूर्वग्रह, मनोगंड, यांनी शबल झालेली असतात. हा प्रश्न बौद्धिक कुवतीच्या

फरकाचा ( Intellectual ability ) नाही हे येथे स्पष्ट केले पाहिजे. असे वैचारिक वातावरण नसले आणि केवळ भौतिक सोयी ( उत्तम घरे, वीज इ० ) कितीही उपलब्ध करून दिल्या तरी मग उत्तम अध्यापक, मग तो कोणत्याही क्षेत्रातील असो, ग्रामीण परिसरात रमत नाही, एकरूप होत नाही. मनाने तो निर्वासित बनून काळ कंठतो व संधी आली की, शहराकडे वळतो. भौतिक सुखसोयींनाच, कळत-नकळत तो प्राधान्य देतो. शिक्षण-संस्थांचे विस्तृत जाळे ग्रामीण परिसरात विणणाऱ्या संस्थांनी वास्तू उभारल्या, फर्निचर आणले, क्रीडांगणे तयार केली, वसतिगृहे बांधली, पण हे बौद्धिक जीवन डोळसपणे संघटित करण्याकडे जितके लक्ष पुरवावे तितके पुरविलेले आढळत नाही. असे शैथिल्य आले की सत्तास्पर्धा, गट, स्थानिक राजकारण, असे तण वाढीला लागते, प्रदर्शनीयतेचा सोस आवडू लागतो आणि पुनरुज्जीवनाचे कार्य अधू बनत जाते. ग्रंथालय आणि प्रयोगशाळा नुसत्या बांधून उपयोगी नाही. त्यांचा मूल हेतू कृति-द्वारा सर्वत्र रूढ केला गेला पाहिजे. **स्वर्गीय डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील नेहमी म्हणत असत, "या ग्रामीण मुलांची मने मला नांगरून काढायची आहेत."** फार अर्थपूर्ण हे उद्गार आहेत. म्हणूनच वाचन, मनन आणि प्रयोग या प्रस्थान-त्रयीवर शिक्षणाचे भविष्य विसंबून आहे. म्हणूनच शैक्षणिक क्षेत्रातील प्रयोग-स्वातंत्र्याचे नवे युग आता सुरू केलेच पाहिजे हे विस्ताराने चर्चिले. असो.

नीलकंठ प्रकाशनाचे संचालक श्री. दामूअण्णा रानडे यांनी आपुलकीने हे प्रकाशन हाती घेतले; सुलभ मुद्रणालयाच्या कामगार-बंधूंनी आणि त्यांचे व्यवस्थापक श्री. राजाभाऊ सरनाईक यांनी तत्परतेने मुद्रण-व्यवस्था केली; श्री. शंकरराव बर्वे यांच्यासारख्या स्नेह्याने सूची-सहाय्य करून पूर्णता येण्यास सहाय्य केले. या सर्वांबद्दल नम्र कृतज्ञता आम्ही व्यक्त करतो. शिक्षणक्षेत्रात आपले सर्वस्व वेचून कार्य करणारे कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना ही कृती सादर करण्याचा योग आला ही भाग्याची गोष्ट आहे.

मित्रहो, हितगुज संपले. आमचा प्रयत्न आपल्याला रुचेल ही आशा.

पुणे
२ नोव्हेंबर, १९६७
बलि-प्रतिपदा.

**चंद्रकुमार डांगे**
**चंद्रकान्त इंदापूरकर**

♣ ♣ ♣

# अनुक्रमणिका


**प्रस्तावना** पाच–एकवीस

१. **भारतीय जीवनप्रवाह** १–१२

महान देश, महान परंपरा – जागे झालेले खेडे – वेगळीच तऱ्हा – मूलभूत प्रश्न – नेतृत्वाकडून अपेक्षा – अडचणींच्या राशी – वर्धा शिक्षण योजना – सर्वोदय आणि समाज – शाळा – समाजकेंद्र.

२. **ग्राम-शिक्षणाची उद्दिष्टे व समस्या** १३–२३

आंग्लपूर्व कालीन ग्रामशिक्षण – आंग्लकालीन ग्रामशिक्षण– चुकीची उद्दिष्टे – यातील दोष – नवी उद्दिष्टे – शैक्षणिक संधीची समानता – शहराकडे वळणाऱ्या ओघाला प्रतिबंध– नवे नेतृत्व – नवा दृष्टिकोण – ग्रामीण पुनर्रचना– सामाजिक क्रांती –समृद्ध ग्रामजीवन – मूळ उद्दिष्टे अभिन्नच – ग्रामशिक्षणाची समस्या.

३. **भारतीय ग्राम-शिक्षणाची पार्श्वभूमी** २४–४३

पार्श्वभूमीच्या अभ्यासाची आवश्यकता – भारतीय ग्राम : ऐतिहासिक परंपरा – ब्रिटिशांचे धोरण – पंचायतीवर आघात – ग्रामीण विकासाबाबत अनास्था व दुर्लक्ष– स्थानिक स्वराज्य – एक मृगजळ – एक विरोध – वाढती लोकसंख्या–ग्रामीण आरोग्य–ग्रामीण आर्थिक परिस्थिती– ढासळणारी कुटुंब व जातिव्यवस्था – ग्रामीण जनता व धर्म – ग्रामीण जनता व राजकारण – ग्रामीण जनता – काही विशेष – ग्रामीण शिक्षणाची आवश्यकता

४. **आंग्लकालीन ग्राम-शिक्षण** ४४–६४

ग्रामीण शिक्षणाकडे दुर्लक्ष – दुर्लक्ष होण्याची कारणे– ग्रामशिक्षणाकडे दुर्लक्ष – शैक्षणिक कारणे – हीन अनास्था– शिक्षणखात्याची व खासगी संस्थांची – ग्रामशिक्षणाचे सरकारी प्रयत्न – ग्रामीण पुनर्रचनेचे सरकारी प्रयत्न–

गुरगाव येथील ब्रायन यांचा प्रयोग – व्ही. टी. कृष्णम्माचारी यांचा प्रयोग – कोसंबा केंद्र – काही निष्कर्ष – महात्मा गांधी व ग्रामीण पुनर्रचना – रवींद्रनाथ टागोर व ग्रामशिक्षण श्रीनिकेतन येथील प्रयोग – ख्रिश्चन मिशनरी व ग्रामीण पुनर्रचना – ग्रामीण पुनर्रचनेचे आणखी काही खासगी प्रयोग – खासगी प्रयत्नांचे समालोचन.

५. **प्रचलित ग्रामशिक्षण** ६५–७८

स्वातंत्र्योत्तर कालातील नवा उत्साह – सर्वोदय व फिर्का योजना – टाना येथील मार्गदर्शक विकास प्रयोग–निलखेरी येथील प्रयोग – सामूहिक विकास व राष्ट्रीय विचार योजना – उच्च ग्रामशिक्षण – ग्रामीण माध्यमिक शिक्षण – ग्रामीण प्राथमिक शिक्षण – ग्रामीण बालशिक्षण ग्रामशिक्षण व ग्रामजीवन

६. **बदलत्या ग्रामजीवनाचे स्वरूप** ७९–९२

पहिली पंचवार्षिक योजना – योजनेचे उद्दिष्ट – योजनेचे कार्यक्रम – योजनेचे प्रशासन – ग्रामपंचायतीचे कार्य– सहकारी संस्था – ग्रामीण शाळा – नवी ग्रामरचना.

७. **परदेशातील ग्रामशिक्षण** ९३–११४

अमेरिका – सोव्हिएट रशिया – इंग्लंड – फ्रान्स – डेन्मार्क– ऑस्ट्रेलिया – मेक्सिको – लॅटिन अमेरिका व फिलिपाईन्स– समीपस्थ व मध्यपूर्व – इराण – ग्रीस – लेबानन – अल्बानिया– अदबानिया – पॅलेस्टाइन – निष्कर्ष.

८. **ग्रामशिक्षक** ११५–१२६

वाढती जबाबदारी – अनेक अडचणी – खेड्याचे चित्र– आवश्यक गुण – व्यावसायिक गुण – वैयक्तिक गुण– शाळेतील विविध कार्यक्रम – शालेय नियोजन – एक समस्या – ग्रामशिक्षकाचे प्रशिक्षण – सेवांतर्गत मार्गदर्शन.

९. **नवी क्षितिजे** १२७–१३८

ग्रामनेते व ग्रामशिक्षक – ग्रामीण शाळा – सहकारी संस्था ग्रामपंचायत व विकेंद्रीकरण – लोकशाहीच्या मूलतत्त्वांचा प्रसार – ग्रामदान व ग्रामदान व समाजविकास – ग्राम-

शिक्षणाचा कारभार – भारतीय विद्यापीठे व ग्रामशिक्षण– शेतकी महाविद्यालये व ग्रामशिक्षण – मंदिरांचा सदुपयोग– जुन्या परंपरा – नवी वळणे – नवा उत्साह – नवी दृष्टी ग्रामोद्धाराची चळवळ.

१०. **ग्रामीण विद्यापीठे** १३९–१५६

पूर्वेतिहास – दोन लक्षणीय घटना – विद्यापीठ शिक्षण महामंडळ – ग्रामीण उच्च शिक्षण-समितीच्या महत्त्वाच्या शिफारशी – ग्रामीण विद्यापीठाचा कारभार – शिक्षण महामंडळ–शिक्षण आणि उत्पादन–शेतकी तंत्र विद्यालये– शाळेतील शेती-शिक्षण – विकास प्रसार कार्यक्रम– भारतीय शेती-संशोधन मंडळ व विद्यापीठ अनुदान मंडळ यांचे कार्य – विद्यापीठांची उद्दिष्टे – नवी भूमिका– युवकांचे शिक्षण – ऐतिहासिक पार्श्वभूमी – महाराष्ट्र राज्य युवक कल्याण समितीच्या महत्त्वाच्या शिफारशी – विद्यापीठाची बोधभाषा – नवे आव्हान.

११. **परिशिष्टे** १५७–१८२

भारतातील ग्रामीण उच्च शिक्षण-संस्था.

१२. **सूची** १८३

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

भारतीय

# ग्राम-शिक्षण

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ........................ दि: ..................
... ........................ नोंद दि: ..................
नों. क्र. १५६८४

# भारतीय जीवन-प्रवाह : १

## महान देश, महान परंपरा

भारतीय जीवनातील कोणत्याही गोष्टीचा सहज विचार करायचा म्हटला तरी हजारो वर्षांच्या प्राचीन परंपरेचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. कला, तत्त्वज्ञान, धर्म, इतिहास आदि जीवनाची अंगोपांगे खोलवर दूर कुठे तरी मूळ धरून बसलेली आहेत. शिक्षणक्षेत्र याला अपवाद नाही. सुमारे तीन हजार वर्षांचा प्राचीन काल वैदिक काल, उपनिषद्-सूत्रकाल, धर्मशास्त्रकाल आणि पुराणे व निबंधकाल अशा चार स्थूल विभागांनी निर्देशित केला जातो. आठव्या शतकात मुसलमानांचा भारतात प्रवेश झाला आणि भारतीय संस्कृतीच्या प्रवाहात कल्लोळ निर्माण झाले. परदेशी फिरंगी, व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचे स्थित्यंतर इंग्रजी राजवटीत झाले. सुमारे दीडशे वर्षे परकीय अमलाखाली राहिलेल्या भारतीय जीवनात न भूतो न भविष्यति अशी उलथापालथ झाली. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र देश झाला. आशियातील एक महान देश, प्राचीन परंपरा असलेला देश, समृद्ध खंडप्राय देश म्हणून साऱ्या जगाचे लक्ष भारताकडे लागले असल्यास नवल नाही. तशात गेल्या अठरा वर्षांत भारताने स्वीकारलेल्या लोकशाही जीवनप्रयोगाने तर, पाश्चिमात्य लोकशाही देशांचे लक्ष, पूर्वेकडील फार मोठे आशास्थान म्हणून

भारताकडे लागले. अगदी अलिकडे चीन आणि पाकिस्तान या देशांनी चालविलेल्या आक्रमणामुळे तर भारतीय जीवन पुनः एकदा अस्थिर झाल्याचा प्रत्यय येत आहे.

विविध धर्म, भाषा, जाती, प्रांत, रूढी, आचार-विचार या सर्वांनाच काळाने आव्हान दिलेले आहे. या छोट्या-मोठ्या संघर्षातूनच भावनात्मक ऐक्याचा मूलभूत प्रश्न निर्माण झाला. अखिल मानवजातीला भयानक रक्तपातापासून, नव्हे मानवाच्या केवळ अस्तित्वालाच नख लावणाऱ्या परिस्थितीपासून वाचवावयाचे असेल तर शांततामय सहजीवनाचे तत्त्व स्वीकारले पाहिजे या दृढ श्रद्धेने भारतीय शासनाने अलिप्ततेचे कठोर व्रत स्वीकारले. त्याचबरोबर अंतर्गत जीवन बळकट आणि समृद्ध व्हावे म्हणून योजनाबद्ध विकासाचे नवे कंकण हाती बांधले. भारताच्या संकल्पांना सिद्धी लाभावी म्हणून साऱ्या जगाने मदतीचे हात पुढे केले. विज्ञानाच्या अपूर्व क्रांतीमुळे एक छोटे घरकुल झालेल्या जगात अशी प्रतिक्रिया होणे साहजिक होते. या नव्या संदर्भात अनंत नव्या कल्पना, नवी आयुधे, नवी सामग्री, नवी नाणी, नवे विचार यांच्या राशी भारताच्या प्रांगणात ओतल्या गेल्या. पण या सर्वांपेक्षा देशोदेशींची जी माणसे आली, अमेरिकन, रशियन, जपानी, पोलिश, डॅनिश, जर्मन, इटालियन, आफ्रिकी, अरब, आदि विविध माणसे, तंत्रज्ञ, कारागीर, सल्लागार, शिक्षक, शेतकरी, प्राध्यापक, धर्मगुरु, व्याख्याते, तत्त्वचिंतक अशा विविध नात्यांनी आली त्यामुळे तर आमचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवन ढवळून निघाले. केवळ शहरेच नव्हेत तर दूरवरच्या खेड्यापर्यंत ही माणसे पोचली. आपले खाणे-पिणे, रीति-रिवाज, पोशाख, भाषा, विचार यांसारख्या गोष्टींत परदेशीयांनी नकळत नवा रंग भरला. लोकशाही जीवनमार्ग आणि प्रचंड परंपरांचे संचित यांचा मेळ कसा घातला जातो याचे नवे कोडे सारे जग सोडवीत आहे. विशेषतः भारतात ही सर्वंकश क्रांती कशी घडून येत आहे या कल्पनेनेच एक जबरदस्त विस्मयाचे वलय अखिल जगात निर्माण झालेले आहे.

## जागे झालेले खेडे

भूविस्ताराच्या दृष्टीने जगात सातवा आणि लोकसंख्येच्या गणनेने जगात दुसरा क्रमांक भारताचा आहे. १९६१ च्या शिरगणनेनुसार भारताची लोकसंख्या ४४ कोटींच्या जवळ पोचलेली आहे. विसाव्या शतकाच्या प्रथम वर्षात २४ कोटी लोकांचा हा देश आज ४४ कोटी लोकांचा देश झालेला आहे. ८१ टक्क्यांहून आधिक लोक खेडेगावांत राहातात तर सुमारे १८ टक्के लोकवस्ती शहर-गावात आहे. वरवर जरी आकडेवारी पाहिली तरी खेड्यांतून शहरांकडे जाण्याची वृत्ती वाढलेली दिसून येते. एकूण लोकसंख्येत २४ टक्के व्यक्ती साक्षर असून त्यांत

पुरुष ३४·५ टक्के आणि स्त्रिया १३ टक्के साक्षर आहेत. प्राधान्याने भारत हा ग्रामप्रधान देश आहे. या खेड्यांत कोंबड्याच्या आरवण्याबरोबरच कारखान्याचा भोंगाही जाग आणू लागला आहे. गावात पंचायत आली, कुठे कायमचा तर कुठे फिरता दवाखाना आला, फिरते चित्रपटगृह तंबू ठोकू लागले, मधूनच बिजलीचे दिवे लकाकू लागले, सहकारी दुकाने, सोसायट्या आल्या, रेडिओने आपले प्रस्थान मांडले आणि 'नभोवाणी शेतकरी मंडळे' स्थापन झाली, बहुतेक ठिकाणी एस्. टी. च्या मोटर-गाड्यांची वाहतूक रुळली, पाच वर्षांनी मतदान-केंद्राभोवती मतदारांच्या रांगा उभ्या राहू लागल्या, खादीच्या कापडाबरोबर टेरेलिन झळकू लागले, प्राथमिक शाळा आली आणि तालुक्याला महाविद्यालये उभी राहिली, इंजीन-दुरुस्ती करण्याची पाले बाजाराला दिसू लागली , चहा-कॉफी तर मुळून जुनी झाली, तयार कपडे शिंप्याच्या दुकानात दिसू लागले, सभा-समारंभातच नव्हे तर लग्न आणि इतर धार्मिक कार्यात लाउडस्पीकर गर्जू लागला, हिंदी चित्रपटातील नट-नटींची नावे आई-बाप पोरांना ठेवू लागले, जिल्हा पत्राबरोबर पुण्या-मुंबईकडील वर्तमानपत्रे मोफत वाचनालयात झळकू लागली, तुरळक का होईना बँकांच्या शाखा आल्या, खरेदी-विक्री संघ निघाले, थोड्या विकास पावलेल्या गावांतून कामगारांच्या मिरवणुका, कधी मोर्चे तर कधी संप घडू लागले, अशा एक ना दोन शेकडो गोष्टींनी भारतीय खेड्याला नवी जाग आलेली आहे. नवे वारे अंगावरून फिरू लागले आहे.

पण परंपरेची ओढ अजून पुरती ओसरली नाही. उरूस, जत्रा, पशु-बळी देणे, बाल-विवाह, शाळेत मुला-मुलींना न धाडणे, जमीन वा अन्य कारणांवरून जीव घेण्यापर्यंत होणारे पर्यवसान, भाऊ-बंदकी, जातिभेद, वाळीत टाकण्याची प्रथा, इंजेक्शन किंवा औषध न घेता—जडी-बुट्टीवर विसंबणे. संतती निर्मितीबद्दलची बेपर्वाई, सदभिरुची ओलांडून करणारी करमणूक, असे एक ना दोन प्रकार खेडेगावातून नाहीसे झालेले नाहीत. निर्धास्त जीवन सर्वत्र आले असे म्हणता येणार नाही. राजकीय स्वातंत्र्य आले तरी सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य पूर्णपणे साध्य झालेले नाही. शहर गावाकडे मोहरा करूनच तरुण पिढी वाढत आहे. रोजच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील स्त्री-पुरुषांची शक्ती शोषून घेतो आहे. कोरभर जमिनीची कशीबशी मशागत करून, कंत्राटी कामाची वाट पहात शेतकऱ्यांची कुटुंबे जीवन कंठीत आहेत. अवर्षण, रोगराई, अपमृत्यू, दरोडेखोरी यांसारख्या संकटाचे सावट पुरे नष्ट झालेले नाही. या साऱ्या वास्तव परिस्थितीचा परिणाम म्हणूनच की काय शिकून कर्तबगार झालेली तरुण-मंडळी सटीसामाशी आपल्या गावाकडे फेरी मारतात. पण त्यांचे मन स्थैर्य शोधीत असते ते शहरांतच.

## वेगळीच तऱ्हा

शहरात आणि शहरवजा गावात सर्व आबादी-आबाद आहे असा याचा अर्थ नव्हे. उद्योगधंद्यांनी गजबजलेल्या शहरात अफाट लोकसंख्या केंद्रित होऊन घरटंचाई, पाणी-टंचाई, बेकारी, गुन्हेगारी, जीवघेणी स्पर्धा, नकली आचार-विचार सामाजिक प्रतिष्ठेची अवास्तव जाणीव, धनसंचयाच्या जोरावर वैचारिक विनिमयावर आणि प्रस्थापित शासनावर दडपण आणणाऱ्या संघटना, सदभिरुचीला धाक घालणारे वाङ्मय आणि करमणूक, राजकीय पक्षांची प्रकट-अप्रकट भांडणे, यांसारख्या किती तरी गोष्टी मनःस्वास्थ्य बिघडवून टाकणाऱ्या आहेत. सर्व धर्म, जाती, वंश यांना उघडी असणारी उपाहारगृहे, रस्ता झाडणाऱ्यांना वेगळ्या कपबशा ठेवण्याची तरतूद इथेही करताना आढळतात. मांसाहार आणि ज्ञानेश्वरीचे प्रवचन करणे यात कसलाच विसंवाद न मानणारी मंडळी बुद्धिमंतांच्या मेळाव्यात सहज झळकतात. अत्यंत रंगेल चित्रपटाचा मुहूर्त सत्यनारायणाच्या पूजेने होतो तर कारखान्यातील नव्या इंजिनावर गुलालबुक्का उधळून नारळ फोडला जातो. विद्यापीठे आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपआपल्या राजकीय कार्यासाठीं उपयोगांत आणण्याचे प्रयत्नही इथे होताना दिसतात. रस्त्यावरील अपघात, रोगराई, अपमृत्यू, सार्वजनिक मारामाऱ्या, वृत्तपत्रीय टीका-प्रतिटीकेची सरबत्ती, या गोष्टीही कमी प्रमाणात नाहीत. जाति-भावना दबून तर कधी प्रकटपणे इथे उफाळताना दिसते. गाण्याच्या मैफली जितक्या गाजतात तितकीच गर्दी भजन-कीर्तनांनाही होते. विलक्षण गती आणि स्पर्धा यांमुळे शेजारधर्म विसरण्याची वृत्ती कळत, नकळत बळावत आहे. सामान्य नोकरवर्गापासून तो अगदी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्यापर्यंत सर्वांच्या ' युनियन्स ',—संघटना आहेत. वैयक्तिक सुख-सोई आणि हित यांना अग्रक्रम देऊन जीवन घडविण्याच्या उद्योगात बहुतेकजण मग्न आहेत.

## मूलभूत प्रश्न

या साऱ्या, मग ते शहरी जीवन असो वा ग्रामजीवन असो, परिस्थितीला वळण देण्यासाठी कोणती मूल्ये रुजविणे अगत्याचे आहे, कोणता ध्येयवाद अंगीकारणे इष्ट आहे, कोणती जीवनदृष्टी स्वीकृत करणे अपरिहार्य आहे, आणि हे कशाच्या साहाय्याने घडवावयाचे हा खरा प्रश्न आहे. हुकमशाही देशात कोणत्याही सुधारणा किंवा नियम सत्तेच्या जोरावर घडवून आणता येतात. अशा ठिकाणी कोणतेच व्यक्तिस्वातंत्र्य नसते याचा अनुभव सर्व जगाला आहे. तद्वतच केवळ कायद्याच्या बळावर सामाजिक सुधारणा करता येत नाहीत हेही इतिहासाने सिद्ध केलेले आहे. सर्वांच्या सहकार्याने नियोजनबद्ध विकास आणि नियोजित जीवनासाठी मानसिक आणि शारीरिक तयारी करणारे शिक्षण हाच मार्ग लोकशाही जीवनप्रणालीला

पूरक ठरतो. राष्ट्रसंघटनेने शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क मानलेला आहे, तर प्रौढांच्यासाठी समाज-शिक्षणाचे नवे दालन उघडले गेले आहे. औपचारिक (Formal) आणि अनौपचारिक (Informal) अशा दोन्ही मार्गांनी जनतेला शिक्षण देणे क्रमप्राप्त कर्तव्य ठरते. भारताने गेल्या सतरा वर्षांच्या कालखंडात या दृष्टीने कोणते उपक्रम केले त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

| | शिक्षणावर एकूण खर्च |
|---|---|
| पहिली पंचवार्षिक योजना ... | १३३ कोटी रुपये |
| दुसरी पंचवार्षिक योजना ... | २२१ कोटी रुपये |
| तिसरी पंचवार्षिक योजना ... | ४०८ कोटी रुपये |

भारतातील ग्रामीण विभागाच्या विकासासाठी २ ऑक्टोबर १९५२ रोजी समाज-विकास कार्यक्रम (The Community Development Programme) हाती घेतला गेला. ग्रामविकासाच्या कार्यक्रमासाठीं पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना मिळून २३५·५७ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ३२१·९ कोटी रुपये या कार्यक्रमासाठी राखून ठेवण्यात आले. १२ जानेवारी १९५८ रोजी लोकशाही विकेंद्रीकरणाचा कार्यक्रम (Democratic Decentralization) स्वीकृत करण्यात आला आणि पंचायत, सहकारी पेढी आणि शाळा या तीन प्रमुख केंद्रांद्वारा प्रत्येक खेड्याचा विकास घडवून आणण्याची योजना कार्यवाहीत आणली गेली. या तीन केंद्रांशी महिलामंडळ, युवक मंडळ, शेतकरी मंडळे, कामगार-मंडळे इत्यादी उपयुक्त संघटनांचा दुवा जोडण्यात आला.

हा सारा प्रपंच करण्यामागे हेतू असा की, केवळ राजकीय समता, मतदानाचा हक्क, येवढ्यापुरतीच लोकशाही मर्यादित न राहता, सामाजिक व आर्थिक जीवनातही प्रत्येकाला सहभागी होण्याची संधी लाभून, लोकशाही जीवन अवलंबिण्याची संधी मिळावी. लोकशाही वृत्तीची मने तयार करणे हा प्रधान हेतू आहे हे स्पष्ट आहे. आणि याच ठिकाणी कसोटी आहे ती सुशिक्षितांची, नेत्यांची व शिक्षकांची.

### नेतृत्वाकडून अपेक्षा

भारतातील लोकसमुदायाची विविधतापूर्ण रचना, (भाषा, धर्म, इत्यादी प्रकारची विविधता) लक्षात घेऊनही प्रत्येक व्यक्तीला एकाच सामाजिक, आर्थिक राजकीय न्यायाने वागविणे हे महत्त्वाचे आहे. अत्यंत कठोरपणे या व्रताचे पालन केले गेले तर हरघडी उफाळणारी जातीयता, धर्मांधता, राजकीय संधिसाधुपणा जाऊन सर्वांच्याच मनात समानतेबद्दल एक विश्वास निर्माण होईल. त्याचप्रमाणे प्रांतनिष्ठा ही अखेर भारत निष्ठेपेक्षा केव्हाही गौण, दुय्यम मानूनच त्या निष्ठेचे

संवर्धन होणे अगत्याचे. म्हणजे भाषावादाला मूठमाती मिळून प्रांताप्रांतातील हेवेदावे, कलह निरास पावतील. मध्ययुगीन समाजजीवनावर **धर्माचे** संपूर्ण वर्चस्व होते. गेल्या तीनशे वर्षांच्या इतिहासात **राष्ट्रवाद** आपली सत्ता गाजवीत आहे. परंतु जगाच्या बदलल्या स्वरूपामुळे जी नवी युगकल्पना अपरिहार्यतेने सर्वांनाच स्वीकारावी लागली आहे, ती आंतरराष्ट्रीय जीवनाची, एक-जगाची कल्पना, सहजीवनाची कल्पना आणि आपला राष्ट्रवाद यांतील अनुसंधान कधीही दृष्टीआड होता कामा नये. इंग्रजांचे राज्य असताना ज्याप्रमाणे सारे प्रांत, सारी जनता एकरूप होऊन लढ्यास सिद्ध झाली होती, तीच एकता, तेच भावनात्मक ऐक्य नव समाजरचनेत राखणे ही आजची सर्वांत मूलभूत अशी गरज आहे. ही दृष्टी म्हणजेच विज्ञानप्रणीत किंवा शास्त्रीय दृष्टी होय. वास्तवाचे कठोर पृथक्करण करून मग कार्यपद्धती अवलंबिणे हे तर विज्ञानप्रणीत दृष्टिकोणाचे सूत्र. हे सूत्र आज पुनः स्थापित करणे हे नेत्यांचे कर्तव्य होय. केवळ आपल्या वैयक्तिक जीवनात गुरफटून न बसता राष्ट्रासाठी या दृष्टीने मानवी संबंध डोळ्यात तेल घालून जपणे हे सुशिक्षितांचे ध्येय हवे. शिक्षक हा विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तीन घटकांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे नेतृत्व करीत असतो. त्याने हीच दृष्टी स्वीकारून प्रत्येक पाऊल टाकले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासात प्रत्येक घटकाने जसा आपला देकार दिला तशीच आहुती नवभारताच्या निर्मितीत प्रत्येकाने टाकणे हे ओघानेच क्रमप्राप्त होते. असा देकार, अशी आहुती टाकण्यास स्फूर्ती मिळावी, संधी मिळावी, बळ यावे म्हणून तर लोकशाही जीवनपद्धतीचा स्वीकार आपण केलेला आहे. कारण लोकशाहीतच्च हे शक्य असते. अशा डोळस दृष्टीचे संवर्धन व्हावे म्हणून तर लोकशाही विकेंद्रीकरणासारखा अत्यंत मूलगामी पण कठीण प्रयोग हाती घेतला गेला आहे. इथे प्रत्येक व्यक्तीला असे नेतृत्व करण्याची संधी लाभेल. हे नवे नेतृत्व, नव्या जाणिवांनी समृद्ध होऊन नवी समाजघडी बसवील, नवे परिवर्तन घडवून आणील. भाषा, प्रांत, जाती, धर्म, रूढी, परंपरा, या साऱ्या विविधतेतून एकता निर्माण होईल. हे सारे आमूलाग्र बदलणे हेच भारतीय शिक्षणाचे साध्य आहे. आणि तेहि ग्रामशिक्षकाच्या संदर्भात. कारण, भारत हा मूलतः ग्रामप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी हा ऊर्जस्वल क्रांतीचा अग्रदूत आहे.

## अडचणींच्या राशी

वाढती लोकसंख्या, अपुरे उत्पादन, द्रव्यटंचाई, तज्ञ कारागिरांचा अभाव, प्रगतीबद्दलची अनास्था व अज्ञान यांसारख्या अडचणी सर्वच प्रश्नांच्या मार्गात उभ्या आहेत. या अडचणींचा शिक्षणावरही परिणाम होतोच. यांच्या

जोडीनेच गळती ( Wastage ), कुचंबणा ( Stagnation ), निरक्षरत्व येणे, तज्ज्ञ शिक्षकांचा अभाव, अयोग्य शालागृहे, अविकसित अभ्यासक्रम, जीर्ण अध्यापन-पद्धती, असे खास किती तरी दोष शिक्षणाच्या विकासात आणि प्रसारात अडथळे आणीत आहेत. भौतिक आणि मानवी अशा दोन्ही प्रकारांची अपूर्णता सर्वत्र आढळते. या साऱ्या अडचणींचा निरास एकदम करता येणार नाही हे उघड आहे. महात्मा गांधीजींनी हे कठोर वास्तव समजून घेऊन मूलोद्योगी शिक्षणाचा उपक्रम हाती घेतला. वर्धाशिक्षण-योजनेचा विचार या संदर्भात, पुनर्रचनेच्या दृष्टीने अपरिहार्य ठरतो. कारण शिक्षणाद्वारे नवसमाज निर्मिती करण्याचा तो पहिलावहिला अखिल भारतीय पातळीवरून केलेला यत्न होता.

## वर्धा-शिक्षण-योजना

इंग्रजांचा अंमल या देशात स्थिर झाल्यानंतर ज्या अनेक प्रवृत्ती संथपणे विकसित होत गेल्या त्यांत ' राष्ट्रीय शिक्षण ' ही एक विशेष निर्देशनीय होती. १८५४ साली वूड्सच्या खलित्यानुसार इंग्रजी राजवटीने शिक्षणाच्या शासनाची नवी परंपरा निर्माण केली. परंतु शिक्षणविषयक धोरण यापूर्वीच आखले गेलेले होते. " लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारची नाही." हे त्या धोरणाचे सूत्र होते. यातून ' पाझर पद्धती ' ( Downward Filtration Theory ) उदय पावली आणि शिक्षणकार्याला प्रारंभ झाला. या प्रचलित शिक्षणावर जे अनेक आक्षेप घेतले जात होते, त्यात अत्यंत मूलभूत आक्षेप असा होता की, हे शिक्षण व्यक्तीला ' स्वावलंबी ' बनवीत नाही. गांधीजींनी १९२० पासून या देशातील शिक्षणाचा एकूण रोख अनुभवला होता. त्या शिक्षणाच्या मर्यादाही त्यांच्या लक्षात आलेल्या होत्या. भारतातील अठरा विश्वे दारिद्र्य आणि अज्ञान याचे भयानक मानसिक आणि शारीरिक परिणाम गांधीजींनी अवलोकन केलेले होते. याबरोबरच त्यांच्या मनन–चिंतनातून समाजरचनेचे विशिष्ट स्वरूपही स्थिर होत होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या महान् उद्योगात, जनतेची मने शिक्षणाने जागी केली पाहिजेत यावर त्यांची श्रद्धा होती. हे शिक्षण भारताला एकाच वेळी सर्वत्र कसे उपयुक्त ठरेल याचाही ते विचार करीत होते. जी जीवनमूल्ये त्यांनी उराशी बाळगून जतन केली, त्या मूल्यांची घडण भारतीय जनमानसात शिक्षणाने केली पाहिजे हा त्यांचा सततचा प्रयत्न होता. एकीकडे राजकीय चळवळींच्या लाटा निर्माण करून गांधीजी कार्य करीत होते. तर दुसरीकडे त्यांच्या मनात या राजकीय कार्याला पूरक, अंतिम हिताची अशी शिक्षणविषयक योजनाही आकार घेत होती.

१९३७ साली गांधीजींनी वर्धा येथे प्रथम अनौपचारिक स्वरूपात आणि नंतर शिक्षणतज्ज्ञांच्यासमोर भारतव्यापी अशी शिक्षण-योजना मांडली. ' वर्धा

शिक्षण-योजना ', ' मूलोद्योगी शिक्षण ', ' जीवन शिक्षण ' या नावाने ही योजना सर्वज्ञात आहे. ही योजना मांडतांना गांधीजींनी पुढील उद्दिष्टे समोर ठेवली होती :

( १ ) भारतातील ६ ते १४ वर्षांच्या मुलांमुलींसाठी ही योजना, सक्तीची, मोफत आणि सार्वत्रिक असावी.

( २ ) इंग्रजी विषय सोडून, बाकीचे सर्व विषय मातृभाषेतून शिकविले जावेत.

( ३ ) योग्य असा मूलोद्योग निवडून, त्या द्वारे इतर त्याच्याशी निगडित असलेल्या विषयांचे ज्ञान द्यावे. यालाच गांधीजी ' समवाय ' पद्धती मानतात.

( ४ ) शिक्षणाच्या दैनंदिन कार्यक्रमात ' उत्पादक परिश्रमावर ' भर.

( ५ ) शाळा हेच समाजकेंद्र मानून सर्व उपक्रम व्हावेत.

( ६ ) हे सारे शिक्षण ' स्वावलंबी ' असावे.

गांधीजींप्रणीत शिक्षणपद्धतीचे विशेष पुढीलप्रमाणे आहेत :

( १ ) अखिल भारतीय स्वरूपाची शिक्षण-योजना पारतंत्र्याच्या काळात प्रथमच मांडली गेली. पूर्वी जे राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयत्न झाले त्यात ही सर्व-समावेशकता नव्हती.

( २ ) शिक्षणासाठी पैसा नाही हे इंग्रजी अमदानीतील सूत्र होते. त्यामुळे जन-शिक्षण उपेक्षित राहिले होते. खेडोपाडी मूलोद्योगाच्या आधारे शिक्षण देण्याची कल्पना गांधीजींनी मांडली व स्वावलंबनाचे मूलभूत महत्त्व प्रथम प्रतिपादन केले. पैशाची चणचण आणि शिक्षणप्रसार यातील ' द्वैत ' प्रथमच धैर्याने काढून टाकण्याचा प्रयत्न झाला.

( ३ ) अन्न आणि वस्त्र या मूलभूत गरजा जनतेच्या आहेत. ते प्रश्न शिक्षणाच्याद्वारे, उत्पादक श्रम तत्त्व अंगीकारून सोडविण्याचा हा पहिलाच प्रयत्न होय.

( ४ ) शाळा हे समाजापासून अलग असे केंद्र नसून, शाळा व समाज परस्परावलंबी आहेत हे सूत्र प्रथमच मांडून शिक्षणाला जीवनाभिमुख केले गेले.

( ५ ) मातृभाषा म्हणजेच भारतीय भाषा आजवर उपेक्षित राहिल्या होत्या. त्यांच्याद्वारे शिक्षण देण्याच्या कल्पनेमुळे खरे व्यक्तित्व-विकासाचे माध्यम शिक्षणाला लाभले.

( ६ ) नोकरीसाठी शिक्षण हे समीकरण दूर करून व्यवसायरूप शिक्षणाच्या अधुनिक कल्पनेला मूर्त स्वरूप प्रथम मिळाले.

## सर्वोदय आणि समाज

गांधीजींनी पुरस्कारलेली शिक्षण-प्रणाली केवळ शिक्षणापुरतीच मर्यादित नव्हती. कोणत्याही शिक्षण-पद्धतीचे धागेदोरे कोणत्या तरी समाज-व्यवस्थेच्या स्वरूपात गुंतलेले असतात. वर्धा-शिक्षण-योजनेतून गांधीजींना 'सर्वोदया'वर अधिष्ठित असा समाज निर्माण करायचा होता. का, अशी गरज गांधीजींना का भासली? याचे कारण त्यांनी केलेले इतिहासाचे आणि जगातील सामाजिक परिस्थितीचे चिंतन हे होय. वर्गा-वर्गाची भांडणे, भांडवलशाही, हिंसक युद्धे, यंत्राची गुलामगिरी, अनीतीचे थैमान, पराकोटीची स्वार्थपरायणता, जाती—वंश—धर्म यांची भांडणे या सर्वांनी भरून वहात असलेला मानवजातीचा समग्र इतिहास गांधीजींच्या डोळ्यासमोर होता. आफ्रिकेमधील वास्तव्यात याचा अनुभव त्यांनी घेतला होता. ब्रिटिशांच्या काळात भारतात निर्माण झालेल्या अनेक अपप्रवृत्ती— निरुद्योगीपणा, श्रमांचा तिटकारा, शहराकडे धाव घेण्याची प्रवृत्ती, जुलूम जबरदस्तीने चालत आलेल्या रूढी, मागासलेपणा, स्वावलंबनाचा अभाव, गुलामी मनोवृत्ती अशा अनेक प्रवृत्तींवर विजय मिळवून, माणसाच्या मनातील 'सद्भावनेला' जागे करून 'रामराज्य' निर्माण करण्याचे स्वप्न गांधीजी पहात होते. पण हे केवळ स्वप्न नव्हते. त्या समाज-निर्मितीला वास्तवाचा आधार मिळावा म्हणून गांधीजींनी आपल्या शिक्षणात मूलभूत प्रश्नांनाच हात घातला. अन्न, वस्त्र आणि निवारा या प्राथमिक गरजादेखील ज्यांना भागविता येत नाहीत अशा लक्षावधी देशबांधवांच्या भयानक अवस्थेने ते विव्हल झाले होते. चरखा, टकळी ही काही साध्ये त्यांची नव्हती. त्यांना अंतिम प्रतीकांचे महत्त्व गांधीजींच्या लेखी होते. गांधीजी यंत्रयुगाला विरोध करीत होते ही गैरसमजूत आहे. पण यंत्रद्वारे निर्माण होणाऱ्या परावलंबनाला, गुलामी मनोवृत्तीला त्यांचा तीव्र विरोध होता. भारतात संपूर्ण यंत्रयुग निर्माण होण्यास किती वर्षे लागतील, केवढा प्रचंड कालखंड लागेल याचा अंदाज ते करू शकत होते. शेती हा भारतीय समाज-जीवनाचा कणा आहे हे त्यांनी कधीही दृष्टीआड होऊ दिले नाही. शेती व सभोवतालचे अनेक व्यवसाय यांचा केंद्रबिंदू मानून त्यांनी शिक्षणाचा विचार केला तो सत्यावर आधारलेला होता. राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक, आर्थिक समता, व्यक्तीचे मूलभूत मूल्य, परस्पर सहकार्य, खेडे हा स्वयंपूर्ण घटक अशा मूलग्राही आधारावर त्यांनी वर्धा शिक्षण-योजनेचा आराखडा तयार केला. अगदी अलिकडे मध्यवर्ती सरकारने नेमलेल्या **डॉ. कोठारी महामंडळाच्या** मुख्य शिफारसींचा हाच मूलार्थ आहे. गांधीजी हे प्रथमपासून अखेरपर्यंत मानवतावादी होते. आणि या विशाल वैश्विक दृष्टिकोणाची प्रचीती, दुसऱ्या महायुद्धाने होरपळून निघालेल्या जगाचे चित्र पाहून त्यांना नव्हे तर जगातील सर्वच विचारवंतांना आली. हे गांधीजींचे द्रष्टेपण होते. अंधार आणि अज्ञान यांनी वेढलेल्या खेड्यात

त्यांना केवळ ज्ञानाची ज्योती प्रकाशित करायची नव्हती, तर ह्या अवस्थेत राहणाऱ्या माणसाच्या अंतःकरणात समग्र जागृतीचा नंदादीप लावायचा होता.

या गांधीजींच्या समग्र कल्पनेचा परिचय ' सर्वोदय ' या नावाने परिचित आहे. ' अहिंसात्मक ' समाज, म्हणजे कोणत्याही प्रकारच्या पिळवणुकीपासून अलिप्त असलेला समाज– भारतात निर्माण होण्यासाठी त्यांनी हा-वर्धा-शिक्षण योजनेचा कार्यक्रम आखला. शिक्षण ' स्वयंपूर्ण ' झाले पाहिजे याचा अर्थ मुलांनी उत्पादक श्रम करून, त्या उत्पन्नातून शाळेचा निर्वाह झाला पाहिजे ही मुख्य कल्पना होती. भारतासारख्या प्रचंड देशात सर्वत्र शिक्षणाचा प्रसार करायचा, शाळा बांधायच्या, शैक्षणिक साधने पुरवायची, शिक्षक नेमायचे, शासन-यंत्रणा निर्माण करायची यासाठी केवढा अमाप पैसा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ लागेल याची गांधीजींना जाणीव होती. भारतासारख्या मागासलेल्या देशात तुटपुंज्या आर्थिक आणि भौतिक शक्तीनुसार हे कार्य करणे अशक्य आहे हे त्यांना पूर्णपणे आकलन झाले होते. याशिवाय धर्म, भाषा, चालीरीती, रूढी इत्यादी अंगोपांगांतील विविधता, त्यांचे संघर्ष, त्यातून निर्माण झालेले विस्कळित सामाजिक जीवन या सर्वांना कसे सांधावयाचे ही गांधीजींची समस्या होती. ' सर्वोदय ' हा त्यांनी आखलेला एक मार्ग होता. या मार्गातच गांधीजींनी शाळेसंबंधी कल्पना अधिक स्पष्टपणे मांडली. ही कल्पना जगात रूढ होती. परंतु भारतात या दृष्टीने शाळेकडे पाहिले जात नव्हते. विशेषतः शाळा ही समाज-केंद्र मानून कसे कार्य करायचे या संबंधीची ही कल्पना होय. ग्रामीण जीवनात शाळेला कोणती नवी भूमिका करायची आहे याची कल्पना पुढे आली. या कल्पनेचे स्वरूप पहाणे अगत्याचे आहे.

### शाळा – समाजकेंद्र

पाश्चात्य देशांतील शिक्षणाचा इतिहास आपण पाहू लागलो की, रूसो, पेस्टॉलॉट्झी, फ्रोबेल, मॉंटेसरी, आदींनी शिक्षण-क्षेत्रात केलेली वैचारिक क्रांती डोळ्यात भरते. शिक्षण-पद्धतीला लाभलेले नैसर्गिक वळण, अभ्यासक्रमाची व्यापकता, विद्यार्थ्याला मिळालेले मध्यवर्ती स्थान याबरोबरच शाळा या सामाजिक संस्थेकडे पहाण्याच्या दृष्टिकोणात झालेला बदल अशा महत्त्वाच्या गोष्टी आता सर्वमान्य झालेल्या आहेत. त्यात शाळेला लाभलेले नवे महत्त्वपूर्ण स्थान विशेष चिंतनीय आहे.

पूर्वी शाळा म्हटली की काही विषय शिकविण्याचे ठिकाण येवढीच कल्पना मर्यादित होती. परंतु आता शाळा ही केवळ विषय-ज्ञान देणारी संस्था राहिली नसून ती भावी समाजनिर्मितीचे केंद्र आहे हे मान्य झालेले आहे. शाळा आणि समाज यांचे नाते आता परस्परावलंबी असे मानले जाते. शाळेला समाजासाठी

काही करता येईल आणि समाजही शाळेसाठी काही गोष्टी करू शकेल. ही कल्पना दिसण्यास सोपी वाटते. परंतु तिचे काटेकोर पालन कसे करायचे हे फार महत्त्वाचे. ही कल्पना राबविताना पहिले पथ्य हे पाळले पाहिजे की कोणत्याही दृष्टीने समाजाने शाळेवर कार्याचा ताण निर्माण करून, शाळेच्या दैनंदिन कार्यात व्यत्यय आणता कामा नये. विद्यार्थ्यांचे वयोमान, त्यांची मानसिक अवस्था, शालेय साधने, अभ्यासक्रमाचा कार्यक्रम या गोष्टी लक्षात घेऊन समाजाशी संपर्क साधला पाहिजे. हा संपर्क साधताना शिक्षकाच्या कर्तव्यावर कधीही आक्रमण होऊ देता कामा नये. शालेय ग्रंथालय, इमारत, क्रीडासाधने यांचा उपयोग समाजाला जरूर करता येईल. साक्षरतावर्ग, मनोरंजन-कार्यक्रम, सभा, चर्चा, प्रदर्शने यांसारख्या गोष्टी शाळेत घडवून पालकांचे शिक्षण व इतर समाजातील व्यक्तींचे उद्‌बोधन करणे शक्य आहे. याचा परिणाम असा होईल की, शाळेबद्दल एक प्रकारची तीव्र आत्मीयता समाजाला वाटू लागले. या आत्मीयतेतूनच शाळेच्या सर्व प्रकारच्या अडचणी आपल्याच आहेत या भावनेने समाज त्या सोडविण्यास पुढे येईल. या शाळेतून जी आपली मुले शिकत आहेत त्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ घडविण्यात आपलाही वाटा आहे ही नवी जाणीव निर्माण होईल. सर्व काही शिक्षक करील ही भावना नाहीशी होईल. आपल्यालाही खूप शिकायचे आहे, नव्या कल्पना समजून घ्यायच्या आहेत, राष्ट्र-प्रगतीच्या कार्यात आपलीही काही जबाबदारी आहे ही लोकशाही मनोवृत्ती मूळ धरू लागेल. तद्वतच शाळेतील विद्यार्थ्यांना समाजातील सांस्कृतिक घडामोडींचे दर्शनही घडू शकेल. या समाजासाठी आपल्याला भावी जीवनात आपला वाटा उचलायचा आहे या कल्पनेचे संस्कार, चिर–संस्कार मनावर उमटतील. श्रमदान, समारंभ, मिरवणुका, स्वातंत्र्यदिन, उत्सव यांसारख्या घटना घडत असताना मनाला जी सामाजिक शिस्त अपेक्षित असते तिचे पहिलेवहिले पाठ इथे मिळतील.

शाळेला समाज-केंद्राचे स्वरूप देणे आणखी एका दृष्टीने महत्त्वाचे आहे. भारताचे दोन महत्त्वाचे प्रश्न या केंद्रातर्फे सोडविण्याचा प्रारंभ करावा लागणार आहे. निरक्षरता, सर्वसामान्य अज्ञान दूर करणे ही पहिली गोष्ट आणि दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोगराई दूर करणे, आरोग्यविषयक नव्या सवयींची घडण करणे. शाळेतील शिक्षक आणि प्रौढ वयाचे, वरच्या इयत्तेतील विद्यार्थी यांना साक्षरता-प्रसाराचे काम करता येईल. ही साक्षरता टिकविण्यासाठी शालेय वाचनालयाचा उपयोग फार होईल. त्याचप्रमाणे या कामात शाळेतील शैक्षणिक साधनांचा उपयोग करून घेता येईल. या कामाच्या जोडीने, स्वच्छता, वैयक्तिक, आणि सामुदायिक, रोगप्रतिबंधक इलाज यांसारख्या अत्यंत मूलभूत अशा गोष्टींबद्दलचे अज्ञान दूर करणे शक्य होईल. अज्ञान, दारिद्र्य, रोगराई यामुळे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात येणारा मागासलेपणा नष्ट करणे हे महत्त्वाचे

कार्य आहे. जगाच्या अविकसित भागात हे प्रश्न सर्वत्र आहेत. यांपैकी कोणताही मुख्य किंवा गौण मानणे इष्ट ठरणार नाही. सर्वांनाच एकाच वेळी हात घालून प्रयत्न करावा लागेल.

शाळा हे समाजाचे केंद्र बनण्याने आणखी महत्त्वाची घटना सिद्ध होणार आहे. ती म्हणजे सामाजीकरणाची ( Process of socialization ) होय. संस्कृती, नव्या परंपरा, समतोल जीवनदृष्टी, यांसारख्या गोष्टींची निर्मिती एकाएकी होत नाही. पिढ्या-पिढ्यातून संथपणे घडणाऱ्या या घटना आहेत. त्यांचे स्वरूप प्रवाही असते. त्यांना गति देण्याचे काम शिक्षक, विचारवंत नेते, सामाजिक कार्यकर्ते यांना करावे लागते. वृत्तपत्रे, आकाशवाणी, चित्रपट, व्याख्याने, चर्चा, कीर्तने प्रवचने, आदि सर्व अनौपचारिक, शैक्षणिक साधनांचा उपयोग करणे अगत्याचे ठरते. यातूनच संस्कृतीची घडण होते. व्यक्ती आणि समाज या दोहोंचे संवर्धन या घडामोडीतून होते. राष्ट्राने अंगीकृत केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या दृष्टीने केलेली ही पायाभरणी होय. समाजवादी समाजरचनेच्या पायाभरणीचे कार्य या केंद्राकडून अपेक्षित आहे. समर्थ आणि संपन्न भारत नव्या अधिष्ठानावर निर्माण करायचा आहे. या कार्यात ग्रामीण शिक्षणाचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्याचा विचार पुढे आपण क्रमशः करणार आहोत.

# ग्रामशिक्षणाची उद्दिष्टे व समस्या : २

## आंग्लपूर्वकालीन ग्रामशिक्षण

भारतात इंग्रज येण्यापूर्वी राज्यसत्तेने शिक्षणाची जबाबदारी उचललेली नव्हती. शिक्षण हे सर्वस्वी समाजाच्या सहकार्यावर अवलंबून होते. ग्रामीण विभागातील शाळा तेथील जनतेच्या मदतीवर चालत होत्या ह्या शाळांचा आर्थिक भार तेथील लोकांनाच उचलावा लागत होता. कारण तेथील शिक्षकांच्या वेतनाची व्यवस्था सरकार करीत नव्हते. साहजिकच शाळेतील अभ्यासक्रम, शिस्त, कारभार इत्यादी बाबतीतही ढवळाढवळ करण्याची आवश्यकता राज्यसत्तेच्या सूत्रचालकांना वाटत नव्हती. एकंदर ग्रामीण व्यवस्था स्वयंपूर्ण असल्यामुळे शिक्षणाच्या बाबतीतही बाहेरून कोणत्याही प्रकारचे निर्बंध वा नियंत्रण नव्हते. ग्रामीण शाळेचे उद्दिष्ट त्या विशिष्ट गावाच्या शैक्षणिक गरजा भागवणे हेच होते. शाळा हा त्या ग्रामीण समाजाचा व ग्रामीण जीवनाचा एक महत्त्वाचा घटक होता. ग्रामीण समाजाला ह्याची पूर्ण जाणीव होती. म्हणून शाळेलाही समाजाचें पूर्ण सहकार्य मिळत होते. थोडक्यात शाळा समाजाची होती व समाज शाळेचा होता. समाजाच्या गरजांची पूर्ती हे ग्रामीण शाळेचे उद्दिष्ट होते, तर शाळेस संपूर्ण सहकार्य देणे हे ग्रामीण रचनेचे एक वैशिष्ट्य होते. त्या काळातील समाजाच्या गरजा अत्यंत मर्यादित होत्या. यंत्रयुगाचे वारे काही लागलेले नव्हते. नव्या

शास्त्रीय ज्ञानाचे बीज पेरले गेले नव्हते. नवीन सामाजिक रचना अस्तित्वात आलेली नव्हती. अर्थातच शाळेचे उद्दिष्ट व कार्य मर्यादित होते. त्याचप्रमाणे समाजावर येणारी शैक्षणिक जबाबदारीही मर्यादित होती.

## आंग्लकालीन ग्रामशिक्षण

इंग्रजांच्या आगमनानंतर सर्वच परिस्थिती बदलली. गावांची स्वयंपूर्णता ढासळून पडली. नवीन सामाजिक व राजकीय जीवनाची प्रभात सुरू झाली. यंत्रयुगाचे आगमन होऊ लागले. शास्त्रीय ज्ञान हेही त्याच्याबरोबर आलेच. जुनी समाजरचना, जुने आचारविचार, जुने रीतीरिवाज पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे धडाधड कोलमडू लागले. शिक्षणावरही ह्याचा परिणाम झाल्याखेरीज राहिला नाही. एतद्देशीय शाळा जुनाट व नव्या प्रगतीला पूरक न ठरणाऱ्या म्हणून ब्रिटिशांनी त्यांची पूर्ण वासलात लावून टाकली. शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वतःकडे घेतली. परंतु त्यांचे लक्ष भारतातल्या असंख्य खेड्यांकडे नव्हते तर मूठभर शहरांकडे होते. शालेय अभ्यासक्रम, शैक्षणिक व्यवस्था, शैक्षणिक उद्दिष्टे इत्यादींचा विचार करतानाही प्रमुखतः शहरांच्या गरजांकडे लक्ष दिले जाई. त्यातही इंग्लंडमधीलच नमुन्यांचे इकडे अनुकरण करण्याची प्रवृत्ती होती. या सर्व गोष्टींमुळे ग्रामीण शिक्षणाकडे खूपच दुर्लक्ष झाले. एतद्देशीय शाळांवर प्रहार झाल्याने समाज व शाळा ह्यांचाही संबंध तुटला. नव्या शाळा समाजापासून फार दूर राहू लागल्या. मागील काळातील शाळा व समाज ह्यांचे सहकार्य आता दुरापास्त झाले. ग्रामीण विभागातील शाळांची स्थिती बांडगुळाप्रमाणे होती. परंतु त्याकडे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे विशेष लक्ष नव्हते. त्यामुळे ग्रामीण शिक्षणासंबंधी सुसंबद्ध व निश्चित विचार करून देशव्यापी सरकारी प्रयोग झाल्याचे आढळून येत नाही. ग्रामशिक्षणाची उद्दिष्टेच मुळात नीटशी पारखून घेण्यात आली नाहीत. त्यामुळे जे काही तुरळक प्रयोग झाले तेही बहुतांशी अयशस्वीच ठरले. जेथे उद्दिष्टेच चुकीची तेथे यश तरी कसे येणार ?

## चुकीची उद्दिष्टे

ही उद्दिष्टे कोणती व ती चुकीची कशी होती हे आता आपण पाहू ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सोपा अभ्यासक्रम ठेवणे हे त्यांपैकी एक उद्दिष्ट होते. विद्यार्थ्यांना पेलेल असा अभ्यासक्रम देण्यासाठी एक योजना होती. ग्रामीण शाळां-मधून असणारा शैक्षणिक साधनांचा अभाव व प्रशिक्षित शिक्षकांची उणीव याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अनिष्ट होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी सोप्या अभ्यासक्रमाचा पाठपुरावा करण्यात आला. लॉर्ड कर्झनने १९०४ मध्ये आपले शिक्षणविषयक धोरण जाहीर केल्यावर मुंबई, बंगाल, मध्यप्रदेश इत्यादी प्रांतांत ग्रामशिक्षणाकडे थोड्याफार प्रमाणात लक्ष देण्यात आले. त्यामधला प्रांतीय

सरकारी शिक्षणखात्याचा मूळ उद्देश ग्रामीण विभागासाठी सोपा अभ्यासक्रम पुरवावा हाच होता.

ग्रामशिक्षणाचे दुसरे एक उद्दिष्ट म्हणजे एतद्देशीय शाळा व नव्या प्राथमिक शाळा ह्यांच्यातील अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती ह्यांत समन्वय साधणे हे होते. विशेषतः मुंबई व मध्यप्रदेश ह्या प्रांतांत १९०१–०२ पूर्वी ग्रामीण शिक्षणाचे जे प्रयोग झाले त्यामागची भूमिका हीच होती. नव्या प्राथमिक शाळांना समाजाकडून जे सहकार्य मिळावयास पाहिजे होते ते मिळत नव्हते. जुन्या एतद्देशीय शाळांसारख्या त्या ग्रामीण जीवनाशी एकरूप झालेल्या नव्हत्या. तेव्हा जुन्यातले काही ठेवावे व नव्यातले काही घ्यावे हा उद्देश समोर ठेवून हे प्रयोग करण्यात आले.

आणखीही एक हेतू या प्रयोगात दिसून येतो. तो म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनास उपयुक्त ठरणाऱ्या विषयांस व कृतींस प्राधान्य देणे. मध्यप्रदेशातील शैक्षणिक प्रयोगांत शाळा फक्त अर्धा दिवस ठेवून उरलेला वेळ बागकाम-शेतीकाम ह्यांसाठी खर्च करण्यात येई. मुंबई प्रांतातील १८७७–७८ च्या मोडी इयत्तांतील अभ्यासक्रम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उपयुक्त कसा होईल या दृष्टीनेच आखण्यात आला. ग्रामशिक्षणाबाबत हीच भूमिका थोड्याफार प्रमाणात संपूर्ण ब्रिटिश अमदानीत चालू होती. १९४४ साली मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणविषयक सल्लागार समितीच्या शेतकीशिक्षणाच्या समितीने आपला अहवाल सादर केला. त्यांत शेतकी शिक्षणाचे ( किंवा ग्रामशिक्षणाचे ) उद्देश खालीलप्रमाणे होते :

( १ ) सर्वसामान्य शिक्षण व भावी शेतकऱ्याच्या गरजांना पूरक ठरणारे व्यवहारोपयोगी शिक्षण ह्यांचा मिलाफ.

( २ ) शेतकऱ्यांना मार्गदर्शन करू शकतील अशा अधिकारीवर्गासाठी शिक्षणासाठी व संशोधनासाठी अधिक उच्च प्रकारचे व्यवहारपयोगी ज्ञान देणे.

## यातील दोष

ही उद्दिष्टे समोर ठेवून करण्यात आलेले ग्रामशिक्षणाचे प्रयोग यशस्वी झाले नाहीत. ह्यांचे प्रमुख कारण म्हणजे मुळांतच ही उद्दिष्टे दोषपूर्ण वा चुकीची होती. यातला पहिला मोठा दोष म्हणजे ग्रामशिक्षणासंबंधी जे एक सुसंबद्ध निश्चित व सकस तत्त्वज्ञान असावयास पाहिजे त्याचा संपूर्ण अभाव येथे आढळून येतो. ग्रामशिक्षणाचा विचार करताना त्याची उद्दिष्टे प्रथम एका निश्चित तात्त्विक भूमिकेवरून पारखून घेणे आवश्यक होते. परंतु वरील उद्दिष्टांकडे नजर टाकली असता अशा तात्त्विक भूमिकेकडे सर्व साधारणतः दुर्लक्षच केलेले आढळून येईल. नाही म्हणायला लॉर्ड कर्झनने आपले शिक्षणविषयक उद्दिष्ट जाहीर करताना ग्रामशिक्षणाबाबत एक विशिष्ट दृष्टिकोन आपल्यासमोर ठेवलेला होता. त्याच्या

मताप्रमाणे ग्रामशिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे काही विशिष्ट शेतकी शिक्षण देणे हे नव्हे. तर जे ग्रामीण विद्यार्थ्यांना बुद्धिमान शेतकरी बनवील, त्यांच्यांत निरीक्षणाची, विचार करण्याची व प्रयोग करण्याची पात्रता निर्माण करील, सावकारांबरोबरच्या व्यवहारांत त्यांचे संरक्षण करील. अशा स्वरूपाचे प्राथमिक शिक्षण देणे हा ग्रामशिक्षणाचा हेतू होय. परंतु हा दृष्टिकोण निरनिराळ्या प्रांतांनी आपल्या ग्रामशिक्षणाच्या योजना अमलात आणताना लक्षात घेतला नाही. यासंबंधी विशेष सखोल विचार केला नाही. प्रत्यक्ष योजना व हे उद्दिष्ट ह्यांचा मेळ बसतो की नाही हे कधी पाहिले नाही. उलट कर्झन जाताच ही ग्रामशिक्षणाची ब्याद अंगावरल्या झुरळाप्रमाणे झटकून टाकून देण्यास ते तयार झाले. थोडक्यात ग्रामशिक्षणाची समस्या काय आहे ह्यासंबंधी अज्ञानच त्याची योजना आखणारांमध्ये होते, ते जाणून घेण्याचा वा दूर करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला नाही. उलट ग्रामशिक्षण हे जनतेत अप्रिय आहे तेव्हा त्याची काही आवश्यकता नाही असा स्वतः सोइस्कर निर्णय काढून ते पार मोकळे झाले.

ग्रामीण विद्यार्थ्यांस सोपा अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे ह्या उद्दिष्टात काही चुकीची व घातक गृहीत तत्त्वे दिसून येतात. याचा एक अर्थ असा होतो की ग्रामीण विद्यार्थी हे मुळांतच कमजोर बुद्धीचे आहेत किंवा त्यांच्यांत उच्च वा अवघड ज्ञान प्राप्त करून घेण्याची पात्रता नाही. साहजिकच ह्यांतून निघणारा निष्कर्ष म्हणजे या विद्यार्थ्यांना केवळ मामुली बौद्धिक स्वरूपाचे व शेतकीस उपयुक्त असे शिक्षण दिले म्हणजे पुरे. अर्थातच अधिक जबाबदारीचे वा उच्च प्रकारचे काम करण्याची पात्रता या विद्यार्थ्यांत किंवा हे शिक्षण घेणाऱ्यांत नाही असाच ह्याचा अर्थ होतो. ही गोष्ट मान्य करण्यास खेड्यांतील पालक स्वाभाविक रीत्या तयार नव्हते आणि त्यांत काही वावगेही नव्हते. लोकशाहीच्या व समानतेच्या ह्या काळात एखादा विद्यार्थी केवळ खेड्यात जन्मास आला म्हणून उच्च प्रकारचे शिक्षण घेण्यास अपात्र असे मानणे अत्यंत अनिष्ट व संपूर्ण चुकीचे होय.

अशा प्रकारचे चुकीचे उद्दिष्ट समोर असल्यानेच ग्रामीण शिक्षण म्हणजे फक्त प्राथमिक शाळेपुरतेच मर्यादित होय असा दुसरा चुकीचा समज प्रसृत झाला होता. त्यामुळेच ग्रामशिक्षणामध्ये दुय्यम व उच्च प्रकारचे शिक्षण देण्याचीही योजना आखणे आवश्यक आहे असे शिक्षणखात्यास वाटले नाही. साहजिकच ग्रामशिक्षण अत्यंत मर्यादित व संकुचित स्वरूपाचे झाले.

ही उद्दिष्टे म्हणजे शिक्षणाचा वाढता प्रसार व त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या वाढत्या गरजा आणि लोकांच्या शिक्षणापासूनच्या चढत्या अपेक्षा यांची पूर्ती करण्याचा एक तकलुपी मार्ग होता. ग्रामशिक्षण म्हणजे शहरातील शिक्षणापासून काही तरी वेगळे पाहिजे. हा वेगळेपणा म्हणजे काय ? तर अभ्यासक्रम जरा सोपा असावा व त्यातले विषय जरा निराळे असावेत – शेतकीच्या ज्ञानास उपयोगी

पडणारे असावेत. ग्रामशिक्षणाची भूमिका ही अशी तयार झाली होती. अशा ह्या योजनेमागे भरभक्कम प्रेरणा व तीव्र आस्था ह्यांचा अभाव होता. ग्रामशिक्षणाची उभारणी केवळ चार भिंतींमधल्या पुस्तकी शिक्षणात होत नसून संपूर्ण गावाच्या वातावरणात होत असते ह्याची जाणीव या नियोजकांना नव्हती. ग्रामशिक्षण म्हणजे केवळ ग्रामातील शिक्षण असा सवंग अर्थ काढण्याची प्रवृत्ती येथे दृष्टोपत्तीस येते. ग्रामशिक्षणातील 'ग्राम' हा 'शिक्षणा' इतकाच महत्त्वाचा घटक आहे; हा घटकही केवळ निष्क्रीय नसून सक्रीय आहे; त्याचा सर्वांगीण विकास व सहकार्य इत्यादींचा विचार न केल्यास ग्रामशिक्षणाची उद्दिष्टे थोटकी पडतील व योजना लंगड्या पडतील ह्या बाबींचा विचार गंभीर रीतीने केल्याचा दाखला आढळून येत नाही. म्हणूनच मूळ उद्दिष्टेच ढिसूळ असल्याने त्यावर आधारलेल्या ह्या कालखंडातील योजना अयशस्वी व अप्रिय व्हाव्यात ह्यात नवल नव्हते.

**नवी उद्दिष्टे**

भारत स्वतंत्र झाल्यावर परिस्थिती पूर्णपणे बदलून गेली. स्वतःच्या देशाच्या उन्नतीचा विचार अत्यंत आस्थेने व गंभीरपणे करण्यात येऊ लागला. भारत हा बहुसंख्य खेड्यांचा देश असल्याने त्यांच्याकडे आपल्या राज्यकर्त्यांचे लक्ष प्रथमतः जाणे स्वाभाविकच होते. खेड्याच्या विकासात शिक्षण हा एक प्रमुख घटक आहे ह्याची जाणीवही राज्यकर्त्यांस झाली. म्हणूनच पंचवार्षिक-योजना, समाजविकास-योजना व ग्रामविकास योजना ह्यांत ग्रामशिक्षणाचा विचार केला जाऊ लागला. ग्रामशिक्षण म्हणजे शहरी अभ्यासक्रमापेक्षा कमी प्रतीचा व सोपा अभ्यासक्रम खेड्यांना पुरविणे अशी चुकीची समजूत लुप्त झाली. ग्रामशिक्षण केवळ प्राथमिक शाळेपुरतेच मर्यादित असावे ही घातक विचारसरणी त्याज्य ठरली. ग्रामीण जीवन व ग्रामीण शिक्षण एकमेकांस पूरक असले पाहिजे ह्या दृष्टिकोणातून ह्या प्रश्नाकडे पाहण्यास सुरुवात झाली. ग्रामीण विकास व पुनर्रचना ह्या गोष्टी ग्रामशिक्षणावर अवलंबून आहेत व ग्रामशिक्षणाची उभारणी ग्रामीण सहकार्यावर आहे ह्याची जाणीव लोकनेत्यांस झाली. म्हणूनच ग्रामशिक्षणाची जुनी दोषपूर्ण उद्दिष्टे दूर सारण्यात आली व नव्या उद्दिष्टांचे संशोधन सुरू झाले. शिक्षण, अन्नधान्य व समाजविकास ह्यांचा विचार करण्यासाठी नेमलेल्या निरनिराळ्या समित्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या ग्रामशिक्षणाचा विचार केला. त्यांतूनच आपल्या ग्रामशिक्षणाबाबतच्या नव्या उद्दिष्टांची कल्पना येऊ शकते.

**शैक्षणिक संधीची समानता**

यांपैकी एक उद्दिष्ट म्हणजे शैक्षणिक संधी सर्वांना प्राप्त करून देणे हे होय. शहरांतल्याप्रमाणेच ग्रामीण विभागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शिक्षणाच्या सर्व

सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. केवळ ग्रामीण भागात जन्माला आला म्हणून शिक्षणापासून कोणी पारखा राहता कामा नये. लोकशाहीच्या तत्त्वांना अनुसरून शिक्षणाचा हक्क प्रत्येक व्यक्तीला मिळाला पाहिजे – मग ती शहरातील असो वा खेड्यातील असो.

यासाठी खेड्यातील विद्यार्थ्यांना शहरात शिकण्यासाठी आणून चालणार नाही, तर आपल्या शिक्षण संस्था खेड्याकडे नेल्या पाहिजेत. प्रत्येक गावात शाळा निघाली पाहिजे. त्या शाळेच्या वेळा तेथील विद्यार्थ्यांना सोइस्कर होतील अशा ठरविल्या पाहिजेत. शिक्षणाचा फायदा प्रत्येकालाच सर्व वेळ शाळेत राहून घेता येणार नाही म्हणून निरनिराळ्या उपाययोजना आखल्या पाहिजेत. अर्धा वेळच्या शाळा, पत्रद्वारे शिक्षण, फिरते शिक्षक, रात्रीच्या शाळा इत्यादी अनेक प्रकारांनी शिक्षणाची गंगा खेड्यातील लोकांच्या दरवाजापर्यंत नेऊन भिडविली पाहिजे. हे करतानाही केवळ प्राथमिक शिक्षणापुरतेच आपले लक्ष केंद्रित करून चालणार नाही. ग्रामशिक्षणाची मर्यादा प्राथमिक शिक्षणाइतकीच मर्यादित ठेवून भागणार नाही. अन्यथा आंग्लकालीन ग्रामीण शाळांतलाच दोष ह्या शाळांतही आढळून येईल. केवळ शहरी शाळांत भरती होणारे विद्यार्थी तयार करणारे कारखाने असे ह्या शाळेचे स्वरूप राहील. म्हणूनच प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय खेड्यांतून करण आवश्यक आहे. आणि ह्याच बरोबर हे शिक्षण कोणत्याही प्रकारे शहरांतून मिळणाऱ्या शिक्षणापेक्षा कमी दर्जाचे असणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. ते शहरी शिक्षणाहून वेगळे असेल पण दर्जा आणि प्रमाण ह्यात तिळमात्रही कमी असणार नाही. ह्या गोष्टीकडे लक्ष दिले म्हणजेच खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुवतीप्रमाणे यथायोग्य शिक्षण घेता येईल. आणि मगच शैक्षणिक संधीच्या समानतेचे तत्त्व व्यवहारात येऊ शकेल.

## शहराकडे वळणाऱ्या ओघाला प्रतिबंध

ग्रामशिक्षणाचे दुसरे उद्दिष्ट म्हणजे खेड्यामधून शहराकडे वळणारा विद्यार्थ्यांचा ओघ कमी करणे हे होय. आंग्लकालीन ग्रामीण शिक्षण शहरा शिक्षणापेक्षा दर्जाने कमी होते व केवळ प्राथमिक शाळेपुरते मर्यादित होते. अर्थातच चांगले व उच्च प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी ह्या विद्यार्थ्यांचा लोंढा शहराकडे वळत होता. ग्रामीण प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे विकासासाठी काही वावही नव्हता. त्यामुळेही विद्यार्थ्यांचे लक्ष शहरी शिक्षणाकडे होते. शिक्षणासाठी शहरात गेलेला विद्यार्थी परत खेड्याकडे जावयाला नाखूषच होता. कारण शहरातल्या सोयी व आरामाच्या गोष्टी ह्यांचा खेड्यात पूर्ण अभाव होता. अशा रीतीने खेड्यातला बुद्धिमान वर्ग शहराकडे वळत होता. त्याच्या बुद्धीचा व ज्ञानाचा उपयोग खेड्याच्या विकासास होऊ शकत नव्हता. खेडी ही ह्या बाबतीतही दरिद्री

ठरत होती व त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर होत होता. ती अधिकाधिक आर्थिकदृष्ट्या गरीब होत होती. कारण योग्य प्रकारचे, प्रगतीकडे नेणारे मार्गदर्शन त्यांना मिळू शकत नव्हते. खेडी जास्तीत जास्त दुबळी होत चालली व शहरांची वाढ एखाद्या सुजेप्रमाणे वाढू लागली. शहरे व खेडी ह्यांत थोडेही सहकार्य राहिले नाही.

म्हणूनच ग्रामशिक्षणाचा हल्लीचा एक उद्देश शहरे व खेडी ह्यांत योग्य सहकार्याचे वातावरण निर्माण करणे आणि ते परस्परांस कसे पोषक ठरेल हे पाहणे होय. ह्यासाठी खेड्यातून शहरांकडे वळणाऱ्या प्रचंड ओघाला प्रतिबंध घालून खेड्याच्या विकासासाठी तेथील बुद्धिमान वर्ग तेथेच कसा राहील ह्याची उपाय-योजना करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शहरातील बुद्धिमान लोकांनीही खेड्यात जाऊन तेथील विकासास हात लावणे व मार्गदर्शन करणे इष्ट ठरेल. म्हणूनच खेड्यातील शिक्षणसंस्थांत शहरी विद्यार्थ्यांनासुद्धा प्रवेश उपलब्ध होऊ शकला पाहिजे. अशाप्रकारे खेडी व शहरे ह्यांना जवळ आणून त्यांच्यात सहकार्याचे वातावरण ग्रामशिक्षणामुळे निर्माण होऊ शकेल.

**नवे नेतृत्व – नवा दृष्टिकोण**

खेड्यातील सुशिक्षित वर्ग खेड्यातच राहू लागला की, ग्रामशिक्षणाचे आणखी एक उद्दिष्ट साधण्यास मदत होईल. ते म्हणजे नवा, प्रगतिपर दृष्टिकोण बाळगणारा ग्रामीण नेत्यांचा वर्ग निर्माण करणे. आपल्या पंचवार्षिक योजना व ग्रामविकासच्या योजना साध्य होण्यासाठी अशा नेतृत्वाची अत्यंत आवश्यकता आहे. ह्या योजना यशस्वी होण्यासाठी जनतेच्या सहकार्याची, निष्ठेची व अविरत परिश्रमाची नितांत आवश्यकता आहे. भारताची बहुसंख्य जनता खेड्यांत राहणारी आहे आणि म्हणूनच खेड्यांतील जनतेच्या सहकार्य व आत्मीयता यांवरच ह्या योजनांचे यश अवलंबून राहणार. यासाठी ग्रामीण जनतेला आपल्या योजना व त्याचा ग्रामीण जीवनावर व पर्यायाने संपूर्ण देशावर होणारा परिणाम समजावून देणारे ग्रामनेते पाहिजे आहेत. ह्या ग्रामनेत्यांना आपल्या ग्रामीण जनतेत असलेले अंधश्रद्धा, भोळसटपणा, धर्मांधता, अज्ञान इत्यादी परंपरागत दोष दूर करावे लागतील. त्यांच्या हाडा-मांसात खिळलेली दैववादी वृत्ती व निराशावादी प्रवृत्ती समूळ उपटून काढावी लागेल. भारताच्या भाग्यासाठी झटणारी एक नवी जिवंत प्रेरणा त्यांच्या मनात निर्माण करावी लागेल. नवीन यंत्रयुगाची कास धरीत, शास्त्रीय ज्ञानाचा फायदा करून घेत नव्या जोमाने व नव्या ईर्ष्येने भारताच्या भाग्योदयासाठी श्रम करण्याची प्रेरणा त्यांच्या मनात निर्माण केली पाहिजे. अशी प्रेरणा ग्रामीण जनतेला देणारे ग्रामनेते निर्माण करणे हा ग्राम-शिक्षणाचा हेतू आहे. ग्रामीण संस्थांतूनच उच्च प्रकारचे ग्रामशिक्षण घेऊन हे ग्रामनेते बाहेर पडतील व आपल्या बुद्धीचा, ज्ञानाचा व कार्याचा फायदा ग्रामीण

जनतेला करून देण्यासाठी ते ग्रामीण विभागातच राहतील. नव्या युगाची व नव्या ज्ञानाची प्रेरणा देत ते स्वतःच्या उदाहरणाने ग्रामीण जनतेला कार्यरत ठेवून विकासाच्या मार्गावर नेतील.

## ग्रामीण पुनर्रचना

एकंदरीत ग्रामीण पुनर्रचना हा ग्रामशिक्षणाचाच एक उद्देश आहे असे म्हटले पाहिजे. ब्रिटिश कालखंडामध्ये देशाचा हा सर्वांत मोठा घटक म्हणजे ग्रामीण विभाग अत्यंत मोठ्या प्रमाणावर उपेक्षिला गेला. ब्रिटिशांचे सर्व लक्ष शहरांतील केंद्रीकरणाकडे होते. मोठे उद्योगधंदे मूठभर शहरात केंद्रित करण्यात आले. त्यामुळे खेड्यांतील जनता मजूर म्हणून शहराकडे जाऊ लागली व खेड्यातील कच्चा माल शहरांतील कारखान्यांकडे वळू लागला. खेडी मात्र निर्धन होत चालली. राज्यकारभाराचेही जाचक केंद्रीकरण होऊन पूर्वीची पंचायत राज्याची पद्धती पूर्ण कोलमडून पडली. त्याबरोबरच खेड्यांची अस्मिता धुळीस मिळाली. शैक्षणिक संस्था व विद्यापीठे ह्यांनी प्रामुख्याने शहरातच ठाण मांडले. तेव्हा खेड्यातला बुद्धिजीवी वर्गही शहरांकडे आकृष्ट होऊ लागला. शहरी राहणीमान व ग्रामीण राहणीमान ह्यात खूपच मोठा फरक पडू लागला. नव्या शास्त्रीय युगाशी संपर्क न आल्याने खेडी ही मध्ययुगातल्याप्रमाणेच जुनी-पुराणी, भकास व ओसाड राहिली. शहरात मात्र शास्त्रीय ज्ञानाने, विजेच्या सहाय्याने व पाश्चात्त्य आचारविचाराने अपूर्व क्रांती घडवून आणली. अशा शहरांत पाऊल ठेवल्यावर परत खेड्याकडे वळण्यास ग्रामीण विद्यार्थी नाखूष होऊ लागला. अशा तऱ्हेने पैसा आणि विद्या ह्या दोन्ही बाबतींत खेडी अधिकाधिक दरिद्री होऊ लागली. परकीय राजसत्तेच्या ध्यानात ही गोष्ट येत नव्हती असे नाही. पण देशहिताची तळमळ व आस्था परकीयांच्या मनात असणे शक्य नव्हते आणि त्यांना काळजी होती ती आपल्या देशाच्या – इंग्लंडच्या – विकासाची व वैभवाची. त्यामुळे ह्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांनी जाणूनबुजून किंवा अजाणता दुर्लक्ष केले तर त्यात नवल करण्यासारखे काही नव्हते.

स्वातंत्र्योत्तर कालात ही परिस्थिती पालटली. देशाचा विकास म्हणजे ग्रामविकास ही गोष्ट आपल्या ध्यानात आली व ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यास मोठ्या जोमाने सुरुवात झाली. शेतीचा विकास करण्यासाठी प्रचंड प्रमाणावरच्या पाटबंधाऱ्याच्या योजना हाती घेण्यात आल्या. मोठमोठ्या उद्योगधंद्यांची प्रतिष्ठापना खेड्यात होऊ लागली व घरगुती उद्योगधंद्यांचा विकास करण्याचा प्रयत्न होऊ लागला. सहकारी संस्थांच्या सहाय्याने शेती व ग्रामजीवन ह्यात आमूलाग्र क्रांती होऊ लागली. शास्त्रीय ज्ञान व वीज ह्याचा उपयोग करून खेड्यांचा कायापालट करण्यास सुरुवात झाली. शिक्षणाचा प्रसार खेड्यांतून झपाट्याने होऊ लागला व खेड्यांतच प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाची साधने

उपलब्ध होऊ लागली. सत्तेचे व आर्थिक व्यवस्थेचे विकेंद्रीकरण मान्य करण्यात येऊन पचायत राज्याचे प्रयोग सुरू झाले. थोडक्यात आर्थिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक अशा सर्व बाबतीत खेड्यांची पुनर्रचना होऊ लागली. ही पुनर्रचना करण्यास पुढे होऊन मदत करणे हा ग्रामशिक्षणाचा आणखी एक हेतू आहे. अर्थातच ग्रामीण पुनर्रचनेचे सर्व कार्य व जबाबदारी ग्रामशिक्षण घेऊ शकणार नाही. पण ह्या बाबतीत एक-दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी त्याला करता येणे शक्य आहे. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण जनतेला नव्या दृष्टिकोणाची प्रेरणा ग्रामशिक्षणाद्वारे मिळू शकेल. आपला विकास आपल्यावरच अवलंबून आहे व त्यासाठी आपणच परिश्रम केले पाहिजेत, हे तत्त्व ग्रामशिक्षणातूनच बिंबविता येईल. ग्रामीण नेते निर्माण करण्याची जबाबदारी ग्रामशिक्षणावरच टाकावी लागेल. त्याचप्रमाणे शिक्षण, उद्योग, वैद्यकीय, स्थापत्य, व्यापार इत्यादी क्षेत्रांत काम करणारे ग्रामीण कार्यकर्ते ग्रामीण शिक्षण-संस्थांतच तयार होतील. ग्रामीण विद्यार्थी व शिक्षकदेखील ग्रामविकासाच्या कार्याला हातभार लावू शकतील. समाज-विकासाच्या योजनात हे तत्त्व अंतर्भूत करण्यात आले आहे व त्या दृष्टीने शिक्षकांना, प्रशिक्षण-महाविद्यालयातील प्राध्यापकांना व शिक्षणाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्याच्या योजना आखण्यात आल्या आहेत. ग्रामशिक्षण हे ग्रामीण पुनर्रचनेला अशा रीतीने पोषक ठरू शकते व ग्रामीण पुनर्रचनेचा तो एक भाग असल्याने तिचा विकास ग्रामशिक्षणाच्या विकासाला उपकारक ठरतो. दोन्ही गोष्टी अशा परस्परपूरक व परस्परपोषक आहेत.

## सामाजिक क्रांती

ग्रामीण पुनर्रचनेतूनच नवी सामाजिक क्रांति होऊ शकेल. ग्रामशिक्षणाचे हे एक प्रमुख उद्दिष्ट मानता येईल. जरी या बाबतीतली संपूर्ण जबाबदारी ग्राम-शिक्षणाला उचलता आली नाही तरी ह्या क्रांतीतील सर्वांत महत्त्वाचा घटक तोच आहे हे विसरून चालणार नाही. गांधीजींच्या लक्षात ही गोष्ट आलेली होती. आपल्या जीवन-शिक्षण-योजनेचे उद्दिष्ट त्यांनी ‘ शांततापूर्ण सामाजिक क्रांती ’ ह्या शब्दात सांगितले होते आणि ही योजना प्रथम खेड्यांतच राबविण्याची त्यांची मनीषा होती. ही क्रांती दोन प्रकारची असू शकते. एक नव्या विचाराची व दुसरी प्रगत जीवनमानाची. या दुसऱ्यात चांगले आरोग्य, चांगले जेवण, चांगला राहण्याची व्यवस्था, साक्षरतेचे अधिक प्रमाण, दळणवळणाच्या चांगल्या सोयी, अधिक उत्पादनक्षमता इत्यादी गोष्टींचा समावेश होऊ शकतो. नवीन विचारात लोकशाहीला पोषक वृत्ति, सहकार्याची आवड, मानवतेची जोपासना, समाजहिताची निष्ठा, जातीयता व अंधश्रद्धा यांस तिलांजली, श्रममूल्याची प्रतिष्ठापना, शास्त्रीय ज्ञानाची कास, प्रयोगक्षमतेवर विश्वास, नीतिमूल्याची जपणूक, दैववादाचा त्याग व प्रयत्नवादावर भर इत्यादी गोष्टी येतील. सामाजिक

क्रांतीच्या ह्या दोन्ही चक्रांना अधिक तीव्र गती देण्याचे व ती नजीक आणण्याचे कार्य ग्रामशिक्षणाकडूनच होऊ शकेल. हे कार्य दोन प्रकारे करता येते. एक नवीन विचाराची समाजाला देणगी देऊन व दुसरे प्रत्यक्ष कृतीत ते विचार कसे उतरावयाचे हे दाखवून. अशा तऱ्हेने सामाजिक क्रांति जवळ आणण्यास मदत करणे हा ग्रामशिक्षणाचा एक महत्त्वाचा हेतू होय.

## समृद्ध ग्रामजीवन

ह्या क्रांतीतून गांधीजींना खेड्यांतील एक प्रमुख समस्या सोडवावयाची होती. ती म्हणजे भुकेची. खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला पोटभर खायला मिळाले पाहिजे अशी त्यांची मनीषा होती. रवींद्रनाथ टागोर मात्र एवढ्यावरच संतुष्ट नव्हते. त्यांची प्रतिभाशक्ती जीवनांतला आनंद व जीवनांतले सौंदर्य यांचा आस्वाद घेण्यासाठी धडपडत होती. व्यक्तीचे जीवन जीवनातल्या सौंदर्याचा साक्षात्कार झाल्याशिवाय परिपूर्ण होऊ शकणार नाही असे त्यांना वाटत होते. हा साक्षात्कार प्राप्त करून घेण्याची क्षमता निर्माण करणे हे एक ग्रामशिक्षणाचे उद्दिष्ट होय. ग्रामजीवनाची समृद्धी ह्या सौंदर्यासक्तीत आहे. नृत्य, नाट्य, काव्य, चित्रकला, शिल्प, निसर्ग ही सारी सौंदर्याची अपत्ये आहेत. ह्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. यांच्या सौंदर्याचे मुक्त पान केले पाहिजे तरच जीवनात आनंद प्राप्त होईल, समृद्धी येईल, यासाठी निरनिराळ्या कला व सांस्कृतिक कार्यक्रम ह्यांना ग्रामशिक्षणात महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः खेड्यांत नेहमी आढळून येते की लोकांचे जीवन एकांगी बनले आहे. त्याच कुबट वातावरणात सतत डुंबत राहिल्याने त्यांची प्रकृती थोडीशी रोगट बनली आहे. विचार काहीसे कोते झाले आहेत. निराशावादाची दाट छाया त्यांच्या सर्व जीवनावर पडली आहे. अशा जीवनाला समृद्ध बनविण्याचा एकच मार्ग कलास्वादाची व सौंदर्यसेवनाची पिपासा त्यांच्यात निर्माण करणे ग्रामशिक्षणाचा हाही एक प्रमुख उद्देश आहे. त्याकडे दुर्लक्ष करून ग्रामशिक्षण सफळ होऊ शकणार नाही.

## मूळ उद्दिष्टे अभिन्नच

ग्रामशिक्षणाच्या उद्दिष्टांची आपण चर्चा केली. पण एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे. आपल्या देशाच्या घटनेत किंवा कायद्यांत अशी स्वतंत्र उद्दिष्टे केवळ ग्रामशिक्षणासाठी ठरवून दिलेली आढळणार नाहीत. आपल्याच काय जगातील बहुतेक सर्व देशांच्या बाबतीत हीच गोष्ट आपणास दिसून येईल. Facilities for Education in Rural Areas ह्या यूनेस्कोच्या प्रकाशनात जगातील सर्व देशांच्या ग्रामशिक्षणाचा आढावा घेऊन हाच निष्कर्ष प्रकट करण्यात आला आहे. राधाकृष्णन् कमिशन व श्रीमाळी कमिशन ह्यांच्या कमिटी-अहवालातही ग्रामशिक्षणाची स्वतंत्र उद्दिष्टे सांगितलेली नाहीत. उलट त्या दोघांच्या

मताने ग्रामीण व शहरी शिक्षणाची अंतिम उद्दिष्टे एकच आहेत. म्हणूनच स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही राधाकृष्णन् कमिशनने सुचविलेली उच्च शिक्षणाची उद्दिष्टे किंवा लोकशाहीवरील निष्ठा, नागरिकत्वाची जोपासना, व्यावसायिक तत्परता व्यक्तित्वाचा विकास व नेतृत्वाची क्षमता ही मुदलियार-कमिशनने सुचविलेली दुय्यम शिक्षणाची उद्दिष्टे शहरी आणि ग्रामीण विभागांना सारखीच लागू आहेत. परंतु ग्रामीण विभागाच्या काही खास गरजा असतात. भारतासारख्या अविकसित व ग्रामप्रधान देशात तर त्या अत्यंत तीव्र असतात. म्हणूनच परिस्थितीनुरूप काही विशिष्ट उद्देश ग्रामशिक्षणाचा विचार करताना आपणास डोळ्यासमोर ठेवावे लागतात त्या दृष्टीनेच वरील चर्चा केली आहे. ही उद्दिष्टे आपल्या देशाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांना पोषकच ठरणारी आहेत हे सहजच आपल्या लक्षात येते.

**ग्रामशिक्षणाची समस्या**

वरील विवेचनाच्या आधारे आपणास ग्रामशिक्षणाच्या समस्यांवर प्रकाश टाकता येईल. सर्वसाधारणपणे आपणांस खालील बाबींचा विचार या संबंधात करावा लागेल :

( १ ) ग्रामीण विद्यार्थ्यांचे शिक्षण ( पूर्वप्राथमिक ते विश्वविद्यापीठीय ).
( २ ) ग्रामशिक्षक व शिक्षणाधिकाऱ्यांचे शिक्षण.
( ३ ) समाजशिक्षण कार्यकर्त्यांचे शिक्षण.
( ४ ) ग्रामीण विकासासाठी आवश्यक असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या व्यक्तींचे शिक्षण तंत्रज्ञ, डॉक्टर, स्थापत्य-विशारद इत्यादी. )
( ५ ) प्रौढ-शिक्षण ( निरक्षर व नवसाक्षरांसाठी )
( ६ ) ग्रामसेवक व ग्रामनेत्यांचे शिक्षण.
( ७ ) समाजविकास-योजना राबविण्यास मदत करणे.
( ८ ) समाजविकासाची प्रेरणा ग्रामीण जनतेत निर्माण करणे व त्यास त्यानुरूप शिक्षण देणे.
( ९ ) ग्रामीण समस्यांवर संशोधन करणे व त्या सोडविण्यास उपाय शोधून मदत करणे.
(१०) खेड्याच्या सामाजिक व सांस्कृतिक गरजा भागविणे.
(११) खेड्यांतील जनतेचा कसबीपणा वाढवणे व जमीन अधिक उत्पादनक्षम करणे.
(१२) थोड्यात स्वकष्टाने सर्वांगीण आत्मविकास करून घेण्याच्या कार्यास खेड्यांतील समाजास मदत करणे.

## भारतीय ग्रामशिक्षणाची पार्श्वभूमी : ३

### पार्श्वभूमीच्या अभ्यासाची आवश्यकता

भारतीय ग्रामशिक्षणाचा विचार करीत असताना प्रथमतः आपणास भारतीय खेड्यांचे स्वरूप बारकाईने पाहणे आवश्यक आहे. शिक्षण आणि जीवन ह्यांचा अविभाज्य संबंध असल्याने ग्रामजीवनाचा परिचय न करून देताच ग्रामशिक्षणाची चर्चा आपण करू शकणार नाही. ब्रिटिश कालखंडात ग्रामशिक्षणाचे जे सरकारी प्रयोग झाले त्यांच्या अपयशाचे हे एक प्रमुख कारण होय. भारतीय ग्रामीण जीवन कसे आहे, त्याची परंपरा कोणती आहे, महत्त्वाचे ग्रामीण प्रश्न कोणते आहेत, ग्रामीण लोकांचा स्वभाव व प्रवृत्ती कशी आहे, त्यांच्या महत्त्वाच्या गरजा कोणत्या आहेत, त्या दूर करण्याचे उपाय कोणते, त्यांपैकी भारतात व्यवहार्य कोणते ठरतील, त्याबाबतीत शिक्षणाचे कार्य कोणते इत्यादी प्रश्नांचा सखोल अभ्यास ब्रिटिश राजवटीत झाला नाही. शैक्षणिक योजना आखण्यात व प्रयोग करण्यात धरसोडपणाच काय तो दिसून आला. विशेषतः ग्रामशिक्षणाच्या बाबतीत तो अधिकच मोठ्या प्रमाणावर होता ; त्यामुळे ब्रिटिशांच्या ग्रामशिक्षणाच्या योजना म्हणजे अपयशाची एक परंपराच होती. हा दोष दूर करण्याचा एकच उपाय तो म्हणजे आपल्या खेड्यांचा जीवनाचा नीट अभ्यास करणे व मगच त्याला अनुरूप अशी शैक्षणिक योजना अंमलात आणणे.

अनुक्रम ४४८८८ वि: ७१०१८

क्रमांक २०६४४ नों: दि: २४।१२।८१

## भारतीय ग्राम : ऐतिहासिक परंपरा

भारतीय खेड्यांना मोठी एतिहासिक परंपरा आहे. अत्यंत प्राचीन काळापासून ती अव्याहतपणे येथे नांदत आली आहेत. ग्रामीण समाजशास्त्राप्रमाणे खेड्यांची निर्मिती मानवाची शिकारी अवस्था जाऊन शेतकऱ्याची अवस्था सुरू झाली की होते. या सिद्धान्ताप्रमाणे भारतीय खेड्यांची सुरुवात आपण इ. स. पूर्व ३००० म्हणजे मोहेंजोदारो–हडाप्पा संस्कृतीपर्यंत नेऊ शकतो. हिंदू संस्कृतीची सुरुवात इ. स. पू. १५००–२००० मानली, तरी त्या वेळेपासून आजतागायत ह्या खेड्यांना इतिहास आहे हे दिसून येते. भारतीय खेड्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य हे की, देशात मोठमोठ्या समाजक्रांत्या वा राज्यक्रांत्या झाल्या, भली मोठी साम्राज्ये उलथापालथी झाली तरी त्यांच्या अस्तित्वाला विशेष धोका पोहोचला नाही. त्यांचा कारभार शतकानुशतके अत्यंत सुरळीतपणे चालू राहिला. याला कारण येथील ग्रामव्यवस्था.

या ग्रामीण व्यवस्थेचा केंद्रबिंदू होता पंचायत-समिती. प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत किंवा ग्रामसमिती असे. गावाचा सर्वसाधारण कारभार पाहणे हे तिचे कार्य होते. हा कारभार ती स्वतःच्या जबाबदारीवर किंवा ग्रामप्रमुखाला सल्लामसलत देऊन पार पाडी. ग्रामपंचायतीच्या कक्षेत अनेक प्रकारच्या गोष्टी येत होत्या. न्यायदानाची व्यवस्था पंचायत पाहत असे. गावातील शांतता व स्वास्थ्य राखण्याची जबाबदारी पंचायतीचीच असे. शिक्षण, आरोग्य, संरक्षण इ. ग्रामीण समस्याही तीच सोडवत असे. रस्ते, इमारती, बागा, देवळे इत्यादी सार्वजनिक हिताच्या गोष्टींकडे लक्ष देणे, त्यांची दुरुस्ती करणे त्यात भर टाकणे ही कामे तिचीच होती. उत्सव, जत्रा, भजन इ. करमणुकीची साधने तिच्यामार्फतच लोकांसाठी उपलब्ध होत. अशा प्रकारे गावाच्या सर्व व्यवहाराचा मुख्य आधार पंचायत होती.

या पंचायत-समित्या आपला कारभार स्वतंत्ररीत्या चालवीत. त्यांवर इतर कोणाचे, प्रत्यक्ष राजसत्तेचेही नियंत्रण नसे. संपूर्ण गावाचा कारभार एखाद्या कुटुंबाप्रमाणे त्या चालवीत. उत्तर भारतात या पंचायतीच्या सदस्यांची निवडणूक होत नसे तर गावातील वयोवृद्ध लोकांकडे तो मान आपणहून येत असे. दक्षिण-भारतात निवडणुकांचा पद्धत होती. त्या ठिकाणी लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी पंचायतीचे सदस्य बनत व ते एकनिष्ठेने गावाची सेवा बजावीत. प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण व स्वावलंबी असल्याने त्यास ग्रामराज्याचे स्वरूप आलेले होते. व ग्राम-पंचायत एखाद्या मंत्रिमंडळाप्रमाणे होती. भारताची सांस्कृतिक परंपरा अविच्छिन्न टिकविण्यात ही ग्रामराज्ये व त्यांच्या पंचायत-समित्या ह्यांचा प्रमुख भाग होता.

ह्या पंचायतींच जमीन-महसुलासाठी राजसत्तेला जबाबदार असत. शेतकऱ्याला पूर्वी स्वतंत्ररीत्या खंड भरावा लागत नसे, तर ग्रामसमिती संपूर्ण गावाचा खंड गावातर्फे राजाला देत असे. प्राचीन हिंदू राजवटीत हा खंड उत्पन्नाच्या १/६ होता. बहुतेक ठिकाणी तो धान्याच्या रूपात दिला जाई. काही क्वचित् ठिकाणी तो पैशाच्या स्वरूपांतही भरला जाई. मुसलमानी अमदानीतही तीच प्रथा चालू होती. पंचायतींचे अस्तित्व मुसलमानी राजांनी मान्य केले होते व त्याच्या सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक कार्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण आणले नव्हते. महसुलाच्या बाबतीत काही थोडेफार फेरफार करण्यात आले. उदाहरणार्थ, अल्लाउद्दिनाने सरकारी महसूल १/६ वरून १/२ वर नेला. परंतु तुघलक राजांनी तो १/१० किंवा १/११ वर आणला. शेरशहाने जमिनीचे वर्गीकरण केले व त्यावरून प्रमाणित उत्पादन अजमावले. उत्पन्नाच्या १/३ इतका महसूल त्याने ठरवून दिला. अकबरानेही ह्याच धोरणाचा अवलंब केला. शेवटच्या मोगली राजांनी व पेशव्यांनी वसुली शेतकऱ्याची ( Revenue farmers ) प्रथा सुरू केलेली आढळून येते, तरी पण एकंदर पंचायत-समित्या आपले स्वातंत्र्य व अधिकार पूर्वीप्रमाणेच राखून होत्या.

या पंचायतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्व जातींच्या प्रतिनिधींचा त्यांत समावेश होता. अर्थातच गावातील सर्व जमातींच्या लोकांकडे पंचायतींचे लक्ष असे. त्यामुळे गावातील प्रत्येक व्यक्तीला गावात स्थान असे. प्रत्येक जातीप्रमाणे कामाची वाटणी केलेली असे व प्रत्येक जातीला गावाच्या कारभारात समाविष्ट करून घेतलेले असे. प्रत्येकाचे व्यवसाय व उद्योगधंदे ठरलेले असत व त्या सर्वांचा गावाच्या स्वयंपूर्णतेला आधार असे. ह्यामुळे कोणाही व्यक्तीस बेकार राहण्याची पाळी सहसा येत नसे. म्हणूनच एकंदरीत गावातील लोकांच्या राहणीचे मान फार उच्च नसले तरी सुखासमाधानाचे होते. गावातील लोक कुटुंबातील घटकाप्रमाणे अगदी जवळजवळचे होते. त्यांच्यांत प्रेमाचा, सहकार्याचा व बंधुत्वाचा धागा होता. पंचायत-समितीचे त्यांच्या आचार-विचारांवर नियंत्रण होते. तिचा त्यांना धाक वाटत असे. त्यामुळे गावाचा व्यवहार सुरळीत व व्यवस्थित चाललेला असे. ती जमिनीत शिरून बसलेली चिवट मुळेच होती.

## ब्रिटिशांचे धोरण – पंचायतीवर आघात

ब्रिटिशांनी बरोबर ह्या मुळांवरच घाव घालून शतकानुशतके अत्यंत सुव्यवस्थित चाललेली येथील आर्थिक व सामाजिक रचना पूर्णपणे विस्कळित व निराधार करून टाकली. सत्कार्याचे व जनसेवेचे व्रत घेऊन सर्व ब्रिटिश लोक येथे आले नव्हते. त्यांचे मुख्य ध्येय होते व्यापार व नंतर राज्यविस्तार. त्यासाठी लागणारा आवश्यक पैसा गोळा करणे हे त्यांचे प्रमुख शेतीविषयक धोरण

होते. त्यापुढे शेती-सुधारणा, समाजकल्याण, ग्रामविकास अशा ध्येयवादी कल्पनांना थारा नव्हता. धरसोडीच्या व स्वार्थी धोरणामुळे ब्रिटिशांनी येथल्या प्रभावी ग्रामव्यवस्थेला सुरुंग लावला आणि सर्व ग्रामीण विभागाची म्हणजे पर्यायाने संपूर्ण देशाचीच पूर्ण दैना उडवून दिली.

येथील पंचायत-समित्यांची मदार एका गोष्टीवर अवलंबून होती. ती म्हणजे गावाची जमिनीवरील सामुदायिक मालकी. पूर्वी महसूल प्रत्येक व्यक्तीकडून निरनिराळा वसूल केला जात नव्हता, तर पंचायतीकडून सर्व गावाचा एकत्रितरीत्या वसूल केला जाई. ह्यामुळे गावातील व्यक्तिव्यक्तींचे परस्परांशी संबंध घनिष्ठ होत व गावात एक कौटुंबिक वातावरण पसरलेले असे. ब्रिटिशांची राजवट येथे सुरू झाल्यावर पहिल्या पहिल्याने काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी कंपनी सरकारचे लक्ष या गोष्टीकडे वेधून महसूल पंचायतीमार्फत वसूल करण्याची सूचना केली. उदाहरणार्थ, मुंबई प्रांतात एल्फिन्स्टनने मुंबई प्रांतातील ग्रामसमित्यांच्या कामाचा अहवाल पाठविला होता. १८०८ ते १८१८ च्या दरम्यान मद्रासमधील महसूलमंडळाने ( Board of Revenues ) ग्रामसमित्यांना मान्यता देण्याची एक चांगली योजना सुचविली होती. परंतु जास्तीत जास्त पैसा वसूल करण्याच्या अभिलाषेने कंपनी सरकारने ह्या साऱ्या सूचनांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. गावाची जमिनीवरील सामुदायिक मालकी झुगारून दिली व पर्यायाने संपूर्ण ग्रामव्यवस्थाच उन्मळून टाकली.

ब्रिटिशांनी तीन प्रकारच्या महसुलाच्या पद्धती अंमलात आणल्या. बंगाल, बिहार व ओरिसामध्ये जमीनदारी पद्धत अवलंबण्यात आली. या विभागात कायमधारा ठरवून देण्यात आला. रयतांकडूनच्या खंडाचा १०/११ सरकारी हिस्सा व १/११ जमीनदाराचा हिस्सा अशी वाटणी करण्यात आली ही योजनाही शेतकऱ्यांच्या दृष्टीने हितकर ठरावी यासाठी आखण्यात आली नाही, तर ह्या तीन प्रांतांचा महसूल २६ लाख रुपये प्रथमतः ठरविण्यात आला व त्याच्या अनुषंगाने ही योजना प्रसृत करण्यात आली. या योजनेमुळे गरीब रयतेला पिळून काढण्यासाठी जमीनदारांना रान मोकळे झाले. जास्तीत जास्त खंड वसूल करण्यासाठी सरकारी वरदहस्त असलेल्या जमीनदारांनी शेतावर राबणाऱ्या किसानांना अक्षरशः दे माय धरणी ठाय केले. आग्रा व पंजाब येथील महालवारी पद्धती केवळ नावानेच समाईक होती. प्रत्यक्ष व्यवहारात प्रत्येक जमीनदाराचा भाग वेगळा करता येण्याजोगा व स्वतंत्ररीत्या घेता येण्याजोगा होता. ह्या दोन्ही पद्धतींमुळे प्राचीन ग्रामीण समित्या मोडकळीस आल्या व एकांगी व्यक्तिनिष्ठतेला प्रोत्साहन मिळाले. रयतवारी पद्धतीतूनही हेच विषफळ बाहेर आले. जमीन गावाच्या मालकीची नसून सरकारी मालकीची आहे व भू-धारकास प्रत्यक्ष सरकारपासून जमिनीचा मालकी हक्क प्राप्त होतो असे

यामागचे गृहीत-तत्त्व होते. ह्यामुळे गावाचे सामुदायिक जीवन व रचना पार धुळीला मिळाली.

अशा तऱ्हेने ग्रामसमित्यांची धूळधाण करून ब्रिटिशांनी ग्रामीण विभागात एक नवे अराजकच निर्माण केले. त्याबरोबरच जमिनधान्यासंबंधी कधीही एकसूत्री व निश्चित धोरण त्यांनी ठरवले नाही. जमिनीपासून अधिक उत्पादन कसे काढावे ह्याचा विचार न करता अधिक खंड कसा मिळेल हा एवढाच दृष्टिकोण त्यांनी समोर ठेवला. त्यामुळे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच कोलमडली. जमीनदारी पद्धतीमुळे बहुतेक सर्व प्रांतांत स्वतः जमीन न कसणारे पण जमिनीचा खंड उकळणारे अनेक मध्यस्थ निर्माण झाले. १९२१ ते ३१ मध्ये ह्यांची संख्या ६२%नी वाढली. जे काही कूळकायदे केले त्या कायद्यांनी जमीनदारांनाच संरक्षण मिळाले. अशा प्रकारे लक्षावधी शेतकऱ्यांच्या कल्याणाची राखरांगोळी करून काही मूठभर जमीनदारांचे हित साधण्यात आले. रयतवारी पद्धतीला अनुसरून मुंबई प्रांतात सुरुवातीला उत्पन्नाच्या ५५ टक्के सरकारी वाटा ठरविण्यात आला. ह्यामुळे एकच दैना उडाली व हजारो लोकांनी आपल्या शेतीला व घरादाराला रामराम ठोकला. साहजिकच भले मोठमोठाले भूप्रदेश शेतीवाचून उजाड पडू लागले. म्हणूनच १९५३ साली मुंबईच्या राज्यपालांनी 'ज्या ज्या ठिकाणी रयतवारी पद्धती अंमलात आणली, त्या त्या ठिकाणी शेतकरी हा भुकेकंगाल झाला' असे उद्‌गार काढले. मद्रासमध्ये भांडणे, फिर्यादी, कज्जेदलाली यांना ऊत आला व पूर्वीचे गावातील कौटुंबिक वातावरण व जिव्हाळा औषधाला सुद्धा मिळेनासा झाला.

ग्रामसमितीचे जमिनीवरचे नियंत्रण नाहीसे झाल्याने आणखी एका ग्रामीण अरिष्टात भर पडली. जमिनीचे तुकडे व विभाजन फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. उदाहरणार्थ, बंगालमध्ये ४६% कुटुंबांजवळ २ एकरांपेक्षा कमी शेती असल्याचे आढळून आले. पंजाबात २३९७ खेड्यांची पाहणी केली असता १७·९% शेतकऱ्यांजवळ १ एकरपेक्षा कमी, २५·५% शेतकऱ्यांजवळ १ ते ३ एकर, १४·९% शेतकऱ्यांजवळ ३ ते ५ एकर व १९% शेतकऱ्यांजवळ ५ ते १० एकर शेती असल्याचे आढळून आले. सर्व भारतभर कमीअधिक प्रमाणात हीच स्थिती होती. जमिनीच्या अशा तोटेदायक तुकड्यांचा संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर व जीवनावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला. शेतीचे उत्पादन पराकाष्ठेचे घटले. श्रम, वेळ, औजारांचा उपयोग व शेतीवर गुंतवलेला पैसा ह्या सर्वांचे वाया जाण्याचे प्रमाण खूपच वाढले. जमिनीची कायमची सुधारणा करणे दुरापास्त होऊ लागले. शेतकऱ्याला आपल्या शेतावर राहणे कठीण पडू लागले. शेतीसाठी योग्य मजूर व भांडवल मिळवणे ही एक अवघड समस्या होऊन बसली. शेतातून दुसरे पीक काढण्यास अडचण भासू

लागली. अनेक वेळा जमीन कसल्याशिवाय राहू लागली. भांडणे व कज्जेदलाली वाढून शेजाऱ्या-शेजाऱ्यांतील घरोबा नाहीसा झाला. थोडक्यात भूमाता ही नावाची माता राहिली व शेतकऱ्याला ती म्हणजे एक डोईजड भारच झाला.

शेतकऱ्यांच्या दुर्दशेबरोबर ग्रामीण उद्योगधंद्यांचीही परवड झाली. वाढत्या औद्योगीकरणामुळे पूर्वीची ग्रामीण स्वयंपूर्णता ढासळली व ग्रामीण उद्योगधंदे बुडाले. ग्रामसमित्या नाहीशा झाल्याने या बेकार ग्रामीण कारागिरांना कोणी वाली उरला नाही. सरकारने ह्याचा कधी विचार केला नाही वा त्यांच्या रोजगाराची काही व्यवस्था केली नाही. त्यामुळे केवळ शेतावर मजूर म्हणून काम करण्याशिवाय त्यांना दुसरा व्यवसाय उरला नाही. ह्या भूमिहीन मजुरांचे प्रमाण १९२१ ते ३१ मध्ये शे. ४९ टक्क्यांनी वाढले. शेतीवरचा भार त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाढला आणि ग्रामीण-समस्या अधिक बिकट व्हावयाला यामुळे मदत झाली.

ह्या ग्रामीण गोंधळाला आणखीही काही गोष्टी जबाबदार ठरल्या. सर्व कारभाराचे केंद्रीकरण झाल्यामुळे व ग्रामसमित्या नाहीशा झाल्याने छोटे छोटे ग्रामीण प्रश्न सुद्धा सरकारी कायद्याच्या मदतीवाचून सुटेनासे झाले. त्यामुळे भांडणे, तंटेबखेडे, दप्तरदिरंगाई, लाचलुचपत इ. दुर्गुण भरमसाठ बोकाळले व जनसेवा, जबाबदारीची जाणीव, बंधुत्वाची भावना ह्या गोष्टी दुर्मिळ होऊ लागल्या लोकोपयोगी कामाची जबाबदारी सरकारने घेतल्याने स्वतः काही न करता सरकारवर सर्व बाबतीत अवलंबून राहण्याची प्रवृत्ती बोकाळली. सरकारनेही स्वतःकडे जबाबदारी घेऊन प्रत्यक्षात काम मात्र काहीच केले नाही. त्यामुळे शिक्षण, विहिरी, तळी, रस्ते, बागा इ. गोष्टींकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होऊन ग्रामीण-अधोगतीला अधिक चालना मिळाली. शिक्षण व उद्योगधंद्यांची केंद्रे शहरात असल्याने ग्रामीण तरुणांची धाव शहराकडे वळू लागली व खेडी आर्थिक व बौद्धिकदृष्ट्यासुद्धा निर्धन बनू लागली. खेड्यातली संपत्ती खेड्यात रहावी यासाठी कोणतेही प्रयत्न सरकारने केले नाहीत; उलट गायरान व जंगल ह्याबाबतचे हक्क व ग्रामसमित्यांची त्यावरची मालकी नष्ट करून ग्रामीण दारिद्र्याला प्रोत्साहन दिले. साहजिकच लोकांचा कर्जबाजारीपणा वाढला. सावकारांचा अधिक जाच सुरू झाला. शेतकऱ्यांना कर्ज फेडता येईना म्हणून त्यांच्या जमिनी घेण्याचा त्यांनी सपाटा चालविला व त्यामुळे जमीन न कसता केवळ खंड लुबाडणाऱ्या मध्यस्थांची पैदास वाढली. १८७५ ते १८९३ च्या दरम्यान १,१७९,००० एकर जमीन त्यांनी ताब्यात घेतली. २७½ ते ५६ टक्क्यांपर्यंत जमीन गहाण म्हणून पडली गेली. त्यातही सरकारचे सावकारी कायदे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या सावकारांच्या स्वार्थाला पोषक ठरल्याने शेतकऱ्यांची पूर्णपणे गळचेपी होऊ लागली. पूर्वीचे

ग्रामसमितीचे नियंत्रण नाहीसे झाल्याने सावकारांना आपले पाश क्रूरपणे आवळण्याची जणू पूर्ण मुभाच मिळाली.

**ग्रामीण विकासाबाबत अनास्था व दुर्लक्ष**

ब्रिटिश राजवटीत खेड्यांची ही धूळधाण झाली याला कारण सरकारची त्याबाबतची उपेक्षा व बेफिकिरी. खेड्यांचा विकास व शेतकऱ्यांची उन्नती साधण्यासंबंधी अनेक सूचना सरकारने वेळोवेळी नियुक्त केलेल्या कमिशन व कमिट्या ह्यांनी पुढे मांडल्या. परंतु सरकारने त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचे आपणास आढळून येते. ग्रामविकासाचा सूत्रबद्ध विचार कधी सरकारी पातळीवर झाल्याचे दिसून येत नाही. आपला राज्यविस्तार वाढवणे व बळकट करणे आणि इंग्लंडचे हितसंबंध अधिक फायदेशीर करणे ह्या प्रकारची दृष्टी असल्याने ब्रिटिश सरकारचे ग्रामीण समस्यांबाबतचे धोरण म्हणजे अपयशाची एक शोकदायक परंपराच आहे. १८८०, १८९८ व १९०१ मध्ये नियुक्त केलेल्या फॅमिन कमिशननी शेतीविकासाबाबत अनेक चांगल्या सूचना केल्या होत्या; परंतु त्यांकडे हेतुपुरस्सर सरकारने दुर्लक्ष केले. उलट १८६६ मध्ये तर केवळ इंग्लंडमधील कापडाच्या धंद्याला खोट बसू नये म्हणून भारतात स्वतंत्र शेतकी खाते स्थापन करावे ही फॅमिन कमिशनची शिफारस फेटाळून लावण्यात आली. तीच शोकांतिका १८८९ च्या डॉ. वोल्करच्या रिपोर्टाची झाली. त्यामध्ये ' हिंदुस्थानातील जमिनीची उत्पादनक्षमता घटत आहे ' ह्या मतावर जोराचा हल्ला चढविण्यात आला. कालवे, तळी, विहिरी व खते ह्यांच्या सहाय्याने शेतीविकास कसा करता येईल ह्यासंबंधी डॉ.वोल्करने मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सर्वसामान्य व शेतकी शिक्षणाचीही बाजू मांडण्यात आली. परंतु सरकारने ह्या रिपोर्टमधील सूचनांकडे सर्वसाधारणपणे कानाडोळा केला. १९०३ मधील इरिगेशन कमिशनच्या व १९१५ मधील सहकार कमिटीच्या सूचनांची अशीच वासलात लावण्यात आली. १९१९ मध्ये द्विदल राज्यपद्धती अमलात आली व शिक्षण, सहकार, स्थानिक स्वराज्य, सार्वजनिक आरोग्य याबरोबरच शेती हे खाते प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आले. त्याबरोबर केंद्र सरकारने ह्या खात्याबाबतची आपली सर्व जबाबदारी पार झटकून टाकली. प्रांतिक सरकार इच्छा असूनही विकासाच्या काही योजना आखू शकत नव्हते. कारण तिजोरीची सत्ता त्यांच्या हातात नव्हती. तेव्हा ग्रामीण जनता व ग्रामीण प्रदेश ह्यांची कमालीची उपेक्षा झाली. एखाद्या पोरक्या पोराप्रमाणे त्यांची शोचनीय अवस्था झाली ह्यामुळे लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध होऊ लागले. तेव्हा लोकांना शांत करण्यावाचून सरकारला गत्यंतर उरले नाही व १९२६ मध्ये शेतीसाठी रॉयल कमिशन नियुक्त करण्यात आले. परंतु त्यातही एक म्यानबाची मेख मारण्यात आली. शेती व ग्रामीण अर्थव्यवस्था ह्यांच्या विकाससंबंधी सूचना करण्यासाठी नेमलेल्या ह्या कमिशनच्या कक्षेबाहेर जमिनीचा महसूल व जमिनीची

मालकी या गोष्टी नेमक्या ठेवण्यात आल्या. त्यामुळे अन्यथा अत्यंत चांगला असलेला हा अहवाल मूलगामी होऊ शकला नाही. 'भारतातील शेती-सुधारण्याचा प्रश्न म्हणजे खरोखर भारतीय ग्रामजीवन सुधारण्याचा प्रश्न आहे आणि त्याचा विचार साकल्याने केला पाहिजे' असे आपले स्पष्ट मत रसेल रिपोर्टने मांडले. ह्यासाठी मध्यवर्ती शेती-संशोधन मंडळाची स्थापना करण्याची व भूविभाजनास प्रतिबंध, जनावरांची जोपासना, सहकार, ग्रामशिक्षण, ग्रामीण पुनर्रचना ह्या सर्वांकडे अधिक धान्योत्पादनासाठी लक्ष देण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे शेतकरी म्हणजे केवळ अधिक उत्पादन वाढवण्याचे साधन नव्हे तर तो एक उत्तम सद्‌गृहस्थही आहे आणि ह्यासाठी त्याचा दृष्टिकोण विशाल करणे आवश्यक आहे असे आपले ठाम मत त्यात प्रदर्शित करण्यात आले. तद्वतच केंद्र सरकारने स्वतः होऊन जबाबदारी उचलल्याशिवाय ग्रामीण-समस्या सुटण्यासारखी नाही व त्यासाठी ही समस्या एकाच वेळी व सर्व बाबींवर विचार करून साकल्याने सोडविली पाहिजे असा इशारा दिला. त्याबरोबरच सर्वसामान्य जनतेची सहानुभूती, आस्था व सक्रिय आधार असल्याशिवाय ही समस्या सुटणार नाही हेही बजावून सांगितले.

सरकारची ह्या रिपोर्टवरची प्रतिक्रिया अत्यंत निराशाजनक व अनास्थापूर्ण होती. ग्रामीण विकासाची व शेतकऱ्यांच्या हिताची खरोखरच तळमळ असती तर सरकारने रसेल रिपोर्टच्या शिफारसी व्यवहारात कशा उतरविता येतील ह्याचा विचार केला असता. परंतु तसे काहीही न करता आहे ती परिस्थिती चालू ठेवण्याचे काळकाढू धारण त्यांनी स्वीकारले. त्यामुळे अर्थातच ग्रामीण जनतेची दैन्यावस्था चालूच होती. त्यांत भर पडली १९३०–३२ च्या मंदीची. सर्वच शेती-प्रधान देशांना मंदीची झळ सोसावी लागली. धान्याच्या किंमती सटकन् उतरल्यामुळे शेतकऱ्याच्या दैन्याला पारावार उरला नाही. अशा वेळीही भारतीय किसानाचे अश्रू पुसण्यास मायबाप म्हणविणारे सरकार धावले नाही. तर खुल्या व्यापाराचे तत्त्व छातीशी कवटाळून लँकेशायरच्या हिताला थोडाही धक्का लागू नये याची पूर्ण सावधगिरी घेत बसले. त्यासाठीच ओटावा करार व **मोदीलीज्-करार** करण्यात आले. **रसेल रिपोर्टने** सुचविलेल्या उपाय-योजनांकडे ढुंकूनही बघण्यात आले नाही; उलट आरोग्य, शिक्षण, विकास-योजना इत्यादींवरील खर्च कमी करण्यात आला. प्रांतिक सरकारचा सार्वजनिक कामावरील १९२९–३० सालाचा ८७२ लक्ष रुपये खर्च १९३२–३३ साली फक्त ५७९ लक्ष रुपयांवर आला. १९३७ साली प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यावर लोकनियुक्त प्रांतांतील मंत्रिमंडळांनी ग्रामीण विकासाकडे आस्थेने लक्ष घालण्यास सुरुवात केली. परंतु त्यांची औट घटकेची राजवट ठरली. १९३९ साली त्यांनी राजीनामे सादर केले व परत येरे माझ्या मागल्या अशी परिस्थिती सुरू झाली. दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडालाच होता. तेव्हा

स्वतःचे राज्य व साम्राज्य टिकवण्याच्या खटाटोपात भारतीय ग्रामीण जनतेच्या डोळ्याकडे व पोटाकडे पाहण्यास साहेबाला वेळही नव्हता नि तसला उमाळाही नव्हता. ब्रिटिश राजवटीचा हा इतिहास म्हणजे ग्रामीण समस्येबाबतच्या पराकाष्ठेच्या अनास्थेचा एक दुर्दैवी पाढा आहे.

## स्थानिक स्वराज्य – एक मृगजळ

परंतु धोरणी व आपमतलबी ब्रिटिशांनी भारतीय जनतेबद्दल आपल्याला खरोखरच कळवळा आहे हे दाखविण्याची संधी दवडली नाही. येथील ग्राम-समित्यांवर साफ नांगर फिरविल्यावर स्थानिक स्वराज्याची योजना पुढे आणून ग्रामीण हिताची आपली कळकळ प्रगट करण्याचा प्रयत्न केला. परंतु ह्या संस्थेचा इतिहास पाहिल्यास ते एक मृगजळच होते असे दृष्टोत्पत्तीस आल्यावाचून राहत नाही.

१८४२ ते १८६२ ह्या कालावधीत स्थानिक स्वराज्यासंबंधी भिन्न भिन्न कायदे करून एका तऱ्हेने पूर्वीच्या ग्रामपंचायतीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. परंतु सरकारचे मुख्य लक्ष शहराकडे असल्याने, ग्रामीण विभागाला ह्या संस्थां-पासून विशेषसा फायदा झाला नाही. १८७० च्या मेयोच्या ठरावाने म्युनिसिपालिट्यांमध्येच वाढ करण्यात आली. १८८२ साली लॉर्ड रिपनच्या पुरस्कारामुळे व प्रेरणेमुळे निरनिराळ्या प्रांतांतून स्थानिक स्वराज्याचे कायदे पास करण्यात आले. परंतु रिपनची आस्था व दृष्टिकोण ह्यांचा अभावच प्रांतिक सरकारमध्ये होता. मद्रास व आसाम हे प्रांत सोडले तर सब डिस्ट्रिक्ट बोर्डसुद्धा इतर प्रांतांत स्थापन झाली नाहीत. त्यांचे लक्ष केवळ डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डावर होते. १९१५ मध्ये प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायत स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. १९१९ मध्ये मॉंटेग्यू-चेम्सफर्ड अहवाल बाहेर आला व ह्या संस्थांचे कार्यक्षेत्र अधिक विशाल झाल्याखेरीज त्या चिरस्थायी होणार नाहीत असा अभिप्राय त्यात व्यक्त करण्यात आला. ह्या अहवालाला अनुसरून १९१९ चा कायदा करण्यात आला. त्यानंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीत निरनिराळ्या प्रांतांत स्थानिक स्वराज्याचे कायदे पास करण्यात येऊन ह्या संस्थांतील कारभार लोकतंत्रानुसार सुरू झाला. स्थानिक स्वराज्याचे खातेसुद्धा लोकनियुक्त मंत्र्याकडे सोपविण्यात आले. १९२० मध्ये बॉंबे व्हिलेज पंचायत ॲक्ट मंजूर झाला व २००० हून अधिक वस्तीच्या प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायत स्थापन करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. इतर प्रांतांतही अशाच प्रकारचे धोरण कमी-अधिक प्रमाणात ठरविण्यात आले. ह्या कायद्यांना अनुसरून ग्राम-पंचायतींना काही थोडे किरकोळ प्रमाणावरील न्यायदानाचे व फौजदारी अधिकार देण्यात आले. ह्याचा खर्च सरकार, म्युनिसिपालिटी व लोकल बोर्ड यांजकडून

मिळणाऱ्या अनुदानातून भागविण्याची तरतूद करण्यात आली. अनेक गावांमध्ये ह्या तरतुदींना अनुसरून पंचायती उघडण्यात आल्या. १९४१ मध्ये मुंबई प्रांतात २१४७२ खेड्यांपैकी १०८३ खेड्यांत ग्रामपंचायती होत्या व ७५ खेड्यांत आरोग्य-समित्या होत्या. ह्यांचे एकूण उत्पन्न २,०१,६६५ रुपये होते व खर्च १,३८,२९५ रुपये होता. त्यांनी एकूण १३६४३ खटले चालवून न्यायदानास मदत केली.

ह्या ग्राम-पंचायतींच्या कार्याचे थोडक्यात समालोचन करावयाचे झाल्यास एक गोष्ट अवश्य मान्य केली पाहिजे. ती म्हणजे काही थोड्या प्रमाणात का होईना पण उपयुक्त कार्य यांनी केले. बंगालमध्ये ह्या ग्राम-पंचायतींनी दवाखाने उघडले तर मध्यप्रदेशात प्रौढ शिक्षणाला उत्साहाने हातभार लावला. पंजाबमध्ये शेतकी विकासाला तर मद्रासमध्ये सामाजिक कायद्याला त्यांच्याकडून साहाय्य मिळाले. तरी पण ह्यांच्या सर्व कार्यांचा व इतिहासाचा एकंदर आढावा घेतल्यास झाले हे कार्य फारच थोड्या प्रमाणावर झाले असे आढळून येते. ह्याला कारणेही अनेक होती पहिले म्हणजे ह्या पंचायतींचा विकास पूर्णतः उलटा झाला. मूळ खेड्यात सुरुवात करून शहराकडे त्या वळायला पाहिजे होत्या तर येथे शहरांवर प्रथम लक्ष केंद्रित करून मग खेड्यांकडे वळविण्यात आले. खेड्यातील गोष्टी जाणून घेण्याऐवजी नागरी मूल्ये व नागरी नमुने जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केल्याने ह्या पंचायती खेड्यांत असूनही खेड्यांचे प्रातिनिधित्व तितक्या यशस्वीपणे करू शकल्या नाहीत. योग्य संचालनासाठी त्यांना कर्तबगार कार्यकर्तेही उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे यांच्या कारभारांत ढिलाई व बेशिस्तपणा आला. लोकल बोर्डांकडून अपेक्षित असलेले योग्य मार्गदर्शन व प्रभावी नियंत्रण ह्यांचाही अभाव दिसून आल्याने पंचायतींच्या कारभारांत अधिकच गोंधळ आला. खुद्द लोकल बोर्डांच्या कारभारात भ्रष्टाचार, वशिलेबाजी, लाचलुचपत, बेशिस्तपणा इ. दोष शिरल्याने ग्रामपंचायतींना त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळणे दुरापास्त झाले. ह्या सर्वांचा परिणाम हा झाला की, पंचायतींना आपले खरे यश कशात आहे ह्याचाच विसर पडला. पूर्वीच्या पंचायती जशा स्वयंपूर्ण व स्वावलंबी होत्या तशा ह्या पंचायती नव्हत्या वा तसे बनण्याची प्रेरणाही वा इच्छाही त्यांच्यात नव्हती. केवळ सरकारी मदतीकडे त्या आशाळभूत नजरेने पाहत राहत. मिळे ती सरकारी मदतही अगदी अपुरी होती. परंतु घातही मौज ही की मिळालेल्या मदतीचा पुरेपूर फायदा ह्या पंचायतींनी उठवला नाही. उदाहरणार्थ, बिहारमध्ये सरकारी अनुदानापैकी फक्त ४२% अनुदान खर्ची पडले व बाकीचे तसेच पडून राहिले. ह्याचा अर्थच हा होता की, पंचायती ह्या केवळ नामधारी पंचायती होत्या. आपला कारभार कसा हाकावा, जवळ असलल्या पैशाचा विनियोग कसा करावा, अधिक पैसा कसा उभारावा, गावातील सर्व जनतेचे सहकार्य कसे मिळवावे व गावाची सर्वांगीण

प्रगती कशी साधावी ह्याचा विचार करण्याची व त्याप्रमाणे पावले टाकण्याची क्षमता त्यांच्या अंगी आलेली नव्हती म्हणूनच स्थानिक स्वराज्याचा ब्रिटिश राजवटीतील प्रयोग म्हणजे एक मृगजळ होते असेच म्हणावेसे वाटते.

साहजिकच या पंचायतींमधून ग्रामीण जीवन सुधारण्याचे यशस्वी कार्य होऊ शकले नाही पूर्वीच्या पंचायती व ह्या पंचायती ह्यांच्यात या बाबतीत जमीन-अस्मानाचा फरक होता पूर्वीच्या पंचायतींनी भारतीय ग्रामीण जीवन शतकानुशतके प्रचंड राजकीय व सामाजिक वावटळींना तोंड देऊन सुरळित चालू ठेवले. ह्या पंचायतींची मूळ घडणच दुर्बल होती. त्यामुळे ब्रिटिश राजवटीत ढासळत चाललेल्या ग्रामीण जीवनाला नवा जोम त्यांच्यामुळे मिळू शकला नाही. म्हणूनच भारतीय किसान व भारतीय ग्राम ह्यांची मोठी केविलवाणी अवस्था ब्रिटिश राजवटीतून झाली. अद्यापही तिच्यात म्हणावा तसा बदल झाला नाही.

## एक विरोध

भारताच्या बाबतीत एक मोठा विरोध दृष्टोत्पत्तीस आल्यावाचून राहात नाही नैसर्गिक संपत्तीने हा देश अत्यंत समृद्ध आहे. तरी पण येथील जनता मात्र तितकीच गरीब आहे भारताचे क्षेत्रफळ १२५९,७६५ चौरस मैल आहे, एवढा विस्तीर्ण भूभाग मिळण्याचे भाग्य जगातील फारच थोड्या देशांच्या वाट्याला आले आहे. हा भूभागही सहारासारखा फक्त वाळवंटाने भरलेला किंवा कांगोसारख्या नुसता जंगलाने व्यापलेला नाही. तर हजारो नद्यांनी सुजलां व व सुफलां बनलेली ही जमीन आहे. केवळ गंगा, ब्रह्मपुत्रा व सिंधू ह्यांच्या सिंचनानेच तीन लाख चौरस मैलाचा भूप्रदेश समृद्ध झाला आहे. दक्षिणेत गोदावरी, कृष्णा, तापी, कावेरी इत्यादी नद्यांनी हजारो एकर जमीन सुपीक केली आहे. उत्तर प्रदेश, उत्तर राजपुताना, पंजाब, दिल्ली, बिहार, पश्चिम बंगाल, गुजरात दक्षिणेमधील कृष्णा-गोदावरीच्या खोऱ्याचा भाग ह्यांची अत्यंत सुपिक प्रदेशात गणना होते अशा या सुपिक प्रदेशात ३०,०९० हजार टन तांदूळ, ७८०० हजार टन ज्वारी, ३४०० हजार टन बाजरी, ३६०० हजार टन मका ९७०० हजार टन गहू, २६०० टन जव, ५८०० टन कडधान्ये, ७५०० टन ऊस, ४३ हजार टन भुईमूग, ३८०० टन कापूस, ५४०० टन ज्यूट, ६८५ टन चहा इ. अनेक पिके होतात. शेतीप्रमाणेच खनिज द्रव्याची समृद्धी येथे आढळून येते. कोळसा, लोखंड, व मँगेनीज ह्यांचा साठा अनुक्रमे ६,००० दशलक्ष टन, २१००० दशलक्ष टन व ११२ दशलक्ष टन असल्याचा अंदाज बांधण्यात आला आहे. जगातील सर्वांत मोठा व सर्वांत उत्तम अभ्रक येथेच सापडतो. प्रत्येक वर्षी ६० दशलक्ष गॅलन पेट्रोल येथून निघते. शिवाय तांबे, नैसर्गिक गॅस, बॉक्साइट, सोने इत्यादी खनिज द्रव्येही येथे मिळू शकतात. जंगलांचीही येथे उणीव नाही. २·८१ लक्ष चौरस मैलांचा प्रदेश जंगलांनी व्यापला आहे व १९५७–५८ मध्ये

२८·९ कोटी रुपयांचे लाकडाचे उत्पादन त्यापासून झाले. भारतातील प्राण्यांचे उत्पादनही प्रचंड प्रमाणावर आहे. १९५६ साली एकूण गुरेढोरे ३०६५ लाख होती. ह्यांच्यापासून दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नात ६६४ कोटी रुपयांची भर पडते. समुद्राच्या बाबतीतही भारताचे भाग्य हेवा वाटण्याजोगे आहे. ३५०० मैलांचा अफाट समुद्रकिनारा भारताला लाभला आहे. साहजिकच मासेमारी हा एक प्रमुख धंदा झाला आहे व त्यापासून दरवर्षी ६० कोटी रुपयांचा भर राष्ट्रीय उत्पन्नात पडत जाते. अशा रीतीने निसर्गाचा सर्व दृष्टींनी वरदहस्त असला तरी सर्वसामान्य भारतीय माणूस हा काही सुखी व धनिक नाही. हा एक मोठाच विलक्षण विरोध आहे. भारतीय नागरिकांचे व अर्थात् किसानांचेही सरासरी वार्षिक उत्पन्न ११७ रु. आहे, तर अमरिकन गृहस्थाचे ८५०० रु आहे, ही तफावत पाहिली म्हणजे भारतीय लोकांच्या दारिद्र्याची कल्पना सहज येऊ शकते.

### वाढती लोकसंख्या

या दारिद्र्याचे एक कारण म्हणजे येथील दरवर्षी भरमसाठ वाढत जाणारी लोकसंख्या. खालील कोष्टकावरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

| वर्ष | लोकसंख्या | शे. वाढ |
|---|---|---|
| १९३१ | २७५५ लाख | ११·४ |
| १९४१ | ३१२८ ,, | १३·५ |
| १९५१ | ३५६९ ,, | १४·० |
| १९६१ | ४३६४ ,, | २१·५ |

असे असले तरी केवळ भारतातच लोकसंख्येचा बोजा वाढला आहे असे नाही. जगातील इतर अनेक देशांत भारतापेक्षा अधिक दाटीने लोक राहत आहेत असे आढळून येते. उदाहरणार्थ, भारतात १९५९ साली प्रत्येक चौरस किलो-मीटरवर १२३ लोक राहत होते, तर जपानमध्ये तेवढ्याच जमिनीवर २५१, बेल्जममध्ये २९८, पश्चिम जर्मनीत २१३, नेदर्लंडमध्ये ३५० व इंग्लंडमध्ये २१४ लोक राहत होते. मग भारताचा बोजा डोईजड का वाटतो ? ह्याचे एक कारण म्हणजे लोकसंख्येचे विषम विभाजन. केरळ, पश्चिम बंगाल, बिहार व दिल्ली येथे दर चौरस मैलावर अनुक्रमे ११२७, १०३२, ६९१ व ४६४० लोक राहतात तर मध्य प्रदेश, राजस्थान, मणिपूर व अंदमान येथे राहणाऱ्या लोकांची संख्या अनुक्रमे १८९, १५३, ९० व २० अशी आहे. या विषम विभाजनामुळे भारताची लोकसंख्या न पेलणारी झाली आहे.

ह्यातही खेड्यांवरचा बोजा जास्त वाढला आहे असे आढळून येते. एकंदर लोकसंख्येपैकी शे. ८४ लोक अजूनसुद्धा खेड्यांत राहत आहेत असे १९६१ च्या खानेसुमारीवरून दिसून आले आहे. दिल्ली हा प्रांत सोडला तर बाकी सर्व प्रांता-

तून शे. ७० च्या वर लोक खेड्यांत राहत आहेत. आसाम, बिहार व ओरिसा येथे तर त्यांचे प्रमाण अनुक्रम शे. ९२, शे. ९१ व शे. ९३ असे आहे. यावरून खेड्यांवर लोकसंख्येचा बोजा कसा अवाढव्य झाला आहे हे कळून येते.

**ग्रामीण आरोग्य**

ह्या वाढत्या लोकसंख्येचा परिणाम जनतेच्या आरोग्यावर निश्चितपणे झाला आहे. येथील लोकांची आयुर्मर्यादा फक्त ४१·५ वर्षे आहे. बहुतेक पाश्चात्य देशांत हीच ६० किंवा ७० च्याही पुढे गेलेली आहे. ह्या देशातील बालमृत्यूचे व बालजन्माचे प्रमाण अनुक्रमे दर हजारी २१·६ व ४०·७ असे आहे. इंग्लंडमध्ये ते अनुक्रमे १२·४ व १४·९ आणि अमेरिकेत ११·२ व १७·० असे आहे म्हणजेच इतर प्रगत देशांच्या मानाने हे प्रमाण खूपच अधिक आहे व आपल्या निकृष्ट आरोग्याचा तो एक पुरावा होय.

पुरेशा व सकस अन्नाचा अभाव हे येथील आरोग्य बिघडण्याचे आणखी एक कारण होय भारतीय जनतेच्या आहारात कॅलरी व प्रोटीन ह्यांचे प्रमाण फार कमी आहे व त्याचा विपरीत परिणाम जनतेच्या आरोग्यावर झाला आहे. खालील कोष्टकावरून जगांतील इतर देशांच्या तुलनेने भारतीय जनतेचा आहार सदोष कसा आहे ह्याची कल्पना येईल.

आहारात प्रत्येक दिवशी उपलब्ध होणाऱ्या कॅलरी व प्रोटीनचे प्रमाण :

| देश | कॅलरी | प्रोटीन | प्राणिज प्रोटीन |
|---|---|---|---|
| भारत | १५७० | ४२ | ६ |
| अमेरिका | ३२१० | ९२ | ६१ |
| इंग्लंड | ३१०० | ८८ | ४६ |
| न्यूझीलंड | ३४७० | १०४ | ७० |

अनेक रोगांचे थैमानही देशात चालूच आहे. मलेरिया-प्रतिबंधक मोहीम सुरू होऊनही शे. २·४ रोगी मलेरियाने पछाडलेले आढळून येतात. ६४० लाख लोक फायलेरियाने दूषित असलेल्या प्रदेशांत राहत आहेत. ५० लाख लोक क्षयाने तर २० लाख लोक महारोगाने ग्रासलेले आहेत. इतरही अनेक रोगांमुळे व साथींमुळे लोक मृत्यूच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत.

एवढ्या अफाट व खंडप्राय देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत औषधोपचाराची प्रभावी व्यवस्था अद्यापिही होऊ शकलेली नाही. सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेत ७४ प्राथमिक आरोग्य-केंद्रे उघडून ग्रामीण विभागांतही औषधोपचाराची सोय उपलब्ध करून दिली. १९६० पर्यंत ह्यांची संख्या २२८२ पर्यंत गेली. तरी सुद्धा भारतात एकंदर दवाखाने फक्त ११ हजार असून अधिकृत डॉक्टर्स फक्त १ लाख आहेत. नर्सेस व मिडवाइफ ह्यांची संख्या अनुक्रमे ३२ हजार व ३५ हजार आहे. खेड्यांच्या वाट्याला तर फारच थोडे डॉक्टर्स

व परिचारिका येतात. म्हणजेच भारताला विस्ताराच्या व लोकसंख्येच्या मानाने अजूनही आरोग्य योजनेच्या बाबतींत बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे.

**ग्रामीण आर्थिक परिस्थिती**

भारतीय ग्रामीण जनतेच्या निकृष्ट आरोग्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय खेड्यांची भयानक आर्थिक परिस्थिती. अमेरिकेसारख्या प्रगतीच्या शिखरावरील देशातसुद्धा ग्रामीण विभाग दरिद्री आहे. तेथे देखील ग्रामीण विभागातील ⅓ कुटुंबे दारिद्याने पछाडलेली आढळून येतात. मग भारताची अवस्था तर विचारू नका. येथील दारिद्य म्हणीत वापरण्याच्या योग्यतेचे झालेले आहे. भारतीय किसान हा कर्ज घेऊनच जन्माला येतो, कर्जातच जगतो व कर्जातच मरतो असे म्हटले जाते. १८९७ पासून आजतागायत कर्जनिवारण्यासंबंधी निरनिराळे कायदे होऊनही भारतीय किसान कर्जाच्या मगरमिठीतून मुक्त झालेला नाही. कमीत कमी ६०० कोटी रुपये कर्जाचा भार आजही त्याच्या डोक्यावर आहे.

ह्या प्रचंड कर्जभारामुळे किसान हा दारिद्याच्या चिखलात अधिकच गुरफटत चालला आहे. ह्या दारिद्याला आणखीही इतर गोष्टी पोषकच ठरत आहेत. त्याची शेतीची पुरातन पद्धती अजूनही जवळ जवळ तशीच चालू आहे. ह्यामुळे धान्योत्पादनात भर पडण्याऐवजी घट मात्र होत चालली आहे. उदाहरणार्थ, भाताचे प्रत्येक एकरातील सरासरी उत्पन्न खालीलप्रमाणे घटत असल्याचे आढळून आले.

| साल | एकरी सरासरी उत्पन्न |
|---|---|
| १९१४–१५ ते १९१८–१९ | ९८१ पौंड |
| १९२६–२७ ते १९३०–३१ | ८५१ ,, |
| १९३१–३२ ते १९३५–३६ | ८२९ ,, |
| १९३८–३९ | ७२८ ,, |

परदेशाच्या तुलनेने येथील उत्पन्नही बऱ्याच मोठ्या प्रमाणात कमी आहे. उदाहरणार्थ, येथे दर एकरी फक्त ६६० पौंड गहू उत्पन्न होतो. तर जपानमध्ये सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून तोच प्रत्येक एकरात १७१३ पौंड व इजिप्तमध्ये १९१८ पौंड काढला जातो.

या दुःस्थितीचे एक कारण म्हणजे बरीच मोठी जमीन अद्याप जिराइती आहे. १९५७–५८ साली ३६ कोटी एकर जमिनीपैकी फक्त ५५७ लाख एकर जमीन बागायती होती. अर्थातच शेतकऱ्याला यामुळे पिकासाठी केवळ पावसावर अवलंबून राहवे लागते व येथल्या जुगारी पावसामुळे दुष्काळ व अतिवृष्टी ह्या दोन्ही संकटांना वारंवार तोंड द्यावें लागतें.

हा शेतकरी सामान्यतः जमिनींचे छोटे छोटे तुकडे कसत असतो. त्यामुळे त्यांपासून फायदा होण्याऐवजी अनेकदा तोटाच होत असतो. १९५४–५५ च्या नॅशनल सँपल सर्व्हेवरून हे दिसून आले की येथल्या शेतकऱ्यापाशी सर्वसाधारणतः

फक्त ५·३४ एकर जमीन असते. त्यांतही ७० हून अधिक टक्के शेतकऱ्याची जमीन ५ एकरांहूनही कमी असते. ६५ टक्के शेतकऱ्यांची जमीन सरासरी जमिनीपेक्षाही कमी आहे. खालील कोष्टकावरून ह्याची कल्पना येईल.

| जमीन ( एकरांमध्ये ) | जमीन धारण करणारांचे शे. प्रमाण |
|---|---|
| शून्य | ६·३ |
| ०·०१ ते २·४९ | ४८.५ |
| २·५० ते ४·९९ | १५·९ |
| ५·०० ते ७·४९ | ९·३ |
| ७·५० ते ९·९९ | ५·६ |
| १०·०० ते १४·९९ | ५·५ |
| १५·०० ते २४·९९ | ४·९ |
| २५·०० व त्याहून अधिक | ४·० |

तेव्हा सर्वसामान्यतः शेतकरी छोटे छोटे तुकडे कसत असतो. ह्या तुकड्यांचेही अनेक वेळा आणखी लहान लहान तुकडे झालेले आढळून येतात व ते एकमेकांपासून बऱ्याच दूर अंतरावर विखुरलेले असतात. ह्यामुळे पैसा व श्रम वाजवीपेक्षा अधिक खर्च होऊन ह्यांच्यापासून खर्च भागविण्यापुरते उत्पन्न निघणेही अनेक वेळा दुरापास्त होऊन जाते. तुकडेबंदी-कायदे व कूळकायदे ह्यांच्या सहाय्याने सरकारने ही तुकड्यांची समस्या सोडविण्याचा प्रयत्न चालविला आहे परंतु यांत अद्यापही बरेच यश गाठावयाचे आहे.

खेड्यातील दारिद्र्याचे आणखी एक कारण म्हणजे शेतीवरील वाढता भार. १९५४ च्या नॅशनल इन्कम कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणे १९५०–५१ मध्ये ३५९३ लक्ष लोकसंख्येपैकी १०३६ लाख म्हणजे ७२·४% लोक शेतीवर अवलंबून होते. तर उद्योगधंद्यावर जगणारांचे प्रमाण फक्त १०·६% होते. साहजिक शेतीवरचा भार वाजवीपेक्षा अधिक वाढून त्यापासून मिळणारे उत्पन्न इतर व्यवसायांच्या मानाने खूपच कमी आहे. ह्याची कल्पना खालील कोष्टकावरून येईल.

| व्यवसाय | प्रत्येक व्यवसायी इसमाचे उत्पादन (सन १९५०–५१ ) रुपये |
|---|---|
| शेती | ५०० |
| खाणी व कारखाने | १७०० |
| छोटे व्यवसाय | ८०० |
| रेल्वे व दळणवळण | १६०० |
| बँका, इन्शुअरन्स इ. | १५०० |
| व्यावसायिक आणि अन्य कला | ७०० |

ग्रामीण दारिद्र्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे तेथील भयानक बेकारी. ॲग्रिकल्चरल लेबर इन्क्वायरीप्रमाणे १९५०–५१ साली ग्रामीण विभागात २८ लाख लोक बेकार होते. ह्यांतच बिगार मजुरांची संख्या भरमसाठ आहे. १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणे ४·४८ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या १८% लोक स्वतःची जमिनी नसताना केवळ मजूर शेतीवर राबत आहेत. याशिवाय आणखी ३·१६ कोटी म्हणजेच १२% लोक स्वतःची पूर्णतः किंवा जवळ जवळ जमीन नसतानाही शेतीवरच अवलंबून आहेत. या सर्वांचा परिणाम बेकारीवर झाला आहे. या बाबतीत पाहणी करता असे आढळून आले आहे की सर्वसामान्यपणे खेड्यातील शतकरी व कामगार एकूण ३० % दिवसाहून अधिक बेकार किंवा विनाकामाचा असतो.

खेड्यांतल्या ह्या भयानक दारिद्र्याचा परिणाम शिक्षण, आरोग्य, संस्कृती, शेती, व्यवसाय इत्यादि सर्व ग्रामीण अंगांवर झाला आहे. म्हणूनच ग्रामीण समस्या ही मूलतः जनतेच्या दारिद्र्याची समस्या होय असे म्हटले जाते ते निःसंशय खरे होय.

## ढासळणारी कुटुंब व जातिव्यवस्था

खेड्यातील जीवनाचा परिचय करून घ्यायचा तर येथील कुटुंबपद्धती व जातिव्यवस्था यांकडे आपणांस दुर्लक्ष करतां येणार नाही. ह्या दोन्ही संस्था आता कोलमडत असताना दिसत आहेत तरी अजून पूर्ण नामशेष झालेल्या नाहीत. पूर्वीच्या ग्रामीण रचनेत तर यांना चांगलेच प्राधान्य होते. कुटुंब, जात व पंचायत ह्या तीन घटकांवर तर प्राचीन ग्रामराज्याची मदार होती.

एकत्र कुटुंबपद्धती आजही खेड्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर दिसून येते. ह्या पद्धतीमुळे कुटुंबातील घटकांत अधिक जिव्हाळा व सुसंवादीपणा आलेला आढळून येतो. सर्वांनी मिळून कुटुंब चालवावयाचे असल्याने कौटुंबिक व्यवसायात सर्वच सामील होतात. उदाहरणार्थ, आई, बाप, बहीण, भाऊ सारेच शेतीवर राबतात व आपआपल्या परीने काम करतात. कुटुंबातील सर्वच घटक ह्यामुळे कापडाच्या उभ्या आडव्या धाग्याप्रमाणे एकमेकांशी जुळलेला असतात. ते परस्परावलंबी असल्याने एकाच्या हिताची दुसऱ्याला काळजी असते. प्रत्येकाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी सर्व गरजांची पूर्ती करण्याची जबाबदारी संपूर्ण कुटुंबाची असते. कुटुंबाचा अभिमान आणि कुटुंबप्रमुखाचा मान व अधिकार ह्यावर सर्व कुटुंबाचा डोलारा उभा असतो.

अशी काही कुटुंबांची मिळून एक विशिष्ट जात बनलेली दिसून येते. ह्या जातीवरच व्यक्तीचा व्यवसाय, दर्जा, त्यास उपलब्ध होणारी संधी आणि आपत्ती ह्या गोष्टी अवलंबून असतात. जातिभेदामुळे एक विशिष्ट जातीची राहणी, संस्कृती,

आचारविचार, घरगुती व सामाजिक जीवन, जमिनीची मालकी...या गोष्टी दुसऱ्या जातीहून भिन्न झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. या जातीचा परिणाम ग्रामीण व्यक्तीच्या आर्थिक जीवनावरही होतो. उत्पादनाची पद्धत, उपभोगाच्या सवयी घरांची ठेवण व वस्ती, कर्जबाजारीपणा आणि खेळतेपणा ( mobility ) ह्या सर्व गोष्टी जातिजातींना अनुसरून खेडेगावांतून भिन्न भिन्न झाल्या आहेत. जातीचा ठसा व्यक्तीच्या शिक्षणावरही उठल्याशिवाय राहत नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण धार्मिक जीवन, राजकीय व सामाजिक जीवन ह्यांची जातीय व्यवस्थेपासून पूर्ण फारकत होऊ शकत नाही. सामाजिक मूल्ये व ग्रामीण नेतृत्व यांच्यावर हि जातीचा पगडा बसला आहे. सर्वसामान्यतः खेड्यातील त्या त्या विशिष्ट जातींचे पुढारीच ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व तात्त्विक जीवनाचे नेतृत्व करताना आढळून येतात. खेड्यातील अनेक सामाजिक गंडांची उत्पत्ती ह्या जातभेदातच असते. अशा तऱ्हेने जातिव्यवस्था हा ग्रामरचनेचा एक प्रधान घटक असल्याचे आढळून येते.

ब्रिटिशोत्तर कालात कुटुंब व जाती ह्या दोन्ही संस्थांवर जोरदार प्रहार झाला व त्या खिळखिळ्या झाल्या. औद्योगीकरणाचा प्रसार व व्यक्तिगत मानसशास्त्राची वाढती छाप ह्यामुळे एकत्र कुटुंबव्यवस्थेला चांगलाच तडा बसला. सध्याची एकंदर प्रवृत्ती विभक्त कुटुंबपद्धतीकडे आहे व खेड्यातही हीच प्रवृत्ती अधिक बळावत आहे. ग्रामीण विभागातील जातिव्यवस्थाही कोलमडत आहे. दळणवळणाचा प्रसार, राज्यकारभाराची व कायदेकानूंची ब्रिटिश पद्धत, आधुनिक भांडवलशाही प्रधान चढाओढीची आर्थिक व्यवस्था ह्यामुळे पुढे जातिव्यवस्थेचा निभाव लागणे अशक्यच झाले. भारताची नवी घटनाही जातीय व्यवस्थेला मारकच ठरली. ह्या घटनेप्रमाणे जाती सोडून प्रत्येक व्यक्ती भारतीय समाजाचा मूळ घटक ठरविण्यात आला. समाजातील सर्व नागरिकांना समान दर्जा देण्यात आला. लोकशाहीप्रधान समाजरचना हे एक घटनेचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. ह्यामुळे ग्रामीण विभागातील एकत्र कुटुंब व जाती ह्या दोन्ही पुरातन संस्था लुप्त होत असल्याचे दिसून येत आहे.

### ग्रामीण जनता व धर्म

कुटुंब आणि जाती याप्रमाणेच आणखी एक संस्था भारतीय जीवनात सनातन कालापासून तग धरून आहे. ती म्हणजे धर्म. यापैकी पहिल्या दोन संस्था ढासळत असताही ही तिसरी संस्था मात्र अद्यापि बलवत्तर आहे. त्यांतही शहरांतल्यापेक्षा खेडूत जनतेवर धर्माचा पगडा खूपच अधिक दिसून येतो. या लोकांच्या संपूर्ण जीवनावर धर्माची छाप पडलेली असते. त्यांच्या आचार-विचारांत धर्म डोकावत असतो – अनेकदा त्यावर नियंत्रण ठेवीत असतो. भारतात ब्रिटिश आल्यानंतर धर्मातीतपणाचे तत्त्व अस्तित्वात आले. भारतीय घटनेनेही त्याचाच स्वीकार केला, तरी धर्माचा जोर आणि तोही विशेषतः ग्रामीण जनते-मधील अजूनही नाहीसा झाला नाही.

ग्रामीण धर्माची नागरी धर्माशी तुलना केली तर असे दिसते की नागरी धर्माप्रमाणे हा धर्म अमूर्त कल्पनांवर व तात्त्विक विचारसरणीवर आधारलेला नाही. प्रत्यक्ष मूर्त आणि काहीसे ओबडधोबड स्वरूप या ग्रामीण धर्माचे असते. याचे मूळही अज्ञान, अगतिकता किंवा बाह्य वातावरणाची भीती ह्यांत असते. त्यामुळेच म्हसोबा, सटवाई, नाग, पिंपळ, मुंजाबा इत्यादी अनेक काल्पनिक देवतांच्या काल्पनिक प्रकोपाने भयभयीत झालेले कित्येक अज्ञानी खेडूत आपणास दिसतात. ह्या देवतांचा राग नाहीसा करण्यासाठी त्यांची प्रार्थना करतात व त्यांना आपल्या सामर्थ्यानुरूप त्यांना बळी देत असतात. या लोकांच्या जीवनात अनेक धार्मिक विधींचे प्रस्थ माजलेले असते.

या धर्माच्या प्रेरणेचे मूळ स्थान असते देऊळ. ग्रामीण विभागातील निरनिराळ्या चळवळींचे हे केंद्रस्थान असते. खेड्यातील शाळा बहुधा देवळातच असते. सामाजिक व लोकोपयोगी कामाची सुरुवात येथूनच होते. सामुदायिक, सामाजिक व धार्मिक उत्सवांचे प्रमुख स्थान हे देऊळच असते. ग्रामीण वाङ्मय, कला व संस्कृति यांचे रक्षण होत असते. खेड्यातील नैतिक मूल्ये, सामाजिक हालचाली, आर्थिक जीवन, इत्यादी सर्वांचा केंद्रबिंदू ग्रामीण मंदिर हाच असतो. म्हणून ग्रामीण विकासाचा वा शिक्षणाचा विचार करतांना ह्याकडे दुर्लक्ष करून आपणास चालणार नाही.

## ग्रामीण जनता व राजकारण

याचबरोबर आणखीही एका गोष्टीकडे आपणास लक्ष दिले पाहिजे ती म्हणजे ग्रामीण जनतेची राजकारणाबद्दलची वाढती जागरूकता. ग्रामीण समाज हा काही सुस्त गोळा नाही तर तो अत्यंत संवेदनक्षम आहे. विशेषतः भोवतालच्या राजकारणाकडे तो मोठ्या आस्थेने पाहत असतो व त्यात भाग घेत असतो.

भारतामध्ये ग्रामीण जनतेच्या या प्रवृत्तीचा म. गांधींनी मोठ्या कौशल्याने उपयोग करवून घेतला. त्यांच्या प्रचंड देशव्यापी चळवळींचे यश मुख्यतः खेड्याखेड्यांतून जो जनसागर खवळून उचंबळला त्यात आहे. गांधीजींच्या सत्याग्रही सेनेत हजारोंच्या संख्येनी या ग्रामीण चमूंनीच भाग घेतला. आजही सार्वत्रिक मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्याने ग्रामीण जनतेच्या राजकारणातील उत्साहाला भरते आले आहे. खेड्यातील अडाणी व निरक्षर लोकांच्या लांबच लांब रांगा केवळ मतदानाचा हक्क बजावण्यासाठी तास न तास तिष्ठत उभ्या असतात. हे कशाचे द्योतक आहे ? आता खेडे हा देशातील राजकीय चळवळीचा व शासकीय कारभाराचा घटक झाल्याने ग्रामीण जनतेतील राजकारणाची आस्था ही उपेक्षणीय गोष्ट राहिली नाही. विशेषतः जातिसंस्थांची ग्रामीण जनतेवरची पकड ढिली होत असताना ही राजकारणाची पकड अधिक घट्ट होत आहे हे आपणास विसरता येणार नाही.

## ग्रामीण जनता : काही विशेष

भारतीय ग्रामीण पार्श्वभूमीचा आपण आतापर्यंत सविस्तर परिचय करून घेतला. ह्याच पार्श्वभूमीच्या आधाराने ग्रामीण जनतेची वैशिष्ट्ये आपणास समजावून घेता येतील. खेड्यातील माणसाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची जमिनीवर असलेली श्रद्धा व भक्ती. ती खरोखरच त्याला मातेप्रमाणे पूज्य वाटते. तिच्यासाठी वाटेल ते कष्ट करण्याची व हालअपेष्टा सोसण्याची त्यांची तयारी असते. दुर्दैवाने अत्यंत लहान लहान तुकडे त्यांच्या नशिबी येतात, पैशाचे पाठबळही त्यांच्यापाशी नसते. दारिद्र्य व कर्जबाजारीपणा त्यांच्यामागे हात धुऊन लागलेलाच असतो, त्यांची शेतीची पद्धतही जुनीपुराणी असते, नवीन खते, रासायनिक द्रव्ये वा पाटबंधाऱ्यांच्या योजना यांचा पुरेसा फायदा त्यांना मिळत नाही–या सर्व गोष्टींमुळे त्यांच्या कष्टाचे चीज होऊ शकत नाही. शेतांत चोवीस तास उराफोडीची मेहनत करूनही तो समाधानाने जीवन जगण्याइतपत धान्य निर्माण करू शकत नाही. म्हणूनच तो अत्यंत विकल व अगतिक झालेला. तो पराकाष्ठेचा दैववादी बनतो व आपल्या दुर्दैवाचे खापर आपल्या कर्मावर फोडून स्वस्थ बसतो. आत्मविश्वासाचा अभाव व अज्ञानाचा पगडा त्यांच्यात दिसून येतो. त्याचा देवभोळेपणा, अंधश्रद्धा भुताखेतांवर विश्वास या गोष्टींचे मूळ ह्यांतच आढळून येईल. एकप्रकारच्या न्यूनगंडाने तो ग्रासलेला असतो. निराशावादी वृत्तीने त्याच्या मनात ठाण दिलेले असते. त्यामुळे नव्या गोष्टी, नव्या प्रवृत्ती, नवे विचार ह्यांच्याविषयी तो साशंक असतो. कधी कधी त्याला त्यांची भीतीही वाटते. त्या आत्मसात करून एकदम बदल घडवून आणण्याची त्याची तेवढीशी क्षमता व तयारी नसते. जुनी पद्धती, जुने आचार विचार, जुनी संस्कृती ह्यांबद्दल त्याला स्वाभाविक ओढ असते. त्या जागी तडकाफडकी नव्या गोष्टी आणणे त्याच्या मनाला तेवढेसे पटत नाही.

जुन्या पद्धती व परंपरा यावर त्याचा मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. वेळेचा सदुपयोग अनेक वेळा त्याला करून घेता येत नाही. त्यामुळे त्याच्या दारिद्र्यात भर पडत जाते. सामाजिक हिताची जाणीवही कमी प्रमाणात त्याच्यात दिसून येते. म्हणूनच त्याचा देशाभिमान अनेकदा गावापुरता किंवा जातीपुरता मर्यादित होतो.

पण ह्या ग्रामीण जनतेत आता हळूहळू परिवर्तन होत आहे. विज्ञानाबद्दल त्याला प्रेम वाटत आहे व त्याच्या सहाय्याने प्रगती करून घेण्याची त्याला भूक लागली आहे. ज्ञानाचे मूल्य जाणण्याची पात्रता व रसग्रहणक्षमता त्याच्यात पूर्वीपासूनच आहे. रामायण व महाभारत यांचे संस्कार त्याला या बाबतीत पोषक ठरले आहेत. नवीन गोष्टी योग्य रीतीने पटवून दिल्या तर आत्मसात करायला तो मागेपुढे पाहत नाही. त्याच्यावरील धार्मिक व नैतिक संस्कारही चांगले आहेत.

शिक्षणात तो कमी असला तरी व्यवहारात चोख आहे. त्याला सर्वसामान्य बुद्धिमत्तेची देणगी मिळालेली आहे. व्यवहारज्ञानाचीही त्याच्याजवळ कमतरता नाही. निसर्ग हा त्याचा फार मोठा शिक्षक आहे. नम्रता, सेवाभाव, श्रद्धाळुपणा, त्यागवृत्ती, चिकाटी, परिश्रम करण्याची हातोटी, प्रामाणिकपणा इत्यादी अनेक गुणांचा संगम त्याच्यामध्ये आहे. त्यांचा फक्त कौशल्याने उपयोग करून घेतला पाहिजे. त्यास योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. मग त्याचा सर्वांगीण विकास दूर नाही.

## ग्रामशिक्षणाची आवश्यकता

भारतीय ग्राम, ग्रामीण जनता, ग्राम-जीवन, ग्रामीण समस्या– यांची आपण मागील व ह्या प्रकरणांत ओळख करून घेतली. या ग्रामीण पार्श्वभूमीचा विचार केला की, ग्रामशिक्षणाची निकड अत्यंत तीव्रपणे आपल्या लक्षात येते. आर्थिक-दृष्ट्या विचार केला तर खेड्यातील पूर्वीची स्वयंपूर्णतेची आर्थिक रचना ढासळून पडली. भांडवलशाहीप्रधान गुंतागुंतीचे आर्थिक जीवन येथे सुरू झाले आहे. त्यात तग धरून राहण्यासाठी त्यांतील बारकावे लक्षात घेतले पाहिजेत. त्या दृष्टीने उत्पादनाच्या योजना आखल्या पाहिजेत. यासाठी ग्रामशिक्षणाची आवश्यकता आहे. राजकीय दृष्ट्याही हे शिक्षण दिले पाहिजे. कारण मतदानाचा हक्क व्यक्तीला बजावता आला पाहिजे. भारताचा नागरिक व विशिष्ट राजकीय पक्षाचा सदस्य म्हणून आपले कर्तव्य बजावताना ग्रामीण नागरिकाला शिक्षणाशिवाय अन्य कोणतीही गोष्ट जास्त उपयुक्त पडणार नाही. सामाजिक मूल्यांची जाणीव ग्राम-शिक्षणांतूनच होऊ शकणार. संकुचित, भोळसट व विक्षिप्त धर्मकल्पनांच्या जागी मानवतावादी दृष्टिकोण, नैतिक मूल्ये, स्वातंत्र्य व समता, व्यक्तित्वाचा विकास अशी तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी ग्रामीण शिक्षणाचीच आवश्यकता आहे. ग्रामीण नागरिकांना फुरसतीचा वेळ योग्य तऱ्हेने व्यतीत करता आला पाहिजे. हे शिक्षणही ग्रामशिक्षणातून उपलब्ध होऊ शकेल. यांतूनच त्यांना कलात्मक व सांस्कृतिक विकास करण्याची संधी प्राप्त होईल. शेतीची आधुनिक पद्धती व नवीन शास्त्रीय ज्ञानाचा आपल्या विकासासाठी उपयोग यासाठीही ग्रामशिक्षण आवश्यक आहे. अज्ञान व निरक्षरता दूर करणे, नवीन नेतृत्वाची निर्मिती करणे, भारतीय लोकशाहीचा पाया स्थिर करणे व ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्याचा वेग वाढविणे ह्या गोष्टीही मुख्यतः प्रभावी ग्रामशिक्षणावरच अवलंबून आहेत. थोडक्यात खेड्यांचा सर्वांगीण विकास व उद्धार ह्याचा मूळ पाया म्हणजेच ग्रामशिक्षण होय.

♧ ♧ ♧

# आंग्लकालीन ग्रामशिक्षण : ४

## ग्रामीण शिक्षणाकडे दुर्लक्ष

आधुनिक शाळांची सुरुवात आंग्लकाळात मोठ्या शहरांतून झाली. प्रथमतः जिल्ह्याच्या ठिकाणी त्या स्थापन करण्यात आल्या. मग त्या तालुक्याच्या ठिकाणी आल्या व नंतर त्यांचा ओघ खेड्यांकडे वळला. त्यामुळे खेड्यांतील गरजांनुसार त्यांची उभारणी झाली नाही. केवळ शहरी रोपटे ग्रामीण विभागात लावण्याचा प्रयोग करण्यात आला. म्हणूनच ह्या शाळांना urban म्हणण्याचा प्रघात पडला. ग्रामीण विभागात असूनही ह्या शाळांतून ग्रामशिक्षण दिले जात नव्हते. ग्रामीण शिक्षणाचा योग्य उद्दिष्टेच या शाळांसमोर नव्हती. ह्याची सविस्तर चर्चा आपण मागे प्रकरण २ मध्ये ( ग्रामशिक्षणाची उद्दिष्टे व समस्या ) केलीच आहे. योग्य उद्दिष्टांचा विचार सरकारने कधी केला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे अनास्था. गेल्या दोन प्रकरणांत ग्रामशिक्षणाच्या पार्श्वभूमीचा परिचय करून घेत असताना ग्रामीण समस्या व पर्यायाने ग्रामशिक्षण याकडे कसे दुर्लक्ष झाले हे पाहिलेच आहे. ग्रामशिक्षणाकडे हे असे दुर्लक्ष होण्याची प्रमुख कारणे आपण आता बघू या.

## दुर्लक्ष होण्याची कारणे

ब्रिटिश राज्यपद्धतीतच काही असे मूलभूत दोष होते की ज्यामुळे

ग्रामशिक्षणाकडे स्वाभाविकच दुर्लक्ष झाले. यांपैकी पहिला दोष म्हणजे सर्वसामान्य इंग्रज व्यक्तीला भारतीय ग्रामीण समाजाच्या विशिष्ट गरजांची जाणीव नव्हती. त्यामुळे ग्रामशिक्षणाची प्रभावी योजना सरकारी यंत्रणेपुढे येऊ शकली नाही वा तशी योजना जाणून घेऊन ती राबविण्याची क्षमता तिच्यात नव्हती. ब्रिटिशांनी सत्तेचे व कारभाराचे केंद्रीकरण काही मोजक्या शहरांतून केल्यामुळे खेड्यांकडे सर्वच बाबतीत दुर्लक्ष होऊ लागले. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास फक्त शहरांतच काय तो थोडाफार झाला व खेडी पूर्वीप्रमाणेच जुनाट व अप्रगत राहिली. खेड्याची स्वयंपूर्णता व पंचायतपद्धती यावर प्रहार करण्यात आला व त्यामुळे खेड्याचा विकास साधण्याची ग्रामीण जनतेची व पंचायतींची जबाबदारी नष्ट झाली. ग्रामिण उद्योगधंदे नष्ट करण्यात आले व त्यामुळे खेड्यांची दुर्दशा अधिकच वाढली. या दुर्दैवी परिस्थितीचा परिचय आपण मागील दोन प्रकरणांत करून घेतलाच आहे. या सर्वांचा परिणाम हाच झाला की खेड्यांतून शहरांकडे वळणाऱ्या लोकांचा प्रचंड ओघ सुरू झाला. कोणी अधिक पैसे मिळवण्यासाठी तर कोणी चांगल्या नोकऱ्यांसाठी, कोणी मुलांच्या शिक्षणासाठी तर कोणी उद्योगधंद्यांच्या निमित्ताने शहरात जाऊ लागले. त्यामुळे खेडयातल्या बुद्धिमत्तेला ओहोटी लागली. कार्यक्षम शक्ती क्षीण झाली व आर्थिक स्थिती शोचनीय झाली. अशा खेडयात ग्रामशिक्षणाचे प्रयोग करणार तरी कोण व ते होणार तरी कसे ?

## ग्रामशिक्षणाकडे दुर्लक्ष – शैक्षणिक कारणे

ग्रामशिक्षणाकडे दुर्लक्ष होण्याची काही शैक्षणिक कारणेही आहेत. त्याचा आपण आता विचार करू. यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय विद्यापीठांची या समस्येबाबतची संपूर्ण अनास्था. वास्तविक रीत्या ग्रामशिक्षणाबाबत किती तरी महत्त्वाचे प्रश्न विचारणीय होते. ग्रामीण समाजशास्त्र, ग्रामीण शिक्षणाची उद्दिष्टे व पद्धती, ग्रामशिक्षकांचे प्रशिक्षण, ग्रामीण पुनर्रचना व ग्रामशिक्षण ह्यांचा संबंध ग्रामीण वातावरणास पोषक असा अभ्यासक्रम बनवणे, शालेय अभ्यासक्रम व समाजजीवन ह्यांची सांगड घालणे, ग्रामीण नेत्यांचे प्रशिक्षण, ग्रामीण विद्यापीठाची निर्मिती करणे, ग्रामीण प्रश्न सोडवण्यासाठी संशोधन व प्रयोगशाळा स्थापण करणे प्रयोगसिद्ध ज्ञानाचा ग्रामीण जनतेला फायदा करून देणे, असे किती तरी ग्रामशिक्षणाशी निगडित असलेले प्रश्न विद्यापीठांच्या कक्षेमध्ये येत होते. परंतु आमच्या विद्यापीठांना या प्रश्नांकडे ढुंकूनही पाहिले नाही मग विचार करण्याची गोष्ट दूरच राहिली. ही विद्यापीठे केवळ परीक्षापीठे होती. कार्यक्षेत्र अत्यंत मर्यादित व संकुचित होते. म्हणूनच १८ ७-१९ पर्यंत ग्रामशिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या शैक्षणिक प्रश्नाकडे यांनी संपूर्ण दुर्लक्ष केलेले आढळून येते. १९१७–१९ मध्ये कलकत्ता विद्यापीठ समितीने प्रथमतः विद्यापीठांना आपल्या संकुचित कार्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक विद्यापीठामध्ये शिक्षण-विभाग असावा असे

समितीने सुचविले. ह्या शिक्षण विभागाचे कार्य प्रमुखतः सुसंबद्ध पाहणी व प्रयोग करणे असेच राहणार होते. या विभागाचे मार्गदर्शन अनुभव व ज्ञानसंपन्न प्राध्यापकाकडून व्हावे व नवीन शैक्षणिक विचाराचे ते केंद्र बनावे अशी समितीची इच्छा होती.

समितीने प्रायोगिक शाळेची कल्पनाही विद्यापीठांसमोर ठेवली. समितीच्या मताने विद्यापीठाच्या प्राध्यापकाच्या नियंत्रणाखाली प्रायोगिक शाळा असावी. या शाळेतून शैक्षणिक प्रयोगांना चालना मिळाली पाहिजे. शालेय विषय व शालेय व्यवस्थेच्या नवनवीन योजना यांचा समन्वय घालण्याचे कार्य ह्या शाळेकडून व्हावे. अमेरिकेतील प्रा. जॉन ड्युई ह्यांच्या हाताखाली असलेली शिकागो येथील विद्यापीठ शाळा किंवा प्रो. रन यांच्या हाताखालील जेना येथील शाळा किंवा प्रा फिंड्लेच्या नेतृत्वाखालील मँचेस्टर येथील फिल्डन प्रायोगिक शाळा यांसारखे स्वरूप या विद्यापीठ-शाळेचे असावे.

कलकत्ता विद्यापीठ-समितीच्या अशा महत्त्वाच्या सूचनांकडे विद्यापीठांनी नीट लक्ष दिले नाही. प्रयोगशाळा तर कोणत्याच विद्यापीठांतून सुरू झाल्या नाहीत. शिक्षणविभाग विद्यापीठांनी जरूर सुरु केले. परंतु त्यांतील निरीक्षण व संशोधन ह्या दोन्ही गोष्टींकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. याचा परिणाम हा झाला की केवळ शिक्षकांचे प्रशिक्षण एवढेच कार्य या शिक्षणविभागाचे राहून त्यांत साचेबंदपणा व यांत्रिकपणा आला. त्यातही ग्रामीण शिक्षणाच्या दृष्टीने काहीही प्रयत्न करण्यात आला नाही.

## हीच अनास्था – शिक्षणखात्याची व खाजगी संस्थांची

सरकारी शिक्षणखात्यानेही ग्रामशिक्षणाच्या समस्येचा कधी गंभीरपणे विचार केला नाही. येथील सर्वच शैक्षणिक योजना ब्रिटिश पद्धतीनुसार आखण्यात आल्या. बहुधा इंग्लंडमधल्या टाकाऊ रोपट्यांचे येथे कलम लावण्यात आले. त्या कलमाला येथील परिस्थिती मानवण्यासारखी आहे का याची दखल क्वचितच घेण्यात आली. त्याचमुळे ही शैक्षणिक प्रयोगांची रोपटी एक तर अल्पायुषी ठरली वा त्यांची वाढ जोमदार व सकस होऊ शकली नाही. अशा स्थितीत सरकारकडून जे काही ग्रामशिक्षणाचे अगदी तुरळक प्रयत्न झाले तेही असफल व्हावे यात नवल ते काय ?

खाजगी संस्थांकडूनही ग्रामशिक्षणाची अशीच उपेक्षा फार मोठ्या प्रमाणावर आढळते. मिशनऱ्यांच्या काही शिक्षणसंस्था वा टागोरांचा श्रीनिकेतन येथील प्रयोग सोडला तर खाजगी संस्थांनीही ग्रामीण शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवले नाही. शहरांतूनच शिक्षणसंस्था काढण्याकडे यांचा कल होता. याला तशी सबळ कारणेही होती. एक म्हणजे शहरातूनच शिक्षणाची मागणी होत होती कारण इंग्रजी

शिक्षणाने तेथील जनतेत जागृती निर्माण झाली होती. शिक्षकाचा स्वाभाविक कल शहरांतूनच काम करण्याचा होता. कारण तेथे एकंदर सुखसोयी व प्रगतीस पोषक वातावरण उपलब्ध होते. खेड्यांची एकंदर परिस्थिती फारच भयानक व गैरसोयींनी परिपूर्ण होती. त्यामुळेही शिक्षकांचा तिकडे वळण्याचा कल नव्हता.

## ग्राम-शिक्षणाचे सरकारी प्रयत्न

आता ग्रामशिक्षणाचे ब्रिटिश सरकारने जे काही प्रयोग केले त्यांचा ऐतिहासिक आढावा घेऊ. या बाबतीत सरकारने प्रथमतःच एक मोठी विघातक गोष्ट केल्याचे आढळून येते. ती म्हणजे येथील एक-शिक्षकी शाळांवर जोरदार प्रहार. वास्तविक ग्रामीण शिक्षणाचा केंद्रबिंदू या एक-शिक्षकी शाळा होत्या व त्या वेदकालापासून येथे चालत आलेल्या होत्या. ब्रिटिश राजवटीतही सुरुवातीला ह्याच शाळा प्रचलित होत्या खर्चाच्या दृष्टीने ह्या अत्यंत काटकसरीच्या होत्या व खेड्यांत शिक्षणाचा प्रसार करण्यास फारच उपयुक्त होत्या. ॲडम, एल्फिन्स्टन् व मन्रो ह्यांनी बंगाल, मुंबई व मद्रास येथे जी पाहणी केली त्यांतही त्यांना या शाळांचा मोठाच प्रसार असल्याचे आढळून आले. पण ब्रिटिश नमुना उचलण्याच्या सरकारी प्रवृत्तीमुळे ग्रामशिक्षणाच्या ह्या उपयुक्त संस्थांवर जोराचा तडाखा मारण्यात आला. ब्रिटनमध्ये वर्गनायकपद्धतीला फाटा देण्यात येऊन शाळेतील अभ्यासक्रम भरगच्च करण्यात आला. त्याचेच अंधानुकरण येथे करण्यात येऊन एक-शिक्षकी शाळा नवे शिक्षण देण्यास असमर्थ म्हणून बंद करण्यात आल्या. ह्याचा तोटा प्रमुखतः ग्रामीण विभागाला सोसावा लागला. कारण खेड्यातील ते एकमेव साधन होते.

१९०४ पर्यंत ग्रामशिक्षणाच्या दृष्टीने काही डोळ्यात भरण्याजोगे विधायक प्रयोग सरकारने केलेले आढळून येत नाहीत. नाही म्हणायला फक्त मुंबई व मध्यप्रदेश येथे ग्रामीण विभागासाठी वेगळा अभ्यासक्रम देण्याचे प्रयत्न करण्यात आले. १८७७–७८ मध्ये मुंबई प्रांतात ग्रामीण प्राथमिक शाळांसाठी ४ वर्षांचा अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला. ह्या चार वर्गांना मोडी वर्ग म्हणून संबोधिले जाई. पुढे ह्यांतच ५ व्या वर्गाची म्हणजे बालवर्गाची भरती करण्यात आली. ह्या मोडी इयत्तांतील अभ्यासक्रमाचे स्वरूप अत्यंत उपयुक्त प्रधन होते. या दृष्टीने या शाळा शहरी शाळाहून भिन्न होत्या.

मध्यप्रदेशात ग्रामीण शाळा शिक्षणाचा एक प्रयोग करण्यात आला. मध्यप्रदेश सरकारच्या मताप्रमाणे प्रचलित प्राथमिक शाळा लोकप्रिय नव्हत्या. त्याची कारणमीमांसा अशी : ( १ ) ह्या शाळांतील अभ्यासक्रम बोजड होता. त्यामुळे निश्चलता व व्ययता वृद्धिंगत होत होती. ( २ ) हा अभ्यासक्रम फारच पुस्तकी व म्हणूनच शेतकऱ्यांना अनुपयुक्त होता. ( ३ ) ग्रामीण जनतेचा नव्या

अभ्यासक्रमावर व नव्या पद्धतीवर विश्वास नव्हता. यावर तोडगा म्हणून मध्यप्रदेश सरकारने ग्रामीण शिक्षणाचा एक प्रयोग केला. त्याची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी सांगता येतील : ( १ ) शाळा ही फक्त अर्धा दिवस भरविण्यात यावी. ( २ ) उरलेला अर्धा दिवस विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यात व्यतीत करावा. ( ३ ) नव्या व जुन्या शिक्षण पद्धतीच्या सुवर्णमध्य काढण्यात यावा.

ग्रामशिक्षणाचे हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी झाल्याचे आढळून येते. याची कारणे खालीलप्रमाणे होत : ( १ ) दोन्ही प्रयोगांच्या मागे परिपुष्ट तात्त्विक विचारसरणी नव्हती. ( २ ) दोन्ही प्रयोगांचे ध्येय अत्यंत संकुचित होते. ते म्हणजे आधुनिक प्राथमिक शाळेची अप्रियता दूर करण्याचा प्रयत्न करणे. ( ३ ) नव्या व जुन्या पद्धतीचा योग्य समन्वय त्यांना घालता आला नाही. ( ४ ) लोकांची सर्वसामान्य प्रवृत्ती शहरी अभ्यासक्रमाकडे होती.

१९०४ मध्ये लॉर्ड कर्झनचा शैक्षणिक धोरणावरचा ठराव अंमलात आल्यावर ग्रामीण शिक्षणाकडे सरकारी अधिकाऱ्यांचे जरा अधिक लक्ष गेले. कर्झनचे वैशिष्ट्य हे की, त्याने ग्रामशिक्षणाचे सुस्पष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते. त्याच्या मताने ज्या योगाने मुले बुद्धिमान कृषिक बनतील; निरीक्षक, विचारवंत आणि प्रयोगवेत्ते बनण्याची पात्रता ज्यामुळे त्यांच्यात येईल; जमानदारांपासूनच्या व्यवहारात ज्या योगाने त्यांना संरक्षण मिळेल अशा प्रकारचे ज्ञान देणे हे ग्रामीण शाळांचे ध्येय होय. त्याच्या मताने ग्रामीण शाळांच्या अभ्यासक्रमात सोप्या भाषेतील पुस्तके, प्राथमिक व्याकरण, सोपे अंकगणित व ग्रामीण जमाखर्च ह्यांचा समावेश असावा. कर्झनच्या ह्या विचारामुळे ग्रामीण शाळांसाठी वेगळा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याची एकच लाट उसळली.

मुंबई प्रांतामध्ये ग्रामीण विभागासाठी कमी विषय ठेवण्यात आले व अभ्यासक्रमही सोपा करण्यात आला. बंगालमध्ये एकंदर अभ्यासक्रम शहरी व ग्रामीण शाळांसाठी एकच ठेवण्यात आला, परंतु ग्रामीण विभागात विज्ञान व रसायनशास्त्र ह्याऐवजी शेतीस पूरक अशा विज्ञान, रसायनशास्त्र व अध्यापनाची सोय करण्यात आली. पंजाबमध्ये ग्रामीण शाळांतून पर्शियन काढून टाकण्यात आले. अंकगणित शिकविताना एतद्देशीय पद्धतीचा अवलंब करण्यात आला. भूगोलाचा दर्जा व वाचनाच्या पुस्तकातील भाषा ह्यांत ग्रामीण विभागास अनुसरून बदल करण्यात आला. मध्य-प्रदेशातील ग्रामीण शाळांत अर्धा वेळ शालेय अभ्यास व अर्धा वेळ शेतकाम अशी विभागणी करण्यात येऊन वाचन, लेखन, अंकगणित, भूगोल, शेती, प्राथमिक भूमिती, चित्रकला व शारीरिक शिक्षण असे विषय ठेवून अभ्यासक्रमांतही थोडासा बदल करण्यात आला.

परंतु ह्या सरकारी प्रयोगांमागे ग्राम-हिताची कळकळ नव्हती. केवळ कर्झनचा आदेश म्हणून काही हालचाल करण्यात आली एवढेच. म्हणूनच

१९०५ मध्ये कर्झन परत विलायतेस जाताच त्याच्या धोरणालाही अर्धचंद्र मिळाला. १९१३ च्या सरकारी ठरावाने ह्याच गोष्टीवर शिक्कामोर्तब करण्यात आले कारण या ठरावात असे स्पष्ट नमूद करण्यात आले की, ग्रामीण व शहरी शाळांच्या अभ्यासक्रमात फार बदल ठेवणे व्यवहार्य होणार नाही. मध्यवर्ती सरकारच्या ह्या धोरणामुळे लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत ग्रामीण शिक्षणाला मिळालेली चालना बंद झाली. १९१६-१७ मध्ये मुंबई प्रांतातील ग्रामीण इयत्तांना तिलांजली देण्यात आली. यासाठी खालील कारणे पुढे करण्यात आली :- (१) ग्रामीण अभ्यासक्रम लोकांना आवडत नव्हता कारण तो पार पाडल्यावर सरकारी नोकरी मिळणे शक्य नव्हते. (२) इंग्रजी शिकण्याची इच्छा जनतेत वाढत चालली होता. (३) ग्रामीण नागरिक शहरवासीयाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा काकणभरही कमी शिक्षण घेण्यास तयार नव्हता. इतर प्रांतांतही ग्रामीण शिक्षणाची कमी-अधिक प्रमाणात हीच स्थिती होती. थोडक्यात ग्रामीण शिक्षणाचे हे प्रयोग पूर्णपणे फसले हाते.

या प्रयोगांच्या असफलतेची कारणे खालीलप्रमाणे होत : (१) कर्झनच्या दृष्टिकोणाचा मथितार्थ सरकारी अधिकाऱ्यांच्या ध्यानात आला नाही वा तो जाणून घेऊन ग्रामशिक्षणाची योजना मोठ्या आस्थेने व विचारपूर्वक त्यांनी कधी आखली नाही की अमलात आणली नाही. (२) हे ग्रामशिक्षण फक्त प्राथमिक शाळेपुरतेच मर्यादित होते. पुढे माध्यमिक व उच्च शिक्षण घेण्याची त्यात सोय नव्हती. (३) ह्यापैका काही प्रयोगांचे उद्दिष्ट केवळ शहरी व ग्रामीण शाळांतील अभ्यासक्रम वेगवेगळा ठेवावे असे हेते. (४) या प्रयोगांच्या मागे सुसंबद्ध योजना नव्हती वा पुरेशा प्रमाणावर ते योजले गेले नाहीत. (५) सरकारी अधिकाऱ्यांनी असे गृहीतच धरले की, शहरांना जी गोष्ट इष्ट आहे तीच खेड्यांनाही इष्ट आहे. (६) ग्रामीण शाळा व शहरी शाळा ह्यांतला फरक जाणून घेण्यात आला नाही. (७) ग्रामीण शिक्षण म्हणजे फक्त प्राथमिक शिक्षणच होय असा समज सरकारी अधिकाऱ्यांनी करून घेतला. (८) ग्रामशिक्षणासाठी योग्य प्रकारचे प्रशिक्षित शिक्षक तयार करण्यात आले नाहीत.

या सर्वांचा परिणाम असा झाला की, ग्रामीण शिक्षणाचा विद्यापीठाशी काडीचाही संबंध राहिला नाही. माध्यमिक शिक्षणसुद्धा वाजवीपेक्षा अधिक शहरी झाले. ग्रामशिक्षण सर्व दृष्टींनी कमकुवत असणाऱ्या शिक्षकांच्या हाताखाली गेले. त्यामुळे त्याचा दर्जा अधिकच खालावला. म्हणूनच अभ्यासक्रमाच्या प्रतवारीतील फरक, वेगळ्या शिक्षणपद्धती, ग्रामीण पशिक्षित विद्यालये, ग्रामीण संशोधन व प्रयोग, ग्रामीण शाळांचे निरीक्षण इत्यादी अनेक समस्यांकडे दुर्लक्ष होऊन ग्रामशिक्षणाची पुरेपूर आबाळ झाली. ग्रामीण शिक्षणाची अशी परिस्थिती ब्रिटिश कालखंडात सर्वसामान्यतः दिसून येते.

१९१९ मध्ये द्विदल राज्यपद्धती अस्तित्वात आल्यावर शिक्षण खाते प्रांतिक सरकारचे म्हणून मध्यवर्ती सरकारने त्या बाबतीतील आपली जबाबदारी पार झुगारून टाकली. प्रांतिक सरकारच्या ताब्यात तिजोरी नसल्याने ग्रामशिक्षणाच्या प्रयोगांना टाळाच बसला. १९३५ मध्ये प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यावर ग्रामपुनर्रचनेचे झालेले थोडेसे प्रयत्न सोडल्यास ग्रामशिक्षणाचे एकंदर चित्रण वर दाखविल्याप्रमाणे संपूर्ण ब्रिटिश कालखंडात अत्यंत निराशाजनकच होते.

## ग्रामीण पुनर्रचनेचे सरकारी प्रयत्न

ग्रामीण पुनर्रचना हा ग्रामशिक्षणाचा एक अविभाज्य भाग आहे. ह्याचा विचार केल्याशिवाय ग्रामशिक्षणाचे चित्र पूर्ण होणार नाही. ग्रामीण पुनर्रचना व शेतकी विकास या दृष्टीने आंग्लकालात खालील गोष्टी करण्यात आल्या :

(१) शेतकऱ्याच्या कर्जासंबंधी व जमीन-सुधारण्यासंबंधी कायदे.
(२) सहकारी चळवळीस चालना.
(३) संशोधन-संस्था व शेतकी महाविद्यालये यांची स्थापना.
(४) संशोधन व विस्तारकार्य यासाठी शिक्षणखात्याची स्थापना.
(५) जंगल, पाटबंधारे, सहकार्य, आरोग्य, शिक्षण, उद्योग व पशू या खात्यांच्या कार्यमर्यादेत वाढ.
(६) ऋणकरी शेतकऱ्यांच्या संरक्षणाचे कायदे.

सरकारने असे प्रयत्न ग्रामीण विकासासाठी केले, परंतु त्यांची व्याप्ती व प्रत्यक्ष कार्य लक्षात घेता ते फारच मर्यादित होते असे म्हटले पाहिजे. भारताची गंभीर व विशाल ग्रामीण समस्या अशा तुटपुंज्या उपाययोजनेने सुटली जाण्याजोगी नव्हती. १९३५ मध्ये प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यानंतर एक उत्साहाचे वातावरण सर्व देशात निर्माण झाले. ८ प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली व त्यांनी खेड्यांच्या प्रश्नाकडे आस्थेने पाहण्यास सुरुवात केली. ग्रामीण पुनर्रचनेचे खाते प्रत्येक प्रांतातून उघडण्यात आले व ते एका मंत्र्याकडे सोपविण्यात आले. सहकारी संस्था व पंचायती यांनाही चालना देण्यात आली. बिहारमध्ये १९३८ साली ग्रामीण संस्थापना खाते उघडण्यात आले. ह्याच्यामार्फत प्रत्येक विभागातील २० ते ३० खेड्यांसाठी १ अशी एकूण चार आदर्श केंद्रे सुरू करण्यात आली. या केंद्रांकडे खेड्यातील आरोग्य, पंचायत, छोटे, उद्योगधंदे व प्रौढशिक्षण यांचा विकास करणे हे काम होते. मुंबई प्रांतात ग्रामीण पुनर्रचना व सहकार खाते एकत्र करून ग्रामीण विकास खाते निर्माण करण्यात आले. ह्या खात्याच्या मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकासाच्या प्रांतिक परिषदेची स्थापना करून त्यात खालील चार उपसमित्या नेमण्यात आल्या : (१) शेती व जीवधन-समिती, (२) लघू उद्योग समिती, (३) प्रशिक्षण व प्रचार समिती, (४) अप्रगत

विभाग समिती. ह्याचप्रमाणे तालुका विकास परिषदांची स्थापना करण्यात आली. उत्तर प्रदेशातही ग्रामीण विकास परिषद व जिल्हा विकास सभा निर्माण करण्यात आल्या म्हैसूरमध्ये निवडक खेड्यांतून पंचायतीच्या विकासास प्राधान्य देण्यात आले. अशा तऱ्हेने ग्रामीण पुनर्रचनेचे काम सर्व प्रांतांत थोड्याफार प्रमाणावर झाल्याचे आढळून येते. खालील कोष्टकावरून ग्रामीण पुनर्रचनेच्या सरकारी कामकाजाची व त्यावर १९४०–४१ अखेरपर्यंत करण्यात आलेल्या खर्चाची कल्पना येईल.

| खर्चाची बाब | मध्यवर्ती सरकारचे मान्य अनुदान ( लाख रु. ) | ३१ मार्च १९४१ पर्यंत प्रत्यक्ष खर्ची पडलेली रक्कम ( लाख रु. ) |
|---|---|---|
| ( १ ) सहकार विभाग व जिल्हा कचेरी द्वारा योजलेल्या ग्रामविकास-योजना | ८·२९ | ७·९० |
| ( २ ) ग्रामीण पाणीपुरवठा | ४४·६५ | ३९·२६ |
| ( ३ ) ग्रामीण दळणवळण | २३·८२ | १९·३१ |
| ( ४ ) ग्रामीण स्वास्थ्य | ५.७० | ५·४७ |
| ( ५ ) ग्रामीण आरोग्य | ११.७२ | ११·२१ |
| ( ६ ) औद्योगिक योजना | ३·४५ | २·९६ |
| ( ७ शेती-विकास | ९·२४ | ८·५७ |
| ( ८ ) संस्थापन | २·०८ | २·०८ |
| ( ९ ) तुकड्यांचे एकीकरण | ४·११ | ४·११ |
| (१०) कर्ज-निवारण | १·०० | १·०० |
| (११) जीवन-सुधारणा | ४·६० | ४·९५ |
| (१२) पशुसंशोधन | ०·९३ | ०·९१ |
| (१३) कुक्कुटपालन | ०·११ | ०·११ |
| (१४) प्रचार | ६·६७ | ६·६७ |
| (१५) समाजकल्याण-योजना | ५·८२ | ४·३६ |
| (१६) अन्य | ४·२६ | ३·५१ |
| (१७) वैकल्पिक अनुदान | ६·८५ | ७·०३ |
| (१८) अविभाजित निधी | ४·६६ | — |
| एकूण | १४७·९६ | १२९·४१ |

वरील विवेचनावरून पुढील निष्कर्ष निघू शकतात : ( १ ) ग्रामीण विकास व ग्रामीण शिक्षण ह्या अविभाज्य गोष्टी असतानाही त्याची योग्य सांगड घालण्याचे

प्रयत्न सरकारने केले नाहीत. ( २ ) ग्रामीण पुनर्रचनेसाठी जो पैसा खर्च करण्यात आला तो अपुरा होताच, त्यांतही मान्य अनुदानाचा पुरेपूर उपयोग केला नाही ही खेदाची गोष्ट होय. ( ३ ) ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम फारच मर्यादित स्वरूपात आयोजित करण्यात आले. ( ४ ) त्यासाठी आवश्यक असलेला आर्थिक व अन्य समस्यांचा अभ्यास करण्यात आला नाही. ( ५ ) जमीनधाऱ्याची व कूळपद्धतीची सयुक्तिक पद्धत, पाटबंधाऱ्याची व्यवस्था, तुकड्यांचे योजनाबद्ध एकीकरण इ. मूलभूत ग्रामीण समस्या सोडविण्याचा प्रयत्न पाहिजे तसा झाला नाही. ( ६ ) ग्रामीण पुनर्रचनेसाठी आवश्यक लोकमत तयार करणे व त्या कामांत लोकांचे सक्रीय सहकार्य मिळविणे ह्या दोन्हा गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यात आले. ( ७ ) ग्रामीण नेते व ग्रामशिक्षण ह्यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आली नाही. ( ८ ) ग्रामीण पुनर्रचना कार्यासाठी ग्रामशिक्षणाच्या उच्च संस्था खेड्यात स्थापन करणे व खेड्यातील बुद्धिमत्ता खेड्यातच कशी राहील हे पाहण्यात आले नाही.

या सगळ्याचा इत्यर्थ हाच की, ग्रामीण शिक्षण व पुनर्रचना ह्यांचे आंग्लकाळातील सरकारी प्रयत्न जवळ जवळ फसले. नाही म्हणायला दोन ठिकाणचे सरकारी प्रयोग बऱ्याच प्रमाणावर यशस्वी झाले. एक म्हणजे गुरगाव ( पंजाब ) येथील एफ्. एल्. ब्रायन ह्यांचा प्रयोग, दुसरा बडोदे संस्थानातील व्ही. टी. कृष्णम्माचारी ह्यांच्या मार्गदर्शनाखालचा ग्रामविकासाचा प्रयोग. ह्या दोन्ही प्रयोगांना जे थोडेफार यश मिळाले त्याचे कारण म्हणजे सरकारी पाठबळाबरोबरच त्या प्रयोगाच्या मागे असणारे कळकळीचे नेतृत्व. गुरगाव प्रयोगाचे श्रेय ब्रायन दांपत्याला दिले पाहिजे, तर बडोद्याच्या संस्थानातील प्रयोगाचे यश श्री. सयाजीराव गायकवाड ह्यांच्या प्रेरणेला व व्ही. टी. कृष्णम्माचारी ह्यांच्या मार्गदर्शनाला दिले पाहिजे. ह्या दोन्ही प्रयोगांची आपण आता ओळख करून घेऊ.

## गुरगाव येथील ब्रायन ह्यांचा प्रयोग

१९२० मध्ये पंजाबमधील गुरगाव येथे त्या विभागाचे नायब कमिशनर म्हणून एफ्. एल्. ब्रायन आले. तेथील परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर त्यांनी ‘ गुरगाव-योजना ’ पुढे मांडली व ती व्यवहारात उतरविण्याचा यथा-योग्य प्रयत्न केला. ब्रायनसाहेबांना स्वतःला ग्रामीण लोकांच्या उन्नतीची आस्था होती व त्यासाठी परिश्रम करण्याची त्यांची नेहमी तयारी असे. त्याच्या जोडीलाच विशाल दृष्टिकोन व चिकाटी हे गुण त्यांच्यापाशी होते. त्यांच्या पत्नीचेही त्यांच्या कार्याला संपूर्ण व सक्रीय सहकार्य होते जनतेला आपला विकास साधावयाचा असेल तर स्वतःच प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांच्या धोरणाचे मुख्य सूत्र होते. ग्रामीण

समस्या सोडवावयाची असेल तर ग्रामविकासाच्या विविध अंगांकडे एकदमच लक्ष दिल पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

गुरगाव येथाल प्रयोगात आपले हे विचार कृतीत उतरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ग्रामविकासासाठी त्यांनी विविध संस्थांची स्थापना केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शिक्षण देणारी शाळा स्थापन करण्यात आली. ह्या शिक्षणाचा उपयोग ग्रामनेत्यांसाठी व्हावा अशी अपेक्षा होती. म्हणून त्यात सहकारी चळवळ, शेतीसुधारणा, ग्रामीण आरोग्य इत्यादी शिक्षणाची सोय होती. स्त्रियांसाठी घरगुती काटकसरीचे शिक्षण देणारी शाळा काढण्यात आली याशिवाय आरोग्य-संस्था, महिलासंस्था इत्यादींचे जाळे निर्माण करण्यात आले. आपल्या विकास-योजनेची प्रगतीची जनतेला माहिती करून देण्यासाठी जिल्हापत्रिका प्रसिद्ध करण्यात येऊ लागली.

ग्रामविकास म्हणजे गावाच्या विविध अंगांचा विकास ही ब्रायन ह्यांची मूलभूमिका असल्याने त्यांच्या प्रयोगात विविध प्रकारच्या कार्यांचा अंतर्भाव झालेला होता ग्रामाण आरोग्य व स्वच्छता ह्याकडे मुद्दामहून लक्ष पुरविण्यात आले होते साथी-प्रतिबंधक लस, गावाताल स्वच्छता, घरांची रचना ह्या गोष्टींकडे लक्ष देण्यात आले व आवश्यक ती उपाय योजना करण्यात आली. शेती सुधारण्यासाठी चांगले खत पुरवणे, वळू पोसणे, तगाई देणे, बी-बियाण्याची व्यवस्था करणे इत्यादी. समाजशिक्षणासाठी जत्रा, मेळावे, बालवीर-पथक, वाचनालये ह्यांचा उपयोग करून घेण्यात आला. रात्रीच्या शाळाहा काढण्यात आल्या. शिक्षणालाच सहकाराची जोड देण्यात आली. विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. कर्जे, खतें, बी-बियाणे ह्या संस्थांतून मिळण्याची सोय झाली. ह्या संस्थांचे प्रथमतः केवळ १। लाख रुपये असलेले भांडवल २६ लाखांवर गेले. सामाजिक सुधारणा आर्थिक विकासाइतक्याच महत्त्वाच्या म्हणून त्याचाही समावेश ब्रायनसाहबांनी आपल्या योजनेत केला. बालविवाह थांबवणे, सहशिक्षणाचा प्रसार करणे, लग्नादि समारंभांत काटकसर करणे, कर्ज-बाजारीपणातून मुक्त करणे यांसारख्या छोट्या-मोठ्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या विविध कार्यांत एकसूत्रीपणा राहवा म्हणून ग्रामनत्याची योजना करण्यात आली. हा ग्रामनेता सर्व सरकारी खात्यांचा प्रचारक तर असेलच पण त्याबरोबरच जनता व सरकार ह्यांमध्ये दुवा साधण्याचे काम त्याचे राहील अशी अपेक्षा होती.

श्री. ब्रायन ह्यांच्या मताप्रमाणे ग्रामविकासाचे भरीव कार्य होण्यासाठी खालील चार गोष्टींची आवश्यकता आहे—

( १ ) लोकांत ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे.

( २ ) लोकांच्या पुढे अनुकरणीय अशी उदाहरणे ठेवली पाहिजेत.

( ३ ) जनतेमध्ये सेवावृत्तीने काम केले पाहिजे.

( ४ ) सहकारवृत्ती बळावण्यासाठी ग्राम-संघटना केली पाहिजे.

आंग्लकाळात ज्या वेळेला ग्रामीण-विकासाबाबत सर्वत्र उदासीनता दिसत होती त्या वेळी इंग्रज असूनही अत्यंत आस्थेने, चिकाटीने, परिश्रमाने, अभ्यासू वृत्तीने व सुस्पष्ट कल्पना डोळ्यासमोर ठेवून ब्रायन ह्यांनी ग्रामशिक्षणाचा एक मौलिक प्रयोग केला ह्यांत शंका नाही.

## व्ही. टी. कृष्णम्माचारी ह्यांचा प्रयोग — कोसंबा-केंद्र

ग्रामशिक्षणाचा दुसरा उल्लेखनीय सरकारी प्रयोग बडोदे संस्थानात तेथील महाराज श्री. सयाजीराव गायकवाड ह्यांच्या प्रेरणेने झाला सयाजीरावांचे लक्ष आपल्या संस्थानाच्या सर्वांगीण विकासाकडे होते. शिक्षण व ग्रामविकास ह्यांकडे त्यांनी प्रथमपासूनच लक्ष दिले होते. १८९३ मध्येच त्यांनी ६ ते ११ वर्षांच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले होते १८९०–९५ च्या दरम्यान प्रत्येक खेड्यात सक्तीने ग्रामपंचायत स्थापन झाली होती. छोट्या छोट्या खेड्यांपर्यंत ज्ञानाचे लोण पोहोचवण्यासाठी ग्रामीण वाचनालयांची सूत्रबद्ध योजना तेथे आखण्यात आली होती. परंतु ग्रामीण शिक्षणाचा खरा तंत्रबद्ध व योजनाबद्ध प्रयोग १९३२ मध्ये कोसंबा येथे ग्रामविकासाचे केंद्र उघडल्यावरच सुरू झाला. ह्या केंद्राचे योजक, सूत्रधार व प्रेरक संस्थानचे १९२७ मध्ये झालेले दिवाण श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी हे होत. ह्यांच्या अचूक व प्रभावी मार्गदर्शनामुळे कोसंबा-केंद्राला भारतीय ग्राम-शिक्षणाची गंगोत्री होण्याचा मान प्राप्त झाला आहे. कारण स्वातंत्र्योत्तर कालात संपूर्ण भारतात ग्रामविकासाची योजना आखण्याची जबाबदारी श्री. कृष्णम्माचारी यांजवरच टाकण्यात आली. या योजनेची मूळ बीजे आपणाला कोसंबा-केंद्रातील प्रयोगातच दिसतात.

कृष्णम्माचारींची विकास-योजनेसंबंधी काही निश्चित मते होती. त्यांच्या मताने विकासयोजनेचा संबंध जनतेच्या जीवनमानाशी असतो. ते सुधारण्यासाठी कुटीरोद्योग व शिक्षणप्रसार ह्यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु विकास-योजनेचे मुख्य यश शेतीवरच अवलंबून आहे. कारण ग्रामीण जनतेचा हाच प्रमुख धंदा होय. साहजिकच विकासकेंद्राचे उद्दिष्ट ग्रामजीवनाचा सर्वांगीण विकास करणे हे असले पाहिजे. हा विकास साधण्यासाठी ह्या केंद्रातून आणखी एक महत्त्वाची गोष्ट ह्या केंद्रातून साध्य झाली पाहिजे ती म्हणजे शेतकऱ्याच्या दृष्टिकोनात बदल घडवणे. या केंद्रातून ग्रामनेत्यांच्या शिक्षणाचीही व्यवस्था झाली पाहिजे. हे केंद्र स्थापन करताना शेतकऱ्यांशी वैयक्तिक संबंध स्थापन करता येतील ह्याची दक्षता बाळगली पाहिजे.

अशा ह्या तात्त्विक भूमिकेवर आधारलेल्या केंद्राची सुरुवात कोसंबा येथे १९३२ साली करण्यात आली. केरळमधील मार्तंडम् केंद्रातील प्रशिक्षित व अनुभवी कार्यकर्त्यांस मदतीस बोलाविण्यात आले. त्यांच्या सहाय्यास शेती, पशुपालन सहकार व स्थापत्यशास्त्र या क्षेत्रांतील चार तज्ज्ञ देण्यात आले. पंचायती व सहकारी संस्थांमार्फत स्थानिक कुटुंबांशी संबंध ठेवण्याची योजना आखण्यात आली, ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम शक्य तितक्या व्यापक प्रमाणावर अंमलात आणण्याचे ठरविण्यात आले. ह्या कार्यक्रमातही शेतीस प्राधान्य देऊन कार्यक्रमातील गटागटांतील सर्व कार्यकर्त्यांत सहकार्य नांदेल ह्यांची दक्षता घेण्यात आली. ह्या सर्वांमुळे कोसंबा-केंद्राला थोड्याच कालावधीत चांगले यश प्राप्त झाले.

ह्या केंद्रातील कार्यक्रमांत विविधता ठेवण्यात आली होती. अर्थात प्राधान्य शेतीविकासास देण्यात आले. कापसाची व धान्याची प्रत सुधारावी म्हणून खास शिक्षणाची योजना आखण्यात आली. केंद्रातील प्रत्येक खेड्यात कमीत कमी एक सहकारी कर्ज-संस्था स्थापन करण्यात आली. हिचेच रूपांतर पुढे बहूद्देशीय सहकारी संस्थेत झाले. तिला जोड प्रभावी ग्रामपंचायतीची देण्यात आली. परंतु खेड्यातील शेतीविकास केवळ विकासयोजनेवर अवलंबून नाही. येथील परंपरागत व खूप खोल जाऊन बसलेले दोष दूर करण्यासाठी सरकारी पूरक कायद्यांचीही आवश्यकता आहे. म्हणून बडोदे संस्थानात वेगवेगळे पूरक कायदे वेळोवेळी करण्यात आले. कर्जनियंत्रण-कायदा १९३५ मध्ये झाला. १९३८ मध्ये कर्जाबाबत तडजोड करण्याचा कायदा मंजूर झाला. नंतर खंडनियंत्रण व जमीन सुधारणा-कायदा व तुकडेबंदी-कायदा हेहा अमलात आले.

शेतीबरोबरच कुटीरोद्योगांनाही जोडधंदा म्हणून चालना देण्यात आली. भाजीपाला पिकविणे, मधुमक्षिका-पालन, विणकाम, कुक्कुटपालन इत्यादी अनेक छोट्या धंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले. शैक्षणिक व नैतिक कार्यक्रमांना केंद्रात महत्त्वाचे स्थान मिळाले. प्रौढ-शिक्षण, बालवीरपथक, अनिष्ट सामाजिक रूढी ह्या सर्व बाबतीत योग्य मार्गदर्शन करण्यास शिक्षक पाहिजेत म्हणून मध्यवर्ती प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे उन्हाळी वर्गातून ग्रामीण पुनर्रचना व कुटीरोद्योग ह्यासंबंधीचे शिक्षण दिले जाऊ लागले. १९३६ मध्ये हीरकमहोत्सव रकमेच्या व्याजातून ह्या विकासयोजनेसाठी अनुदान मिळाले. त्याचा उपयोग पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दळणवळणाची सोय, घरबांधणी, गायरान, हिवताप-प्रतिबंधक उपाय इ. ग्रामविकासाच्या कामासाठी करण्यात आला.

१९४१ साली कोसंबा-केंद्रात ३५ ग्रामीण कर्जसंस्था होत्या. त्याशिवाय इतरही अनेक सहकारी संस्था होत्या. त्यांत कापूसविक्रीसंस्था, ६ स्त्रियांसाठी काटकसरी संस्था, १ गृहनिर्माण संस्था व १ तालुका विकास परिषद ह्यांचा समावेश होता. ग्रामपंचायत सक्तीच्या शिक्षणाचा कायदा ह्या गोष्टी केंद्राच्या

विकासाला पूरक ठरल्या. कोसंबा-केंद्राचा असा हा प्रयोग म्हणजे भारतीय ग्राम-शिक्षणाच्या इतिहासातील एक मोठा टप्पा होय असे म्हणणे भाग आहे.

**काही निष्कर्ष :**

वरील दोन प्रयोगांच्या आधारे आपणास खालील निष्कर्ष काढता येणे शक्य आहे :

(१) ग्रामशिक्षणाची योजना ग्रामीण पुनर्रचनेहून विभक्त करता येणार नाही.

(२) ग्रामीण पुनर्रचनेच्या केंद्राला ब्रायन किंवा कृष्णम्माचारी ह्यांसारखा प्रेरक व प्रभावी मार्गदर्शनाची सतत आवश्यकता आहे.

(३) ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम विशाल असला पाहिजे ग्रामजीवनाच्या सर्व अंगांशी तो निगडित पाहिजे.

(४) ग्रामीण विकासाचा कार्यक्रम सरकारी पूरक कायद्याशिवाय यशस्वी होऊ शकणार नाही. या दृष्टीने गुरगाव येथील कार्यक्रमाचे यश मर्यादित होते.

(५) ग्रामीण जनता व ग्रामीण कार्यकर्ते ह्यांचा संबंध निकटचा, जिव्हाळ्याचा व सतत पाहिजे.

(६) हा कार्यक्रम टिकाऊ स्वरूपाचा होण्यासाठी ग्रामनेते व ग्रामशिक्षक ह्यांच्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

(७) प्रेरक मार्गदर्शक दूर झाल्यावर कार्यक्रमाचा पहिला उत्साह राहत नाही असे दोन्ही प्रयोगांवरून दिसते. यासाठी प्रभावी कार्यकर्ते व सहकारी वृत्ती कार्यक्रमांतून निर्माण होईल हे पाहिले पाहिजे. दोन्ही प्रयोग ह्या दृष्टीने डावेच राहिले.

(८) ग्रामविकासाच्या कार्यक्रमाला निश्चित तात्त्विक भूमिकेची आवश्यकता आहे.

(९) सरकारी पाठिंबा व आर्थिक सहाय्य याशिवाय ग्रामविकासाची योजना यशस्वी होऊ शकणार नाही.

(१०) उच्च ग्रामशिक्षणाच्या सोईशिवाय ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यास भरीवपणा येणार नाही. या दृष्टीने दोन्ही कार्यक्रमांत फारच मोठी कमतरता होई. ग्रामीण पाहणी, संशोधन इत्यादी गोष्टींसाठी ग्रामीण विद्यापीठांची आवश्यकता आहे.

(११) ग्रामशिक्षणाची सूत्रबद्ध योजना—पूर्वप्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत—आखण्याकडे दोन्ही प्रयोगांत लक्ष दिले गेले नाही.

(१२) संपूर्ण देशाचा विचार करता, दोन्ही प्रयोगांच्या कक्षेत आलेला ग्रामविभाग फारच थोडा होता. म्हणूनच दोन्ही प्रयोगांचे यश मर्यादित आहे हे विसरून चालणार नाही.

(१३) ग्रामविकासाचे खरे यश शेतकऱ्यांच्या बदलत्या दृष्टिकोणात आहे. ह्या बाबतीतले योग्य प्रकारच्या निकष उपलब्ध होणे व त्याच्या साहाय्याने ह्या प्रयोगांचे मोजमाप करणे कठीण आहे.

(१४) ग्रामीण विकासाच्या कार्यातील अत्यंत आस्थेवाईक, चिकाटीचे व परिश्रमाचे सुरुवातीचे यशस्वी सरकारी प्रयोग म्हणून ह्यांचा उल्लेख करता येईल.

ग्रामविकास व ग्रामशिक्षण ह्यांचेकडे काही खाजगी प्रयत्नही ह्या कालखंडात झाले. त्याचा आता आपण परिचय करून घेऊ.

## महात्मा गांधी व ग्रामीण पुनर्रचना

ग्रामीण पुनर्रचनेचा सर्वांत मोठा व अत्यंत मौलिक प्रयोग ह्या कालखंडात म. गांधी ह्यांच्या प्रेरणेने सुरु झाला. हा प्रयोग मूलोद्योग-योजना, जीवनशिक्षण-योजना किंवा वर्धा-योजना म्हणून ओळखला जातो. १९३७ च्या काँग्रेस मंत्रिमंडळाने, सार्जंट कमिशनने व १९४७ नंतर भारत सरकारने ही योजना उचलून धरल्याने भारतीय शिक्षण परंपरेत व विशेषकरून ग्रामशिक्षणाच्या इतिहासात ह्या योजनेला काही वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. तेव्हा ह्या योजनेला सविस्तर विचार पुढील प्रकरणात आपण करू या. परंतु तत्पूर्वी ग्रामीण पुनर्रचनेचे काही मर्यादित उद्दिष्टे समोर ठेवून गांधीजींनी प्रयोग केले. त्यांची तोंडओळख आपण करून घेऊ या.

राष्ट्रीय चळवळ यशस्वी व्हावयाची असेल तर ह्या दरिद्री देशाची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. विशेषतः खेड्यातील जनतेला शेतीशिवाय दुसरा व्यवसाय उपलब्ध करून दिला पाहिजे. या उद्देशानेच त्यांनी अत्यंत कमी साधने व भांडवल ह्यांच्या सहाय्याने कोणालाही घरबसल्या सुरू करता येण्यासारखा सूतकताईचा व्यवसाय सुचविला. यासाठीच चरखा व स्वदेशी ह्यांना आपल्या राष्ट्रीय चळवळीत महत्त्वाचे स्थान दिले. १९२३ मध्ये अखिल भारतीय सूतकार परिषदेची स्थापना केली. १९४१–४२ मध्ये ह्या परिषदेने १५,११० खेड्यांतील ३,५४,२५७ लोकांना सूतकताईचा व्यवसाय उपलब्ध करून दिला. जानेवारी ४१ ते जून ४२ ह्या कालखंडात ८०,००,००० रुपये मजुरी म्हणून कामगारांना दिले. त्याचप्रमाणे स्थापन झाल्यापासून एकूण १७ वर्षांत परिषदेने ६,८३,५७,८६२ रुपयांची खादी निर्माण केली व ४,१०,३०,०३१ रुपये मजुरी म्हणून सूतकारांना दिले. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने हा प्रयोग महत्त्वाचा ठरला. कारण खेडुतांना एक

सोपा घरगुती व्यवसाय ह्यामुळे उपलब्ध होऊन त्यांच्या पोटापाण्याची सोय भागविण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला.

सूतकताईप्रमाणेच इतर मृत ग्रामीण उद्योगधंद्यांना परत चालना देण्यासाठी १९३४ मध्ये गांधीजींनी अखिल भारतीय ग्रामीण उद्योग परिषदेची स्थापना केली. ह्या परिषदेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती : (१ सूतकाम, विणकाम साबण तयार करणे, कागद तयार करणे इत्यादी ग्रामीण उद्योगधंद्यांना चालना देणे, ( २ ) ह्यासंबंधी संशोधन करणे. ( ३ ) ह्या व्यवसायातून निर्माण झालेल्या गोष्टी वापरण्याबद्दल लोकांत प्रेम उत्पन्न करणे, म्हणजेच स्वदेशीची चळवळ वाढविणे.

ग्रामीण उद्योगधंद्यांचे शिक्षण देणारे व ग्रामशिक्षणाचे खेड्यात काम करू शकणारे प्रशिक्षित शिक्षक वरील योजना राबविण्यास आवश्यक होते. त्यासाठी कार्यकर्त्यांना शिक्षण देण्याची योजना गांधीजींनी आखली होती. ग्रामीण उद्योग-धंद्यांचे प्रशिक्षण देणारी शाळा वर्धा येथे काढण्यात आली व ह्यात दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती ठवण्यात आली. सेवाग्राममध्ये मध्यवर्ती खादी विद्यालय व ८ प्रांतांत, ८ खादी विद्यालये स्थापन करण्यात आली. या विद्यालयांमार्फत अभ्यास-वर्ग व प्रशिक्षण शिबिरे ह्यांची योजना आखण्यात आली. गांधी सेवा संघामार्फत सर्व स्वार्थत्यागी कार्यकर्त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

गांधीजींच्या वरील योजनांमधून ग्रामीण जीवनाचा आर्थिक विकास करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट होते. सरकारी मदतीशिवाय किंबहुना सरकारी विरोध पचवून गांधीजींनी केलेले हे देशव्यापी प्रयोग ग्रामशिक्षणाच्या दृष्टीने खास उपेक्षणीय नाहीत.

## रवींद्रनाथ टागोर व ग्रामशिक्षण : श्रीनिकेतन येथील प्रयोग

ग्रामीण शिक्षणाचा दुसरा एक प्रयोग ह्या कालखंडातील गांधीजींसारख्याच जगन्मान्य व प्रतिभासंपन्न व्यक्तीने केला. ती व्यक्ती म्हणजे विश्वकवि डॉ. रवींद्रनाथ टागोर. टागोरांचा काव्यात्मा सर्व विश्वातील सौंदर्याचा साक्षात्कार घेत होता. भारतातल्या दारिद्र्याने महात्माजींना संभ्रमित केले तर या दुःखी खेड्यात आनंद कसा निर्माण करावा हा प्रश्न टागोरांना भेडसावीत होता. त्यांच्या मते जीवनसमृद्धी हे ग्रामशिक्षणाचे उद्दिष्ट होय. खेड्यातील जनतेला सौंदर्याचा आस्वाद घेण्यास शिकवले पाहिजे. त्यासाठी काव्य, नाटक, नृत्य, चित्रकला इत्यादी कलांचे शिक्षण दिले पाहिजे ह्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास दृढ केला पाहिजे. त्यांच्यांत स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. ग्रामशिक्षणाचे हे एक प्रमुख कार्य होय. असे ग्रामशिक्षण देताना ग्रामीण गरजा प्रथमतः लक्षात घेतल्या पाहिजेत. ग्रामीण शाळा व पालक ह्यांच्यांत सहकार्य कसे राहील याचाहि प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती व संशोधनवृत्ती ह्यांना प्रेरणा दिली

पाहिजे. ह्या शिक्षणातून सभोवतालच्या व्यक्तीवर प्रेम करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांत तयार झाली पाहिजे. सर्वच ग्रामीण प्रश्न एकमेकांशी गुंफलेले असल्याने ग्रामशिक्षणाच्या प्रयोगात त्या सर्वांचा विचार होणे आवश्यक होय.

आपले हे ग्रामशिक्षणासंबंधीचे विचार कृतीत उतरविण्यासाठी शांतिनिकेतन-पासून एक मैलावर श्रीनिकेतन ह्या ठिकाणी सुरुवात केली. त्यांना अमेरिकेतील लिओनार्ड एल्महर्स्ट ह्यांच्या सहकार्याचा लाभ मिळाला. १९२१ मध्ये ते येथे आले व १९२२ मध्ये त्यांच्यासह १० विद्यार्थी, ३ प्राध्यापक व इंजिनिअर ह्यांच्या सहकार्याने श्रीनिकेतनच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्याला सुरुवात झाली.

श्रीनिकेतनची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती :

( १ ) ग्रामीण जीवनात रस घेऊन खेडुतांची मैत्री व प्रेम संपादन करणे.

( २ ) ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास व चर्चा करणे व ते सोडविण्यासाठी प्रयोग करणे.

( ३ ) आपणास उपलब्ध झालेल्या अनुभवाचे व ज्ञानाचे लोण शेतकऱ्या-पर्यंत नेऊन पोहोचविणे.

( ४ ) शेतकऱ्यांस आपले उत्पन्न वाढविण्यास, माल विकण्यास व आवश्यक वस्तू विकत घेण्यास सहाय्य करणे.

( ५ ) धान्य व भाजीपाला पिकवण्याच्या व जीवधन पाळण्याच्या अधिक चांगल्या पद्धती शिकवणे.

( ६ ) कला व व्यवसाय शिकण्यास खेडुतांस प्रवृत्त करणे व सहकारी जीवन, आपापसातील मदत आणि सामूहिक प्रयत्न यांचे फायदे पटवून देणे.

श्रीनिकेतनच्या कार्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होत :

( १ ) **शेती**—सुधारलेली शेती प्रत्यक्ष करून दाखविणे, दुग्धालय संस्था, कुक्कुटपालन संस्था चालवणे; पुष्ट प्राणी निर्माण करण्या-संबंधी संशोधन करणे, बटाट्याचा साठा करणे इत्यादी गोष्टींचे शिक्षण देण्यात येई.

( २ ) **ग्रामोद्योग**—विणकाम, चर्मकाम, सुतारकाम, कुक्कुटपालन, शिंपीकाम, पुस्तक-बांधणी इत्यादी घरगुती उद्योगधंद्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

( ३ ) **ग्रामीण कल्याण**—ग्रामीण आरोग्य व स्वच्छता ह्यांकडे लक्ष पुरविण्यात येऊन ग्रामीण जनतेसाठी एक दवाखाना चालविण्यात येऊ लागला.

(४) **सहकार**— या बाबतीत डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या सहकार्याने सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. शेती, कर्ज, खरेदी-विक्री इत्यादीसाठी सहकार्याचा कसा फायदा होतो हे स्पष्ट करण्यात येऊ लागल.

(५) **बालवीर-पथक**— भाजीपाला पिकवणे, स्वच्छता ठेवणे, आगी विझविणे ह्यांसारखी लोकोपयोगी कामे व नाट्यादि मनोरंजनाची कामे ह्या पथकाकडून करण्यात आली.

(६) **शिक्षण**— वसतिगृहात्मक शाळेची स्थापना करण्यात आली. स्वतःचा शिधा स्वतःच आणणे व स्वतःचे काम स्वतः करणे ही त्या शाळेची वैशिष्ट्ये होती. गाणी व खेळ ह्यांना महत्त्वाचे स्थान शिक्षणात होते. लेखन व गणित रोजच्या अनुभवावर आधारलेले असावे ह्यावर कटाक्ष देण्यात आला होता.

रात्रशाळा, फिरती वाचनालये व आरोग्य, सहकार्य, समाजसेवा इत्यादीवरील स्वतंत्र व्याख्याने यांच्याद्वारा प्रौढांना शिक्षण दिले जाई. त्याशिवाय सहकार्य, ग्रामोद्योग, बालवीर चळवळ, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण कला इत्यादींचे प्रशिक्षण देण्यासाठी शिबिरे घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

ग्रामीण पुनर्रचनेचा हा एक अत्यंत प्रभावी व प्रतिभासंपन्न प्रयोग होता. ह्या प्रयोगाला अधिक भरीवपणा येण्याच्या दृष्टीने आणखी एक-दोन गोष्टींची आवश्यकता होती एक म्हणजे सरकार व स्थानिक स्वराज्य-संस्था ह्यांची आस्था व दुसरी म्हणजे विद्यापीठाकडून संशोधनाची मदत. लोकांचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्याबाबतही पुरेसे यश पदरी पडू शकले नव्हते. श्रीनिकेतनच्या ह्या प्रयोगातून उत्पन्न झालेले ग्रामशिक्षणाचे प्रश्न स्वातंत्र्योत्तर कालातील पुनर्रचनेस निश्चितच मार्गदर्शक झाले ह्यात शंका नाही.

## ख्रिश्चन मिशनरी व ग्रामीण पुनर्रचना

ग्रामीण पुनर्रचनेबाबतच्या प्रयत्नात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलेले कार्यही उपेक्षणीय नाही. आपला स्वतःचा एक विशिष्ट दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून अगदी सुरुवातीपासून अत्यंत अप्रगत व मागासलेल्या वस्तीत जाऊन ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपले ग्रामीण विकासाचे कार्य चालू ठेवले. ९० टक्के मिशनरी खेड्यातच राहणारे असल्याने त्यांच्या कार्यात साहजिकच ग्रामप्राधान्य आले. मिशनऱ्यांच्या ग्रामविकासकार्याचे सर्वसाधारण तीन पोटविभाग करतां येतील– (१) शिक्षण, (२) शेती व ग्रामोद्योग, (३) आरोग्यसेवा ह्यांचा आपण थोडक्यात परिचय करून घेऊ. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की हे तिन्ही विभाग परस्परपूरक आहेत व ह्या तिहींच्या समुच्चयांतच ग्रामीण पुनर्रचनेच्या मिशन यांच्या कार्याचे दर्शन होऊ शकेल.

ग्रामशिक्षणाबाबत मिशनऱ्यांची काही निश्चित मते होती. एक म्हणजे ह्या शिक्षणाचा संबंध ग्रामीण नागरिकांचे जीवन व गरजा ह्यांच्याशी असला पाहिजे. दुसरे ह्या शिक्षणाचे उद्दिष्ट सुचारित्र्य, सुज्ञान व चांगल्या प्रवृत्ती व आणि योग्य सामाजिक आदर्श ह्यांनी युक्त असे सर्वांगीण व्यक्तित्व घडविणे हे होय. अशा प्रकारचे शिक्षण देण्यास योग्य शिक्षक तयार करण्यासाठी केंद्रे त्यांनी मोगा, मार्तंडम्, केतपाडी, औक्लेश्वर, उषाग्राम इत्यादी ठिकाणी उघडली.

निरनिराळ्या शाळांमधून ग्रामीण विकासाचे कार्य निरनिराळ्या प्रकारे करण्यात येई. मोठ्या शहरातील शाळांतील विद्यार्थी ग्रामीण पाहणी किंवा ग्रामस्वच्छता मोहीम अशा कार्यांत भाग घेत. प्रत्यक्ष खेड्यांतील विद्यार्थ्यांना ग्रामीण विभागास उपयुक्त अशा शेती, विणकाम शिंपीकाम, सुतारकाम इ. चे शिक्षण दिले जाई, त्यासंबंधी प्रयोग केले जात. बालवीरपथकांच्या दुसरे ग्रामसेवेचे बीज विद्यार्थ्यांत रोवण्यात येई. या शाळांतून शिक्षणाला ग्रामप्राधान्य देण्यासाठी निरनिराळ्या उपायांचा अवलंब करण्यात येई. महाविद्यालयातुन १९३१ च्या खिश्चन उच्च शिक्षणावरच्या लिंडसे कमिशनच्या शिफारशीप्रमाणे ग्रामीण विभागातील विस्तारकार्य व संशोधन ह्या दोन गोष्टींकडे लक्ष दिले जाऊ लागले.

शिक्षणाप्रमाणेच ग्रामविकासासाठी शेती व उद्योगधंदे ह्यांच्याकडेही ध्यान दिले पाहिजे हे मिशनऱ्यांनी सुरुवातीलाच ओळखले होते. ह्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यासाठी मार्तंडम, कोसांबा, पाटणचेरी इ. अनेक ठिकाणी त्यांनी प्रात्यक्षिक केंद्रे उघडली होती. या केंद्रांत शेती, पशुपालन, सहकार, आवश्यक यंत्रशास्त्र, प्रौढशिक्षण, हस्तशिक्षण, मधुपक्षिकापालन, कुक्कुटपालन, लोहारकाम, सुतारकाम, पुस्तक-बांधणी, गोपालन इत्यादी अनेक ग्रामोपयोगी व्यवसायांचे शिक्षण दिले जाई. ह्या सर्वांत त्रावणकोर-कोचीनमधील मार्तंडम येथील केंद्राला मिळालेले यश सर्वच दृष्टींनी स्पृहणीय हाते.

मार्तंडम केंद्राच्या यशाचे श्रेय डॉ. स्पेन्स हॅच यांच्या मार्गदर्शनाला जाते. १९२१ मध्ये ते वाय्. एम्. सी. ए. मध्ये दाखल झाले. थोड्याच अवधीत त्यांनी मार्तंडम येथे आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. मार्तंडम ग्रामीण विभागात असूनही त्रावणकोरपासून फार लांब नव्हते. बाजारहाटासाठी चांगल्या रस्त्यांची तेथे सोय होती. त्याच्या ३ मैलांच्या परिसरांत ४० खेडी होती. व तेथील सर्व मुले शिक्षणासाठी येथेच येत होती. एकूण एक मध्यवर्ती केंद्र या दृष्टीने मार्तंडम स्वाभाविकतःच फार सोयीचे ठिकाण होते.

स्पेन्सर हॅच ह्यांचे ग्रामीण विकासाच्या कार्याबद्दल एक विशेष तत्त्वज्ञान होते. त्यांच्या मताने हे कार्य खेड्यातील सर्व लोकांसाठी असले पाहिजे. गरीबातला गरीबसुद्धा मग त्यातून सुटता कामा नये. ह्या कार्यक्रमातून लोकांत श्रम करण्याची व सहकार्याने काम करण्याची प्रवृत्ती निर्माण केली पाहिजे. हा कार्यक्रम एकांगी

असता कामा नये तर ग्रामजीवनाच्या सर्व अंगांचा विचार त्यात झाला पाहिजे. म्हणूनच शेतीबरोबरच निरनिराळे ग्रामोद्योग यांना यांत स्थान दिले पाहिजे. असे कार्य करण्यासाठी डॉ. हॅच ह्यांच्या मताने अत्यंत निरलस व स्वार्थत्यागी कार्यकर्ते पाहिजेत. विनावेतनही काम करण्याची ह्यांची तयारी असली पाहिजे. साधेपणा व सहकार्य ह्यावर त्यांनी आपला ग्रामसेवेचा कार्यक्रम आधारला पाहिजे. ह्या कार्यकर्त्यांना योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. ह्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, ग्रामविकासाच्या कार्याला आध्यात्मिक अधिष्ठान देणे आवश्यक आहे.

हॅचसाहेबांनी आपल्या ह्या विचारांना मूर्त स्वरूप मार्तंडम येथील केंद्राच्या रूपाने दिले होते. या केंद्रांतर्फे ३६ प्राथमिक शाळा व एक माध्यमिक शाळा उघडण्यात आली. ह्यांच्यांतील विद्यार्थी व शिक्षक ह्यांच्या सहकार्याने साक्षरता-प्रसाराचे कार्य सुरू झाले. शेती, मधुमक्षिकापालन, कुक्कुटपालन, चांगल्या गाई पाळणे, चटया विणणे, ताडगूळ तयार करणे इ. अनेक व्यवसायांचे शिक्षण देण्याची सोय उपलब्ध करण्यात आली. सहकारी संस्थांची त्याला जोड देण्यात आली. सहकारी अंडी–विक्री सोसायटीमुळे तर खूपच फायदा झाला. सुधारलेल्या कोंबड्या, जनावरे इ. चीं प्रात्यक्षिके आठवड्याच्या बाजारात लावण्यात आली. केंद्राच्या कार्यक्रमाचे सूत्र 'पंचभुज त्रिकोण' असे ठरविण्यात आले व ह्या पंजभुज त्रिकोणात ग्रामीण जनतेच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक व प्रांतिक उन्नतीचा समावेश करण्यात आला. हे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शाळाही मार्तंडम येथे उघडण्यात आली. छोट्या छोट्या अभ्यासमंडळां-मार्फतही प्रशिक्षण दिले जाते. ह्यांमधून निराळ्या उद्योगधंद्याबरोबरच ग्रामीण जनतेस शिक्षण कसे द्यावे व त्यासाठी नाटक, वाचनालय, सभा इत्यादी साधनांचा कसा उपयोग करावा ह्याचेही मार्गदर्शन करण्यात येते. स्पेन्सर हॅच यांच्या प्रयोगाला सरकारी सहाय्य व तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा सल्ला यांचा फायदा मिळाला. सरकारी अनुदानही प्राप्त झाले. लंडन मिशन व नेयूर येथील मिशन हॉस्पिटल ह्यांनीही त्यांच्या कार्यात आस्था दाखवून सहकार्य दिले. ह्यामुळे मार्तंडम केंद्र हे ग्रामीण शिक्षण व ग्रामीण पुनर्रचना ह्यांचे देशातील एक अग्रगण्य केंद्र बनले यात शंका नाही.

मिशनऱ्यांनी आपल्या या पुनर्रचनेच्या कामात आरोग्य-सेवेची कधीच उपेक्षा केली नाही. त्यामुळे ग्रामीण जनतेचे विनायास सहकार्य त्यांना मिळत गेले. मिरज, लुधियाना, वेलोर इत्यादी अनेक ठिकाणी त्यांनी उत्तम दवाखाने काढले. त्यांना जोडून वैद्यकीय शाळा उघडून त्यांमार्फत डॉक्टर्स, परिचारिका इत्यादींच्या शिक्षणाची सोय केली. १९४१ मध्ये मिशनऱ्यांचे देशात २८८ मोठे दवाखाने व ६४१ छोटे दवाखाने होते. ह्याशिवाय क्षयरोगी, महारोगी इत्यादींसाठी स्वतंत्र दवाखाने त्यांनी काढले होते.

मिशनऱ्यांच्या या ग्रामीण विकासाच्या कार्याची तीन प्रमुख सूत्रे होत–

( १ ) एका प्रयोगाच्या अनुभवाचा दुसऱ्या प्रयोगासाठी उपयोग करून घेणे,

( २ ) ग्रामीण विकासाचा कार्यक्रम जास्तीत जास्त विशाल ठेवणे,

( ३ ) अध्यात्मिक उद्दिष्टाकडे दुर्लक्ष न करणे.

मिशनऱ्यांचा कटाक्ष तिसऱ्या तत्त्वाकडे विशेष असे व त्याला धर्मप्रसार व धर्मप्रचार ह्याचे स्वरूप यणे सहज शक्य होते ह्यामुळेच मिशनऱ्यांच्या ह्या कार्याचे पाहिजे तितके चाज होऊ शकले नाही.

## ग्रामीण पुनर्रचनेचे आणखी काही खाजगी प्रयोग

ह्या कालखंडात ग्रामीण पुनर्रचनेचे आणखीही काही प्रयत्न झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीने मद्रास प्रांतात मयनूर ग्रामीण केंद्रामार्फत शेती-शाळा व औद्योगिक शाळा ग्रामीण जनतेसाठी चालवल्या. त्याचप्रमाणे मध्यप्रदेशात एक, उत्तर प्रदेशात एक व मुंबई प्रांतात ८ ग्रामीण विकास-केंद्रे स्थापन केली.

ग्वालेरमधील पोहरी येथे आदर्श सेवा संघातर्फे करण्यात आलेला ग्राम-विकासाचा प्रयोगही उल्लेखनीय आहे. ह्या प्रयोगाचे श्रेय त्याचे सूत्रधार पंडित पुराणिक यांच्या मार्गदर्शनास व तेथील वतनदार श्री. कर्नल राज राजेंद्र शितोळे ह्यांच्या साहाय्यास आहे. १९४० मध्ये एक दशवार्षिक विकास-योजना आखून त्या वतनातील २३२ खेड्यांतील सरासरी मजुरी १। रुपयावरून ५ रुपयापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. त्यासाठी ग्राम-सुधार सभा उघडण्यात आल्या. जनावरांची स्थिती सुधारणे, शेतकऱ्यांचे कर्ज कमी करणे, त्यांच्या वायफळ खर्चास फाटा देणे, पिण्याच्या पाण्याची सुव्यवस्था करणे, शेतीसाठी पाणी-पुरवठ्याचा बंदोबस्त करणे, ग्रामोद्योगांना चालना देणे, ग्रामस्वच्छता राखणे, प्रौढ व बाल-शिक्षणाची सोय करणे इत्यादी अनेक कामे ह्या सभांकडे सोपविण्यात आली. आत्मसाह्य व स्वावलंबन ह्या दोन तत्त्वांवर या ग्रामीण प्रयोगाची उभारणी झाली होती.

बंगालमधील गोसाबा येथे सर डॅनिअल हॅमिल्टन याने केलेला ग्रामीण विकासाचा प्रयोग असाच उल्लेखनीय आहे. १९०३ मध्ये याने सुमारे २२ हजार एकर अरण्याची तीन बेटे खंडाने घेतली व त्यांत थोड्याच अवकाशात एक वसाहत उत्पन्न केली. १९१६ त कर्जसंस्था काढली. १९२४ मध्ये गोसाबा सहकारी मध्यवर्ती बँक काढून २४ ग्रामीण संस्था तिच्याशी संलग्न केल्या. तत्पूर्वी १९१९ मध्ये दैनिक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी एक सहकारी संस्था व १९२२ मध्ये तांदळाच्या विक्रीसाठी भात-विक्रीसंस्था उघण्यात आल्या. १९३४ मध्ये ग्रामीण पुनर्रचना केंद्राची स्थापना करण्यात आली. तिच्यामार्फत अनेक शाळा, मध्यवर्ती

आदर्श शाळा, आरोग्य व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी दोन ग्रामीण पुनर्रचना संस्था व भात ठेवण्यासाठी १५ कोठारे यांची उभारणी करण्यात आली. मध्यस्थाच्या सहाय्याने तंटे मिटवण्याची योजनाही हॅमिल्टनने आखली त्यामुळे तीस वर्षांत एकही फौजदारी स्वरूपाचा खटला निर्माण झाला नाही हे विशेष होय. एका मर्यादित क्षेत्रात पण अत्यंत प्रभावीपणे व यशस्वीपणे पार पाडलेला ग्रामीण प्रयोग म्हणून हॅमिल्टनच्या गोसाबा येथील कार्याचा निर्देश करता येईल.

## खाजगी प्रयत्नाचे समालोचन

ग्रामशिक्षण व ग्रामीण पुनर्रचना यांबाबतच्या ह्या खाजगी प्रयोगांची काही वैशिष्ट्ये सहज डोळ्यात भरतात. एक म्हणजे या प्रयोगांची निर्मिती ग्रामीण जनतेवरील प्रेम व तिच्या अभ्युदयाची आस्था ह्यांतूनच झाली आहे. साहजिकच ह्या ठिकाणचे कार्य आस्थेने, समाजहिताच्या कळकळीने, स्वार्थत्यागाने व निरलसपणे झाले आहे. या प्रयोगामागे काही विशिष्ट तत्त्वज्ञानाची बैठकही दिसून येते. त्यामुळे त्या कार्याला जोरदारपणा आलेला दिसून येतो. तरीसुद्धा संपूर्ण देशाची ग्रामीण समस्या लक्षात घेतली तर झालेले कार्य न त्यांनी प्राप्त केलेले यश आकारमान व गुणवत्ता ह्या दोन्ही बाबतीत मर्यादित आहे असे सहज ध्यानात येईल याला प्रमुख कारण म्हणजे सरकारी पाठबळाचा व आर्थिक मदतीचा अभाव. ग्रामीण विकास ही केवळ भूतदयेवर सुटण्यासारखी गोष्ट नाही. तिच्या जोडीला सरकारची आर्थिक व इतर सर्व प्रकारची मदत व मार्गदर्शन यांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सरकारी पूरक कायद्यांचीही तिला जोड पाहिजे. परंतु सरकारच्या सहकार्याशिवाय ह्या खाजगी संस्थांनी ग्रामशिक्षणाचे जे मौलिक कार्य केले त्याकडे कोणत्याही समंजस व विचारवंत अभ्यासकाला दुर्लक्ष करता येणार नाही.

# प्रचलित ग्रामशिक्षणाचे स्वरूप : ५

## स्वातंत्र्योत्तर कालातील नवा उत्साह

१९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जनतेत व राष्ट्रीय नेत्यांत एक नवा उत्साह आला. देशाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रयत्नांना जोराची चालना मिळाली. देशाचे महत्त्वाचे व ब्रिटिश सरकारने उपेक्षिलेले प्रश्न आपल्या सरकारने अत्यंत आस्थेने सोडविण्यास सुरुवात केली. ग्रामशिक्षण, ग्रामीण पुनर्रचना यांकडे आंग्लकाळात बरेच दुर्लक्ष झाले होते; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा विकास हा प्रमुखतः ग्रामविकासावर अवलंबून आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवण्यात आली. ग्रामविकासाच्या विविध अंगांकडे कसोशीने लक्ष पुरविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

ग्रामविकासाचा केंद्रबिंदू शेती हा होय व शेती सुधारावयाची असेल, तर जमीनधारापद्धती व कूळपद्धती यांत आमूलाग्र परिवर्तन करणे आवश्यक होय ही गोष्ट भारतीय सरकारने केव्हाच ओळखली होती. १९४७ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीने ह्यासंबंधी आपले धोरण निश्चित करण्यासाठी एक उपसमिती नियुक्त केली होती. ह्या समितीने शेतीसुधारण्यासाठी तीन प्रमुख सूचना केल्या होत्या :

(१) प्रत्यक्ष जमीन कसणारा व सरकार यांमधील मध्यस्थ नाहीसे करण्यात यावेत.

(२) शेतीवरील सर्व प्रकारचे मध्यस्थ नाहीसे करून त्यांच्या जागी सरकारी संस्थांसारख्या नफेबाजी न करणाऱ्या संस्था आणाव्यात.

(३) शेतीच्या प्रमुख उत्पन्नाच्या किफायतशीर किंमती ठरवून द्याव्यात व शेतीसाठी जीवनवेतन निश्चित करावे.

याच धोरणाचा अवलंब केंद्रीय व प्रांतिक सरकारकडून गेली १७ वर्षे करण्यात आला. अनेक जमीन-सुधारण्याचे व कूळकायद निरनिराळ्या प्रांतांतून मंजूर करण्यात आले. जमिनीच्या मालकीवर एक विशिष्ट बंधन घालण्यात आले. जमिनदारी पद्धती नष्ट करण्यासंबंधी कायदे झाले असे कायदे करण्यास सुकर जावे म्हणून १९६४ च्या मे महिन्यात लोकसभेचे खास अधिवेशन बोलावून आवश्यक ती घटना-दुरुस्तीही करण्यात आली आहे. नवनवीन योजना आखण्यात आल्या. पंचवार्षिक योजनांतून संपूर्ण ग्रामजीवन बदलण्याचा प्रयत्न सुरू झाला. या प्रकरणात ग्रामीण पुनर्रचनेच्या या कालात जे काही नवीन उत्साही व यशस्वी प्रयोग झाले त्यांची आपण ओळख करून घेऊ. या प्रयोगांचा ग्रामशिक्षणावर स्वाभाविकच परिणाम झाला व त्यामुळे त्याचे स्वरूपही बदलत चालले. ग्रामशिक्षणाच्या या बदलत्या स्वरूपाचाही आपण परिचय करून घेऊ.

## सर्वोदय व फिर्का योजना

मुंबई राज्यात ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यासाठी सर्वोदय योजना अमलात आणण्यात आली. सर्वोदय योजनेचा केंद्राधार प्रांतिक सर्वोदय समिती हा होता व तिच्या अध्यक्षस्थानी प्रांताचे महसूल मंत्री नियोजित करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा, तालुका व ग्राम सर्वोदय समित्यांची स्थापना करून प्रत्येक सर्वोदय केंद्रासाठी एकेक संचालक असावा असे ठरविण्यात आले. संचालक हा केंद्रांच्या सर्व कार्यक्रमाचा प्रमुख सूत्रधार होता. केंद्राच्या समितीतर्फे त्यास मार्गदर्शन होण्याची सोय होती. 'सर्वोदय' ह्या नावातच या योजनेचे वैशिष्ट्य समाविष्ट झालेले आहे. ग्रामीण जनतेचा सर्व प्रकारे अभ्युदय करणे हे ह्या योजनेचे ध्येय होते. म्हणूनच शेती, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, सहकार, ग्रामोद्योग इत्यादी सर्व ग्रामीण समस्यांकडे ह्या योजनेनुसार लक्ष देण्यात येई. सल्लागार समित्यांच्या रचनेमुळे जनतेचा सहकार मिळण्याची सोय उपलब्ध झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरुवातीच्या कालखंडात ग्रामीण प्रगतीस ही योजना बरीच पोषक ठरली.

मद्रास राज्यामध्ये ग्रामीण विकासासाठी अंमलात आणलेली योजना **फिर्का** योजना ह्या नावाने सुपरिचित आहे. ह्या योजनेचे मुख्य उद्दिष्ट अन्न, वस्त्र व जीवनाच्या इतर गरजा याबाबत प्रत्येक फिर्का किंवा केंद्र स्वयंपूर्ण असावे हे होते. ह्या फिर्क्यांतील खेड्यांचा शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक विकास

करावा अशा प्रकारे एकदर योजना आखण्यात आली होती. लोकांच्यामध्ये स्वाभिमान व आत्मविश्वास उत्पन्न व्हावा आणि स्वावलंबनाची आवड त्यांच्यात निर्माण व्हावी असाही ह्या योजनेचा आणखी एक उद्देश होता. फिर्क्यांचे शासन जिल्हाधिकाऱ्याच्या हाती सुपूर्द करण्यात आले. त्याला सहाय्य करण्यासाठी ग्राम-कल्याणाधिकारी नेमण्यात आला. या प्रत्येकाकडे २–३ फिर्क्यांच्या एक गट सोपविण्यात आला व मदतनीस म्हणून पाच-दहा ग्रामसेवकांची योजना करण्यात आली. ह्या फिर्का-योजनेतून ग्रामविकासाच्या खालील अंगांकडे खास लक्ष देण्यात आले—( १ ) शेतीसुधारणा– यासाठी भाड्याने व हप्तेबंदीने पंप पुरविणे, बिनव्याजी कर्ज देणे, बी-बियाणे स्वस्त दरात देणे, शेतीची अवजारे पुरविणे इत्यादींची सोय करण्यात आली. ( २ ) स्वच्छता, ( ३ ) पाणीपुरवठा, ( ४ ) वीजपुरवठा, ( ५ ) जीवधनपालन, ( ६ ) सहकार व प्रौढशिक्षण. अशा तऱ्हेने गावाचा सर्वांगीण विकास हे फिर्क्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

हे उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून खालील गोष्टींकडे खास लक्ष देण्यात आले :—

पहिली गोष्ट म्हणजे फिर्क्यांचे यश प्रमुखतः ग्रामसेवकांच्या कर्तबगारीवर व निष्ठेवर अवलंबून असल्याने त्यांच्या प्रशिक्षणाची खास सोय करण्यात आली. या यशासाठी आवश्यक असणारी दुसरी गोष्ट म्हणजे जनतेचे सहकार्य. ते जास्तीत जास्त मिळवण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला. त्यासाठी या योजेनेचे प्रशासन पाच निवडक खाजगी संस्थांकडे सोपविण्यात आले. तिसरी गोष्ट म्हणजे आर्थिक सहाय्य. सरकारने याबाबतीतही आपली तिजोरी पुरेशी सैल केली. पहिल्या फिर्क्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान व १० हजार रुपयांचे आवर्त अनुदान व नंतरच्या फिर्क्यांसाठी २५ हजार रुपयांचे अनुदान व ८ हजार रुपयांचे आवर्त अनुदान देण्याची व्यवस्था केली. १९४६ मध्ये ३४ फिर्क्यांची स्थापना होऊन या योजनेला सुरुवात झाली. पुढे लौकरच ५० फिर्क्यांपर्यंत त्यांची वाढ करण्यात आली. १९५२ साली हीच संख्या ७४ पर्यंत गेली. ग्रामीण पुनर्रचनेचा एक नवा प्रयोग म्हणून फिर्कायोजना नमूद करून ठेवण्यासारखी आहे.

## इटावा येथील मार्गदर्शक विकास-प्रयोग

उत्तर प्रदेशात इटावा येथे ग्रामीण शिक्षण व ग्रामीण पुनर्रचना यांचा नवा प्रयोग करण्यात आला. १९४६ साली **अल्बर्ट मायर्स** ह्यांच्या मार्गदर्शना-खाली ह्या विकास-प्रयोगाची सुरुवात झाली. ह्या प्रयोगाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती : ( १ ) सुधारलेल्या साधनांनी शेतीचे उत्पादन वाढविणे, ( २ ) औद्योगी-करणाने शेतीवरील दडपण कमी करणे, ( ३ ) उपलब्ध साधनसामग्रीचा अधिकाधिक विकास करून भौतिक संपत्ती व मनुष्यसंख्या ह्यांच्या वाढीत समतोलपणा राखणे, ( ४ ) ग्रामीण विकासाच्या कार्यात मदत करण्यासाठी विद्यमान

संस्था व संघटना कार्यक्षम बनविणे, ( ५ ) उत्साही व कार्यक्षम कार्यकर्ते जनतेतून तयार करणे, ( ६ ) ह्यांच्या सहाय्याने शेती, शिक्षण, उद्योग व समाजकल्याण यांच्या विकास-योजना तडीस नेणे.

या प्रयोगामागची तत्त्वप्रणाली वैशिष्ट्यपूर्ण होती. ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यात ग्रामविकासाच्या सर्व अंगांकडे लक्ष दिले असे मायर्स ह्यांचे मत होते. ह्यासाठी जनता, सामाजिक कार्यकर्ते व सरकार ह्या तिघांचेही सहकार्य उपलब्ध झाले पाहिजे. लोकांत स्वावलंबनाची आवड निर्माण केली पाहिजे. निरनिराळे प्रयोग करून मग ग्रामविकासाचा कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. हा कार्यक्रम एकदम सर्व क्षेत्रात लागू करण्यापूर्वी मर्यादित क्षेत्रात प्रथमतः आयोजित करून त्याचे यश अजमाविले पाहिजे. ह्या कार्यक्रमातून सहकार्याची भावना वाढीस लागली पाहिजे. भौतिक व आत्मिक प्रगतीची प्रेरणा निर्माण झाली पाहिजे. उत्पादनक्षमतेत वाढ झाली पाहिजे आणि मिळालेले यश ही एक जीवनातील स्वाभाविक गोष्ट आहे अशी जनतेची भावना झाली पाहिजे. सर्वसामान्यरीत्या या भूमिकेवरून इटावा येथील मार्गदर्शक विकासप्रयोगाची उभारणी झाली होती.

प्रयोगाचे संचालन अत्यंत सूत्रबद्ध होते. संचालनाची मुख्य जबाबदारी प्रयोगाधिकारी व उपप्रयोगाधिकारी ह्यांच्याकडे होती. त्यांच्या हाताखाली ग्राम-सेवकांचे पथक देण्यात आले होते. ८ खेड्यांसाठी किंवा ५००० वस्तीसाठी एक १ ग्रामसेवक असे प्रमाण ठरविण्यात आले होते. ग्रामसेवकांचे व प्रयोगा-धिकाऱ्यांचे संबंध अत्यंत खेळीमेळीचे होते. त्यांच्यात वारंवार चर्चा होत असे व कार्यक्रमांचे यश आणि पुढील योजना याबाबत विचारविनिमय होत राही. ग्रामसेवकांचे एक मुख्य कार्य, लोकांत उत्साह निर्माण करणे व त्यांचे संपूर्ण सहकार्य मिळविणे हे होते. कारण प्रयोगाचा मूळ पायाच जनतेचे सहकार्य हा होता. यामधूनच स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याकडे लक्ष देण्यात येई. त्याच-प्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळवून त्यांच्या मार्गदर्शनाचा यथोचित उपयोग केला जाई. आपल्या कार्यक्रमाचे यशापयश अजमावण्यासाठी प्रयोगाधिकारी वारंवार एकत्रित येत व कार्यक्षमता वाढवणे, दिसून आलेल्या चुका सुधारणे, कार्याचा गती वाढवणे इत्यादी अनेक बाबींचा गंभीरपणे विचार करीत व त्या प्रकारची उपाययोजना अमलात आणीत.

इटावा येथील या प्रयोगाला कल्पनातीत यश प्राप्त झाले. शेतीचे उत्पादन जवळ जवळ ५० टक्के वाढले. पशूंचे अनेक आजार आटोक्यात येऊ लागले. सहकारी संस्थांचे जाळे पसरू लागले व त्यांत झालेली वाढ नेत्रदीपक होती. १९४८–४९ साली फक्त ३० सहकारी संस्था होत्या त्या १९६१–६२ मध्ये २६५ झाल्या. त्यांची सभासद-संख्या ६०८ वरून २३६२८ वर गेली. भांडवल व कर्जे ह्यांतसुद्धा ३०८६ रुपये व १९५८६ रुपये यावरून अनुक्रमे ६५४५८०

रुपये व १४,१०,८२२ पर्यंत वाढ झाली. ग्रामीण उद्योगधंद्यांना चालना मिळून विटांच्या भट्ट्या चालवणे, शेतीच्या अवजारांचे उत्पादन करणे, रेशमी किडे पाळणे, फळांचे डबे करणे इत्यादी अनेक ग्रामोद्योगांना चालना देण्यात आली. ग्रामीण आरोग्य व स्वच्छता ह्यांच्याकडेही लक्ष पुरविण्यात आले. ग्रामशिक्षण हा एक या सर्व कार्यक्रमाचा प्रमुख घटक होता. प्राथमिक व दुय्यम शाळा तर अनेक उघडण्यात आल्या. पण त्याशिवाय ५ इंटरमीजिएट व २ पदवी कॉलेजेही काढण्यात आली. समाजशिक्षणाच्या कार्याला अधिक चालना मिळाली. ग्राम-नेत्यांची शिबिरे, सहली, समाजशिक्षणाचे वर्ग, समुदाय-केंद्रे इत्यादी अनेक गोष्टींचा उपयोग करून समाजशिक्षणाचा प्रसार करण्यात आला. अशा तऱ्हेने ग्रामीण पुनर्रचनेच्या सर्व अंगांकडे लक्ष देऊन अत्यंत यशस्वी रीतीने सुरू केलेला प्रयोग म्हणून इटावा येथील मार्गदर्शक विकास-प्रयोगाचे नाव घेता येते.

या प्रयोगाचे यश मुख्यतः तेथील कार्यपद्धतीवर अवलंबून आहे. तिची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी आहेत :

(१) जनतेचा सहयोग मिळवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला.
(२) लोकांमध्ये स्वावलंबनाची प्रेरणा निर्माण करण्यात आली.
(३) ग्रामनेत्यांच्या निर्मितीकडे लक्ष देण्यात आले.
(४) अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवण्याचा प्रयत्न केला व आपण समाजाचे सेवक आहोत ही भावना त्यांच्या मनात रुजविण्यात आली.
(५) निरनिराळ्या सरकारी खात्यांचे सहकार्य मिळवण्यात आले.
(६) सरकारी व खाजगी संघटनांचे सहकार्य उपलब्ध करून घेतले.
(७) तंत्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात आले.
(८) प्रयोगाचे छोटे छोटे टप्पे आखून ते यशस्वी रीत्या पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले.
(९) प्रयोगाचा विविध भागांतील इष्टांक आपल्या आवाक्यातील राहतील याची काळजी घेण्यात आली.
(१०) कार्यक्रम लोकांच्या गरजेवर अधिष्ठित करण्यात आले.
(११) तो सर्वांगीण व सुसंघटित असावा ह्याकडे लक्ष देण्यात आले.
(१२) कार्यक्रमाची सुरुवात शेती-सुधारण्यापासून होई व त्याच्या आर्थिक अंगाकडे दुर्लक्ष कधीही करण्यात आले नाही.
(१३) विकास अधिकारी, ग्रामनेते, ग्रामीण जनता व सरकारी-बिनसरकारी संस्था ह्यांचे सततचे परिश्रम, चिकाटी व सहकार्य ह्यांना तोड नव्हती.

## निलोखेरी येथील प्रयोग

इटवाप्रमाणेच निलोखेरी येथे करण्यात आलेला ग्राम-पुनर्रचनेचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण होता. ह्या प्रयोगाची उभारणी अत्यंत तीव्र गरजेतून झाली होती. १९४७ मध्ये निर्वासितांचे लोंढे पाकिस्तानमधून येऊ लागले. ह्या निर्वासितांची एक प्रचंड छावणी कुरुक्षेत्र येथे उघडण्यात आली होती. ग्रामविकासाचे केंद्रीय मंत्री श्री. एस्. के. डे त्या वेळी तेथे इंजिनीअर व शासनाधिकारी म्हणून काम करीत होते निर्वासितांच्या काही प्राथमिक गरजा लक्षात घेऊन त्यांनी तेथे काही व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले. उदाहरणार्थ, कपडे धुण्यासाठी साबणाची अत्यंत आवश्यकता होती. म्हणून साबण तयार करण्याचा धंदा तेथे यशस्वी रीत्या चालण्यासारखा होता. कपड्यांसाठी कोष्टीकामाचा व्यवसाय व त्यासाठी लागणारे माग, चरखे इत्यादी तयार करण्यासाठी सुतारकामाचा व्यवसाय सहज सुरू करता येण्याजोगा होता. कापड तयार करण्याबरोबरच त्यावरील छपाई व शिवणकाम हे धंदे सुरू करता येण्याजोगे होते. ह्या धंद्यांमुळे बेकार निर्वासितांना काही स्वतंत्र व्यवसाय मिळण्यासारखा होता. श्री. डे ह्यांच्या मताने प्रत्येक व्यक्तीचे मग ती निर्वासित का असेना तीन प्रमुख हक्क आहेत :

( १ ) जगण्याचा हक्क

( २ ) जगण्यासाठी काम करण्याचा हक्क

( ३ ) स्वतः कमावलेल्या उत्पन्नाचा उपभोग घेण्याचा हक्क.

हे हक्क साध्य करून घेण्यासाठी निर्वासितांना व्यवसायांचे शिक्षण देणे आवश्यक होते. म्हणून १९४८ मध्ये त्यांनी साबण तयार करणे, कापड तयार करणे, त्यावरील छपाई इत्यादी अनेक व्यवसायाचे उत्पादन–प्रशिक्षण केंद्र सुरू केले. यामध्ये ७५० विद्यार्थी विविध व्यवसायांचे शिक्षण घेण्यासाठी दाखल झाले.

या केंद्राच्या कार्यक्रमाला खूपच स्पृहणीय यश प्राप्त झाले. प्रथमतः केवळ १७०० रुपयांचे अनुदान प्राप्त झालेली ही योजना थोड्याच अवकाशात ५ लाख रुपयांची सरकारी योजना बनली. माल–वाहतुकीसाठी ट्रक व ड्रायव्हर यांची सोय करण्यात आली. निर्वासितांच्या प्रमुख गरजा भागविणाऱ्या वस्तूंचा निपज ह्या केंद्रांतून होऊ लागली व त्या वस्तू निर्माण करणाऱ्या व्यवसायाचे शिक्षण त्याच केंद्रात निर्वासितांना मिळू लागले. श्री. डे ह्यांच्या या प्रयोगाची प्रमुख तीन सूत्रे होती :

( १ ) माणसाचे हात काहीही करू शकतात.

( २ ) माणसाच्या हातांना हवे ते वळण लावणे शक्य असते.

( ३ ) माणसांना काम मिळवून देण्याची परिस्थिती निर्माण करता येते.

ह्या सूत्रांच्या आधारावरच पुढे आणखी एक विशाल प्रयोग करण्यात आला. तो **मजदूर मंझील** ह्या नावाने विख्यात आहे. शहर व खेडे यांची सहकार्यावर उभारणी झाली आहे. २५००० वस्तीच्या खेडयांचा परिसर व ५००० वस्तीचे केंद्र शहर यांवर प्रयोगाचा उभारणी करण्यात आली. प्रत्येक खेड्याच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देण्यात आले. दवाखाने, माध्यमिक शाळा, शेती-विस्तार–केंद्र, वीजपुरवठा–केंद्र, सिनेमागृह, नाट्यगृह, ह्यांची सोय केंद्र शहरात करून, प्रत्येक खेडयात प्राथमिक शाळा उघडण्यात आली. त्याला जोडून समुदाय–केंद्राची योजना आखण्यात आली. शाळेतून अन्य विषयांबरोबर शेती, हस्तव्यवसाय व पशुपालन ह्यांच्याही शिक्षणाची सोय करण्यात आली. समुदाय केंद्रातून समाजशिक्षणाकडे व लोकांच्या सांस्कृतिक गरजा पुरविण्याकडे लक्ष देण्यात येऊ लागले. विविध व्यवसायांचे शिक्षण देण्यासाठी पॉलिटेक्निकची स्थापना करण्यात आली. सुतारकाम, लोहारकाम, विणकाम, धुलाई, छपाई, इत्यादी अनेक व्यवसायांच्या शिक्षणाची सोय निर्वासितांसाठी उपलब्ध करण्यात आली. शेती, पशुपालन, दुग्धपालन इत्यादी धंद्यांच्या विकासाकडेही लक्ष देण्यात आले. सरकारी सहकार्यामुळे पाणीपुरवठा, वीजपुरवठा, इमारती, रस्ते इत्यादी सोयी लवकर उपलब्ध होऊ शकल्या. दिल्ली-अंबाला रस्त्यावरील जंगल तोडून आवश्यक ती जमीन उपलब्ध करून घेण्यात आली. एकंदर दीड कोटी रुपयांची सरकारी योजना तयार झाली.

प्रयोगाची सर्व उभारणी लोकशाहीच्या मूल्यांवर करण्यात आली आहे. कामगार, शिंपी, सुतार, चांभार इत्यादींच्या सहकारी संस्था आहेत. मालाची खरेदी-विक्री, कर्जप्राप्ती, उत्पादन इत्यादी अनेक बाबतींतील व्यवहार त्यामुळे चोख रीतीने चाललेले आढळून येतात. सहकारी पद्धतीला पंचायत-राज्याची जोड दिलेली आहे. कायदा, सुव्यवस्था, आरोग्य, स्वच्छता व समाजकल्याण ह्या गोष्टी पंचायतीच्या कक्षेत आणण्यात आल्या. अशा रीतीने भारताच्या नव्या ध्येयाला व धोरणाला अनुरूप असा निलोखेरीचा प्रयोग झाला. ह्याला अमेरिकन सरकारची बरीच मोठी मदत मिळाली व पंजाब सरकारने तर याची संपूर्ण आर्थिक व शासकीय जबाबदारी स्वीकारली. ग्रामीण पुनर्रचनेचा एक अत्यंत यशस्वी व अभिनव प्रयत्न म्हणून निलोखेरीचा आपणास उल्लेख करता येईल. येथील विकासाची कल्पना तेथून प्रसिद्ध होणाऱ्या ‘ कुरुक्षेत्र ’ या मासिकावरून येऊ शकते.

### सामूहिक विकास व राष्ट्रीय विस्तार-योजना :

ग्रामीण पुनर्रचनेच्या स्वातंत्र्योत्तर कालातील काही प्रयोगांची अभ्यास-चर्चा आपण आता केली. हे प्रयोग आपापल्या दृष्टीने थोडे-फार यशस्वी ठरले तरी

संपूर्ण देशाच्या ग्रामीण समस्येचा विचार करताना त्यांत मिळालेले यश मर्यादितच होते ग्रामीण समस्या ही प्रमुखत: शेतकीची समस्या आहे, पण त्याबरोबरच इतर ग्रामीण समस्याही तिच्यात एकजीव झालेल्या आहेत. त्यामुळे शेतीचे अधिक उत्पन्न वाढवण्यासाठी इतर ग्रामीण प्रश्नांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. १९५२ च्या श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या ‘ अधिक धान्य पिकवा मोहीम चौकशी-समितीने ’ असाच निष्कर्ष काढला व सर्वांगीण ग्रामीण प्रगतीसाठी सामूहिक विकास-योजना सुचविली. ह्या योजनेचे मूळ उद्दिष्ट भारतातील संपूर्ण खेड्यांचा आर्थिक, सामाजिक व वैचारिक कायाकल्प घडवून आणणे हेच होते.

प्रथमतः १५ राज्यांत प्रत्येकी १ याप्रमाणे १५ प्रायोगिक विस्तार प्रकल्प १९५२ साली सुरू करण्यात आले. यांचा प्रमुख उद्देश भारतीय खेड्यातील जे तीन भस्मासुर—दारिद्र्य, रोगराई व अज्ञान ह्यांवर हल्ला करणे हाच होता. यासाठी खालील गोष्टींकडे लक्ष देण्यात आले :

( १ ) शेतीचे उत्पादन वाढविणे, ( २ ) त्यासाठी जनतेत शास्त्रीय ज्ञानाचा वापर करण्याची प्रेरणा निर्माण करणे, ( ३ ) स्वावलंबन व सहकार ह्या तत्त्वांवर विकास करण्यास प्रवृत्त करणे, ( ४ ) कौटुंबिक, ग्रामीण व सामाजिक जीवनाची पातळी उंचावणे.

या गोष्टी साध्य करण्यासाठी या १०० खेड्यांच्या एका प्रायोगिक गटाचा एक प्रकल्प अधिकारी, तंत्रज्ञ व १०–१२ ग्रामसेवक असा कर्मचारीवर्ग देण्यात आला. राज्यसरकारच्या विविध खात्यांचे सहकार्य उपलब्ध होईल हेही पाहण्यात आले. ग्रामविकासाच्या शिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रेही उघडण्यात आली. फोर्ड फौंडेशनने ६ कोटी रुपयांची मदत या प्रकल्प योजनेस केली. वाढता रोजगार व उत्पादन, स्वावलंबन व सहकार, सामूहिक प्रेरणा व सामाजिक परिवर्तन ह्या तत्त्वावर या योजनेची उभारणी झाली होती. देशाच्या विकासाच्या दृष्टीने ह्या योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन पंचवार्षिक योजनेत तिचा समावेश करण्यात आला. सामूहिक विकासाचे स्वतंत्र खाते केंद्रीय व राज्यसरकारांत उघडण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र मंत्र्यांची नियुक्ती झाली. सामूहिक विकास ( Community development ) व राष्ट्रीय विस्तार ( National extension ) या योजनामार्फत शासनयंत्रणा भारतात प्रत्येक गावापर्यंत व गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोचू लागली आहे. अशा प्रकारे बदलत्या ग्रामजीवनाचा तो एक अविभाज्य घटक झाला आहे. ही विकास-योजना, पंचवार्षिक योजनेतील तिचे स्थान तिच्यामुळे ग्रामीण जीवनात होऊ घातलेले बदल इत्यादींचा सविस्तर स्वतंत्रपणे करणे आवश्यक ठरेल.

## उच्च ग्रामीण शिक्षण

सामूहिक विकास-योजना राबविण्यासाठी ग्रामसेवक, समाजशिक्षणाधिकारी, विकासअधिकारी इत्यादींच्या प्रशिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. त्यासाठी उच्च ग्रामीण शिक्षण देणे आवश्यक भासू लागले. ब्रिटिश कालखंडात ह्या प्रश्नाकडे सर्वस्वी दुर्लक्ष करण्यात आले होते. परंतु स्वातंत्र्योतर कालात ह्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होऊ लागल्याने ग्रामीण विभागातही ठिकठिकाणी शाळा निघू लागल्या. साहजिकच माध्यमिक शिक्षणक्रम संपविल्यावर उच्च शिक्षणासाठी शहराकडे ह्या विद्यार्थ्यांचा लोंढा वळू लागला. हा थांबविण्यासाठीही ग्रामीण विभागातच उच्च शिक्षणाची सोय करणे क्रमप्राप्त झाले. खुद्द ग्रामीण जनतेचीही उच्च शिक्षणाकडे दृष्टी वळली याला कारण म्हणजे पंचवार्षिक योजनेमुळे त्यांचा उत्साह द्विगुणित झाला व एक प्रकारचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. संस्कृती व श्रम, मानवशास्त्र व यंत्रशास्त्र, आदर्शवाद व व्यवहारवाद ह्यातील अंतर कमी करण्यासाठी ह्याच शिक्षणाची आवश्यकता होती. ग्रामजीवनच्या खऱ्या प्रश्नांना हात घालण्यासाठी, ग्रामीण जनतेच्या कायद्यासाठी ग्रामीण साधनांचा उपयोग करून घेण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या उत्पादनक्षम कृतींना चालना देण्यासाठी आणि ग्रामीण जनतेचा सांस्कृतिक व आर्थिक दर्जा वाढवण्यासाठी उच्च ग्रामशिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करणे हाच काय तो प्रभावी उपाय उपलब्ध होता. ही गोष्ट भारतीय सरकारच्या व भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या लक्षात आली. म्हणूनच उच्च शिक्षणासाठी नेमलेल्या राधाकृष्णन् कामशनने ग्रामीण विद्यापीठांची कल्पना सविस्तररीत्या आपल्यापुढे ठेवली. १९५६ साली केवळ ह्याच प्रश्नाचा विचार करण्यासाठी नियुक्त झालेल्या श्रीमाळी-कमिशनने उच्च ग्रामशिक्षणासाठी प्रथमतः रूरल इन्स्टिटयूट स्थापन करण्याची सूचना केली. सरकारने तिचा स्वीकार करून प्रथम सर्व देशांत १० रूरल इन्स्टिटयूटस् स्थापन केल्या; सध्या अशा १४ संस्था असून त्यांच्यामार्फत उच्च ग्रामीण शिक्षण देण्याचे कार्य होत आहे. याच संस्थांमधून पुढे ग्रामीण विद्यापीठांची कल्पना साकार होणार आहे. भारतीय ग्रामजीवनात ग्रामीण विद्यापीठांचे स्थान अशा तऱ्हेने अत्यंत महत्त्वाचे राहणार आहे. कारण त्यांमधूनच ग्रामीण जनतेला नवी आशा व प्रेरणा मिळणार आहे. ग्रामीण विकासाच्या प्रगतीचा मार्ग तेथूनच उपलब्ध होणार आहे. ग्रामविकासाचे व ग्रामशिक्षणाचे नवनवीन प्रयोगांचे जन्मस्थान तेथेच राहणार आहे. ग्रामीण समस्यांचा संशोधनाला चालना तेथूनच मिळणार. ग्रामीण जनतेच्या भिन्न भिन्न आशा-आकांक्षाच्या पूर्तीसाठी व ग्रामजीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या निरनिराळ्या ज्ञानशाखांच्या शिक्षणाची सोय येथेच उपलब्ध होऊ शकणार.

## ग्रामीण माध्यमिक शिक्षण

आंग्लकालामध्ये प्रमुखतः ग्रामीण विद्यार्थ्यांना शेतकीचे ज्ञान उपलब्ध करून द्यावे या उद्देशाने शेतकी शाळांची स्थापना करण्यात आली. ह्या शाळा बेसिक ॲग्रिकल्चरल स्कूल्स म्हणून ओळखल्या जात. त्यांमधून शेतीप्रधान माध्यमिक शिक्षणक्रम पुरा करण्यात येई. या शाळांमधील प्रमुख दोष खालील-प्रमाणे होते :

( १ ) येथील शिक्षणाचे लक्ष्य शेतकी खात्यातील नोकरी हे होते. शेतीचे तात्त्विक ज्ञान व व्यवहारज्ञान यांची सांगड घालण्याचा प्रयत्न शेतकी–शाळांतून केला जात नव्हता.

( २ ) या शाळांतून बाहेर पडणारे विद्यार्थी मुख्यतः खेड्यांत राहणारे तेव्हा त्या दृष्टीने त्यांना शिक्षण दिले पाहिजे ह्याचा विचार करण्यात आला नव्हता.

( ३ ) योग्य प्रशिक्षित शिक्षकवर्गाचा अभाव होता.

( ४ ) शेतकी-महाविद्यालयांकडून मार्गदर्शन मिळण्याची काही सोय उपलब्ध नव्हती.

स्वातंत्र्योत्तरकालात शैक्षणिक ध्येयांच्या विचाराला चालना मिळाली व शेतीच्या प्रश्नाचा विचारही या विशाल दृष्टिकोनातून केला जाऊ लागला. म्हणून राधाकृष्णन्-कमिशनच्या मताप्रमाणे :

" नवीन भारताची घडण स्वातंत्र्य, लोकशाही, समता व बंधुभाव या तत्त्वांवर उभारलेली आहे. ह्या तत्त्वांनाच सुसंगत ठरतील अशाच साधनांनी भारतीय अन्नधान्याची समस्या सोडविली पाहिजे. "

म्हणूनच शेती-शिक्षणातही नोकरीस देण्यात येणारे प्राधान्य ही मोठी धोकादायक गोष्ट होय. म्हणून या शेतकी शाळा किंवा ग्रामीण माध्यमिक शाळांना खालील गोष्टी प्रामुख्याने ध्यानात ठेवाव्या लागतात :

( १ ) या शाळांतील बहुसंख्य विद्यार्थी खेड्यांत राहणार आहेत.

( २ ) शेती हा त्यांचा केवळ धंदा नाही तर तो त्यांच्या जीवनाचाच एक मार्ग आहे.

( ३ ) शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य मिळेल अशा प्रकारचा बदल ग्रामीण विभागातील शिक्षण-पद्धतीत आवश्यक आहे.

( ४ ) शेतीशिक्षणामुळे सुशिक्षित शेतकऱ्यांमध्ये उत्पादनाच्या जुनाट पद्धती सोडून नवीन पद्धती स्वीकारण्याचा दृष्टिकोण निर्माण झाला पाहिजे.

अशा रीतीने ग्रामीण माध्यमिक शाळांची समस्या प्रगत विचारसरणी आधारित झालेली आढळून येते. शेती-शिक्षणाचा राधाकृष्णन्-कमिशनने जो आराखडा सुचविला आहे. त्यात हीच विचारसरणी प्रतिबिंबित होते. कमिशनच्या मताने शेतीशिक्षणाचे कार्यस्वरूप खालील प्रकारचे असावे :

( १ ) खाद्य वस्तूंचे–उत्पादन कौशल्याने निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणे.

( २ ) बाजार–वस्तूंचे फायदेशीररीत्या उत्पादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

( ३ ) जमीन व इतर नैसर्गिक साधनांची निगा राखण्याचे शिक्षण देणे.

( ४ ) शेतीचा व्यवहार परिणामकारकपणे चालविण्याचे शिक्षण देणे.

( ५ ) ग्रामीण नेतृत्वाच्या चळवळीत भाग घेण्याची पात्रता निर्माण करणे.

१९५९ च्या ग्रामशिक्षण-समितीने बहूद्देशीय उच्च माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमांची रचना हीच उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून करावी अशी शिफारस केली आहे त्याचप्रमाणे जीवनशिक्षणोत्तर शाळांतूनही हीच उद्दिष्टे दृष्टिआड करू नयेत असे आपले मत प्रदर्शित केले आहे. समितीच्या मताप्रमाणे ह्या शिक्षण-क्रमात पूर्वीच्या शेतीशिक्षणात दिसून येणारा संकीर्ण दृष्टिकोन नसावा. केवळ नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध करणे वा सामूहिक विकास योजनांच्या पूर्तीसाठी नोकरवर्ग निर्माण करणे हा ह्या शाळांचा उद्देश राहू नये. सर्वसामान्य ग्रामीण शेतकऱ्याचा शैक्षणिक दर्जा व ज्ञान वाढवणे व त्याचा योग्य फायदा शेती–उत्पादनाच्या प्रगत पद्धतींतून दिसून येणे या गोष्टी माध्यमिक शेती–शिक्षणातून साध्य झाल्या पाहिजेत. त्याशिवाय लोकशाही व नागरिकत्व यादृष्टीने इष्ट असलेले संस्कारही या शिक्षणक्रमात नजरेआड करून चालणार नाहीत.

## ग्रामीण प्राथमिक शिक्षण

आंग्लकाळामध्ये ग्रामीण शिक्षणाचे सरकारी प्रयोग फक्त प्राथमिक शाळांपुरतेच मर्यादित होते. ते प्रयोगही मुख्यतः अत्यंत संकुचित होते. स्वातंत्र्योत्तर काळात हा दोष काढून टाकण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात येऊ लागला. ग्रामीण शाळेची उद्दिष्टे, कार्यक्रम व रचना-पद्धती या सर्वांतच आमूलाग्र बदल होऊ लागला. प्राथमिक शाळांचे रूपांतर जीवनशिक्षण मंदिर व समुदाय-केंद्र यांत होऊ लागले. मूलोद्योगातून सर्वांगीण शिक्षण देण्याची कल्पना प्रसृत होऊ लागली. प्राथमिक शाळा ही भारतीय खेड्याची एक आवश्यक संस्था मानण्यात येऊ लागली. खेड्यात नव्या जीवनाचा उदय करविण्यामध्ये तिचा वाटा निश्चित झाला. साहजिकच प्रत्येक खेड्यात कमीत कमी एक तरी प्राथमिक शाळा स्थापन करणे हे सरकारचे प्रमुख कर्तव्य होऊन

बसले. या सर्व गोष्टींमुळे एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण शाळा आपल्या देशात निर्माण होत आहे. हिची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी सांगता येतील :

( १ ) ग्रामीण शाळा ही प्रमुखतः ग्रामीण प्राथमिक शाळा असते. कारण माध्यमिक व उच्च शिक्षणाचा तितकासा अजून प्रचार लहानसहान खेड्यापर्यंत झाला नाही. अर्थात आंग्लकालापेक्षा सध्या यात बरीच प्रगती होत आहे हे आपण पाहिलेच आहे.

( २ ) ग्रामीण शाळा ही एक अशी शिक्षण-संस्था आहे की, ज्या ठिकाणचे लोक मुख्यतः प्राथमिक उद्योगधंद्यात गुंतलेले असतात.

( ३ ) ग्रामीण शाळा ही मुख्यतः शेतीप्रधान विभागात स्थापन झालेली असते. परंतु मासेमारी, खाणकाम, लाकूडतोड इत्यादी उद्योगधंदे प्रधान असलेले विभागही यांतच समाविष्ट होतात.

( ४ ) साहजिकच ग्रामीण शाळा ही तुरळक लोकवस्तीच्या विभागात असते.

( ५ ) आपल्या सभोवतालच्या संपूर्ण ग्रामीण समूहाला शैक्षणिक कार्यक्रम पुरविणारी संस्था म्हणजे ग्रामीण शाळा.

सध्या ग्रामीण शाळांची पुनर्रचना महात्मा गांधींच्या जीवनशिक्षण योजनेनुसार होत आहे. प्रचलित ग्रामीण शिक्षणातील दुसरा एक महत्त्वाचा नवीन प्रवाह म्हणजे ग्रामशाळेचे समाजकेंद्रात रूपांतर करणे. कारण शाळा व समाज परस्परांपासून विभक्त राहणे इष्ट नाही. बालकांच्या शिक्षणाप्रमाणेच प्रौढांच्या शिक्षणाचीही जबाबदारी शाळेवरच आहे. प्रौढांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजा शाळाच भागवू शकणार. त्यांच्यांत व्यावसायिक पात्रता शाळेमधूनच निर्माण करता येईल. म्हणून ग्रामशाळेचे रूपांतर समाजकेंद्रात होणे इष्ट आहे.

जीवन-शिक्षणाचा उद्देश हा आहे की, विद्यार्थी पुढे एक आदर्श नागरिक झाला पाहिजे. त्याला स्वतःची जबाबदारी नीट समजली पाहिजे. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद त्याच्यात आली पाहिजे. त्याचप्रमाणे समाजातील एक कुशल घटक या नात्यानेही त्याला आपली जबाबदारी पार पाडता आली पाहिजे.

ग्रामशिक्षणातील या नवीन विचारप्रवाहामुळे ग्रामीण प्राथमिक शाळांना आपल्यासमोर नवीन दृष्टिकोन ठेवणे भाग आहे. खेड्यातील विद्यार्थ्यांच्या प्रमुख गरजा कोणत्या, त्या कशा रीतीने पुरवता येतील व त्यायोगे भावी कालात सुखी जीवन व्यतीत करणारे आदर्श नागरिक त्यांच्यातून कसे निर्माण होतील याचा विचार या शाळांना करावयास पाहिजे. त्या दृष्टीने शालेय कार्यक्रमांची आखणी झाला पाहिजे.

ग्रामीण प्राथमिक शिक्षणातील आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे एक-शिक्षकी शाळेची खेड्यांतील वाढत्या शैक्षणिक प्रसारामुळे प्राथमिक शाळांची संख्या भरपूर मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. परंतु खेडयांतील प्रत्येक शाळेस प्रत्येक इयत्तेस १ याप्रमाणे शिक्षक पुरविणे आर्थिकदृष्ट्या; प्रशिक्षित शिक्षकांच्या टंचाईमुळे व विद्यार्थ्यांचा कमी संख्यमुळे शक्य होत नाही साहजिकच ग्रामीण शाळेतील एका शिक्षकास दोन किंवा दोनांपेक्षा अधिक वर्ग शिकवणे भाग पडते. अर्थातच शाळांची रचना, अभ्यासक्रम, वेळापत्रक, प्रशिक्षण इ॰चा विचार करणे आवश्यक आहे.

## ग्रामीण बालशिक्षण

आतापर्यंत सर्वस्वी व अजूनही खूपच मोठ्या प्रमाणावर उपेक्षित असलेली ग्रामशिक्षणाची एक समस्या म्हणजे ग्रामीण बालशिक्षणाची होय. वास्तविक रीत्या बालशिक्षणावर सर्व शिक्षणाची मदार अवलंबून असते. म्हणूनच खेड्यातील शिक्षणक्रमातही बालशिक्षणाला प्राधान्य मिळणे आवश्यक होते. परंतु आमच्याकडे प्रत्यक्ष शहरांतूनही मिळावे तितके महत्त्व अद्यापिही बालशिक्षणास दिले गेलेले नाही. अर्थातच खेड्यांत या प्रश्नाकडे अधिक उपेक्षा होणे यात काहीच आश्चर्य नव्हे. परंतु सध्या खेड्यांतूनसुद्धा बालकमंदिरे वा बालवाडी स्थापन करण्याकडे लक्ष देण्यात येऊ लागले आहे. अशातऱ्हेने तीन ते सहा-सात वर्षांच्या मुलांची शिक्षणाची सोय खेड्यांतूनही उपलब्ध होऊ लागली आहे.

खेड्यांतील या बालकांची काही वैशिष्ट्ये आपल्या सहज नजरेस पडतात. एक तर या विद्यार्थ्यांचा निसर्गाशी प्रत्यक्ष संबंध येत असतो. साहजिकच निसर्गासंबंधी त्यांचे ज्ञान शहरी विद्यार्थ्यांपेक्षा अधिक प्रगल्भ असते. रोपटी, झाडंझुडपं, फळे, फुले, शेती यासंबंधी किती तरी बारकाईने माहिती त्यांना असते. त्याचप्रमाणे गाई, बैल, शेळा, कुत्रा इ. किती तरी प्राण्यांशा त्यांचा निकटचा संबंध यत असतो. जागा आणि आकाश यांची समृद्धी म्हणजे त्यांना मिळालेली नैसर्गिक देणगीच होय. त्यांचा उत्साह व काम करण्याची शक्ती याला तोड नसते. त्यालाच स्वावलंबनाची जोड मिळालेली असते. ग्रामीण बालकाच्या या स्वाभाविक गुणांचा उपयोग बालवाडीत करून घेण्यात येतो.

‘ बालवाडी ’ म्हणजे किंडर गार्टन व मॉंटेसरी शाळा यांना दिलेले ग्रामीण वळण होय. खेड्यांतील बालकांच्या शिक्षणाची सोय बालवाडीच्याद्वारा भागविली जाते. बालवाडीचे हेतू खालीलप्रमाणे सांगता येतील :

( १ ) बालकांत निर्भयता उत्पन्न करणे.

( २ ) शरीरश्रमाची प्रतिष्ठा त्यांना समजावून देणे.

( ३ ) लोकसेवेची आवड त्यांच्यात निर्माण करणे.
( ४ ) त्यांच्यांत स्वाभिमान जागृत करणे.
( ५ ) त्यांचे अनुभव व क्रिया यांना आवाहन करणे.
( ६ ) त्यांच्यावर सांस्कृतिक व नैतिक संस्कार करणे.

या दृष्टीने बालवाडीत सर्वसाधारणतः खालील कार्यक्रम आढळून येतातः–

( १ ) न्याहारी, ( २ ) वाडीची साफसफाई, ( ३ ) झाडांस पाणी घालणे, ( ४ ) न्हाणे-धुणे, ( ५ ) सूत कातणे, ( ६ ) शेतावाडीची कामे, ( ७ ) सहली जवळच्या व लांबच्या, ( ८ ) बालनाटके, ( ९ ) बालगीते, (१०) बालगोष्टी व गप्पा, (११) बालखेळ– बसून व धावून, (१२) आजूबाजूच्या वस्तूंचा परिचय करून घेणे, (१३) सामाजिक व्यवहार, (१४) प्रार्थना.

बालवाडीची शैक्षणिक साधने ही खेड्यातून सहज उपलब्ध होणारी व तेथेच निर्माण झालेली असतात. सागरगोटे, शिंपले, रंगीत दगड, फुले इत्यादी. सहज उपलब्ध होणाऱ्या साधनांचा उपयोग तेथे कौशल्याने करून घेण्यात येतो. या बालवाडीलाच अर्भकालय व प्राथमिक शाळा यांची जोड देऊन विकासवाडी प्रत्येक खेड्यात स्थापन करण्यात यावी असा एक नवा सूर ऐकू येत आहे. १०–११ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या संपूर्ण विकासाची जबाबदारी या विकास-वाडीवर राहील. परंतु नजीकच्या भविष्यकाळात प्रत्येक खेड्यातून विकास-वाडीची कल्पना साकार करणे अवघड आहे.

## ग्रामशिक्षण व ग्रामजीवन

ग्रामशिक्षणाच्या नवीन प्रयोगांची अशा रीतीने आपण माहिती करून घेतली. त्याचप्रमाणे बालशिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत ग्रामीण विभागात कोणते प्रयत्न चालू आहेत याचाही आढावा घेतला. या सर्वांचा निष्कर्ष हाच आहे की, ग्रामशिक्षणाकडे सध्या मूलगामी लक्ष पुरविले जात आहे. ग्रामशिक्षणाशिवाय ग्रामविकास होऊ शकणार नाही व ग्रामविकासाचा एक मुख्य घटक म्हणजे ग्राम-शिक्षण होय याची जाणीव आमच्या लोकांना, विचारवंतांना व सरकारला झाली आहे. लोकशाहीप्रणीत समाजवाद साकार करण्याचे आपले ध्येय ग्रामीण शिक्षणाकडे पाठ फिरवून साध्य होणारे नाही. उलट या ध्येयाप्रत जाणाऱ्या ग्रामीण रचनेत ग्रामीण शाळा हा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू राहील. म्हणूनच आमच्या समाजविकास योजनेत ग्रामीण शाळेला फार महत्त्वाचे स्थान देण्यात आले. समाजविकास-योजना आमच्या पंचवार्षिक योजनांचा एक प्रमुख भाग होय. या योजनांच्याद्वारे संपूर्ण भारतीय ग्रामजीवन बदलण्याचा प्रयत्न चालू आहे.

## बदलत्या ग्रामजीवनाचे स्वरूप : ६

### पहिली पंचवार्षिक योजना

भारतात स्वातंत्र्योदय झाला नि आपले भाग्य आपल्या हातात आले. देशाचे राष्ट्रीय पुढारी खरेखुरे सत्ताधारी झाले. संपूर्ण देशाच्या पुनर्रचनेचे विचार त्यांच्या डोक्यात सुरू झाले. त्यातूनच पंचवार्षिक योजनांचा जन्म झाला. पंचवार्षिक योजनेच मूळ उद्दिष्ट संपूर्ण देशाची सर्वांगीण प्रगती करणे हेच होते. ही प्रगती अर्थात्च केवळ शहरांपुरती मर्यादित राहू शकत नव्हती. भारतातील ५॥ लाख खेड्यांचा विकास म्हणजेच खरा देशाचा विकास होता म्हणूनच शेती व सामूहिक विकास ह्यांना पंचवार्षिक योजनेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले. नियोजन-समितीने १९५० साली सुरू झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत सामूहिक-विकास कार्यक्रमाचे मूलभूत तत्त्व पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले आहे :

"सामूहिक विकास ही पद्धती असून ग्रामीण विस्तार हे साधन होय. तिच्याद्वारे पंचवार्षिक योजना खेड्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात बदल घडवून आणू इच्छिते."

अशा तऱ्हेने संपूर्ण ग्रामजीवन बदलण्याचा प्रयत्न या पंचवार्षिक योजनांतून चाललेला आहे, त्याचाच आपण परिचय करून घेऊ.

आता प्रथमतःच प्रश्न निर्माण होतो की, ग्रामजीवनात बदल घडवायचे

म्हणजे काय करावयाचे? याचे उत्तर हेच की, ग्रामीण जनतेला खरेखुरे स्वातंत्र्य प्राप्त करून द्यावयाचे. हे खरेखुरे स्वातंत्र्य पुढील तीन हक्कांत प्रामुख्याने आहे:

(१) योग्य प्रकारे जगण्याचा हक्क.

(२) योग्य प्रकारे जगता यावे म्हणून उपजीविकेसाठी काम करण्याचा हक्क.

(३) अशा प्रकारे काम करून जे काही मिळवले असेल ते प्राप्त करून त्याचा उपभोग घेण्याचा हक्क.

हे हक्क ग्रामीण जनतेला प्राप्त करून घेता यावेत म्हणून सामूहिक विकास-योजना पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत झाली. प्रथमतः २ ऑक्टोबर १९५२ रोजी ५५ विकास-क्षेत्रांत सामूहिक विकासाचा कार्यक्रम झाला. नंतर १९५३ साली दोन हप्त्यांत अशा आणखी विकास-योजना हाती घेण्यात आल्या. १९५४ मध्ये २२८ विकास गट स्थापन झाले व त्यांना २३६५० खेडी व २ कोटी १५ लाख लोकसंख्या व्यापली. सामूहिक विकास-योजना सुरू झाल्यावर बरोबर एक वर्षाने म्हणजे २ ऑक्टो. १९५३ रोजी राष्ट्रीय विस्तार-योजना सुरू करण्यात आली. यामधील कार्यक्रम सामूहिक विकास गटातील कार्यक्रमापेक्षा कमी जोमदार स्वरूपाचा असतो. पण हा अधिक खेड्यात व्यापणारा असतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेत १२०० राष्ट्रीय विस्तार गट सुरू करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. १९६० च्या अखेरीस विकास-गटांची संख्या ३११० वर गेली व त्यांनी ३·६८ लाख खेडी व २०·४ कोटी लोकसंख्या व्यापली. सध्या ५०० हून अधिक विकास गटांतून जवळ जवळ सर्व खेड्यांमध्ये या योजनेने प्रवेश केला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत या विकास योजनेसाठी फक्त ४६·१९ कोटी रुपये राखून ठेवले होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ह्या योजनेच्या वाट्याला १९·१४५ कोटी रुपये ठेवण्यात आले व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत हीच रक्कम २९४ कोटी रुपयांवर नेण्यात आली. अशा रीतीने ग्रामविकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन अत्यंत अल्पावधीत केलेले हे कार्य खरोखरच अपूर्व असे आहे.

## योजनेची उद्दिष्टे

संपूर्ण ग्रामजीवन बदलणे ही तर या विकासयोजनेच्यामागची धारणा. मग ती सिद्धीस जाण्यासाठी कोणती निश्चित उद्दिष्टे पुढे ठेवण्यात आली? पहिले उद्दिष्ट म्हणजे वाढता रोजगार व उत्पादन व खेड्यातून दिसणारे दारिद्र्य व बेकारी भयंकर आहे. या दोन्ही राक्षसांना मारण्यासाठी शेतीशिवाय अन्य व्यवसाय उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्याप्रमाणे शेतीचे उत्पादन नवीन शास्त्रीय ज्ञानाचा फायदा करून घेऊन वाढविता येणे सहज शक्य आहे. अशा तऱ्हेने खेड्यांपाड्यांतील भुकेची समस्या सोडविणे हे या विकास-योजनेचे पहिले व सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आपला ग्रामीण नागरिक आजपर्यंत अर्धपोटी राहिला आहे व त्याच्या

पोटापाण्याची व्यवस्था केली नाही तर इतर सर्व ग्रामविकास योजना दिखाऊ असतील व त्या केव्हा कोलमडतील याचा नेम नाही.

या योजनेचे दुसरे उद्दिष्ट ग्रामीण भागातील लोकांचे व्यवहार सहकारी तत्त्वावर संघटित करणे हे होय. आपली आजपर्यंतची पद्धत फक्त व्यक्तीपुरतेच पाहण्याची होती. त्यामुळे व्यक्तीचीही म्हणावी तशी उन्नती झाली नाही व समाजाची तर नाहीच नाही. म्हणूनच सहकाराची आवड लोकांत निर्माण करणे व त्याच्या साहाय्याने स्वतःच्या खेड्याचा विकास करावयास त्यांना शिकविणे आवश्यक आहे. ग्रामविकासाचे विविध कार्यक्रम हे स्वावलंबन व सहकार यांच्या पायावरच उभारलेले असतात. शेती, विहिरी खोदणे, छोटे पाट काढणे, बियाण्याचे उत्पादन करणे, कर्ज, खत, औजारे, इत्यादी सोयी करणे, मालाची विक्री करणे, छोटे उद्योगधंदे चालविणे, रस्ते बांधणे वृक्षारोपण करणे इत्यादी अनेक कामे सहकार व स्वावलंबन यांच्या मदतीनेच यशस्वी होऊ शकतात.

ग्रामीण समाजाच्या समाईक हितासाठी सामूहिक प्रयत्नांची प्रेरणा निर्माण करणे हे तिसरे उद्दिष्ट होय. ग्रामीण विभागाची खरी संपत्ती तेथे असलेले अफाट मनुष्यबळ हेच होय. ही संपत्ती आज तशीच वाया जात आहे. हिचा उपयोग केला तर संपूर्ण गावाच्या किती तरी गरजा सहज भागण्यासारख्या आहेत. रस्ते, तलाव, विहिरी, शाळा, आरोग्य– गावातील अशा कित्येक गोष्टी आहेत की ज्याचा सर्वच नागरिकांना लाभ मिळतो. मग सर्वांचेच हातभार यासाठी लागले तर किती चांगले होईल ? सरकारी मदतीशिवायदेखील आपल्या प्रयत्नाने या गोष्टी प्राप्त करून घेणे गावाला सहज शक्य आहे.

ह्या सर्व उद्दिष्टांचा मथितार्थ हाच आहे की, योजनेच्या द्वारा ग्रामीण जनतेचा एकंदर दृष्टिकोण पार बदलून टाकावयाचा. शेती करताना परंपरागत साधनांना चिकटून बसण्याची वृत्ती काढून टाकावयाची व त्या जागी नवीन शास्त्रीय साधनांचा उपयोग करून अधिक उत्पादन निर्माण करण्याची प्रेरणा ग्रामीण जनतेत निर्माण करावयाची. उद्योगधंद्याच्या व सार्वजनिक हिताच्या कामाच्या बाबतीत स्वावलंबन व सहकाराची आवड त्यांच्यात उत्पन्न करावयाची. हे गाव माझे आहे; मी त्याचा एक घटक आहे; गावाचा विकास हा माझाच विकास आहे व देशाचा विकास त्यावरच अवलंबून आहे ही जाणीव जनतेत निर्माण करावयाची आणि ह्यामधूनच स्वातंत्र्य, समता बंधुभाव व न्याय ह्या भारतीय घटनेने नमूद केलेल्या मूलभूत हक्कांची प्राप्ती करून घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करावयाची हाच या योजनेचा अंतिम उद्देश मानला पाहिजे.

### योजनेचे कार्यक्रम

अशा विशाल उद्दिष्टांवर आधारलेल्या या सामूहिक विकासाचे कार्यक्रम विशालच आहे. शेती, पशुपालन, पाटबंधारे, वीजपुरवठा, आरोग्य व स्वच्छता,

शिक्षण, समाजशिक्षण, दळणवळण, ग्रामोद्योग, घरे बांधणे इत्यादी ग्रामीण उन्नतीस पोषक असलेल्या सर्व कार्यक्रमांचा अंतर्भाव या विकास-योजनेत केलेला आहे. पहिल्या दोन योजनांत या निरनिराळ्या कार्यक्रमांवर कसा खर्च केला याची कल्पना खालील कोष्टक करून येऊ शकेल.

योजनांतून करण्यात आलेला खर्च ( लक्ष रुपयांत )

| | पहिली योजना | दुसरी योजना |
|---|---|---|
| गटाची वसतिस्थाने | १०५१ | ५२७१ |
| शेती व पशुपालन | ३५५ | १०९४ |
| पाट-बंधारे व कृषिलागवड | १०८३ | ४५०९ |
| आरोग्य व ग्रामीण स्वच्छता | ३७९ | १५६८ |
| शिक्षण | ३४४ | १२७२ |
| समाजशिक्षण | २०० | ९०७ |
| दळणवळण | ५१६ | १४२२ |
| ग्रामोद्योग | २१८ | ६५९ |
| गृहनिर्मिती | १७३ | ९४४ |
| अन्य | २७९ | ७२५ |
| मध्यवर्ती योजना | २१ | १३२ |
| ( एकूण ) | ४६१९ | १८५०३ |

या खर्चाचा फायदा कसा झाला याची कल्पना खालील कोष्टकांतील प्राप्तांकावरून येऊ शकेल.

मार्च १९६० अखेरचे एकूण प्राप्तांक

| बाब | प्राप्तांक |
|---|---|
| **( १ ) शेती** | |
| चांगल्या बियांचे वाटप | २,७३,२०,०० मण |
| रासायनिक खतांचे वाटप | ६,२२,५१,००० मण |
| सुधारलेल्या औजारांचे वाटप | १५,९४,००० औजारे |
| शेतीची दाखविण्यात आलेली प्रात्यक्षिके | ८०,४७,००० |
| कंपोस्ट खताचे तयार केलेले खड्डे | ९३,००,००० |
| **( २ ) पशुपालन** | |
| सुधारलेल्या जनावरांचा पुरवठा | ७४००० |
| सुधारलेल्या पक्ष्यांचा पुरवठा | १०४१,००० |
| उत्पादनक्षमता नष्ट केलेले प्राणी | ७३८५,००० |

**( ३ ) आरोग्य व ग्रामीण स्वच्छता**

| | |
|---|---|
| बांधण्यात आलेले ग्रामीण संडास | ६०४,००० |
| तयार केलेल्या पक्क्या गटारी | २,४२,६४,००० यार्ड |
| तयार केलेल्या ग्रामीण गल्ल्या | १,२७,०९,००१ चौ. यार्ड |
| खोदलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी | १,८४,००० |
| दुरुस्त केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी | २,७४,००० |

**( ४ ) समाजशिक्षण**

| | |
|---|---|
| प्रौढ शिक्षणाची सुरू केलेली केंद्रे | १,५६,००० |
| साक्षर केलेले प्रौढ | ४३,००० |
| उघडण्यात आलेली वाचनालये व ग्रंथालये | ७२,००० |
| स्थापन केलेली युवक-मंडळे व शेतकरी संघ | |
| ( अ ) संख्या | १,४९,००० |
| ( ब ) सभासद-संख्या | १८,४९,००० |
| ग्राम-साहाय्यकांची घेण्यात आलेली शिबिरे | |
| ( अ ) संख्या | ६१,००० |
| ( ब ) प्रशिक्षण दिलेले पुढारी | २८,००,००० |

**( ५ ) स्त्रियांचे कार्यक्रम**

| | |
|---|---|
| स्थापन केलेली महिला-मंडळे | ३६,००० |
| सभासद-संख्या | ५,९९,००० |
| बसविण्यात आलेल्या बिनधुराच्या चुली | ३,२६,००० |

**( ६ ) दळणवळण**

| | |
|---|---|
| बांधण्यात आलेल्या नवीन कच्च्या सडका | १०९,००० मैल |
| सुधारलेल्या कच्च्या सडका | १३६,००० मैल |
| रस्त्याखाली बांधलेली गटारे | ८६,००० मैल |

## योजनेचे प्रशासन

अशा तऱ्हेने भारतीय खेडयाचे संपूर्ण रूप बदलण्याचा प्रयत्न या योजनाबद्ध कार्यक्रमांनी चालविला आहे. योजनेचा हा कार्यक्रम सध्या चालू असलेल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्टांप्रमाणे सर्व खेडयांस पुरविण्यात येणार असून खेड्यातील प्रत्येक कुटुंबाला त्याचा फायदा मिळाला पाहिजे ही त्यामागची मनीषा आहे. अर्थात एवढे विशाल कार्य पार पाडावयास प्रभावी कार्यक्षम व जनसेवातत्पर प्रशासन केवळ हुकूम सोडणारे किंवा कागदी घोडे नाचविणारे नको, तर प्रत्यक्ष कृतीने मार्गदर्शन करणारे पाहिजे. प्रशासन करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची

प्रवृत्ती लोकशाहीला उपकारक व म्हणूनच जनतेवर प्रेम करण्याची व त्यांना आस्थापूर्वक प्रगतिपथावर घेऊन जाण्याची असली पाहिजे. यासाठी बिनसरकारी सहकार्य जास्तीत जास्त मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारच्या भिन्न भिन्न खात्यांचा परस्परांशी सहयोग असणे आवश्यक आहे. सर्व पातळीवर अशा तऱ्हेचे सहकार्य असल्याशिवाय ग्रामविकासाचा कार्यक्रम पार पाडता येणार नाही. म्हणूनच अगदी वर लोकसभेमध्ये केंद्रीय समाजविकास व सहकार खात्याला सल्ला देण्यासाठी संसदेच्या अनौपचारिक विचारविनिमय समित्यांच्या विषयवार पोटसमित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. नव्या कल्पना मध्यवर्ती समितीला सुचवणे व त्याबरोबरच थेट जनतेपर्यंत त्या नेऊन भिडविणे असे दुहेरी कार्य या समित्यांकडून अपेक्षित आहे. विधानसभेत देखील समाजविकास खात्याला सल्ला देण्यासाठी अनौपचारिक विचारविनिमय-समिती व तिच्या पोटसमित्यांची रचना करण्यात आली आहे. परंतु ग्रामविकासाचे कार्य लोकसभा किंवा विधान-सभा ह्यांनी तयार केलेल्या योजना खेड्यांवर लादून होणार नाही. यासाठी खेड्यातील ग्रामीण जनतेचा पुढाकार स्वतः त्या योजना बनविण्याच्या व राबविण्याच्या बाबतीत असला पाहिजे. म्हणूनच ग्रामीण स्वराज्याची किंवा पंचायत राज्याची योजना पुढे आली. या योजनेनुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद या कार्यक्रमाचा आराखडा व नियोजन करते. जिल्हा कलेक्टर व जिल्हा नियोजन व विकास अधिकारी हे सरकारी कर्मचारी हे काम करतात तर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी येथेही परिषदेतील लोकनियुक्त सदस्यांच्या भिन्न भिन्न पोटसमित्या असतात. जिल्हा परिषदेला गटपंचायत समिती गटविकासाची योजना सुचविते. तेथे सब-डिव्हिजनल ऑफिसर, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी लोकनियुक्त पोटसमित्यांच्या सहकार्याने काम करून ही योजना राबवली जाते. गट पंचायतीचा पाया म्हणजे ग्रामपंचायत आपल्या गावाच्या गरजा व त्यानुसार आवश्यक असलेल्या योजना सुचविण्याची खरी जबाबदारी ग्रामपंचायतीवर असते. आपल्या निरनिराळ्या पोटसमित्या व विविध कार्यकर्ते यांच्या सहकार्याने पंचायत हे काम करते. हे काम करताना गावातील प्रौढ लोकांना वारंवार सल्ला घेणे पंचायतीला सोपे जावे व शक्य व्हावे म्हणून ग्रामसभेची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक गावातील प्रौढ नागरिक या ग्रामसभेद्वारे आपल्या गावच्या गरजा, आपले अनुभव, गावाच्या भावी योजना चालू योजनांची सफलता इ. बाबतीत साधकबाधक चर्चा करून पंचायतीस योग्य निर्णय घेण्यास मदत करू शकतात. अशा रीतीने सामूहिक विकासाची योजना पूर्णपणे लोकशाहीच्या मूल्यांवर उभारलेली आहे. ही योजना वरून लादून चालणार नाही तर ती खालून निर्माण झाली पाहिजे. म्हणूनच ग्रामपंचायत हा या योजनेचा प्रमुख घटक होय व ग्राम-पातळीवर काम करणारा ग्रामसेवक हा सर्वांत महत्त्वाचा विकास-अधिकारी होय.

सर्व साधारणतः ५ ते १० खेड्यांकरिता १ ग्रामसेवक असतो. याचे कार्य दुहेरी स्वरूपाचे असते. एक तर संशोधनाद्वारे मिळालेली सर्व माहिती हा शेतकऱ्यांना पुरवितो व दुसरे म्हणजे शेतकऱ्यांच्या अडचणी हाच तज्ज्ञांसमोर ठेवतो. अशा तऱ्हेने विकास चमूचा तो एजंट असतो व शेतकऱ्यांचा मित्र व मार्गदर्शक असतो. शेती, पशुसंवर्धन, सहकार इ. ची प्राथमिक माहिती व शेतकऱ्यांशी कसे वागावे ह्याचे प्रशिक्षण त्याने प्राप्त केलेले असते. त्यामुळे राष्ट्रीय विस्ताराच्या प्रत्येक कार्यक्रमात जनतेचे हार्दिक सहकार्य कसे मिळेल याचा तो अटोकाट प्रयत्न करतो. थोडक्यात राष्ट्रीय विस्ताराचा कार्यक्रम हा आपलाच कार्यक्रम आहे व त्यासाठी आपण सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे अशी प्रेरणा खेडुतांच्या मनात ह्याच्यामुळेच निर्माण होऊ शकते. जनतेमध्ये अशी जागृती किंवा चैतन्य निर्माण करणे हे सामूहिक विकास-योजनेचे एक मूळ उद्दिष्ट आहे.

## ग्रामपंचायतीचे कार्य

ग्रामसेवक हा जसा राष्ट्रीय विस्तार–योजनेचा प्रमुख कार्यकर्ता होय. तशी ग्रामपंचायत ही या बाबतीतील सर्वांत प्रमुख संस्था होय. हिचे विशेष महत्त्व पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशापयशाची चर्चा सुरू झाली तेव्हा समजून आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे बहुतेक कार्यक्रम मध्यवर्ती सरकारने तयार केले व ते जनतेवर लादले. त्यामुळे पाहिजे तितका लोकांचा उत्साह या कार्यक्रमासाठी दिसून आला नाही. या प्रश्नाचा मूलगामी विचार १९५७ सालच्या खासदार बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखालील योजना आणि विकास कार्यक्रम यासंबंधीच्या समितीने केला व यावर तोडगा म्हणून लोकशाही विकेंद्रीकरणाची योजना सुचविली. तिची रूपरेषा आपण लोकसभा व ग्रामसभा ह्यांचा संबंध स्पष्ट करून घेत असताना पाहिलीच आहे. आपला भूप्रदेश मोठा असल्याने स्थानिक गरजा व परिस्थिती नीट जाणून घेण्यासाठी लोकशाही सरकारला सत्तेचे हस्तांतर आणि यंत्रणेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी जनतेच्या स्थानिक प्रतिनिधींनी या सत्तेचा वापर करावा व त्या यंत्रणेवर नियंत्रण ठेवून तिचे मार्गदर्शन करावे, अशी मेहता-समितीची सूचना होती. मध्यवर्ती सरकारने ती ग्राह्य मानली व त्यानुसार सर्व प्रांतांत ग्रामीण स्वराज्य वा पंचायत राज्याची मुहूर्तमेढ रोवण्यात येऊ लागली. या ग्रामीण स्वराज्याचा पाया म्हणजे ग्रामपंचायत होय. सरकारी यंत्रणेचे विकेंद्रीकरण या मूळ पायापाशी नेऊन भिडवलेले आहे. यामुळे या पायाला किंवा ग्रामपंचायतीला ग्रामीण भवितव्याच्या व म्हणूनच संपूर्ण देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने काही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेप्रमाणे ग्रामपंचायतीची ग्रामयोजना घडवून त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी खालील कर्तव्ये पार पाडावीत अशी अपेक्षा आहे :

( १ ) खेड्यातील उत्पादनासंबंधी कार्यक्रम आखणे.

( २ ) सहकारी संस्थांच्या साहाय्याने पुरवठ्यासंबंधीचे अंदाजपत्रक व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे.

( ३ ) वाढती सरकारी मदत खेड्यांपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम होणे.

( ४ ) पडिक जमिनी, जंगल, आबादीच्या जागा, तलाव इत्यादी सर्व-सामान्य जमिनींचा विकास करणे– यात जमिनीची धूप थांबविण्या-बाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे.

( ५ ) खेड्यांतील सर्वसामान्य इमारती, सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आदि बांधणे, त्यांची दुरुस्ती करणे व काळजी घेणे.

( ६ ) सर्व कार्यांकरिता एकमेकांना साहाय्य देणारी व सहयोग देणारी संस्था स्थापन करणे.

( ७ ) सहकारी संस्थांचा विकास करणे.

( ८ ) श्रमदानाद्वारे सामूहिक कामे पार पाडणे.

( ९ ) अल्पबचतीस प्रोत्साहन देणे.

(१०) जनावरांची सुधारणा करणे.

ग्रामपंचायतीचा कार्यक्रम द्विविध स्वरूपाचा असतो. एक उत्पादनाचा. यात शेतीला प्राधान्य असते. परंतु त्याबरोबरच ग्रामोद्योग व व्यापार सहकारी तत्त्वावर चालविण्याकडेही लक्ष द्यावे लागते. दुसरा कार्यक्रम समाज-कल्याणाचा. यांत विहिरी, रस्ते, मोऱ्या, पूल इत्यादी बांधणे, त्यांची दुरुस्ती करणे, निगा राखणे, सार्वजनिक इमारती, बाजार बांधणे व त्यांचा उपयोग खेड्यातील साफसफाईची कामे व रोगराईचा बंदोबस्त करणे; नवीन शाळा उघडणे व शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यास मदत करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. अशा तऱ्हेने लोकांची आर्थिक स्थिती सुधारणे व त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची पातळी उंचावणे हा ग्रामपंचायतीच्या कार्यांचा मूळ हेतू होय.

ग्रामपंचायतीला हा हेतू साध्य करून घेण्यासाठी खालील साधनांचा उपयोग करून घेता येतो.

( १ ) स्वतंत्र मार्गांपासून मिळणारे उत्पन्न.

( अ ) पंचायतीने बसविलेला कोणताही कर, नाका अथवा फी यांपासून मिळणारे उत्पन्न.

(ब) पंचायतीने उभारलेल्या मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न, उदा. जंगल, मासेमारी, बाजार.

(२) सरकारकडून व पंचायत समिती, जिल्हा परिषद यांसारख्या स्थानिक संस्थांकडून मिळणारे अनुदान.

(३) विशिष्ट कार्यासाठी उभारलेले कर्ज.

(४) पंचायतीकडे असलेली वर्षासने व विश्वस्त निधी.

(५) विशिष्ट कार्यासाठी मिळणाऱ्या वैयक्तिक देणग्या.

(६) श्रमदान.

ग्रामपंचायतीला मार्गदर्शन व पैसा ह्या दोन्ही बाबतीत पंचायत समिती, जिल्हा परिषद व सरकार ह्यांकडून मदत होत असते. परंतु दर वेळेस पंचायत ह्यांच्यावरच अवलंबून राहू लागली तर पंचायत–राज्याच्या पाठीमागची मूळ कल्पनाच नष्ट होईल. पंचायत-राज्याची मुहूर्तमेढ जनतेच्या सामर्थ्यावर आधारलेली आहे. म्हणूनच पंचायतीचे सर्वांत प्रमुख कर्तव्य जनतेमध्ये प्रेरणा व उत्साह निर्माण करणे हे होय. ग्राम-विकासाची योजना गावाच्या जनतेतूनच निर्माण झाली पाहिजे व ती राबविण्यात सर्वांचा सारखाच हातभार लागला पाहिजे. हे कार्य करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. खेड्यात पंचायतीने असा उत्साह निर्माण केला की मग प्रत्येक जण,

(१) परस्परांशी सहकार्य करील व विकास कार्यांत भाग घेईल.

(२) आपण पंचायतीचा एक अविभाज्य घटक आहोत व पंचायतीच्या प्रगतीची जबाबदारी आपणावर आहे ही भावना बाळगून पंचायतीला बळकट बनवील.

(३) पंचायतीच्या कामात सक्रिय सहकार्य करून तिच्या निरनिराळ्या उपसमित्यांवर काम करण्यासाठी आवश्यक वेळ देईल.

(४) शाळा बांधणे, सहकारी संस्था स्थापन करणे यांसारख्या पंचायतीने ठरविलेल्या निरनिराळ्या योजना सफल करण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्न करील.

(५) पंचायतीने स्थानिक कर बसविण्याबाबत व इतर बाबतीत घेतलेल्या निर्णयाला पाठिंबा देईल.

अशा तऱ्हेने ग्रामीण जनतेत चैतन्य उत्पन्न करणारी प्रमुख संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. ग्रामविकासाचे कार्य सहकार्याच्या तत्त्वावरच पार पाडले जाते. हे कार्य करणे सोपे जावे म्हणून पंचायतीच्या सहकार्याने काम करणारी दुसरी मूलभूत संस्था प्रत्येक खेड्यात असणे आवश्यक आहे. ती म्हणजे सहकारी संस्था.

## सहकारी संस्था

गावातील सर्व लोकांनी मिळून आपल्या गावाचा आर्थिक विकास करणे व आपले गाव आपल्या प्रमुख गरजांच्या बाबतीत शक्य तो स्वयंपूर्ण करणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट होय. स्वाभाविकच शेतकऱ्याच्या प्रमुख गरजा भागविण्याची शोषणरहित अशी ही संस्था होय. ही संस्था शेतकऱ्याला खालीलप्रकारे उपयोगी पडू शकते.

(१) पेरणी इत्यादीसाठी लागणारी अल्पमुदतीची कर्जे देणे.
(२) बैल विकत घेणे, जमिनीची सुधारणा करणे, विहीर खणणे, ट्रॅक्टर खरेदी करणे इ. कामासाठी मध्यम व दीर्घमुदतीची कर्जे देणे.
(३) बी-बियाणे, खते. नांगर, जंतुनाशक औषधे, पिकांचे किडीपासून संरक्षण करणारी औषधे, जनावरांचा चारा इत्यादी वस्तूंचा पुरवठा करणे.
(४) घासलेट, साखर, मीठ इत्यादी वस्तू स्वस्त दरात विकणे.
(५) चांगले बी-बियाणे काढणे, कंपोस्ट खत तयार करणे इत्यादी कामे.
(६) चांगला भाव मिळेपर्यंत शेतीचा माल साठवून ठेवण्यासाठी गुदामे बांधणे व बाजारपेठांवर नियंत्रण ठेवणे.
(७) शेतमालाची प्रत ठरवून त्यावर प्रक्रिया करणे.
(८) सहकारी पद्धतीने शेती करणे.
(९) मधमाशा पाळणे, आगपेट्या तयार करणे, मातीची भांडी व विटा तयार करणे, साबण व तेल-उत्पादन, चर्मोद्योग, खादी तयार करणे, गूळ व खांडसरी तयार करणे, तागापासून दोर करणे इत्यादी. ग्रामोद्योगांस चालना देणे.
(१०) मासेमारी, दूधपुरवठा, गृहनिर्माण इत्यादी कार्ये करणे.

सहकारी संस्था अशी नाना प्रकारची कामे करू शकते. खेड्याचा जसजसा विकास होत जाईल तसतसा सहकारी संस्थांचाही विकास होईल. एकाच खेड्यात भिन्न भिन्न कार्य करणाऱ्या अनेक सहकारी संस्था स्थापन होतील. त्या एकमेकीस व तद्वतच ग्रामपंचायतीसही पूरक अशा ठरतील व्यक्तीसाठी समष्टी व समष्टीसाठी व्यक्ती ही कल्पना त्यांतून पूर्ण साकर होईल. सावकार, जमीनदार व व्यापारी ह्यांच्याकडून होणारे खेड्यांतील जनतेचे शोषण हळूहळू लुप्त होत जाईल व प्रत्येक शेतकऱ्याचे जीवन सुखी व समृद्ध होईल. म्हणूनच १९५८ च्या राष्ट्रीय विकास समितीने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतातल्या प्रत्येक खेड्यात सहकारी चळवळ पोहोचली पाहिजे व खेड्यातील प्रत्येक कुटुंबास तिचा फायदा घेता आला पाहिजे असे उद्दिष्ट ठरवले आहे. समितीने तिसऱ्या पंचवार्षिक

योजनेच्या अखेरीस ग्रामीण विभागासाठी आखलेले या बाबतीतील काही इष्टांक पुढीलप्रमाणे आहेत :

| | | |
|---|---|---|
| प्राथमिक ग्राम सहकारी संस्था | ... ... | २·५ लाख |
| सदस्य संख्या | ... ... | ४ कोटी |
| अंतर्भूत गावे | ... ... | १००% |
| अंतर्भूत ग्रामीण लोकसंख्या | ... ... | ५५% |
| अंतर्भूत शेतकरी-संख्या | ... ... | ७४% |
| सहकारी संस्थांतून द्यावयाची कर्जे | | |
| अल्पमुदतीची | ... ... | ४०० कोटी रु. |
| मध्यम मुदतीची | ... ... | १६० ” |
| दीर्घ मुदतीची | ... ... | ११५ ” |
| प्राथमिक मार्केटिंग संस्था | ... ... | ४०० |
| बांधावयाची ग्रामीण गुदामे | ... ... | १०,००० |
| त्यावरील खर्च | ... ... | १ लाख रु. |

अशा तऱ्हेने सहकार हे बदलत्या ग्रामीण जीवनाचे एक प्रमुख तत्त्व आहे व गावातील सहकारी संस्थेत त्याचे मूर्त स्वरूप दृष्टीस येत आहे. गावाची नव्या प्रगतीकडे होत असलेली वाटचाल येथेच प्रतिबिंबित होते. गावाला मिळालेल्या नव्या दृष्टिकोणाचा साक्षात्कार येथेच प्रतीत होत असतो. या नव्या दृष्टिकोणाचा झरा गावात आणणे व सतत चालू ठेवणे हेही अत्यंत महत्त्वाचे काम आहे. नव्या विचाराची प्रेरणा देणे व ते विचार उगवत्या व चालू पिढीवर बिंबविणे यावरच ग्रामपंचायत व सहकारी संस्था ह्यांची मदार उभी आहे. शिक्षकाशिवाय हे काम कोणीच प्रभावीपणे करू शकणार नाही. म्हणूनच हा या नव्या गावातला एक प्रमुख घटक आहे व ग्रामीण शाळा ही वरील दोन्ही संस्थांइतकीच महत्त्वाची मूलभूत ग्रामीण संस्था आहे.

## ग्रामीण शाळा

गावाच्या पुनर्रचनेत ग्रामीण शाळेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रामीण शाळा ही ब्रिटिश कालखंडातल्या शाळेप्रमाणे समाजापासून दूर राहणारी कुए उपेक्षित संस्था म्हणून आता राहू शकत नाही. या नव्या मनूत तिच्या सनातन कार्याचा जीर्णोद्धार करून त्यावर नवीन विचारांचे कलम करण्यात आले आहे. ग्रामीण समाजाचा ती आता एक महत्त्वाचा घटक झाली आहे. साहजिकच या समाजाच्या उत्साहाशिवाय व आस्थेशिवाय तिचा विकास होणार नाही. म्हणून शाळेची इमारत, क्रीडांगण, सजावट, बगीचा, वाचनालय, फर्निचर इ. अनेक

गोष्टी केवळ समाजाच्या सहकार्यावरच अवलंबून आहेत. आपल्या सहकारी वृत्तीनेच गावातील नागरिक हे विद्यामंदिर उभे करू शकतील.

त्याबरोबरच शाळेलाही समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने काही गोष्टी करता येणे सहज शक्य आहे. उदाहरणार्थ, समाजविकाससंबंधी खालील कार्य शाळा करू शकेल : ... ...

(१) गावाचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडवण्यास मदत करणे.

(२) समाजातील चांगल्या गोष्टी राखणे व वाईट गोष्टी बदलणे. यासाठी गावातील सर्व वयाच्या लोकांना पोषक ठरणारा शैक्षणिक कार्यक्रम पुरविणे. ... ...

(३) शालेय सोयींचा वापर समाजविकासासाठी करणे.

(४) सर्व समाजाचे ज्ञानदान केंद्र म्हणून काम करणे. प्रौढ शिक्षण व नवसाक्षर शिक्षण याची सोय करणे व मध्यवर्ती वाचनालय चालवणे.

(५) ग्रामीण जनतेला स्वच्छतेने कामे करण्याची व खेळण्याची प्रात्यक्षिके करून दाखविणे.

(६) समाजाच्या जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध येईल असा जोरदार शैक्षणिक कार्यक्रम आखणे.

(७) अभ्यास व विस्तारकार्य यांची प्रयोगशाळा म्हणून काम करणे.

(८) सामाजिक व आर्थिक कार्य करणाऱ्या इतर संस्थांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे.

(९) मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडास्पर्धा विद्यार्थी व जनता ह्यांच्या सहकार्याने आयोजित करणे. त्यासाठी संगीत, नाटक-मंडळे स्थापन करणे.

(१०) स्त्रियांसाठी शिवणकाम, विणकाम, भरतकाम, गृहस्वच्छता व आरास, पाकशास्त्र इत्यादींचे शिक्षण देणारे केंद्र उघडणे.

अशा रीतीने शाळेचे कार्य चार छोट्या मुलांना दोन पुस्तके वाचायला शिकवण्यापुरते आता मर्यादित राहिलेले नाही. तर ग्रामीण समाजाची नवी घडण घडविण्याची प्रमुख जबाबदारी पंचायत व सहकारी संस्था ह्यांजबरोबर तिच्यावर येऊन पडली आहे. ह्या दोन्ही संस्थांना नवीन विचार देत राहणे, त्या संस्थांच्या विधायक कार्यक्रमात भाग घेणे, त्या संस्थांचे कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने जनतेला मार्गदर्शन करणे व शिक्षण देणे आणि त्याच्या बरोबरच ह्या दोन्ही संस्थांच्या सहाय्याने आपला विकास साधून घेणे असे ग्रामीण शाळेचे महत्त्वाचे कार्य या नव्या बदलत्या ग्रामव्यवस्थेत आहे.

शाळा आणखीही एक कार्य करू शकते. खेड्याच्या विकासासाठी अनेक संबंधित संस्थांची आवश्यकता असते. त्यांत युवकमंडळे, बालमंडळे, महिलामंडळे, क्रीडामंडळे, शेतकरी-संघ, सांस्कृतिक मंडळे इत्यादींचा समावेश होतो. जसजसा ग्रामविकास होत जाईल तसतशी ह्या मंडळांच्या संख्येत व विविधतेत वाढ होत जाईल. शाळेचा शिक्षक या संस्थांना मार्गदर्शन करू शकेल व अशा अधिकाधिक संस्थांची निर्मिती तो करू शकेल. ह्या संबंधित संस्था मूल संस्थांना पूरक असल्या पाहिजेत. पंचायत-राज्याच्या वतीने आपापल्या क्षेत्रात त्या पंचायतींची योजना पूर्ण करण्याचे कार्य हाती घेतील. जनतेचा उत्साह चालू ठेवतील व त्यांचे सक्रीय सहकार्य मिळवतील. अशा प्रकारे गावाच्या सर्वांगीण विकासात यांचा व यांच्यातर्फे जनतेचा संपूर्ण हातभार लागेल.

**नवी ग्रामरचना**

बदलत्या ग्रामरचनेचे हे असे चित्र आहे. ग्रामपंचायत ही गावाच्या मंत्रिमंडळासारखी आहे व ग्रामसभा लोकसभेसारखी आहे. हे मंत्री आपला कारभार हाकताना व ग्रामविकास करताना वारंवार ग्रामसभेचा सल्ला व मार्गदर्शन घेत आहेत. नवीन विचारांची देणगी त्यांना शाळेकडून मिळत आहे. सहकारी संस्थांच्या दुबारा ते आर्थिक व्यवहार पार पाडत आहेत, तर सांस्कृतिक जीवनाची घडण संबंधित संस्थांच्या द्वारा घडवीत आहेत. गाव म्हणजे एखाद्या कुटुंबासारखे आहे व आपले तंटेबखेडे ग्रामीण लोक पंचायतीमार्फत सलोख्याने मिटवीत आहेत. सर्व लोकांच्या मनांत विचार हाच आहे की, हा गाव माझा आहे व त्याच्या विकासांतच माझा विकास आहे. माझ्या श्रद्धेत, चिकाटीत, प्रामाणिकपणात व अविरत परिश्रमांतच गावाचा व पर्यायाने देशाचा विकास अवलंबून आहे. अशा प्रकारची जाणीव प्रत्येक व्यक्तीत निर्माण होणे हाच पंचायत राज्याचा अंतिम निकष मानता येईल.

या दृष्टीने विचार करता सामूहिक विकास साधण्यासाठी काही विवक्षित कसोट्यांना पंचायत राज्य उतरले पाहिजे. या कसोट्या खालील स्वरूपाच्या होत :—

(१) राष्ट्रीय दृष्टिकोणातून सर्वांत अधिक महत्त्वाची असलेली गोष्ट म्हणून शेतीचे उत्पादन वाढले पाहिजे.

(२) ग्रामीण उद्योगधंद्यांच्या वाढीला प्रोत्साहन मिळाले पाहिजे.

(३) अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकारी संस्था स्थापन करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

(४) उपलब्ध मनुष्यबळाचा पुरेपूर उपयोग केला जाऊन त्यात व स्थानीय साधनसामुग्रीत वाढ झाली पाहिजे.

(५) पंचायत राज्य-संस्थांना वरून मदतीदाखल मिळणाऱ्या पैसा, कर्मचारी-वर्ग, तांत्रिक मदत व अन्य सवलती ह्यांचा कमाल उपयोग केला गेला पाहिजे.

(६) खेड्यांतील आर्थिकदृष्ट्या दुबळ्या वर्गांना मदत दिली गेली पाहिजे.

(७) खाजगी संस्थांना भरपूर वाव देऊन आपल्या अधिकाराचा व पुढाकार घेण्याच्या वृत्तीचा सर्व दृष्टींनी प्रागतिक स्वरूपात वापर केला गेला पाहिजे.

(८) सरकारी अधिकारी व गैरसरकारी व्यक्ति ह्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली पाहिजे.

(९) व्यापक प्रशिक्षण व शिक्षण आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्यांची स्पष्ट वाटणी ह्यामुळे जनतेचे प्रतिनिधी व जनतेचे सेवक ह्यांच्यात योग्य समज आणि सुसंवाद स्थापन झाला पाहिजे.

(१०) समाजात एक प्रकारची एकसंधता आणि सहकारी तत्त्वावर आत्मोन्नती करण्याची वृत्ती बाणली गेली पाहिजे.

या कसोट्यांना उतरणाऱ्या पंचायत-राज्यांतूनच आमचे नव्या ग्रामजीवनाचे स्वप्न हळूहळू साकार होत जाणार यात शंका नाही.

# परदेशांतील ग्रामशिक्षण : ७

प्रस्तुत प्रकरणात परदेशांतील ग्रामशिक्षणाच्या प्रमुख प्रयोगांविषयी स्थूल चर्चा करण्याचे योजिले आहे. ह्या देशांपैकी काही देश प्रगत आहेत; तर काही अप्रगत आहेत. या ठिकाणी ग्रामशिक्षणासंबंधी जे खास प्रयोग झाले ते या पुनर्रचनेच्या काळात आपणांस निश्चित मार्गदर्शक होण्यासारखे आहेत. प्रत्येक देशातील ग्रामशिक्षणाचे स्वरूप व त्यासंबंधीचे प्रयोग यांची चर्चा करणे मनोरंजक व बोधप्रद असले तरी या पुस्तकाच्या मर्यादेमुळे येथे तसे करता येणे शक्य नाही. म्हणून काही निवडक देशांतील निवडक प्रयोगांची चर्चा आवश्यक ती पार्श्वभूमी देऊन येथे करण्याचा विचार आहे.

**अमेरिका :**

उद्योगप्रधान देशात सर्व जगाच्या अग्रभागी असूनही ग्रामशिक्षणाबाबत अमेरिकेने दाखविलेली आस्था व उत्साह काही आगळाच आहे. तसे पाहिले तर, १९५० पर्यंत अमेरिकेतील २ ३/५ लोक खेड्यांत राहत होते. १९५८ मध्येही हे प्रमाण ३६% होते. त्यामुळे ग्रामशिक्षणाकडे दुर्लक्ष करणे अमेरिकेला शक्य नव्हते. त्यातही सार्वत्रिक शिक्षणाचे महत्त्व त्यांनी प्रथमपासून ओळखले होते. अमेरिकन स्वातंत्र्याचा एक जन्मदाता जेफर्सन ह्याच्या मताप्रमाणे ‘शिक्षणाच्या संपूर्ण योजनेचे अंतिम उद्दिष्ट देशातील सर्व मुलांना लेखन, वाचन व सामान्य

गणित शिकवणे हे होय. स्वाभाविकच खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाची सोय करणे हे सरकारचे एक प्रमुख कर्तव्य झाले. म्हणूनच १९३० साली व्हाइट हाऊस कॉन्फरन्सने जी बालकांची सनद ( The Children's Charter ) जाहीर केली, त्यातील १७ व्या कलमानुसार ग्रामीण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व अन्य सवलतींचा हक्क मान्य करण्यात आला. हा हक्क पुढील प्रकारचा आहे— प्रत्येक ग्रामीण बालकाला शहरातील बालकांप्रमाणेच चांगल्या प्रकारचे शिक्षण व आरोग्य-सेवा मिळणे आणि खेड्यातील कुटुंबाप्रत सामाजिक, मनोरंजक व सांस्कृतिक सवलतींचा विस्तार होणे. यामुळे अमेरिकेमध्ये ग्रामीण विभागातील मुलांच्या आणि प्रौढांच्याही शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे प्रयोग आर्थिक विकास–योजनेबरोबर झाल्याचे आढळून येते.

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास सुरुवातीच्या काळात अमेरिकेस एक-शिक्षकी शाळांचा अपरिमित फायदा झाला हे विसरून चालणार नाही. ह्या शाळा प्रामुख्याने ग्रामीण विभागात असत व त्यांचे संचालन स्थानिक शालेय विभागाकडून (Local School District) करण्यात येई. १९३७–३८ मध्ये ५२·८% शाळा अशा प्रकारच्या शाळा होत्या. या शाळांमध्ये काही उणिवा निश्चित होत्या. येथील एका शिक्षिकेस अनेक इयत्ता शिकवाव्या लागत. शाळेत वय, अनुभव व आवडी इत्यादीत खूप अंतर असलेले अनेक प्रकारचे विद्यार्थी असत. त्यांच्या गरजा वेगवेगळ्या असत. त्यांना शिकविण्याचे विषय अनेक असत. त्यामुळे शिक्षिकेची शिकवताना तारांबळ उडे. बरे खेड्यात काम करणारी ही शिक्षिकाही बहुधा प्रशिक्षित नसे. केवळ बुडत्याला काडीचा आधार म्हणून खेड्यात तिने नोकरी स्वीकारलेली असे व दुसरी नोकरी मिळताच किंवा लग्न होताच ती शाळेला रामराम ठोकीत असे. शिक्षिकेची निवडही अनेकदा तिच्या गुणांपेक्षा शालेय विभागाच्या संचालकाच्या मर्जीला अनुसरून होई. परंतु ह्या एक-शिक्षकी शाळेत सुधारणा करण्याचे प्रामाणिक प्रयत्न अव्याहत चालू राहिले. ते खालील प्रकारचे होत :

( १ ) एकशिक्षकी शाळांतील वर्गांची संख्या ८ ऐवजी ५ किंवा ६ करण्याचे प्रयत्न करण्यात आले. यासाठी जोड-वर्गांची योजना आखण्यात आली.

( २ ) या शाळांतील अभ्यासक्रम परिस्थितीस अनुसरून बदलण्यात आला.

( ३ ) नॉर्मल स्कूल, हायस्कूल व कौंटी ट्रेनिंग स्कूलमधून ग्रामप्रधान अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले.

( ४ ) शाळांमधून गरम आहार, मोफत क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साधने ह्यांची सोय करण्यात आली.

(५) मुलांची ने-आण करण्यासाठी शालेय बसची व्यवस्था करण्यात आली.

(६) सर्व सोयींनी सुसज्ज असलेल्या केंद्र-शाळा काढण्यात आल्या.

(७) रेडिओ, टेलिव्हिजन व पत्रव्यवहारद्वारा अभ्यासक्रम, ह्यांचा शक्यतो उपयोग करण्यात येऊ लागला.

(८) ग्रामीण शाळांबाबतच्या प्रयोगांना व संशोधनास चालना देण्यात आली.

या प्रयोगांतूनच ग्रामीण समाज–शाळेची ( Rural Community School ) कल्पना निर्माण झाल्याचे आढळून येईल. या समाज–शाळेचे मुख्य उद्दिष्ट सामाजिक जीवनाचा शाळेत प्रवेश करणे व शाळेच्या सहाय्याने समाजाचा विकास करणे हे होय. शाळा ही समाजापासून अलिप्त राहता कामा नये. उलट तिच्या सहाय्याने ग्रामीण जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजे. ग्रामीण समाजाला लोकशाहीची मूल्ये तिच्यापासून मिळाली पाहिजेत. त्याचप्रमाणे शाळेच्या भरभराटीची जबाबदारी समाजाला वाटली पाहिजे. समाजशाळेच्या मागची भूमिका ही अशी आहे. म्हणून एडवर्ड जी. ओल्सेन् ह्यांच्या मताप्रमाणे समाजशाळेची कर्तव्ये खालील होत :

(१) जनतेच्या आवडी व गरजा ह्यांमधून आपली उद्दिष्टे विकसित करणे.

(२) आपल्या कार्यक्रमात समाजातील विविध प्रकारच्या वेगवेगळ्या साधनांचा उपयोग करणे.

(३) शाळा व समाज ह्यांतील निरनिराळ्या कृतींतून लोकशाही प्रत्यक्षात उतरविणे व तिचा विकास करणे.

(४) मानवी जीवनातील प्रमुख प्रक्रिया व प्रश्न यांभोवती मूलभूत अभ्यासाची उभारणी करणे.

(५) सामूहिक जीवनाच्या योजनाबद्ध व सहकारनिष्ठ विकासाचे नेतृत्व करणे.

(६) सर्वसामान्य हित व आपापसातील संबंध यावर आधारित सहकारी सामूहिक प्रयोगात भाग घेण्यास विद्यार्थ्यांस व प्रौढांस प्रवृत्त करणे.

'कुक'च्या पुढील आकृतीवरूनही शाळा व समाज ह्यांचा संबंध कसा प्रस्थापित केला जातो ह्याची कल्पना येऊ शकेल.




समाजविकासाच्या कार्यांत अमेरिकेतील विद्यापीठेही मागे नाहीत. उलट प्रत्यक्ष कार्य, प्रयोग व संशोधन ह्यांच्या सहाय्याने ह्या विद्यापीठांनी ग्रामीण विकासाबाबत अमूल्य असे कार्य केले आहे. विद्यापीठांचे हे कार्य शेतकी महाविद्यालयांच्या विस्तारकार्याच्या योजनेनुसार केले जाते. या शेतकी महाविद्यालयांना भल्या मोठ्या जमिनीच्या देणग्या निरनिराळ्या सरकारी कायद्यांनुसार गेल्या ७५ वर्षांत मिळाल्या आहेत. १८९० पर्यंतचे दोन मॉरिल ॲक्ट, १९१४ चा स्मिथ लिव्हर किंवा को-ऑपरेटिव्ह ॲग्रिकल्चरल एक्स्टेन्शन ॲक्ट, १९१७ चा स्मिथ ह्यूग्ज ॲक्ट व १९३५ चा ब्लॅंक हेड-जोन्स ॲक्ट यांमुळे ग्रामीण विभागात विस्तारकार्य करण्यास व ग्रामविकासासंबंधी संशोधन व प्रयोग करण्यास प्रतिवर्षी लक्षावधी डॉलर्स या उच्च शिक्षणसंस्थांना उपलब्ध होऊ लागले. यांचा उपयोग खालील प्रकारे करण्यात येतो :—

(१) **शिक्षण** : यामध्ये पदवीपर्यंतचे व पदव्युत्तर अभ्यासक्रम ह्यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे पदवी घेऊ न शकणारांसाठी दोन वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम व प्रौढ-शिक्षणाचे कार्यक्रम या महाविद्यालयांकडून आयोजित केले जातात.

(२) **संशोधन** : प्रत्येक संस्थेत एक मुख्य प्रयोगकेंद्र व त्याला जोडून उपकेंद्रे व शेतीच्या प्रयोगशाळा असतात. यांतून शेती, खते, पशुधन, जमीन, दुग्धालय, पिकांचे रोग इत्यादी अनेक बाबींवर संशोधन होते. त्याच्या सहाय्याने ग्रामीण उत्पादनात अफाट प्रगती झाल्याचे आढळून येते.

( ३ ) **विस्तारकार्य** : याचे मुख्य तत्त्व ग्रामीण लोकांच्या 4H कडे म्हणजे Head, Heart, Hand व Health ह्यांकडे लक्ष देणे हे होय.

याचाच अर्थ लोकांच्या बौद्धिक, सांस्कृतिक, व्यावसायिक व आरोग्य-विषयक गरजांच्या पूर्तीसाठी कार्यक्रम आखणे हा होय. असे कार्यक्रम आखताना तीन प्रमुख तत्त्वे विचारात घेतली जातात. एक म्हणजे ते कार्यक्रम लोकांच्या गरजांवर अधिष्ठित आहेत. दुसरे म्हणजे त्या कार्यक्रमांत जनतेचे संपूर्ण सक्रीय सहकार्य आहे व तिसरे म्हणजे विस्तारकार्याचा संबंध वाढत्या ज्ञानाशी व बदलत्या जगाशी सतत ठेवला जात आहे. या विस्तारकार्यात खालील गोष्टींचा प्रमुख्याने समावेश होतो :

( १ ) **विस्तार-शाळा**— शेती, स्थापत्य, गृहशास्त्र यासंबंधीची एक-दोन दिवसांची प्रात्यक्षिके, चर्चा, प्रयोग इत्यादी.

( २ ) **शेती-विस्तार**— शेतीस भेटी, प्रात्यक्षिके, विस्तार-सहली, शेती दिवस इत्यादींच्या साहाय्याने शेती-विकासास मदत करणे.

( ३ ) **स्थापत्य-विस्तार**—स्थापत्यशास्त्राचा शेतीस कसा उपयोग करून घेता येईल या दृष्टीने मार्गदर्शन करणे यामध्ये नाले, पाटबंधारे, इमारत-योजना, विजेचा व यंत्रांचा उपयोग इत्यादींचा समावेश होतो.

( ४ ) **व्यापार**— सहकारी पद्धतीने मालाची खरेदी-विक्री इत्यादी.

( ५ ) पशुपालन, दुग्धपालन कुक्कुटपालन.

( ६ ) **विस्तार-वार्ता**— माहितीपत्रके, प्रकाशने, मासिक पत्रके, परिपत्रके, पत्रव्यवहार, रेडिओ व टेलिव्हिजन इ. चा उपयोग.

( ७ ) 4H **क्लब**— असे क्लब स्थापन करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या द्वारा शेतीस व ग्रामविकासास उपयुक्त अशी प्रात्यक्षिके, करणे, त्यांच्या नेत्यांच्या प्रशिक्षणाची सोय करणे.

( ८ ) **गृहप्रात्यक्षिके व गृह-अध्ययन**— गृहव्यापार, गृहसुधार, गृह-व्यवस्था, आहार, कपडे, पाकशास्त्र इत्यादींसंबंधी मार्गदर्शन.

अशा रीतीने ग्रामीण जनतेच्या विविध गरजांची पूर्ती करण्याचे काम या उच्च शिक्षण संस्थांकडून अमेरिकेत होत असते. ज्युनिअर कॉलेज व कम्युनिटी कॉलेज ह्या संस्थाही ग्रामीण जनतेच्या बौद्धिक, सामाजिक, नैतिक व शैक्षणिक विकासाचा प्रयत्न करीत असतात.

या शैक्षणिक संस्थांशिवाय शेतकऱ्यांचे संघही केवळ ग्रामीण विभागातील प्रौढांच्या शिक्षणाचे कार्य करीत असतात. यांपैकी ग्रँज, फार्मर्स युनियन व फार्म

ब्यूरो ह्या तीन प्रमुख संघटना होत. ग्रँजची स्थापना १८६७ मध्ये झाली. ह्या संस्थेचे ८६०,००० सदस्य आहेत. अमेरिकन शेतकऱ्यास शिक्षण देणे व त्याचे उत्थान करणे हा या संस्थेचा एक प्रमुख उद्देश आहे. 'शाळेबाहेरील एक विशाल शाळा' ह्या शब्दांत ह्या संस्थेचे वर्णन केले जाते. आपल्या सदस्यांसाठी विस्तृत शैक्षणिक कार्यक्रम या संस्थेकडून आखला जातो. अमेरिकन फॉर्म ब्यूरो ही संघटना ग्रँजइतकी जुनी नसली तरी त्याहून मोठी आहे. १९१२ साली हिच्या कामाला सुरुवात झाली. हिचे १,५००,०००० सदस्य आहेत. अमेरिकन शेतकऱ्यांच्या व्यावसायिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक हिताची वृद्धी करणे, त्यास संरक्षण देणे व त्याचे प्रतिनिधित्व करणे आणि शेतीचा विकास करणे हे ह्या संस्थेचे उद्दिष्ट आहे. विद्यापीठाच्या विस्तारकार्यास ह्या संस्थेकडून पूर्ण सहयोग मिळतो व त्यांतून शेतकऱ्यांच्या शिक्षणाचे कार्य प्रचंड प्रमाणावर केले जाते. फार्मर्स युनियन ही संघटनाही वरील दोहोपेक्षा शैक्षणिक कार्यात बिलकुल मागे नाही. १९०२ साली स्थापन झालेल्या ह्या संस्थेचे २५,००० कुटुंबसदस्य आहेत. ह्या संस्थेची निशाणी त्रिकोण ( △ ) आहे ह्या त्रिकोणाच्या तीन भुजा म्हणजे कायदा, सहकार्य व शिक्षण ह्या आहेत. यावरून ही संस्था शिक्षणाला शेतीविकासाच्या कामांत किती महत्त्व देते हे दिसून येईल. ह्या संस्थेचा शिक्षणविषयक व सहकारविषयक स्वतःचा खास कार्यक्रम असून वर्ग, शिबिरे, सामूहिक योजना, परिषद, परिसंवाद, साप्ताहिक पत्रिका इत्यादी द्वारे तो कार्यक्रम पार पाडला जातो.

ग्रामीण शिक्षणाच्या कार्यात अमेरिकन चर्चचा वाटा पहिल्यापासून चालत आलेला आहे. आज बदलत्या परिस्थितीनुसार चर्चही आपल्या कार्यात इष्ट फेरबदल करून आपल्या मर्यादेच्या कक्षेत ग्रामशिक्षणाचे कार्य करीत आहे. ग्राम-शिक्षणाच्या कार्यात मोठा वाटा वाचनालयाने उचललेला आहे. अमेरिकेतील रूरल लायब्ररी सर्व्हिसचा फायदा ५० % ग्रामीण जनता घेत आहे. कोणत्याही ग्रामीण व्यक्तीला आपल्या आवडीप्रमाणे व गरजेप्रमाणे अत्यंत अल्पकाळात येथून पुस्तके उपलब्ध होऊ शकतात. त्याचप्रमाणे चर्चा, परिसंवाद, प्रकाशन, दृक्-श्राव्य साधने, व्याख्याने इ. च्या साहाय्याने ग्रामीण विभागात ज्ञानदानाचे कार्य ग्रामीण वाचनालय अत्यंत सूत्रबद्ध रीत्या करीत आहे.

अमेरिकेतील ग्रामशिक्षणाचे व ग्रामविकासाचे कार्य अशा रीतीने सरकार, शाळा व विद्यापीठे, खाजगी संस्था व प्रत्यक्ष ग्रामीण जनता यांच्या सहकार्याने चालले आहे, त्यामागे योजना आहे, तळमळ आहे, प्रामाणिकपणा आहे व उत्साह आहे. अमेरिकेच्या प्रगतीचे व समृद्धीचे मूळ ग्रामविकासाच्या या प्रभावी व प्रचंड कार्यात आहे हे आपणास विसरून चालणार नाही.

## सोव्हिएट रशिया :

ग्रामशिक्षणाच्या बाबतीत अल्पावधीत अत्यंत आश्चर्यकारक प्रगती सोव्हिएट रशियाने करून दाखवली आहे. १९२६ साली फक्त शे. १७·९% लोक शहरात राहत होते. १९५६ साली हीच संख्या शे. ४३·४% वर गेली. १८९७ मध्ये १९·६% लोक काय ते साक्षर होते व स्त्रिया तर फक्त ८·६% टक्के साक्षर होत्या. १९३९ मध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ७६·८% व ६६·६% यावर गेले. आज तर निरक्षर स्त्री किंवा पुरुष औषधालाही मिळणे कठीण झाले आहे. ज्या खेड्यामध्ये झारच्या अमदानीत शेतकऱ्याच्या पोटाकडेही पाहिले जात नव्हते त्याच खेड्यात आज केवळ त्याच्या पोटाचीच नाही तर त्याच्या बुद्धीची, आरोग्याची, आरामाची, व संस्कृतीची यथायोग्य काळजी घेतली जात आहे. क्रांतिपूर्व काळातला दुबळा, अडाणी, भ्याड व निराशावादी खेडूत आता सुखी, सशक्त, निर्भीड व बुद्धिवान सोव्हिएट नागरिक बनला आहे. रशियन ग्रामशिक्षणाचे यश यातच साठविलेले आहे.

रशियन खेड्यातील शिक्षणाची जबाबदारी स्थानिक शिक्षणाधिकाऱ्याकडे सोपविलेली असते. त्यांचा कारभार रिपब्लिकच्या शिक्षण मंत्रालयाच्या कक्षेत येतो. ७ वर्षांचे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्याने खेड्यांतसुद्धा ७ ते १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना मोफत शिक्षण मिळण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. या शिक्षणाचे वैशिष्ट्य हे आहे की, शिक्षणानंतर शेतीचा व्यवसाय त्यांना ताबडतोब मिळतो व त्यामुळे खेडे सोडून शहराकडे पलायन करण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण होत नाही. १९४२ च्या आदेशाप्रमाणे खेड्यातील कनिष्ठ व उच्च माध्यमिक शाळेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे ठरविण्यात आली : ( १ ) शेतीच्या मूलतत्त्वाचे ज्ञान व शेतीवर सुबुद्धपणे व समाधानकारकपणे काम करण्याचे प्रावीण्य विद्यार्थ्यांस प्राप्त करून देणे. ( २ ) शाळेमध्ये दिले जाणारे शास्त्राचे ज्ञान दृढ करणे व त्याचा विकास करणे. ( ३ ) शेतीच्या जीवनाबद्दल व कामाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आस्था व प्रेम उत्पन्न करणे. याचप्रमाणे यंत्रज्ञानाचा उपयोग शेतीच्या उत्पादनासाठी व पशुपालनासाठी कसा करून घ्यावा हाही हेतू ग्रामीण शाळेचा असतो.

या उद्दिष्टांना अनुसरून ग्रामीण माध्यमिक शाळेचा अभ्यासक्रम आखलेला असतो. अर्थात ह्याची पूर्वतयारी प्राथमिक शाळेतच सुरू होते. इतर सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच विविध तांत्रिक स्वरूपाचे प्राथमिक ज्ञान, कौशल्य व सवयी विद्यार्थी येथे प्राप्त करतात. म्हणून काम व प्रायोगिक अभ्यास ह्यासाठी आठवड्यातून १२ व वर्षातून ४०८ तास राखून ठेवलेले आढळतात. ८ व्या इयत्तेपासून ‘ उत्पादनाची मूलतत्त्वे ’ शिकवण्यास सुरुवात होते व यासाठी

१० वीपर्यंत प्रत्येक आठवड्यास चार तास दिले जातात. शाळेतील अभ्यासक्रम खालील स्वरूपाचा असतो :—

| | | |
|---|---|---|
| इ. ८ वी— | पिकांची वाढ | ६० तास |
| | शेतीच्या यंत्रांचा अभ्यास | ५९ तास |
| इ. ९ वी— | पशु-उत्पादन | ६८ तास |
| | दिलेल्या जिल्ह्यातील शेतीच्या एका शाखेचा अभ्यास | ६८ तास |
| इ. १० वी— | ट्रॅक्टर किंवा मोटरगाडी | ६८ तास |
| | विजेचा उपयोग | ६८ तास |

या अभ्यासक्रमाशिवाय शेतीच्या प्रायोगिक शिक्षणासाठी या प्रत्येक इयत्तेस दिवसातून ६ तास कामाचे दोन आठवडे राखले जातात. प्रत्येक शाळेचा स्वतःचा अर्ध्या ते पाच एकरांपर्यंतचा मळा असतो. याचा उपयोग प्रयोग करण्यासाठी केला जातो. सभोवतालच्या सामुदायिक व सहकारी शेतीशी त्याचा निकटचा संबंध असतो व ह्या दोहोंच्या कार्यांचा परस्परांना फायदा होतो. ग्रामीण विभागाच्या प्रादेशिक अभ्यासावर इतिहास, भूगोल इत्यादी विषय आधारलेले. या विभागात मिळणारी खनिज द्रव्ये, वनस्पती, किडे, माती, ग्रामगीते, ऐतिहासिक साधने इत्यादींचे प्रादेशिक संग्रहालय बनविण्यास शाळेस उत्तेजन दिले जाते. अशा तऱ्हेने पेन्झा प्रदेशातील ॲटमिस कनिष्ठ माध्यमिक शाळेने निर्माण केलेल्या वस्तुसंग्रहालयाचे तर राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात रूपान्तर करण्यात आले. ग्रामीण जीवनाशी विद्यार्थ्यांचा घनिष्ठ संबंध येण्यासाठी ही वस्तुसंग्रहालये फार उपयुक्त पडतात. यासाठी ग्रामीण विभागातील सहलीचाही पद्धतशीर उपयोग या शाळांतून केला जातो.

ग्रामीण विभागात शिक्षणाचा अधिकाधिक प्रसार व्हावा यासाठी खालील गोष्टींकडे विशेष लक्ष दिले जाते :—

(१) शाळांच्या जाळ्याचा सयुक्तिक विकास व नवीन माध्यमिक शाळांची निर्मिती.

(२) शाळेपासून तीन किलो मिटरपेक्षा अधिक दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात्मक शाळांची सोय.

(३) प्रत्येक प्राथमिक शाळेसाठी ५ एकर व दुय्यम शाळेसाठी ३० ते १२० एकरांएवढी जमीन नमुनेदार शेतीसाठी देणे.

(४) शाळेच्या इमारतींची संख्या वाढविणे.

(५) गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांस मदत करणे, विशेषतः बेवारशी व दुर्दैवी कुटुंबातील विद्यार्थ्यांकडे खास लक्ष पुरविणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५१८८८ वि: १०।५६
क्रमांक २०८५ नों: दि: २५।३।७१


(६) एक-शिक्षकी शाळांतील शिक्षकांस १५ हून अधिक विद्यार्थी झाल्यास त्या प्रमाणात अधिक पगाराची सोय.

(७) दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची स्थानिक, सोव्हिएट किंवा सामुदायिक मळ्यातर्फे बसची व्यवस्था.

(८) रेडिओचा शिक्षणासाठी उपयोग.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. ९५९६४

शेतावर काम करणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून किसान युवकांच्या शाळा (Schools for Peasant Youth) स्थापन केलेल्या आहेत. ज्यांची शिकण्याची इच्छा आहे ते येथे शिक्षण घेताना दिसतात. १९४३ च्या आदेशानुसार १० वर्षांचा माध्यमिक शाळेचा अभ्यासक्रम ज्या किसान युवकांनी पार पाडला नसेल त्यांच्या शिक्षणाची सोय पुरेशी संख्या असल्यास त्या कृषिक्षेत्राला स्वतः करावी लागते. अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यासाठी मोकळा वेळ देण्यात येतो व ७ व्या व १० व्या इयत्तांच्या परीक्षेसाठी बसण्यासाठी आवश्यक ती सुट्टी दिली जाते. शाळेचे विभाजन तीन कालखंडांत केले जाते व प्रत्येक कालखंडात काही विशिष्ट विषय शिकविले जातात. अभ्यासक्रम, अध्यापनपद्धति, क्रमिक पुस्तके इत्यादी बाबतीत या विद्यार्थ्यांना अनुरूप असा वेगळा दृष्टिकोण बाळगण्याचा प्रयत्न केला जातो.

ग्रामीण विभागातील प्रौढांच्या शिक्षणाची सोय अनेक मार्गांनी केली जाते. प्राथमिक व दुय्यम शिक्षण खेड्यातील सर्व प्रौढांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यावर असते. प्रौढांच्या शाळा आठवड्यातून चार दिवस सायंकाळी भरविल्या जातात. या शाळांत आधुनिक साधन सामुग्रींनी सुसज्ज अशा प्रयोगशाळा, उत्तम वाचनालये व निरनिराळ्या विषयांच्या खोल्या आढळून येतात. वर्षाचे दोन कालखंड पाडून निरनिराळे विषय क्रमाक्रमाने शिकविण्याची सोय येथे केली जाते. या शाळांतून विशिष्ट दर्जा प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संस्थांतून किंवा विद्यापीठांमधून प्रवेश मिळू शकतो.

दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पत्रद्वारा शिक्षण दिले जाते. त्यासाठी प्रत्येक विभागात पत्रशाळेच्या प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास-मार्गदर्शन केंद्र उघडले जाते. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सामूहिक मार्गदर्शन मिळू शकते. पत्रशाळेकडून केंद्राला आवश्यक ते विशिष्ट वाङ्मय व विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके पुरविली जातात.

शेतीमध्ये जे अनुभवी विद्यार्थी विशेष प्रावीण्य दाखवितात व ज्यांच्यामध्ये क्षमता, कल्पकता, विचारसंपन्नता, नेतृत्व इत्यादी दिसून येतात अशा विद्यार्थ्यांची निवड ॲग्रिकल्चरल ॲकॅडेमीसाठी करण्यात येते. त्यांना पाच वर्षे ॲकॅडेमीतील शिक्षणासाठी सुट्टी देण्यात येते. यांच्या संपूर्ण शिक्षणाची सोय तर सरकार करतेच. शिवाय कुटुंबवत्सल असल्यास कुटुंबखर्चासाठी यांना स्वतंत्र अनुदान देण्यात येते.

खेड्यातील शिक्षणाचे केंद्र म्हणजे तेथील वाचन-पर्णशाला (Reading Hut) होय. ह्या पर्णशालेच्या संचालिकेकडेच ग्रामीण संस्कृतीच्या प्रगतीचे नेतृत्व असते. गावातील प्रौढ शिक्षणाचे यश तिच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. ह्या पर्णशालेचा एक प्रमुख घटक म्हणजे वाचनालय. गावातील प्रौढांना तेथे वाचण्यासाठी व घरी नेण्यासाठी पुस्तके येथून उपलब्ध होतात. संध्याकाळच्या वेळी ही पर्णशाला गावातील नागरिकांनी भरलेली असते. त्यांच्या नाना प्रकारच्या शंकांचे समाधान येथे केले जाते. त्याशिवाय व्याख्याने, परिषदा, चर्चा, वृत्तपत्र-वाचन, संगीतसभा क्रीडामहोत्सव, महिलांसाठी दुपारचे वर्ग इ. अनेक मार्गांनी ही पर्णशाला ग्रामीण जनतेची शैक्षणिक व सांस्कृतिक भूक भागवीत असते. सुसंपन्न वाचनालय, व्याख्यानासाठी प्रशस्त खोली ह्यामुळे ही पर्णशाळा केवळ नावानेच ( hut ) राहिली आहे.

वाचन पर्णशाळेप्रमाणेच खेड्यातून संस्कृतिगृहांची (Houses of culture) स्थापना झाल्याचे आढळून येईल. अशा प्रकारची संस्कृतिगृहे व त्याच धर्तीची निरनिराळी मंडळे ह्यांची जाळी सर्व शहरापेक्षा अधिक प्रमाणांत खेड्यापाड्यांतून पसरलेली आढळून येतात. १९५७ साली अशा संस्था सर्व रशियात एकूण १२६,३६१ होत्या व त्यांपैकी फक्त ११,४४९ शहरांत होत्या तर ११४,९३१ खेड्यांत होत्या. यांपैकी २४,००० हून अधिक मंडळे सामुदायिक शेतीकडून चालविली जात होती.

खेड्यात शिक्षणाचे काम करणाऱ्या इतर शिक्षण-संस्थांत व्याख्यान-केंद्र ( Lecture Bureau ) व वाचनालय यांचा समावेश होतो. स्थानिक मंडळाकडून व्याख्यानकेंद्राचे संचालन होते व निरनिराळ्या विषयांवर व्याख्यान वा व्याख्यानसत्र चालविले जाते. या बाबतीत विद्यापीठे सुद्धा पुढाकार घेतात. वाचनालयांनी केलेले शैक्षणिक कार्यही विस्मयकारक असे आहे. प्रत्येक खेड्यांत वाचनालय हे आवश्यकच झालेले आढळून येते. वाचनाशिवाय माहिती-केंद्र, व्याख्यानकेंद्र, चर्चा-स्थान इत्यादी प्रकारेही वाचनालयाचा उपयोग केला जातो. फिरत्या वाचनालयाच्या सहाय्याने देशाच्या अगदी कानाकोपऱ्यातील झोपडीपर्यंत ज्ञानगंगा जाऊन पोहोचलेली दिसते. १९५६ साली रशियात ३९१,९५२ वाचनालये होती. त्यांत १३५ कोटी २० लाख पुस्तके होती. म्हणजेच प्रत्येक नागरिकासाठी सरासरीने ७ पुस्तके होती.

वस्तुसंग्रहालय, संस्कृती व विश्रांती-उद्याने व निरनिराळे उत्सव, यांचाही उपयोग रशियात ग्रामीण जनतेच्या विकासासाठी करून घेतला जातो. जुन्या परंपरांना नवे वळण देऊन ग्रामीण जनतेला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्नही सुबुद्धपणे केला जातो. अशा तऱ्हेने अत्यंत मागासलेल्या अडाणी व खंडप्राय देशात

सोव्हिएट सरकारने केवळ साक्षरता व सुशिक्षितपणा यांचा प्रसार केला नाही, तर त्याबरोबरच संपूर्ण जनतेचा दृष्टिकोण बदलून तिला शास्त्रीय व आधुनिक ज्ञानाच्या सहाय्याने स्वतःची प्रगती करून येण्याची संधी उपलब्ध करून दिली. रशियातील ग्राम-शिक्षणाच्या प्रयोगावरून ही गोष्ट आपणास निश्चित शिकता येण्यासारखी आहे.

इंग्लंड :

ग्रामीण शिक्षणाबाबत इंग्लंडमधील एक प्रयोग उल्लेख करण्याजोगा आहे आणि तो म्हणजे ग्रामीण महाविद्यालयांचा. यांना Village किंवा Community Colleges म्हणून संबोधिले जाते. सुरुवातीला १९३० मध्ये इंपिंग्टन येथे असे ग्रामीण महाविद्यालय उघडण्यात आले. याची मूळ कल्पना केंब्रिजशायर कौन्सिलचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मि. हेन्री मॉरिस ह्यांची होती. खेड्यातील बुद्धिमत्ता खेड्यातच राहावी ही ह्या प्रयोगामागची प्रमुख भूमिका होती.

या ग्रामीण महाविद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे मुलांचे शिक्षण व प्रौढांचे शिक्षण ह्या दोहोंची व्यवस्था एकाच ठिकाणी करण्यात आली आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय गावातील मुलांसाठी शाळेच्या इमारतीत होते. पाचनंतर प्रौढांच्या शिक्षणासाठी ही इमारत मोकळी राहते. इंग्लंडमधील प्रौढ शिक्षणाचा मुख्य उद्देश प्रौढास स्थानिक वसतिस्थान व नाव मिळवून देणे व लोकांना क्लबच्या मनोहर वातावरणात आपल्या फावल्या वेळच्या छंदांच्या विकासाला पूर्ण वाव देणे हा होय. त्या दृष्टीनेच या महाविद्यालयाची रचना केलेली असते. त्यामुळे येथे शाळेच्या सुंदर इमारतीबरोबरच रम्य उद्यान, चित्रपटगृह, उपाहारगृह, वाचनालय, क्रीडांगण, व्यायामशाळा इत्यादी गोष्टी आढळून येतात. थोडक्यात हे महाविद्यालय समाजकेंद्र म्हणून यशस्वी रीत्या काम करते. १९३७ सालच्या Physical Training and Recreation Act मुळे अशा केंद्रांना सरकारकडून प्रोत्साहन व आर्थिक मदत मिळू लागली.

या महाविद्यालयांचा सर्व खर्च काउंटी कौन्सिलकडून केला. सदस्यांना केवळ नाममात्र वर्गणी द्यावी लागते. गावातील सर्व शैक्षणिक व सामाजिक चळवळीचे केंद्रस्थान म्हणजे हे महाविद्यालय असते. गावातील युवक-मंडळ, महिला-मंडळ इत्यादी अनेक ऐच्छिक संस्थांचे मूळ येथे सापडते. ग्रामीण जनतेत स्वावलंबन, आत्मविकास व उत्साह ह्यांचे वातावरण ह्या महाविलयामुळे, निर्माण होते. त्याचप्रमाणे आपल्या परिसरांतील खेड्यांना शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने जवळ आणण्याचे कार्यही हे महाविद्यालय करते.

लोकशाहीयुक्त कारभार हे एक आणखी वैशिष्ट्य या महाविद्यालयाचे असते. या महाविद्यालयातील भिन्न भिन्न कार्यक्रम सदस्यांनी निवडून दिलेल्या उपसमित्यां-

करून आखले जातात. महाविद्यालयाचा शिक्षकवर्ग मार्गदर्शक व मित्र म्हणून काम करतो.

लिंटन येथे या धर्तीचे एक आदर्श ग्रामीण महाविद्यालय काम करीत आहे. त्याने साध्य केलेल्या गोष्टींच्या आधारे आपणास या महाविद्यालयांच्या कार्याचे सर्वसाधारण स्वरूप जाणून घेता येईल. या गोष्टी खालीलप्रमाणे होत :

( १ ) शाळा व समाज ह्यांतील अंतर नष्ट करण्यात आले. ( २ ) खेड्यातील जीवनातील एकलकोंडेपणा मोडण्यात आला व कंटाळवाणेपणा दूर करण्यात आला. ( ३ ) शहराच्या मोहाला टक्कर देणारा एक चांगला व बलशाली प्रतिस्पर्धी निर्माण करण्यात आला. सुखी व परिपूर्ण जीवन जगण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. ( ४ ) परिसरातील निरनिराळ्या खेड्यांना सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने जवळ आणण्यात आले. ( ५ ) शिक्षक व विद्यार्थी यांच्या एकत्रित राहण्यातून व अध्ययनांतून सहकारी प्रयत्नांना प्रेरणा देण्यात आली. अत्यंत उद्योगप्रधान देश असतानाही इंग्लंडने आपल्या खेड्यांतील शिक्षणाची आबाळ केली नाही हे या प्रयोगावरून लक्षात ठेवण्यासारखे आहे.

**फ्रान्स :**

फ्रान्सचे वैशिष्ट्य हे आहे की, युरोपातील औद्योगिक दृष्ट्या हा एक प्रगत देश असूनही तो अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. ४ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या या देशातील निम्मी जनता खेड्यांतून राहते. शेतकऱ्या-पाशी असलेली जमीनही विशेष मोठी असत नाही. सरासरीने प्रत्येकाची जमीन २४ एकर भरते. परंतु या जमिनीचा फ्रेंच शेतकरी कौशल्याने व आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्या सहाय्याने भरपूर उपयोग करून घेताना आढळून येतो. याला कारण म्हणजे शेती व शिक्षण यांची अविभाज्य सांगड फ्रान्समध्ये घालण्यात आली आहे. हीच फ्रान्समधील ग्रामीण शिक्षणाची विशेषता होय.

अगदी प्रथमतः ग्रामीण प्राथमिक शाळेतच शेती व ग्रामीण वातावरण यास अनुकूल असा अभ्यासक्रम ठेवला जातो. शास्त्राचा उपयोग शेतीकडे कसा करून घेता येईल हे शेवटच्या इयत्तेत शिकविण्यात येते. ग्रामीण लोक, त्यांची घरे, चालीरीती, सवयी इत्यादी व आधुनिक कालानुरूप त्यांतील इष्ट सुधारणा यांची कल्पना प्राथमिक शाळेतच विद्यार्थ्यांना मिळते. त्याचप्रमाणे जमीन, पिके, पशुपालन शेतीचे आधुनिकीकरण याचेही ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते. शाळेतील अन्य विषयांची सांगड ग्रामीण जीवनाशी घातली जाते व शिक्षणाधिकारी अभ्यासक्रमाचा स्थानिक परिस्थितीशी समवाय कसा घालावा याचे मार्गदर्शन शिक्षकांना करतात.

अखंडित अभ्यासक्रमातून ( Continuation Courses ) शेती किंवा शेती आणि गृहशास्त्र यांचे शिक्षण ग्रामीण मुलामुलींस प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमानंतर म्हणजे वयाच्या ११-१२ व्या वर्षानंतर मिळते. यामध्ये नागरिकशास्त्र, हस्तव्यवसाय व शास्त्र हे विषय ग्रामीण गरजांना अनुसरून शिकवले जातात. १४ ते १७ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी शालेयोत्तर अभ्यासक्रम ( Post-School Courses ) असतात. यात शेती आणि शेती व गृहशास्त्र ह्यांचे शिक्षण दिले जाते. जे विद्यार्थी इतर कोणता अभ्यासक्रम चालू ठेवीत नाहीत व ज्यांचे पालक शेतीचा धंदा करतात त्यांच्यासाठी हा अभ्यासक्रम सक्तीचा असतो. दरवर्षी ऑक्टोबर ते १५ जानेवारीपर्यंत १२० तासांचे मोफत शिक्षण खास प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांकडून ह्या केंद्रांतून दिले जाते. हे शिक्षक एका किंवा अधिक परगण्यांना ( Commune ) विशिष्ट किंवा सर्वसामान्य विषयांचे शिक्षण अशा केंद्रातून देतात. प्रत्येक केंद्राची स्वतःची एक बाग असते. सरकारी अनुदान ह्या केंद्रांना मिळते व हे परगणे स्वतः इतर खर्च करतात. विद्यार्थ्यांना येथे खर्च करावा लागत नाही.

हिवाळी शेती शाळेतून ( Winter Agricultural School ) १४ वर्षांवरील विद्यार्थ्यांस प्रवेश मिळू शकतो. येथे लागोपाठ दोन वर्षे प्रत्यक्ष मळ्यामध्ये चार महिने शेती व अन्य विषय शिकविले जातात. हंगामी शेती शाळांतून ( Seasonal Agricultural School ) तरुण शेतकरी, माळी, गवळी इत्यादींस त्या त्या विषयांतील आधुनिक ज्ञानाची ओळख करून देण्यात येते शेती व गृहशास्त्र शाळांतून ( Agricultural and Domestic School ) १५ ते १६ वर्षांच्या ग्रामीण मुलींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. वर्षांतून चार महिने फिरत्या शाळांतून हे शिक्षण देण्यात येते. याशिवाय अनेक शेती-शिक्षण केंद्रे ( Agricultural Training Centres ) फ्रान्समध्ये आहेत. या ठिकाणी आपले घर न सोडता शेतीच्या विशिष्ट शाखेचे शिक्षण शेतकऱ्यास मिळू शकते. सवसाधारणपणे २-३ वर्षांचा अभ्यासक्रम येथे ठेवलेला असतो.

अशाप्रकारे शेती व आधुनिक ज्ञान यांची सांगड घालण्याचा एक अनुकरणीय प्रयत्न फ्रान्समधील ग्रामशिक्षणात केल्याचा आढळून येतो.

**डेन्मार्क :**

डेन्मार्क म्हटले की, तेथील लोकशाळांची ( Folk High School ) आठवण होते. डेन्मार्कमधील या लोकशाळा म्हणजे जगातील प्रौढ शिक्षणाच्या चळवळीला मिळालेली अमूल्य देणगी होय. या शाळा प्रामुख्याने ग्रामीण विभागातच लोकप्रिय झाल्याने ग्रामशिक्षणाच्या इतिहासातही यांचे नाव अजरामर झाले आहे.

डेन्मार्कमधील लोकशाळांचा निर्माता बिशप निकोलाय ग्रुंडट्विग (१७८६–१८७२) हा होय. हा तेथील एक थोर राष्ट्रीय व सांस्कृतिक नेता होता. लोकशाही खरोखर यशस्वी व्हावयाची असेल, तर सामान्य माणसांना जिवंत व व्यापक शिक्षण देणे आवश्यक आहे. पारंपरिक शाळा म्हणजे केवळ मृत्युशाळा ( Schools of death ) होत. ह्यांमधून उदात्त मानवाची निर्मिती होऊ शकत नाही. त्यासाठी त्याचा बौद्धिक, आध्यात्मिक, व सांस्कृतिक विकास केला पाहिजे. अशी ग्रुंडट्विगची सर्वसाधारण विचारसरणी होती. यावरच डॅनिश लोकशाळांची उभारणी झालेली आहे.

ह्या लोकशाळांची काही वैशिष्ट्ये आपणांस अशी सांगता येतील:—येथील विद्यार्थी सर्व सामान्यतः १८ ते ३३ वर्षांचे असतात. ते प्रमुखतः शेतकरी वर्गातील खेडूत असतात. आत्मविकास हेच त्यांचे उद्दिष्ट असते. पैसा, मान किंवा प्रमाणपत्र हा त्यांच्या शिक्षणामागील हेतू नसल्याने ह्या शाळांतून परीक्षांना स्थान नसते. ह्या लोकशाळांना ग्रुंडट्विगने मुद्दामहून उच्च शाला ( High School ) म्हणून संबोधिले. कारण जनतेला बौद्धिक, सांस्कृतिक व आध्यात्मिकदृष्ट्या वरच्या पातळीवर न्यावे हीच त्याची भूमिका होती. म्हणूनच ह्या शाळांतून डॅनिश इतिहास, भाषा व वाङ्मय, प्रचलित सामाजिक प्रश्न व धर्म ह्यांचे शिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम पुरुषासाठी ४–५ महिन्यांचा व स्त्रियांसाठी २–३ महिन्यांचा असतो. स्त्रिया व पुरुष यांना वेगवेगळ्या शाळांतून शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांवर प्रभावी संस्कार करणे हे यांचे ध्येय असल्याने प्रामुख्याने व्याख्याने व चर्चापद्धतीचा उपयोग केला जातो. ग्रुंडट्विगच्या शिष्य खिश्चन कोड ह्याने रिस्लिंग येथील आपल्या लोकशाळेत ह्याच पद्धतीचा यशस्वीरीत्या प्रयोग केला. त्याचा प्रभावी वक्तृत्वाचा फायदा घेण्यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतून शेतकऱ्यांच्या झुंडी त्याच्या लोकशाळेत येत.

या शाळा वसतिगृहात्मक असल्याने सहकार्याचे शिक्षण तेथील जीवनातून आपोआप मिळू शकते. येथे प्रथम केवळ बौद्धिक व आध्यात्मिक अंगावर जोर दिला जात होता. पण आता निरानिराळ्या कलागुणांना वाव मिळण्याचीही सोय उपलब्ध झाली आहे. त्यामुळे वादविवाद, चर्चा, सामूहिक वाचन, गाणी, नाच खेळ इत्यादी नाना कार्यक्रम येथे पार पडत असलेले दिसून येतात. सरकारी अनुदानही २५ ते ७५% पर्यंत या शाळांना मिळते. १९४२ च्या हायस्कूल ॲक्टमुळे या शाळांना अधिक स्थैर्य प्राप्त झाले. विद्यार्थ्यांना फीही अत्यंत माफक प्रमाणात द्यावी लागते व सरकारकडून त्याबाबतही सवलत ५०% हून अधिक विद्यार्थ्यांना मिळते.

या शाळांतील संपूर्ण वातावरण लोकशाहीनिष्ठ असते. त्याचप्रमाणे आंतर-राष्ट्रीय बंधुभाव वाढविण्याचाही प्रयत्न येथे केला जातो. त्यादृष्टीने एल्सिनो-

येथील आंतरराष्ट्रीय लोकशाळेने मोठीच महत्त्वाची कामगिरी केली आहे. एकंदर भारताच्या प्रकृतीशी या लोकशाळांची विचारपरंपरा जुळत असल्याने भारतीय ग्रामोद्धारास हा प्रयोग निःसंशय मार्गदर्शक होईल.

## ऑस्ट्रेलिया :

ऑस्ट्रेलियाचा विस्तार अमेरिकेएवढा म्हणजे सुमारे ३० लक्ष चौरस मैलांइतका आहे. पण लोकवस्ती फक्त ८० लाख आहे. त्यापैकी शें. ५० म्हणजे ४० लाख लोक सहा राज्यांच्या राजधानीत राहतात व बाकीचे उरलेल्या विस्तृत प्रदेशांत राहतात. यामुळे येथील ग्रामीण विभागातील लोकसंख्या थोडी व अत्यंत विरळ आहे. परंतु असे असूनही खेड्यातील प्रत्येक व्यक्तीस चांगले शिक्षण देण्यासाठी ऑस्ट्रेलियन सरकारने विविध उपाय योजिलेले दिसतात. त्यामुळेच ग्रामशिक्षणाचे ऑस्ट्रेलियातील प्रयत्न अभ्यसनीय आहेत.

ग्रामीण विभागात प्राथमिक शिक्षणासाठी एक-शिक्षकी शाळांचा भरपूर उपयोग ऑस्ट्रेलियात करण्यात येतो. टेट् या शिक्षणतज्ज्ञांच्या मताने अशा शाळा अनिवार्य आहेत. या शिक्षकांना ट्रेनिंग कॉलेजातून व विद्यापीठाच्या पत्रद्वारा अभ्यासक्रमातून मार्गदर्शन मिळू शकते. वर्गांचे व विषयांचे एकत्रीकरण आणि वर्गनायक-पद्धती यांचा उपयोग येथे केला जातो. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास या शाळा नमुनेदार काम करतात हे ऑस्ट्रेलियातील ग्रामीण एक-शिक्षकी शाळांवरून दिसून येते.

ग्रामीण शिक्षणाबाबत विशेष सवलती ऑस्ट्रेलियात दिल्या जातात. एक म्हणजे खेड्यात शाळा नसल्यास दुसऱ्या ठिकाणच्या शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना बसची सोय उपलब्ध करून देण्यात येते. काही शाळांतून विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी मोफत बसचीही व्यवस्था केली जाते. काही शाळांत ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माफक खर्चाची वसतिगृहे शाळांना जोडण्यात आलेली दिसून येतात. काही राज्यांतून विद्यार्थ्यांना घरापासून दूर राहण्याबद्दल सरकारी सवलत देण्यात येते. सुसज्ज केंद्र शाळांची स्थापनाही ग्रामीण विभागातून होत असल्याचे आढळून येते. उदाहरणार्थ, टास्मानियामध्ये अशा प्रकारच्या केंद्रशाळा किंवा प्रदेशशाळा ( Area School ) उघडण्यात आल्या आहेत. या शाळेची ३० ते १०० एकरांची जमीन असते व तेथे विद्यार्थ्यांना शेतीचे शिक्षण दिले जाते. त्याशिवाय सुतारकाम, चांभारकाम, पाकशास्त्र, धोबीकाम, शिवणकाम इत्यादी अनेक व्यवसायांचे शिक्षण तेथे मिळू शकते. पत्रशाळांचाही उपयोग फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. प्राथमिक, दुय्यम व व्यावसायिक शिक्षण या शाळांतून दिले जाते. शाळेपासून तीन मैलांहून अधिक दूर राहणारी मुले, शारीरिक व्यंग असणारी मुले, सर्कस वगैरेच्या निमित्ताने नेहमी भटकणारी मुले,

आईबाप परदेशी असणारी मुले व परदेशांतून आलेल्या लोकांची मुले ह्या सर्वांना या पत्रशाळांचा मोठाच फायदा होतो. फिरत्या शिक्षकांकडूनही ग्रामशिक्षणाचे काम केले जाते. पत्रशाळेचे विद्यार्थी जेथे राहतात तेथे जाऊन हे शिक्षक चार चार दिवसांच्या दोन भेटी देऊन त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करतात. या शिक्षकांजवळ फिल्म प्रोजेक्टर, टेप रेकॉर्डर इत्यादी आधुनिक साधने असल्याने त्यांचे काम व्यवस्थित होते. रेडिओवरून 'आरोग्य', 'आपले जग' इत्यादी विषयांवरील अभ्यासक्रम ग्रामीण लोकांसाठी खास रीत्या आयोजित केले जातात. सार्वजनिक वाचनालयाने 'पेटी'च्या द्वारा जवळजवळ प्रत्येक खेड्यात प्रवेश केला आहे. खेड्यांतील सांस्कृतिक चळवळींना चालना ज्युनिअर रेडक्रॉस, पशु व वृक्ष-प्रेमिकांची मंडळे, बालवीर-पथके इत्यादी पत्रशाळांशी संलग्न असलेल्या संस्थांद्वारा देण्यात येते.

ऑस्ट्रेलियातील ग्रामशिक्षणाच्या यशाचे प्रमुख श्रेय शिक्षणातील विकेंद्रीकरण, तेथील राज्य सरकारांचा दांडगा उत्साह व अविरत प्रयत्न व ग्रामशिक्षकांना देण्यात आलेला मानाचा दर्जा ह्यात आहे.

**मेक्सिको :**

अप्रगत देशांपैकी ग्रामशिक्षणाकडे विशेष आस्थेने लक्ष पुरविणारा देश म्हणजे मेक्सिको होय. भारताप्रमाणेच येथील शे. ७० लोक खेड्यात राहणारे आहेत. दारिद्र्य, अज्ञान, अंतर्गत उलथापालथी यांनी हा क्षेत्रफळाने विशाल असलेला देश जर्जर होऊन गेला होता. परंतु १९१०–२० मध्ये प्रचंड रक्तमय क्रांती झाली व ह्या देशांत नवे चैतन्य शिरले. मध्यम व कनिष्ठ वर्गीय ह्यांच्या हातात देशाची सूत्रे आली ! देशाचा विकास हा मूलतः ग्रामशिक्षणावरच अवलंबून आहे ही गोष्ट त्यांनी ओळखली. खेड्यातील निरक्षरता, दारिद्र्य, रोगराई, जुनाट पद्धती इत्यादी दोष दूर करण्यावर एकच उपाय आहे व तो म्हणजे शिक्षण असे त्यांच्या ध्यानात आले.

ग्रामशिक्षणाचा प्रसार मेक्सिकोत ग्रामीण प्राथमिक शाळा, अध्यापन शाळा, शेती शाळा व सांस्कृतिक मंडळे यांजकडून केला जातो. ग्रामशिक्षणाच्या ह्या सर्व संस्था ग्रामजीवनाशी पूर्णपणे समरस झालेल्या असतात. १९१७ च्या घटनेनुसार मध्यवर्ती सरकारने शिक्षणात अधिक लक्ष घालावयास सुरुवात केली. ६८ टक्क्यांहून अधिक प्राथमिक शाळा सध्या मध्यवर्ती सरकारच्या कक्षेत येतात. प्राथमिक शाळांपैकी ८०% शाळा ग्रामीण शाळा आहेत व त्यांपैकी ७०% मध्यवर्ती सरकार चालविते. या शाळांचे वैशिष्ट्य हे की येथील संपूर्ण अभ्यासक्रम ग्रामीण गरजांवर अधिष्ठित असतो. त्यामुळे शेती, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण छंद अशा निरनिराळ्या ग्रामीण गोष्टींना निरनिराळ्या शाळांतून प्राधान्य

मिळालेले दिसून येईल. शेती-शाळातून प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या अभ्यास-क्रमाची सोय केलेली असते. खेड्यातील शिक्षकांसाठी १८ स्वतंत्र अध्यापन-शाळा ग्रामीण विभागांतच स्थापन केलेल्या शेती आणि गृहशास्त्रप्रधान आहेत. तेथे शिक्षण ग्रामशिक्षक-शिक्षिकांना दिले जाते.

मेक्सिकोकडून ग्रामशिक्षणाच्या चळवळीला मिळालेली मौलिक देणगी म्हणजे तेथील सांस्कृतिक मंडळांची ( Cultural Mission ) कल्पना होय. १९२२ मध्ये प्रथमतः ही सांस्कृतिक मंडळे स्थापन करण्यात आली व १९४२ मध्ये त्यांची पुनर्रचना करण्यात आली. ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विकास घडविण्यात यांना भरीव यश मिळाल्याचे आढळून येते. अशी ४० मंडळे मेक्सिकोत काम करीत आहेत. ह्यांपैकी प्रत्येक मंडळात शैक्षणिक विभागाचा प्रमुख, शारीरिक शिक्षण व खेळ ह्यांचा शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता व ग्रामोद्योगाचे तीन शिक्षक ह्याचा समावेश केलेला असतो. ही मंडळे फिरती असतात व एकेका मागासलेल्या ग्रामीण विभागात एक ते तीन वर्षे राहतात. मेक्सिकोमधील मागासलेल्या विभागातील ग्रामीण जनतेचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करणे आणि ग्रामीण नागरिक व राष्ट्रीय जीवन ह्याच्यातील सांस्कृतिक तफावत कमी करणे हा ह्या मंडळांच्या कार्याचा प्रमुख उद्देश होय. स्थानिक शिक्षक व सरकारी नोकरवर्ग ह्यांच्या सहकार्याने आपला उद्देश साध्य करून घेण्यांत ही मंडळे बरीच यशस्वी झाल्याचे दिसून येते.

### लॅटिन अमेरिका व फिलिपाईन्स :

लॅटिन अमेरिकेतील इतर अप्रगत देशही मेक्सिकोप्रमाणेच ग्रामशिक्षणातून ग्रामविकास साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. ब्राझिलमध्ये १२ ग्रामीण समाज केंद्रे आहेत. ग्रामीण शाळांचे छोट्या कृषिक्षेत्रात रूपांतर होण्यासाठी ह्या केंद्रां-कडून पूर्ण मदत दिली जाते. समाजाच्या फावल्या वेळच्या छंदांना येथे उत्तेजन दिले जाते व ग्रामीण विद्यार्थी व नागरिक यांच्यांत संगीत व अन्य कला ह्यांच्या बाबत आवड निर्माण करण्यात येते. शिवणकाम, विणकाम, पाकशास्त्र इ. चे शिक्षण स्त्रियांना त्या केंद्रात मिळू शकते. विद्यार्थी व गरीब नागरिक त्या औषधोपचाराची व दंतकीय मदतीची येथे व्यवस्था केलेली असते. दैनंदिन जीवनाला उपयुक्त असे व्यावहारिक शिक्षण येथून दिले जाते. ग्रामशिक्षणाचे यश चांगल्या प्रशिक्षित शिक्षकांवर अवलंबून आहे ही गोष्ट जाणून ग्रामशिक्षकांसाठी सुट्टीत खास अभ्यासक्रम ठेवण्यात आले आहेत.

चिलीमध्ये व्यावसायिक व शेतकी शिक्षणाचे स्वतंत्र खाते असून त्यांच्या कक्षेत ग्रामीण किंवा शेतकी शाळा दिलेल्या आहेत. ह्या शाळांसाठी काही उद्दिष्टे ठरवून दिलेली आहेत. ती याप्रमाणे : ( १ ) शेती व इतर संबंधित उद्योगासंबंधी

निरीक्षण व प्रत्यक्ष कृतीद्वारा विद्यार्थ्यांत आवड निर्माण करणे. ( २ ) उत्पादन वाढविण्यासाठी शेतीच्या पद्धतीत आधुनिकीकरण आणणे. ( ३ ) समाज-जीवनाचा दर्जा व प्रकार ह्यांत सुधारणा व्हावी म्हणून नाना छंद व माहिती ह्यांचे केंद्र सुरू करणे.

इक्वेडोरमध्ये ७१·४७% लोकसंख्या ग्रामीण विभागातील आहे व ३५०५ प्राथमिक शाळांपैकी ७८% शाळा ग्रामीण शाळा आहेत. म्हणून ग्रामीण शिक्षणासाठी शिक्षण मंत्रालयात खास खाते उघडण्यात आलेले आहे. ग्रामीण शाळांचा प्रमुख उद्देश शेतीशिक्षण देणे हा होय. सभोवतालचा वातावरणाचा शिक्षणासाठी उपयोग करून घेण्याकडे ह्या शाळांचे विशेष लक्ष असते. शहरात शिक्षकाची नोकरी करण्यापूर्वी शिक्षकांना कमीत कमी दोन वर्षे ग्रामीण शाळेत नोकरी करणे आवश्यक असते. येथील ग्रामीण शिक्षणाची काही खास वैशिष्ट्ये अशी सांगता येतील : ( १ ) ग्रामशाळेच्या उपाहारगृहांना कर्ज देण्याची सोय, ( २ ) शाळेतून औषधोपचार व वैद्यकीय इलाज, ( ३ ) समाजकल्याण केंद्राचे शाळेकडून संचालन, ( ४ ) युनिसेफमार्फत मधल्या वेळेस मुलांना दूध, ( ५ ) मध्यवर्ती शाळांकडून ग्रामीण जनतेस नियमितपणे प्रात्यक्षिके दाखविणे.

फिलिपाईन्सची लोकसंख्याही ग्रामप्रधानच आहे. येथील शे. ७५ लोक ग्रामीण विभागातील आहेत व शे. ६५·४ शाळा ग्रामीण शाळा आहेत. म्हणूनच ग्रामशिक्षणासंबंधी स्वतंत्र उद्दिष्टे देशाच्या घटनेत नसली तरी प्रत्यक्ष शिक्षणात ग्रामजीवनाकडे दुर्लक्ष केले जात नाही. शिक्षकांच्या प्रशिक्षणात ग्रामीण जीवनाचा व प्रचलित वातावरणाचा विकास ह्यावर खास जोर देण्यात येतो. येथील ८ प्रादेशिक प्रशिक्षण महाविद्यालयांचा स्थानिक वातावरणाशी प्रत्यक्ष संबंध असल्याचे आढळून येते.

होतकरू शिक्षकांसाठी अनेक ग्रामप्रधान अभ्यासक्रमांची फिलिपाईन्समध्ये सोय आहे. त्यांत समाजोपयोगी गृहशास्त्र, आरोग्यसेवा, प्रौढ शिक्षण इ.चा समावेश होतो. फिलिपाईन्स कम्युनिटी स्कूलमध्ये शेती, हस्तव्यवसाय, दुकानदारी, बागकाम इत्यादी ग्रामोद्योगाचे शिक्षण दिले जाते. शेती व व्यापारविषयक कॉलेजांतून त्या त्या विषयांचे प्रशिक्षण ग्रामीण विभागात काम करू इच्छिणाऱ्या पदवीधरांसाठी उपलब्ध होते. सुट्टीमध्येही शिक्षकांसाठी अनेक अभ्यासक्रमांची सोय येथे उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रामीण नेतृत्व, साक्षरता, समाजशाळांचे संचालन व कारभार, पूर्व-प्राथमिक शिक्षण इ. अनेक विषयांचा त्यांत समावेश होतो. ग्रामशिक्षक हा ग्रामशिक्षणाचा मूलाधार आहे हे ध्यानात ठेवून त्याच्या प्रशिक्षणाच्या विविध सोयी उपलब्ध करून देण्यात फिलिपाईन्स सरकारने मोठेच औचित्य दाखविले यात शंका नाही.

**समीपस्थ व मध्यपूर्व – इराण :**

समीपस्थ व मध्य पूर्वेतील काही अप्रगत देशात ग्रामविकास व ग्राम-शिक्षणाचे प्रयोग अमेरिकेतील 'निअर ईस्ट फाऊंडेशन' सहकार्याने पार पाडण्यात आले. भारतालाही ग्रामविकासाबाबत ते निश्चित मार्गप्रद ठरतील. त्यांतील काही प्रयोगांचा परिचय आपण येथे करून घेऊ.

इराणमध्ये ग्रामीण शिक्षणाचा प्रयोग शेती-सुधारण्यावर आधारण्यात आला. कारण इराण हा शेतीप्रधान देश आहे. परंतु येथे मोठे जमीनदार बरेच असल्याने मामाझान व त्याजवळची चार खेडी प्रयोगासाठी मुद्दाम निवडण्यात आली. कारण येथील जमीन जमीनदारांच्या नियंत्रणाखाली येत नव्हती. हेडेन हा येथील प्रयोगाचा सूत्रधार होता. त्याने खालील गोष्टींवर मुख्यतः जोर दिला : ( १ ) भाजीपाला व धान्य यांचे नवे प्रकार आणणे, ( २ ) त्यांचे योग्य वाटप करणे, ( ३ ) हंगामी पाणीपुरवठ्याचा चांगला उपयोग करून घेणे, ( ४ ) उत्पादन वाढवणे, ( ५ ) प्रचलित शेती पद्धतीत सुधारणा करणे, ( ६ ) निरक्षर लोकांना नवीन ज्ञानाचा परिचय करून देणे.

या कामासाठी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न ग्रामीण कार्यकर्त्यांचा होता. ग्रामीण कार्यकर्त्यांमध्ये खेड्यांतील परिस्थितीशी समरस होऊन खेडुतांबरोबर काम करण्याची तयारी असली पाहिजे असे हेडेनचे मत. त्या दृष्टीने त्याने आपले सहकारी कसोशीने निवडले. त्यांच्या साहाय्याने शेतीपासून सुरुवात करून आरोग्य, स्वच्छता, पाणी-पुरवठा, रोगाशी झगडा व शिक्षण असे प्रश्न त्याने क्रमाक्रमाने हाताळले. त्याच्या प्रयोगाचे सुयश ध्यानात घेऊन इराण सरकारने सर्वांगीण ग्रामीण विकासाचा दीर्घ मुदतीचा कार्यक्रम त्याच धर्तीवर आखला.

**ग्रीस :**

ग्रीसमधील ग्रामविकासाच्या प्रयोगांना आरोग्य-सुधारणेपासून सुरुवात झाली. ह्या प्रयोगांच्या यशाचे श्रेय ॲपोस्टोलोस कोस्किनिडेज् यांच्या तळमळीच्या कार्याकडे व आस्थापूर्ण मार्गदर्शनाकडे जाते. त्यांच्या मताप्रमाणे ग्रीसमधील प्रमुख समस्या आरोग्याची होय. ही समस्या केवळ वैद्यकीय मदतीचा पुरवठा करून किंवा खेड्यांतून दवाखान्यांची पैदास वाढवून सुटणारी नाही. तर यासाठी आरोग्यप्रद सवयी लोकांत निर्माण केल्या पाहिजेत आणि आपला विकास आपल्यालाच घडवावयाचा आहे ही जाणीव त्यांच्यात निर्माण केली पाहिजे. या मूलभूत गोष्टी लक्षात ठेवल्या तर ग्रीसचा कायापालट घडविणे विशेष कठीण नाही असे त्याच्या लक्षात आले.

रिझो व त्याच्या जवळच्या खेड्यांत ७॥ लाख लोकांपैकी २ लाख लोक नेहमी आजारी असत. यांपैकी बहुसंख्य मलेरियाने पछाडलेले होते. याचे मूळ

कारण ज्याच्या पाण्याचा सर्व लोक उपयोग करीत तो घाणेरडा ओढा होता हे कोस्किनिडेस यांच्या ध्यानात आले. त्यातला गाळ काढायला व त्याची चांगली व्यवस्था करायला त्यांना फक्त ८० डॉलरचा खर्च आला. पण ७॥ लाख लोकांचे आरोग्य त्याने पूर्णपणे सुधारून टाकले. अथेन्सपासून फक्त २० मैलांवर असलेल्या मान्द्रा गावात पाण्याचे मोठे दुर्भिक्ष होते. तीन मैलांवरून स्त्रियांना पाणी आणावे लागे. तेथे १०,००० तास लोकांनी श्रमदान केले व अमेरिकन मिशनच्या सहाय्याने पंप बसविण्यात आला. लोकांचे पाण्याचे हाल वाचले व शुद्ध पाणी मिळायला लागल्याने रोगराई कमी झाली. कॉस्किनिडेजच्या प्रयोगाचा निष्कर्ष हाच की, तुम्ही लोकांना वाचवू शकत नाही तर फक्त स्वतःला वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा उत्साह तुम्ही त्यांच्यात निर्माण करू शकता.

मॅसिडोनिया येथे १९२८ मध्ये आखण्यात आलेल्या प्रयोगामागे अशीच भूमिका होती. या ठिकाणी ४८ खेड्यांमध्ये मध्यआशियातून आलेल्या १० लाख लोकांचे पुनर्वसन करावयाचे होते त्यासाठी आरोग्यविकासाच्याबरोबर शेती-उत्पादन वाढवणे, घर सुधारणे, व करमणुकीच्या छंदांना वाव देणे असे कार्यक्रम नियोजित करण्यात आले. लोकांना स्वतःच आत्मोन्नती करावयास लावल्याच्या दृष्टीने हा प्रयोग खूपच सफळ झाला म्हणून १९३७ मध्ये त्याच्या आधारावर ग्रामविकासाची राष्ट्रीय योजनाही आखण्यात आली.

**लेबानन :**

लेबानमध्ये ग्रामविकासाचा एक चांगला प्रयोग हन्ना खाउरी या कल्पक समाज-कार्यकर्त्याने केला. मार्ज बार ऐलिअस या दोन खेड्यांत त्याने आपल्या प्रयोगास सुरुवात केली. येथील लोकांची सांस्कृतिक गरज लक्षात घेऊन प्रथम एका मनोरंजन मंडळाची ( club ) त्याने स्थापना केली. गावातील उत्साही तरुणांकडून एक नाटक बसवून घेतले. एका मंत्र्याकडून त्याचा उद्‌घाटन-समारंभ घडवून आणला. साहजिकच लोकांत मग जास्त उत्साह निर्माण झाला. तेव्हा शेती, समाज गाव यांच्या विकासाठी निरनिराळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या. मशीद साफ करण्यात येऊन तिच्याभोवती बाग लावण्यात आली. पुढे शेतीप्रयोगाचे तेथे छोटेसे केंद्र उघडण्यात आले. शेतीचे प्रदर्शन भरविण्यात येऊन पुस्तिका, पत्रके इत्यादीमार्गे मंडळाचा खूप प्रचार करण्यात आला. रस्ते सुधारणे, झरा स्वच्छ करणे, ग्रामोद्योग सुरू करणे, स्वस्त खताचा पुरवठा करणे इ. कार्यक्रमही मंडळाने हळूहळू हाती घेतले. क्रीडास्पर्धांना उत्तेजन देऊन त्या दोन्ही गावांतील वैमनस्य दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. गावकऱ्यांच्या सहाय्याने पाटबंधाऱ्याची सोय करून घेण्यात आली. सामूहिक आरोग्य विमा-योजना, मातांसाठी वर्ग, बाल-संगोपनाची सोय ह्या गोष्टी क्रमाक्रमाने व्यवहारात आणल्या. कल्पक मार्गदर्शनाखाली

एका छोट्या कृतीतून ग्रामविकासाचे विभिन्न कार्यक्रम क्रमाक्रमाने कसे आणता येतात याचे ःहा प्रयोग म्हणजे मूर्तिमंत उदाहरण होय.

**अल्बानिया :**

अमेरिकन इन्स्टिटयूटच्या सहाय्याने प्रथमतः एक ग्रामीण शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा प्रयोग अल्बानियात करण्यात आला. परंतु तो यशस्वी झाला नाही. या प्रशिक्षण केंद्रातील शिक्षकांचा ओढा शहरांत नोकरी करण्याकडेच दिसून येऊ लागला. ग्रामविकासाच्या कामाबद्दल व ग्रामजीवनाबद्दल त्यांच्या मनात आस्थाच निर्माण होत नव्हती असे आढळून आले. या गोष्टीची जेव्हा कारणमीमांसा करण्यात आली तेव्हा हे दृष्टोत्पत्तीस आल की या केंद्रातील वातावरण अमेरिकन पद्धतीचे अत्यंत आधुनिक बनविण्यात आले. येथील घरे, ६०० एकराची मोठी जमीन, शेतीसाठी ट्रॅक्टर व इतर आधुनिक यंत्रसामुग्री व ग्रामीण जीवनापासून अलिप्त राहणारा कारभार ःह्यांमुळे अपेक्षित यश या प्रशिक्षण-केंद्राला मिळत नव्हते.

१९३४ मध्ये आलेल्या राल्फ एच्. ॲलीने या केंद्रातील हे दोष ओळखले. ते दूर करण्याचा त्याने धडाक्याने प्रयत्न केला. केंद्रातील बोजड व भारी किंमतीची यंत्रसामुग्री त्याने विकून टाकली. विद्यार्थ्यांची राहण्याची पद्धती सर्वसाधारण अल्बानियन कुटुंबाप्रमाणे ठेवली. स्वच्छता, रोगप्रतिबंधक उपाय इत्यादीसाठी विद्यार्थ्यांना निरनिराळ्या समित्यांतून काम करण्याची प्रेरणा देण्यात आली. जमिनीचे दोन विभाग करून आधुनिक व जुन्या दोन्ही पद्धतीने शेती करण्याचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. तात्त्विक शिक्षण व प्रत्यक्ष व्यवहार यांची सांगड घालण्यात आली. विद्यार्थ्यांचा दर्जा बौद्धिक परीक्षेऐवजी प्रत्यक्ष निष्पत्तीवरून ठरविण्यात येऊ लागला. या केंद्रातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना कमीत कमी सहा महिने घरी किंवा शेतावर राहून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करण्यास भाग पाडण्यात आले. थोडक्यात ग्रामिण प्रशिक्षण केंद्राने स्थानिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे या प्रयोगावरून सिद्ध होते.

**पॅलेस्टाईन :**

पॅलेस्टाईनमध्ये १९४७ चे विभाजन होण्यापूर्वी तेथील शिक्षणसंचालक हंफ्रे बोमन याने प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ बर्क्ले अचीसन व पॉल मन्रो यांच्या सहाय्याने केलेला ग्रामशिक्षणाचा प्रयोग अत्यंत मौलिक, यशस्वी व मार्गदर्शक असा आहे. बोमन ह्याच्या मताने ग्रामविकासाचे मूळ ग्रामीण शाळेत आहे. ही ग्रामीण शाळा खऱ्या अर्थाने ग्रामीण असली पाहिजे. म्हणजे शाळेला स्वतःची जमीन पाहिजे. तेथे आदर्श शेती करण्यात आली पाहिजे. शाळेतील विद्यार्थ्यांचा ग्रामीण वातावरणाशी घनिष्ठ संबंध आला पाहिजे. यासाठी उत्साही प्राशिक्षित शिक्षक तयार केले पाहिजेत.

१९२० मध्ये आपल्या या कल्पनांवर आधारित अशा ग्रामशाळेच्या प्रयोगाला बोमनने सुरुवात केली. अहमद कासीम नावाचा चांगला कल्पक सहकारी त्याला या कार्यासाठी मिळाला. १५ ग्रामशिक्षकाना चांगले कसून प्रशिक्षण देऊन तयार करण्यात आले. शालेय अभ्यासक्रमांत बागकाम व शेती ह्यांना तिसऱ्या-चौथ्या इयत्तांपासून स्थान देण्यात आले. शालेय जमीन व बाग ह्यांची सतत सुधारणा करण्यात येऊ लागली. उत्तम तपासणी व नोकरीतील प्रशिक्षण ह्यांच्या सहाय्याने शिक्षकांना कार्यक्षम बनविण्यात आले. याचा परिणाम हा झाला की, शाळाशाळांतून भाजीपाला, फळे, धान्य दिसू लागले. विद्यार्थ्यांना पिकवलेल्या मालापैकी ½ माल घरी नेण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी शेतीकाम उत्साहाने करू लागले. शेती व बागकामाशी सांगड घालून शास्त्र, गणित, भूगोल इत्यादी विषय शिकविण्यात येऊ लागले. ते मुलांना समजणेही सोपे जाऊ लागले. १९४७ मध्ये ४०० ग्रामीण प्राथमिक शाळांपैकी २५० शाळांपाशी एकूण ८०० एकरांचे दर्जेदार मळे असल्याचे आढळून आले. त्यामधून ९० टन भाजीपाला, २३०३३ फळझाडांची कलमे व २४२००० भाजीपाल्याची रोपटी तयार करण्यात आली. ६५००० झाडे विद्यार्थ्यांकडून लावण्यात आली. शाळांना रमणीय उद्यान बनविण्याचा हा मौलिक प्रयोग विभाजनामुळे एकाएकी अस्ताव्यस्त झाला तरी अत्यंत मार्गदर्शनपर आहे हे विसरून चालणार नाही.

**निष्कर्ष :**

ग्रामशिक्षण व ग्रामविकास ह्या बाबतीतील काही प्रमुख प्रगत व अप्रगत देशांनी केलेले प्रयोग स्थूलपणे आपण पाहिले. यामध्ये अनेक चांगल्या व अनुकरणीय गोष्टी आहेत. भारतीय ग्राम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्या जीवनाच्या वाट चालीत आहे. या वेळेस त्याला या गोष्टी वाळवंटांतील पावलांप्रमाणेच प्रेरक व मार्गदर्शक झाल्याखेरीच राहणार नाहीत.

## ग्रामशिक्षक : ८

गेल्या वीस वर्षांतील वाढत्या शैक्षणिक प्रसारामुळे व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामुळे खेड्यांतील शाळांचे प्रमाण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उदाहरणार्थ, १९६०–६१ मध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या १३ जिल्ह्यातील एकूण १५,९८६ गावांपैकी केवळ ५४४ छोटी खेडी सोडली तर प्रत्येक गावात व प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळेची सोय उपलब्ध होती व त्यातून सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले जात होते. खेड्यात काम करणाऱ्या शिक्षकांची संख्याही अर्थातच त्याच प्रमाणात वाढली आहे. माध्यमिक शाळा व उच्च शिक्षणाच्या संस्था याही खेड्यात क्रमाक्रमाने स्थापन होत आहेत. यात काम करणारे शिक्षक किंवा प्राध्यापक हेही 'ग्रामशिक्षक' ह्या सदराखाली येतील. परंतु ग्रामीण प्राथमिक शिक्षकांच्या मानाने ह्यांची संख्या फारच अल्प आहे. स्वाभाविकच त्यांची समस्या ग्रामीण प्राथमिक शिक्षकांच्या इतकी आज तरी महत्त्वपूर्ण नाही. प्राथमिक शिक्षकाच्या तुलनेने त्यांना पगार व अन्य सवलतीही अधिक मिळत आहेत. उलट त्यांचे कार्यक्षेत्र मात्र मर्यादित आहे म्हणून या प्रकरणात त्यांच्या प्रश्नांची चर्चा न करता फक्त ग्रामाण प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नांचे विवेचन करण्याचे योजिले आहे.

## वाढती जबाबदारी :

स्वातंत्र्योत्तर कालात ग्रामशिक्षणाचा विचार कसा वेगळ्या दृष्टिकोणातून केला जात आहे हे आपण मागे बघितलेच आहे. ग्रामशिक्षणाच्या उद्दिष्टांत मूलगामी बदल झाला आहे. ग्रामजीवनाचे स्वरूप पार बदलून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. ग्रामीण शाळा ही या बाबतीतली एक मूलसंस्था म्हणून मान्य करण्यात आली आहे. स्वाभाविकच या शाळेतला शिक्षक हा नव्या ग्रामीण रचनेतला एक प्रमुख कार्यकर्ता आहे. तो केवळ चार भिंतींच्या आत दोन बुके नि परवाचा शिकवणारा पंतोजी नाही, तर ग्रामीण विद्यार्थी नि समाज यांना प्रगतिपथावर नेणारा व नवा दृष्टिकोण देणारा सामाजिक नेता आहे. ग्रामशिक्षकाचे स्वरूप अशा तऱ्हेने बदलत आहे. त्याच्यापासूनच्या अपेक्षा वाढत आहेत. त्याची जबाबदारी अधिकाधिक मोठी होत आहे.

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण देणे हे आज ग्रामीण शिक्षकाचे काम राहिलेले नाही. पुस्तकी ज्ञानाची व्यवहाराशी व जीवनाशी कशी सांगड घालावी हे शिक्षकाने पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांना जीवनातून जीवनाचे शिक्षण देण्याची दक्षता त्याने बाळगली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासाबरोबर त्यांच्या सामाजिक गुणांच्या विकासाचीही काळजी त्याला वाटली पाहिजे. आदर्श सामाजिक नागरिक बनण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना त्याच्यापासून मार्गदर्शन मिळाले पाहिजे. सामूहिक कामाची आवड, श्रमदानात रुची, ग्रामविकासाच्या कार्यात भाग घेण्याची प्रेरणा, आपल्या खेडयाबद्दल प्रेम व त्याचा विकास करण्याची मनीषा अशा अनेक गोष्टी त्याने विद्यार्थ्यांच्या मनात ठसविल्या पाहिजेत.

विद्यार्थ्यांच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासाचाही विचार शिक्षकाने केला पाहिजे. ग्रामीण शाळा ही समाजाच्या सुखदुःखापासून वेगळी राहू शकत नाही हे त्याने पूर्णपणे ध्यानात ठेवले पाहिजे. शाळेचा विकास खेडयाच्या विकासावरच अवलंबून आहे हे जाणून त्याने स्वतः ग्रामीण विकासास सर्वतोपरी सहाय्य केले पाहिजे. खेडयाच्या आर्थिक, सामाजिक, प्राकृतिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून खेडयातील शाळा या वेगवेगळ्या क्षेत्रात ग्रामीण विकासास कोणत्या तऱ्हेने मदत करू शकेल हे त्याने पाहिले पाहिजे. ग्रामविकासासाठी सहकार्याची व स्वावलंबनाची वृत्ती खेड्यात निर्माण करण्याच्या दृष्टीने त्याने प्रयत्न केले पाहिजेत. पंचायत व सहकारी संघटना याची तत्त्वे ग्रामीण जनतेत बिंबविण्याकडे त्याने लक्ष दिले पाहिजे. थोडक्यात केवळ विद्यार्थ्यांचाच नाही तर ग्रामीण जनतेचाही तो शिक्षक बनला पाहिजे.

ग्रामशिक्षकाचे कार्य व कार्यक्षेत्र हे असे विशाल बनत आहे. शाळा ही समाज-केंद्र म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. शिक्षक हा ह्या केंद्राचा व

पर्यायाने गावातील अनेक सामाजिक प्रवृत्तींचा संचालक बनला जात आहे. एक नवे आणि महत्त्वाचे काम त्याच्यावर येऊन पडले आहे. ग्रामीण जनतेला नवा दृष्टिकोण देणे व प्रगतीच्या मार्गावर नेणे ही त्याची प्रमुख जबाबदारी आहे. लोकशाही व समाजवाद ही तत्त्वे लोकांच्या मनावर ठसविणे व त्यांच्यात स्वतःच्या अभ्युदयाचा मार्ग आक्रमण्यास सामूहिक प्रयत्न करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे हे ग्रामशिक्षकाचे एक कर्तव्य आहे. ग्रामविकासाच्या कार्याबद्दल ग्रामीण जनतेत त्याने उत्साह निर्माण केला पाहिजे. ग्रामविकासाचा कार्यक्रम आखणे, त्याचे नियोजन करणे व नंतर त्याचे समालोचन करणे हे कार्य पार पाडण्याच्या दृष्टीने ग्रामीण नागरिकांत क्षमता उत्पन्न करण्याचे कार्य त्याच्याशिवाय कोणीही दुसरा अधिक यशस्वी रीतीने करू शकणार नाही. निरनिराळ्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळी खेड्यात सुरू करून ग्रामीण जीवनाला समृद्धता आणण्याची ताकद त्याच्यातच आहे. शिक्षक हा अशा प्रकारे ग्रामीण समाजाचा मित्र, मार्गदर्शक व नेता असला पाहिजे. अर्थात त्याच्या कार्यालाही मर्यादा आहेत व केवळ त्याला नेता म्हटल्याने तो संपूर्ण गावाचे स्वरूप एका दिवसात बदलू शकणार नाही. पण शिक्षकाच्या बदलत्या स्वरूपामुळे व नव्या सामाजिक दृष्टिकोणामुळे ग्रामशिक्षकाचे बदलत जाणारे स्थान व वाढती जबाबदारी विसरून चालणार नाही.

**अनेक अडचणी :**

ग्रामशिक्षकावरील वाढती जबाबदारी व त्याला मिळणाऱ्या सवलती यांचे गुणोत्तर व्यस्त आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की, शिक्षकाकडून समाजाच्या व सरकारच्या अपेक्षा खूपच वाढल्या, परंतु त्याच प्रमाणात त्याच्या सुखसोयींचाही विचार करायला हवा याकडे सोइस्कर रीत्या बरेचसे दुर्लक्ष करण्यात आले. यामुळे खेड्यात काम करणाऱ्या शिक्षकाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. आर्थिकदृष्ट्या त्याला मिळणारा पगार बेताचाच असतो. खेड्यामधून शिकवणी वा अन्य साधनाने अधिक पैसा फावल्या वेळात मिळविण्याचे साधन उपलब्ध नसते. शाळेचे वातावरण फारसे समाधानकारक नसते. शाळेबद्दल मुलांना आस्था नसते की, पालकांना नसते. शाळेची इमारत म्हणजे पडके देऊळ किंवा जुनाट वाडा असतो. या कोंडवाड्यात मुलांना भरती करणे व त्यासाठी पालकांची खुशामत करणे यांपासून त्याच्या कामाला सुरुवात होते. शाळेत शैक्षणिक साधनाचा जवळ जवळ अभावच असतो. थोडे विद्यार्थी असल्याने एका किंवा दोन शिक्षकांना सर्वच म्हणजे ५–६ वर्ग सांभाळावे लागतात. शाळेतील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती व त्यामुळे त्यांचा घसरणारा दर्जा, परीक्षा-निकालावर होणारा त्याचा परिणाम ह्या प्रश्नांकडेही त्याला पाहावे लागते. या बाबतीत शिक्षणखात्याकडून वस्तुनिष्ठ मार्गदर्शन होण्याऐवजी अनेक वेळा शिक्षणाधिकाऱ्यांच्या करड्या, काटेकोर व यांत्रिक शिस्तीला त्याला बळी पडावे लागते.

गावातील वातावरणही त्याला मोठे उत्तेजक वाटण्याजोगे नसते. पडकी घरे, गलिच्छ वस्ती, अडाणी लोक, घाणेरडे रस्ते या सर्वांमुळे त्याच्या मनाला उबग येणे स्वाभाविक होय. सिनेमा, नाटक, क्लब इत्यादी करमणुकीची साधने त्याला उपलब्ध नसतात. वाचनालये, वादविवाद-चर्चामंडळे व विद्वान लोक यांच्या अभावामुळे स्वतःची प्रगती करून घेण्याचा त्याचा मार्ग खुंटलेला असतो. योग्य सामाजिक व शैक्षणिक थरातील सहकारी न मिळाल्याने त्याला एकप्रकारचा एकलकोंडेपणा तेथे जाणवत असतो. त्यातच खेड्यातील वातावरणाशी नीट समरस होता न आल्यास ग्रामीण राजकारण, सत्तास्पर्धा व आपापसातील दुफळी ह्यांच्यापासून स्वतःचा बचाव करून घेणे त्याला दुरापास्त होते. दळणवळणाच्या सोयी व्यवस्थित नसल्याने खेड्यातील भकास वातावरणापासून मनःस्वास्थ्यासाठी अल्प काळ का होईना पण दूर जाणे लौकर शक्य होत नाही. अशा प्रकारे शैक्षणिक, बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक या सर्वच बाबतीत खेड्यातील शिक्षकाची थोड्याफार प्रमाणार गळचेपी होत असते. त्यामुळे खेड्यातील जीवन त्याला दुःसह वाटले तर त्यात फारसे नवल नाही.

**खेड्याचे दुसरे चित्र :**

परंतु खेड्याच्या या जीवनाला दुसरीही बाजू आहे हे विसरून चालणार नाही. ग्रामशिक्षकाची आर्थिक स्थिती चांगली नाही हे खरे. परंतु शहरातील शिक्षकाप्रमाणे त्याच्या खर्चाला नानाविध वाटा फुटत नाहीत. हॉटेल, सिनेमा, बस, इस्त्रीचे झकपक कपडे, भरमसाठ घरभाडे इत्यादी अनेक खर्चाच्या तावडीतून तो सुटलेला असतो. शैक्षणिक बाबतीत विद्यार्थी व पालक ह्यांना आस्था नसते ही वस्तुस्थिती होय. पण ती निर्माण केली तर शिक्षक उजाड माळाचे रम्य उद्यानात रूपांतर करू शकतो. गावातील लोकांच्या अनास्थेचे प्रमुख कारण अज्ञान हेच असते व शिक्षकाचे काम ज्ञानाचा दीप लावणे व अज्ञानाचा अंधःकार घालवणे हेच नाही काय ? केवळ शिक्षणाच्याच काय सर्वच ग्रामविकासाच्या कार्यक्रमाची प्रेरणा शिक्षकच ग्रामीण जनतेला देऊ शकतो व त्यांच्यामध्ये स्फूर्तीचा झरा अखंड पाझरत ठेवू शकतो. याचे एक प्रमुख कारण म्हणजे शिक्षकाबद्दल सर्वसामान्य ग्रामीण नागरिकाच्या मनात आदराचीच भावना असते. गावातील सर्वांत जास्त सुशिक्षित व ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारी व्यक्ती या दृष्टीने लोक त्याच्याकडे पाहात असतात. म्हणून ग्रामीण नेतृत्व स्वाभाविकरीत्या त्याच्याकडे येऊ शकते. तिचा योग्य तो फायदा त्याने करून घेतला तर ग्रामजीवन बदलून टाकण्याचे क्रांतिकारक कार्य करणे त्याला अवघड नाही.

खेड्यातील सर्वसामान्य जनता प्रेमळ व भोळीभाबडी असते. आदरातिथ्य व सहानुभूती या बाबतीत शहरी लोक तिच्या पासंगालाही पुरू शकत नाहीत. खेड्यातील नागरिक सर्वसामान्यतः प्रामाणिक, कष्टाळू, उद्योगी, निष्कपटी व

धार्मिक प्रवृत्तीचा आढळून येतो. ग्रामशिक्षकाला अशा रीतीने हृदयाची श्रीमंती शहरापेक्षा खेड्यातच मोठ्या प्रमाणावर आढळून येते. निसर्गाची श्रीमंती उपभोगणे हाही जीवनातील एक मोठा आनंद आहे. विस्तीर्ण आकाश, खेळकर नद्या, उंच टेकड्या व पर्वत, मोकळी हवा, हसरे झरे, डोलणारी झाडे, बागडणारे प्राणी व मजेत भराऱ्या मारणारे पक्षी, निसर्गातल्या या व अशा किती तरी गोष्टी आहेत की, ज्यांचा रसास्वाद मोठा गोड आहे. यंत्राच्या घरघरीत व गिरणीच्या धुराड्यात कोंबलेल्या शहरी जीवनाला हा आनंद हळूहळू दुरापास्त होत चालला आहे. खेड्याचे जीवन त्या मानाने समृद्ध आहे. त्याचा मनमुराद आनंद ग्रामशिक्षकाला चाखायला मिळू शकतो व इतरांनाही त्याचा आस्वाद घेण्याची क्षमता तो निर्माण करू शकतो.

भारतातील खेडे आता नवी वाटचाल करीत आहे. त्यामध्ये नव्या प्रवृत्ती निर्माण करणे व त्याला नवा दृष्टिकोण देणे ही फार महत्त्वाची कामे आहेत. ग्रामशिक्षकाला ती पार पाडण्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचे कार्यक्षेत्र विशाल झाले आहे. त्याला आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. कारभारातील विकेंद्रीकरणामुळे खेड्यातील त्याचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण झाले आहे. आदर्श ग्रामशिक्षकास आदर्श देशसेवक म्हणूनच आजच्या व उद्याच्या जमान्यात ओळखले जाईल. म्हणूनच ग्रामीण जीवन खडतर असले तरी स्वतःचे नाव दाखवायला व काही भरीव कार्य करायला तेथेच जागा आहे हे ग्रामशिक्षकाने विसरता कामा नये.

**आवश्यक गुण**

खेड्यातील शिक्षकाचे कार्य अशाप्रकारे विशाल स्वरूपाचे व अत्यंत जबाबदारीचे असल्याने त्याच्या अंगी विशिष्ट व्यावसायिक व वैयक्तिक गुण असणे आवश्यक आहे. त्याची आपण आता चर्चा करू.

**व्यावसायिक गुण**

( १ ) **भरपूर सर्वसामान्य ज्ञान**—खेड्यातील शिक्षक हा सर्व ग्रामीण समाजाचा एक चालता बोलता ज्ञानकोशच असतो. ग्रामीण समाज व विद्यार्थी ह्यांच्या सर्व शंकांचे समाधान त्याच्याशिवाय दुसरा कोणी करू शकत नाही. म्हणूनच शालेय विषयांबरोबरच, निसर्ग, समाज, इतिहास, संस्कृती, प्रचलित घडामोडी इ. अनेक गोष्टींचे सर्वसामान्य स्थूल ज्ञान त्याला असणे आवश्यक आहे.

( २ ) **सतत विकास करण्याची क्षमता**—शिक्षकाने स्वतःचे ज्ञान परिपूर्ण झाले असे मानता कामा नये. आपण जन्मभर विद्यार्थी आहोत याच कल्पनेने त्याने सदोदित आपली ज्ञानार्जनाची क्रिया चालू ठेवली पाहिजे. म्हणजेच त्याला स्वतःला नवी दृष्टी मिळत राहील व जनतेला तो नवे विचार देत प्रगात-

पथावर नेत राहील. शालेय विषयांचे व अन्य सर्वसामान्य ज्ञान, शिकविण्याच्या नवनवीन पद्धती देशातील व समाजातील प्रगत हालचाली इत्यादींचा परिचय त्याने पुस्तकांच्याद्वारा वा प्रत्यक्ष अनुभवाच्या द्वारा करून घेतला पाहिजे. त्या ज्ञानाचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांस व भोवतालच्या समाजास करून दिला पाहिजे.

**( ३ ) प्रयोग करण्याचा उत्साह**— आपल्या नवीन ज्ञानाचा व पद्धतींचा उपयोग करून ग्रामशिक्षकास नवनवीन शैक्षणिक व सामाजिक प्रयोग करता येणे सहज शक्य आहे. आपल्या बुद्धीचा कल्पकतेचा व धाडसाचा उपयोग करून त्याने असे प्रयोग केले तर ते शाळेच्या व गावाच्या प्रगतीला निश्चित उपकारक ठरतील.

**( ४ ) शिक्षणाच्या उद्दिष्टांची कल्पना**— आपल्या ज्ञानदानाचे अंतिम उद्दिष्ट काय याची स्पष्ट कल्पना शिक्षकास असली पाहिजे. त्याबरोबरच ग्रामशिक्षणाच्या विशिष्ट उद्दिष्टांचीही माहिती त्याने करून घेतली पाहिजे. आपल्या खेड्यात काम करताना कोणत्या उद्दिष्टांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे याचा आडाखा त्याने बांधला पाहिजे. आपली शिक्षणपद्धती व समाजकार्यपद्धती या उद्दिष्टांना अनुसरून त्याने आखली पाहिजे. हे करीत असताना समाजाच्या व देशाच्या अंतिम उद्दिष्टांना पूरक असेच आपले शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रम असतील असे त्याने पाहणे आवश्यक आहे.

**( ५ ) विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोण**— ग्रामशिक्षकाने अत्यंत प्रेमाच्या, आस्थेच्या व सहानुभूतीच्या दृष्टिकोणातून विद्यार्थ्यांकडे पाहिले पाहिजे. शाळा म्हणजे एक आसऱ्याचे व निवाऱ्याचे स्थान आहे असे विद्यार्थ्यांना वाटले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या प्रवृत्तींचा, भावनांचा व कृतींचा आस्थापूर्वक व सखोल अभ्यास करण्याची सवय शिक्षकाने स्वतःला लावली पाहिजे. यासाठी निरीक्षण, मुलाखत, प्रतिक्रियांचे विश्लेषण व मनोमापनाच्या परीक्षा ह्यांचा उपयोग त्याला करता येणे शक्य आहे. यापासून विद्यार्थ्यांसंबंधीचे अधिक ज्ञान त्याला उपलब्ध होऊ शकेल. त्याचा उपयोग त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तींचे उन्नयन करणे त्यांना उचित मार्गदर्शन करणे यासाठी त्याने करून घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांना हसत खेळत, जुलूम-जबरदस्तीचा उपयोग न करता त्याने विकासाच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**( ६ ) ग्रामीण संस्कृतीबद्दल जिव्हाळा**—ग्रामशिक्षकाला ग्रामीण संस्कृतीबद्दल जिव्हाळा वाटणे आवश्यक आहे. याशिवाय या संस्कृतीचा विकास तो करू शकणार नाही. ग्रामीण उत्सव, जत्रा, मंदिरे, चालीरीती, खेळ, लग्न-समारंभ, ग्रामीण गीते, लोकनृत्ये इत्यादी, अनेक गोष्टींतून ग्रामीण संस्कृतीचे प्रतिबिंब पडत असते. ग्रामजीवन समृद्ध करण्यासाठी ह्यांचा उपयोग कौशल्याने करून घेता येणे शिक्षकास

शक्य आहे. ग्रामजीवनाशी समरस होणे, त्यातील अयोग्य भाग काढून टाकणे व नव्या प्रवृत्तींची जोड त्याला देणे, याकडे शिक्षकाने लक्ष दिले पाहिजे. ग्राम, ग्रामीण जीवन व शेतकरी ह्यांना प्राप्त झालेले मानाचे स्थान व त्यांच्या विकासावर अवलंबून असलेला ग्रामीण व संपूर्ण देशाच्या संस्कृतीचा विकास या गोष्टी त्याने जाणून घेतल्या पाहिजेत. यांच्या आधारावर ग्रामीण जनतेत नवी प्रेरणा व ताकद निर्माण केली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिकवीत असताना गणित, भाषा, इतिहास इत्यादी विषयांचा समन्वय या ग्रामीण संस्कृतीशी घालण्याचा त्याने प्रयत्न केला पाहिजे.

**( ७ ) नव्या तंत्रांचा उपयोग**– लहान खेड्यात काम करताना अध्यापनाच्या काही विशिष्ट तंत्रातील प्रावीण्य त्याला उपयोगी पडण्याजोगे आहे. सामूहिक चर्चा करण्याची क्षमता निर्माण करणे, वेगवेगळ्या थरांतील व वयाच्या विद्यार्थ्यांना एका वेळी सांभाळणे, विद्यार्थ्यांत स्वतंत्ररीत्या अभ्यास करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे, वैयक्तिक मार्गदर्शन करणे, गटनायक-पद्धतीचा अध्यापनासाठी उपयोग करून घेणे, विद्यार्थ्यांचे भिन्न भिन्न प्रकारे निरनिराळ्या गटांत अध्यापनानुरूप विभाजन करणे इत्यादी अनेक गोष्टींचे तंत्र त्याने अवगत करून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे व्यवसायातून शिक्षण देण्यातही तो प्रवीण असला पाहिजे. यासाठी निरनिराळ्या हस्तव्यवसायांचे व खेड्यास लागू पडणाऱ्या मूलोद्योगाचे ज्ञान त्याला असले पाहिजे. त्यांच्या द्वारा भिन्न भिन्न विषयांचे शिक्षण कसे देता येईल हे त्याने पाहिले पाहिजे.

**वैयक्तिक गुण :**

वरील व्यावसायिक गुणांशिवाय अनेक वैयक्तिक गुणांची जोपासना ग्रामीण शिक्षकाला यशस्वी होण्याच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. अध्यापन कार्यावर त्याचे मनापासून प्रेम असले पाहिजे. शिक्षकीपेशा एक निष्ठा म्हणून त्याने स्वीकारला पाहिजे. नम्रता व सेवावृत्ती त्याला ग्रामविकासाच्या कार्यात नेहमीच उपयोगी पडण्यासारखी आहे. याबरोबरच समाजाला पुढे नेण्यासाठी नेतृत्व पेलण्याची ताकद त्यांच्यात असली पाहिजे. परंतु सतत नेता म्हणून पुढे पुढे मिरवण्याची सवय त्याने स्वतःला लावून घेता कामा नये. तर समाजातून निरनिराळे काम करण्यासाठी निरनिराळे नेते कसे पुढे येतील हे त्याने पाहिले पाहिजे. यांच्या सहाय्याने गावाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास कसा होईल याची काळजी त्याने बाळगली पाहिजे. यासाठी कल्पकता व बुद्धिमत्ता यांची जोड त्याच्यापाशी असणे आवश्यक आहे. म्हणजेच नवनवीन सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तींना त्याला प्रेरणा देता येईल. विनोदी वृत्ती हसत खेळत काम करण्याची हातोटी व सहकार्याची आवड ह्या गुणांमुळे तो ग्रामीण समाजाला आपलसे करून घेऊ शकतो. सुदृढ शरीर, प्रसन्न मन व विशुद्ध आचरण यांच्यामुळे

त्याचे व्यक्तिमत्त्व आदरणीय व विलोभनीय झाल्याखेरीज राहत नाही. सहानुभूती, अभ्यासूपणा, सचोटी, चिकाटी, प्रामाणिकपणा, आशावादीपणा, भावात्मक स्थैर्य, उत्साही वृत्ती व कोणतेही श्रम करण्याची तयारी या गुणांच्या मिलाफामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला सुसंवादीपणा येतो. यांपैकी जास्तीत जास्त गुण आत्मसात करून आपल्या कार्यांत यशस्वी होण्याचा प्रयत्न ग्रामशिक्षकाने केला पाहिजे.

**शाळेतील विविध कार्यक्रम :**

ग्रामशिक्षकास पुस्तकी ज्ञानाबरोबरच इतर अनेक गोष्टींचे शिक्षण विद्यार्थ्यांस, त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी द्यावे लागते. त्या दृष्टीने आजच्या ग्रामशाळेत अनेक कार्यक्रम त्याला आयोजित करावे लागतात. त्यांचे संकलन याप्रकारे करता येईल :

(१) शरीर, आरोग्यशास्त्र व स्वच्छता यांचे व्यावहारिक शिक्षण देणे.

(२) समतोल आहाराची कल्पना देऊन तो तयार करण्यास शिकविणे.

(३) शारीरिक व्यायाम व खेळ.

(४) लेखन-वाचन व पुस्तकांचा योग्य उपयोग करण्यास शिकवणे.

(५) सभोवतालच्या वातावरणाचे व इतर सर्वसामान्य ज्ञान.

(६) निसर्गातील आनंद लुटण्यास विद्यार्थ्यांस प्रवृत्त करणे. त्यासाठी त्यातील रंग, नाद, संगती इत्यादींकडे लक्ष वेधणे.

(७) विद्यार्थ्यांच्या सामाजिक गुणांचा विकास करून आदर्श नागरिकत्वाचे संस्कार त्यांच्यावर करणे.

(८) लोकशाहीस अनुकूल अशा कार्यक्रमांना शाळेत चालना देणे.

(९) सहली, खेळ, नाटक, संमेलन इत्यादी सामूहिक कार्यक्रमांना स्थान देऊन सहकार्य, बंधुभाव, शिस्त इत्यादी गुणांची जोपासना करणे.

(१०) शेती, सूतकताई, लाकूडकाम इत्यादींपैकी एखादा मूलोद्योग स्थानिक परिस्थितीस अनुरूप असा सुरू करणे. त्याचा अन्य शिक्षणाशी समवाय जोडणे.

(११) विद्यार्थ्यांचे सुप्त कलागुण व रचनात्मक शक्ती यांना योग्य वाव देणे व त्यांचा विकास करणे यासाठी चित्रकला, वादविवाद, संगीत, नृत्य, साहित्यलेखन इत्यादी गोष्टींस स्थान देणे.

(१२) ईश्वर, मातापिता, गुरू यांबद्दल श्रद्धा व आदर विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे. म्हणून प्रार्थना, सुविचार-कथन व बौद्धिक यांच्याद्वारा नैतिक शिक्षण देणे. स्वतःचे आचरण त्यास अनुरूप असे ठेवणे व विद्यार्थ्यांसही ती तत्त्वे व्यवहारात उतरविण्याचे शिक्षण देणे.

हे केवळ शालेय कार्यक्रम झाले. यामधून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक, सामाजिक, आर्थिक, आत्माविष्कारात्मक, व नैतिक अशा भिन्न भिन्न गरजांची पूर्ति ग्रामशिक्षकास करावी लागते. याशिवाय शाळा व समाज यांना अधिक जवळ आणण्याच्या दृष्टीने त्याला प्रयत्न करावा लागतो. शाळेच्या कामात समाजाचे सहकार्य मिळवणे. सामूहिक कार्यात विद्यार्थ्यांस सहभागी करणे व शाळेचे रूपांतर समाजकेंद्रात करणे याकडे शिक्षकास लक्ष द्यावे लागते.

## शालेय नियोजन — एक प्रमुख समस्या :

छोट्या खेड्यांतील शिक्षकाची प्रमुख समस्या अनेक वर्गांस एकाच वेळी शिकवावे लागणे ही होय. यासाठी एक-शिक्षकी शाळेचे तंत्र त्याला योग्य तऱ्हेने अवगत करून घ्यावे लागते. खालील भिन्न भिन्न मार्गांचा उपयोग करून शिक्षक ह्या प्रश्नास तोंड देऊ शकतो.

### ( १ ) इयत्तांचे एकत्रीकरण :

शाळेत पाच वर्ग असल्यास १ ली, २ री–३ री व ४ थी–५ वी असे तीन वर्ग शिक्षकास करता येणे शक्य आहे. पहिले चार वर्ग असल्यास १ ली-२ री व ३ री-४ थी असे वर्ग करणे फायदेशीर ठरेल. या बाबतीत काटेकोर वर्गीकरण करणेही चुकीचे आहे. काही इयत्ता वर्षाआड यशस्वी रीतीने चालविण्याचे प्रयत्न पाश्चात्य देशांत झाले आहेत. आपल्या शिक्षकानेही वर्गांच्या बाबतीत असेच लवचिक धोरण स्वीकारले पाहिजे. वास्तविकरीत्या वर्ग ही कल्पनाच मूलतः नागरी आहे व तिचा निकटचा संबंध परीक्षा-पद्धतीशी आहे. ही परीक्षा पद्धतीही अत्यंत दोषपूर्ण व अविश्वसनीय आहे. तेव्हा ग्रामीण भागात काटेकोर रीतीने या वर्गांकडे पाहता कामा नये. एखादा विद्यार्थी गणितात दुसऱ्या इयत्तेत व भाषेत तिसऱ्या इयत्तेत असणे सहज शक्य आहे. स्वाभाविकच विद्यार्थ्यांना व इयत्तांच्या रचनेला अनुसरून अभ्यासक्रमाचा तपशील व अध्यापनाची पद्धती शिक्षकाने ठरविली पाहिजे.

### ( २ ) विषयांचे एकत्रीकरण :

कधी कधी वर्गाऐवजी शिक्षकास विषय एकत्र करून शिकविता येऊ शकतात. मूलोद्योगाच्या पाठीमागे हेच तत्त्व आहे. इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे विषय समाजशास्त्र म्हणून शिकवणे इष्ट. वाचन-लेखन या तिन्हींपैकी कशाही बरोबर शिकवता येईल. गणित व शास्त्र यांचा समवाय जोडणे अशक्य नाही. या सर्वांची सांगड एखाद्या मूलोद्योगाशी, कृतीशी वा भोवतालच्या सामाजिक आणि नैतिक वातावरणाशी घालता येणे सहज शक्य आहे. शिक्षकाला यामुळे अधिक परिणामकारक रीत्या शिकविता तर येईलच पण आपला वेळ व श्रम यांची चांगली बचतही करता येईल.

**( ३ ) अधिक वर्ग शिकविणे :**

श्रम व वेळ ह्यांच्या बचतीचा दुसरा उपाय म्हणजे एखाद्या विषयासासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक वर्ग एकत्र करणे. उदाहरणार्थ, नितीशिक्षणासाठी वा संगीतासाठी सर्व वर्ग एकत्र येऊ शकतील. इतिहास वा भूगोल यासाठी दोन वर्गांना एकदम शिकवणे विशेष जड जाणार नाही. अर्थात् शाळेची परिस्थिती जाणून शिक्षकाने ह्याचा उपयोग केला पाहिजे.

**( ४ ) दुबार पद्धती :**

शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ५०–६० हून अधिक झाल्यास व वर्ग फार मोठे झाल्यास काही वर्ग सकाळी व काही वर्ग दुपारी बोलवणे श्रेयस्कर. ह्यामुळे वर्गनियंत्रणाचे त्यांचे काम अधिक सोपे होते.

**( ५ ) वैयक्तिक मार्गदर्शन :**

विद्यार्थ्यांची संख्या फारज कमी असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस त्याची गरज व कुवत अनुसरून शिक्षकास शिक्षण देणे शक्य होणार आहे. वैयक्तिक अभ्यासाबरोबरच विद्यार्थी अन्य सामूहिक कृतीत भाग घेतील याकडे शिक्षकाने लक्ष ठेवले पाहिजे.

**( ६ ) वर्गनायक-पद्धती :**

पूर्वीच्या काळी वर्गनायक-पद्धतीचा शिक्षणासाठी योग्य रीतीने उपयोग करून घेतला जाई. आजही ऑस्ट्रेलियात या पद्धतीने चांगले मूळ धरल्याचे दिसून येते. आपल्या ग्रामशिक्षकानेही स्वतःची ओढाताण टाळण्यासाठी व प्रभावी रीतीने शिक्षण देण्यासाठी वर्गनायकांचा उपयोग करून घेतला पाहिजे. हा उपयोग खालील प्रकारे करता येणे शक्य आहे :

( अ ) वर्गाची स्वच्छता ठेवणे व शाई देणे, पुस्तके वाटणे इत्यादी किरकोळ कामे त्याजकडून करून घेणे.

( ब ) वाचन घेणे, कविता म्हणवून घेणे, उदाहरणे सोडविण्यास देणे, खेळ घेणे इत्यादी कामे त्याच्यावर सोपविणे.

( क ) खालच्या वर्गातील अप्रगत विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकणे.

वर्गनायकांना योग्य मार्गदर्शन केल्यास व त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवल्यास ग्रामशिक्षक स्वतःच्या कामाचा बराच बोजा कमी करू शकतो.

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की, ग्रामशिक्षकाला अभ्यासक्रम, अध्यापनपद्धती, वर्गरचना, वर्गनियंत्रण इत्यादी बाबतीत अत्यंत लवचिक धोरण स्वीकारावे लागते. त्याचे वेळापत्रकही याचप्रमाणे लवचिक स्वरूपाचे असले

पाहिजे. त्यात तास व विषय याशिवाय शिकवण्याची पद्धत, वर्गनायक, सामूहिक कृती इत्यादीचा निर्देश असणे आवश्यक आहे.

## ग्रामशिक्षकाचे प्रशिक्षण

ग्रामशिक्षकाचे शालेय व सामाजिक कार्य अशा प्रकारे गुंतागुंतीचे असल्याने व त्याच्यापासून अधिक अपेक्षा वाढल्याने त्याच्या योग्य प्रशिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. चांगल्या प्रशिक्षणाशिवाय शिक्षक व सामाजिक नेता या दोन्ही नात्याने त्याला आपली जबाबदारी यशस्वी रीत्या पार पाडता येणार नाही. याद्दष्टीने प्रशिक्षण-संस्थातून खालील गोष्टींची अपेक्षा केली जाते :

( १ ) सामान्य शिक्षण व ग्रामीण शिक्षण ह्यांच्या उद्दिष्टांची स्पष्ट कल्पना शिक्षकांस देणे.
( २ ) बालमन व ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न जाणून घेण्यास मदत करणे.
( ३ ) शाळा आणि समाज ह्यांचे संबंध समजून घेणे.
( ४ ) पाठ्य विषयांचे व पाठसाधनांच्या निर्मितीचे ज्ञान करून देणे.
( ५ ) शिक्षकाच्या सर्वांगीण विकासास सहाय्य करणे.
( ६ ) ग्रामीण शाळेत उपयोगी पडणाऱ्या तंत्रांचा परिचय करून देणे.

समाज-विकासाच्या द्दष्टीने ग्रामीण शाळांना व ग्रामशिक्षकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याने प्रशिक्षण-संस्थांतून त्यास अनुसरून शिक्षकांना प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. या द्दष्टीने प्रशिक्षण-संस्थांची काही प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

( १ ) शाळेचे समाज-केंद्रात रूपान्तर करू इच्छिणाऱ्या जीवन-शिक्षणाच्या तात्त्विक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय व आर्थिक द्दष्टिकोणाचा अध्यापकांना परिचय करून देणे.
( २ ) समाज विकासाचे तत्त्वज्ञान समजावून देणे.
( ३ ) भारतातील लोकशाही-विकेंद्रीकरणाची कल्पना देणे.
( ४ ) ग्रामीण समस्या नीट समजण्यासाठी ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्याची माहिती देणे.
( ५ ) पंचायत, शाळा व सहकारी संस्था या तीन मूळ संस्थांच्या कार्याविषयी कल्पना देणे.
( ६ ) ग्रामविकासाच्या कार्यात भाग घेण्याची प्रेरणा निर्माण करणे व त्या द्दष्टीने अध्यापकांत क्षमता निर्माण करणे.
( ७ ) ग्रामीण प्रश्न जाणून घेणे, ते सोडविण्याचा विचार करणे, त्यासाठी योग्य पद्धतीचा व उपलब्ध साधनांचा उपयोग करून घेणे या द्दष्टीने शिक्षकांस शिक्षण देणे.

(८) निरनिराळ्या वयांच्या ग्रामीण समुदायाबरोबर काम करण्याच्या पद्धतींचे ज्ञान करून देणे.

(९) स्वतःच्या कामाचे परीक्षण करण्यासाठी मूल्यमापनाच्या पद्धतींचा व तंत्रांचा परिचय करून देणे.

(१०) प्रयोगक्षम प्रवृत्तीची आवड अध्यापकांच्या मनात उत्पन्न करणे.

अशा तऱ्हेने ग्रामीण शाळेप्रमाणेच प्रशिक्षण-संस्थेचेही कार्यस्वरूप बदलत आहे व त्यांच्यापासूनच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ग्रामशिक्षकाला नवी जबाबदारी पेलण्यास समर्थ करणे व त्याच्या प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेऊन त्यास प्रशिक्षण-कालात व तदनंतरही गरजेनुसार मार्गदर्शन करणे हे प्रशिक्षण-संस्थेचे प्रमुख कार्य होय.

**सेवांतर्गत मार्गदर्शन :**

ग्रामशिक्षकास केवळ नोकरीपूर्वी मार्गदर्शन करून चालणार नाही तर ते नोकरी चालू असतानाही दिले पाहिजे. कारण त्याच्यापुढील समस्या विपुल, गंभीर व कठीण आहेत. त्याचे ज्ञानाचे क्षेत्र व काम करण्याची पात्रता त्यामागे फार कमी आहे. म्हणूनच त्याला नोकरीच्या काळातही सतत हार्दिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. हे काम अर्थातच प्रामुख्याने सरकारी शिक्षणाधिकाऱ्यांचे आहे.

शिक्षणाधिकारी हा ग्रामशिक्षकाचा मित्र व मार्गदर्शक असला पाहिजे. केवळ हुकुमत गाजविणे वा वरिष्ठांच्या आज्ञेचे काटेकोर पालन करणे हे त्याचे कर्तव्य असता कामा नये. ग्रामशिक्षकाच्या वैयक्तिक अडचणी व तो काम करीत असलेल्या गावाची विशिष्ट परिस्थिती समजावून घेऊन त्याने शिक्षकास सल्ला दिला पाहिजे. ग्रामीण अभ्यासक्रम व अध्यापनपद्धती यांतील लवचिकपणा जाणून शिक्षकास त्याबाबतीत त्याने स्वातंत्र्य दिले पाहिजे. अशाच प्रकारचे मार्गदर्शन केंद्र शाळांतील मुख्याध्यापक, प्रशिक्षण संस्था आणि शिक्षक-संघटना यांजकडून ग्रामशिक्षकाला मिळू शकेल. यासाठी लहान अध्ययनक्रम, परिसंवाद, चर्चा, व्याख्याने इत्यादींचा उपयोग करता येईल. यामधून मिळणारे मार्गदर्शन ऐच्छिक, वैयक्तिक, व्यावहारिक व स्फूर्तिप्रद असे असले पाहिजे. म्हणजेच शिक्षकाला आपल्या कामात गोडी वाटून नवनवीन प्रयोग करण्याची उमेद वाटेल. या प्रयोगांच्या द्वारा तो आपल्या अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न करील. त्याच-बरोबर नव्या उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची चर्चा मनमोकळेपणाने शिक्षणाधिकारी, समाजविकास अधिकारी, पंचायत व ग्रामसभेचे सभासद, शिक्षण-संघटनेचे अधिकारी व सदस्य, प्रशिक्षण-संस्थांतील प्राध्यापक व अन्य व्यवसायबंधू यांच्याशी करून आपला मार्ग आक्रमीत जाईल. यामधून त्याचा स्वतःचा विकास होईल व त्याबरोबरच तो राहात असलेल्या ग्रामीण समाजाचाही होईल. यामध्ये त्याला मिळणाऱ्या यशावरच त्याच्या कार्याचे मूल्यमापन करणे इष्ट होईल.

♧ ♧ ♧

## नवी क्षितिजे : ९

ग्रामशिक्षणाच्या विविध अंगांची चर्चा आपण आतापर्यंत केली. परदेशातील ग्रामीण शिक्षणाचे काही प्रयोगही आपण पाहिले. हे सर्व करीत असताना भारतातील ग्रामशिक्षण व ग्रामीण पुनर्रचना यासंबंधी अनेक कल्पना व विचार स्वाभाविकरीत्या मनात येतात. त्यांपैकीच काही विचार या प्रकरणात मांडावयाचे ठरविले आहे.

**ग्रामनेते व ग्रामशिक्षक**

कोणतीही नवी विचारसरणी वा नवा दृष्टिकोण समाजाला द्यावयाचा असेल तर ज्याच्याद्वारा हे कार्य प्रत्यक्षतः पार पाडावयाचे त्यांना फार महत्त्व आहे. म्हणून ग्रामीण नेते व ग्रामशिक्षक ह्यांचे स्थान समाजविकासाच्या योजनेत अत्यंत महत्त्वाचे आहे. छोटे छोटे ग्रामीण नेते तयार करण्याची जबाबदारी गट-विकास अधिकाऱ्याकडे येते. या दृष्टीने तालुका-पातळीवर काम करणारा विकास-अधिकारी हा ग्रामविकास कार्याचा केंद्रबिंदू आहे असे म्हटले पाहिजे. याची निवड जितक्या पाहिजे तितक्या कसोशीने अद्याप होत नाही व म्हणून सामूहिक विकास-योजना भरमसाट खर्च करूनही पाहिजे तशी यशस्वी झालेली दिसत नाही.

या अधिकाऱ्याच्या मनात ग्रामीण जनतेबद्दल अपार सहानुभूती असली पाहिजे व ग्रामीण जनतेबरोबर काम करण्यात त्याला कृतार्थता वाटली पाहिजे;

तसाच आनंदही झाला पाहिजे. हाताखालच्या ग्रामसेवकांना त्याने मनापासून मार्गदर्शन केले पाहिजे. त्याचप्रमाणे ग्रामशिक्षकांना समाजविकासाच्या योजना समजावून त्यांची नवी जबाबदारी पार पाडायला त्याने मदत केली पाहिजे. या दृष्टीने तालुका पातळीवर काम करणारे उपशिक्षणाधिकारी व हे गटविकासाधिकारी यांत पूर्ण सहकार्य असले पाहिजे म्हणजेच ग्रामशिक्षकाची कुचंबणा होणार नाही.

ग्रामपातळीवर काम करणारे ग्रामशिक्षक, ग्रामसेवक व ग्रामनेते यांच्या प्रशिक्षणातून त्यांच्या अडीअडचणींचे निराकरण झाले पाहिजे. त्यांना उपयुक्त अशा व्यावहारिक सूचना तेथे मिळणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाप्रमाणेच नोकरीच्या काळातही त्यांना मार्गदर्शन मिळत राहिले पाहिजे. खेड्यात काम करीत असताना त्यांच्यापुढे उभ्या राहणाऱ्या समस्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करून त्या सोडविण्यासाठी त्यांना मदत तालुका-पातळीवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून झाली पाहिजे. म्हणून ग्रामशिक्षण व ग्रामविकास ह्यांचा दर्जा सुधारावयाचा असेल तर हे उपशिक्षणाधिकारी व गटविकासाधिकारी ह्यांच्या कार्याची फेरतपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामशिक्षक व ग्रामनेते ह्यांच्यात स्फूर्तीचे कारंजे स्वतःच्या परिश्रमाने, आस्थेने व कळकळीने निर्माण करण्याची क्षमता ह्यांच्यात असल्याशिवाय ग्रामोद्धाराचे स्वप्न व्यवहारात येण्याची शक्यता नाही.

## ग्रामीण शाळा

ग्रामशिक्षक म्हणजे ग्रामशाळेचा संचालक. या शाळेच्याद्वारा ग्रामीण समाजात एक चैतन्य निर्माण करणे हे त्याचे काम. या कामात त्याला यश पाहिजे असेल तर ग्रामीण शाळा ही समाज-जीवनाच्या अगदी जवळ आली पाहिजे. यासाठी प्रत्येक ग्रामीण शाळा शेतकी शाळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे. शेती हा एक प्रमुख मूलोद्योग म्हणून जीवन-शिक्षणातही मान्य केलेलाच आहे. शेतीची समस्या ही देशाची प्रमुख समस्या आहे व तिचा विकास केवळ नवीन ज्ञानाच्या साहाय्यानेच होऊ शकणार ही गोष्ट स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे मुलांमध्ये उत्साह निर्माण करायला बाग व मळा ह्यासारखे अन्य साधन नाही. स्वतःच्या शाळेच्या बागेत काम करायला विद्यार्थ्यांना खूपच आनद वाटतो. शिवाय भाजीपाला, फळे, फुले, धान्य स्वतःच्या परिश्रमाने निर्माण करण्यात काही अवर्णनीय गोडी आहे. त्यात एक वेगळाच अभिमान आहे. या सर्वांचा थोडा-फार आस्वाद घ्यायला मिळाला की, विद्यार्थ्यांच्या उत्साहाला भरते येते. शेतीच्या कामामुळे शरीरप्रकृती सुधारायला मदत होईल. मधल्या वेळच्या खाण्याची व्यवस्था करण्याचा प्रश्न आपोआप सुटण्यास मदत होईल. भारतासारख्या कृषिप्रधान देशात प्रत्येक ग्रामीण शाळा, शेती-शाळा बनविण्याचा प्रयत्न पद्धतशीरपणे व ताबडतोब होणे आवश्यक आहे. यावर केवळ शाळेचीच नाही तर देशाचीही

समस्या अवलंबून आहे हे विसरून चालणार नाही. स्वाभाविकच जीवन शिक्षण = सूतकताई व सूतकताई हाच परिपूर्ण मूलोद्योग अशा प्रकारची संकुचित व कर्मठ विचारसरणी टाकून दिली पाहिजे. शेतीबरोबर सूतकताई आणता आली तर ठीकच आहे, पण त्यासाठी अडून बसण्यात अर्थ नाही.

शाळांचे समाजकेंद्रात रूपांतर करण्याची चळवळ इष्ट अशीच आहे. या चळवळीला एक नवे वळण लावण्याचा प्रयत्न मात्र जरूर केला पाहिजे. सध्या सांस्कृतिक कार्यक्रम काही विशेष उत्सव किंवा सण ह्यांच्या निमित्ताने केले जातात. अन्य वेळा सर्व कारभार थंड पडलेला दिसतो. शाळांतील सांस्कृतिक केंद्राला असे अधूनमधून प्रज्वलित होऊन चालणार नाही. ग्रामीण जीवनातला सांस्कृतिक कार्यक्रम हा एक नित्याचा भाग होईल या दृष्टीने त्याने प्रयत्न केला पाहिजे; म्हणून ह्या कार्यक्रमात सातत्य आवश्यक आहे. दर आठवड्याला पंधरवड्याला किंवा महिन्याला नियमितपणे या सांस्कृतिक केंद्राचा कार्यक्रम गावाच्या समोर झालाच पाहिजे. त्याशिवाय रोज सायंकाळी लोकांच्या मनोविनोदनासाठी ते केंद्र उघडे असलेच पाहिजे. जीवनातल्या आनंदाचा आस्वाद घेण्याची प्रवृत्ती जनतेत निर्माण करणे व तिच्या जीवनाचा तो एक अविभाज्य घटक बनविणे हे ग्रामशाळेच्या सांस्कृतिक केंद्राचे आद्य उद्दिष्ट असले पाहिजे.

## सहकारी संस्था

ग्रामशाळेप्रमाणेच ग्रामविकासाला जबाबदार असणारा दुसरा मूलभूत घटक म्हणजे सहकारी संस्था हा होय. खेड्यातील जनतेला पिळणारे व दरिद्री करणारे सावकार व व्यापारी ह्यांच्या हातातून जनतेकडेच गावातील आर्थिक व्यवहाराची सूत्रे यावीत हा यामागील प्रमुख हेतू होय. यामुळे नफा एकट्यादुकट्या व्यक्तीला मिळणार नाही, तर तो सर्व समाजात विभागला जाईल व सर्वांनाच त्याचा फायदा मिळेल ही कल्पना असावी. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ही कल्पना जशी पाहिजे तशी साकार होताना आढळून येत नाही. सहकारी संस्थांतून गटबाजी शिरल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. व्यापारी, सावकार, राजकारणी पुढारी, गावातील नेते म्हणविणारे लोक ह्यांनी सहकारी संस्थांचा दुरुपयोग चालविल्याची उदाहरणेही कमी नाहीत. या संस्थांतील पैशाची अफरातफर, स्वार्थाकडे त्याचा उपयोग व त्यामध्ये आणलेले गटबाजीचे राजकारण यामुळे अनेक सहकारी संस्थांपासून सामान्य जनतेचा आर्थिक विकासहि होत नाही किंवा तिच्यात स्वावलंबन व सहकार वृत्तीचीही जोपासना केली जात नाही. सहकारी संस्थांची ही दुरवस्था सरकारच्याही लक्षात आलेली आहे व त्यावर कोणती उपाययोजना करावी यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी श्रीराम-निवास मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीही नियुक्त करण्यात आली आहे. अर्थात मूळ गोष्ट या सहकारी

संस्थांच्या संचालकांवर अवलंबून आहे. ग्रामीण हिताची तळमळ, समाजोद्धाराची जाणीव व जनतेला आपल्याबरोबर घेऊन काम करण्याची प्रवृत्ती यांची नितांत आवश्यकता या कार्यकर्त्यांना आहे. प्रामाणिकपणा व सचोटी याशिवाय सहकारी संस्थांचा कारभार सुव्यस्थित चालू शकणार नाही. म्हणून सहकारी संस्थांची सूत्रे कोणाच्या हातात आहेत हे पाहणे आवश्यक आहे. तसेच त्यांवरील नियंत्रण व मार्गदर्शन ह्याच्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. ही जबाबदारी प्रामुख्याने गटविकास अधिकाऱ्याकडेच येते. म्हणूनच त्याचे काम अधिक महत्त्वाचे आहे. सहकारी संस्थांतील अनेक दोष काटेकोर नियंत्रणापेक्षा सहानुभूतिपूर्वक, पद्धतशीर व सतत केलेल्या मार्गदर्शनामुळे दूर होऊ शकतील हे विसरून चालणार नाही. ह्या अशा मार्गदर्शनावरच सहकारी संस्थांना विविध प्रकारचे व्यवस्थित काम करायला प्रेरणा मिळणार व त्यांतूनच त्यांचा विकास होणार हे लक्षात ठेवले पाहिजे.

**ग्रामपंचायत व विकेंद्रीकरण**

शाळा व सहकारी संस्था ह्यांचे सहाय्य घेऊन ग्रामीण जनतेला नवीन दृष्टिकोण देण्याचे व ग्रामीण जीवनाला नवे वळण देण्याचे कार्य पंचायतसि करावयाचे आहे. पंचायतीचा कारभार लोकनियुक्त सदस्यांकडून चालविला जातो. थोडक्यात ही पंचायत म्हणजे भारतीय लोकशाहीचा मूलाधार आहे असे म्हटले पाहिजे.

पंचायत राज्याची सुरुवात बहुतेक राज्यातून झाली आहे. हिचे श्रेय लोक आपले इतर मतभेद बाजूस ठेवून एकत्रितरीत्या कशा रीतीने प्रयत्न करतील यावर अवलंबून आहे. पंचायतीच्या कारभाराला यश येण्यास काही अवधी लागणे सहज शक्य आहे. कारण या पंचायतीची एकंदर रचनाच वरून खाली या क्रमाक्रमाने सरकत आलेली आहे. ब्रिटिशांनी नवीन राजवटीस सुरुवात करताना त्याच वेळी अस्तित्वात असलेल्या, अत्यंत प्रभावी व कार्यक्षम अशा पंचायतींचा उपयोग करून लोकशाहीचा विकास नंतर जिल्हा, प्रांत व देश या क्रमाने केला असता तर सध्या दिसून येणाऱ्या अनेक गैरप्रकारांना आजची पंचायत बळी पडली नसती. पण दुर्दैवाने येथला सर्वच गाडा उलटा चालविण्यात आला व त्यामुळे वरचे दोष खाली सहजरीत्या, विकृतपणे व थोडेफार अधिक प्रमाणात पसरलेले आढळून येतात. त्यामुळे गटबाजी, स्वार्थीपणा, निवडणुकीसाठी भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब, सार्वजनिक हिताकडे दुर्लक्ष, भांडण व तंटेबखेडे करण्याची प्रवृत्ती, जातीयता व इतर संकुचित विचारांचे प्राबल्य, सत्तेचा दुरुपयोग इत्यादी दोष पंचायतीच्या कारभारात कमीअधिक प्रमाणात सर्वत्र आढळून येतील. परंतु त्यामुळे एकंदर पंचायत राज्य व कारभाराचे विकेंद्रीकरण ह्या गोष्टीच मुळात वाईट आहेत असे मानण्याची प्रवृत्ती योग्य होणार नाही. विकेंद्रीकरण हे भारतीय लोकशाहीने उशिरा का होईना, पण योग्य तऱ्हेने टाकलेले पाऊल होय.

त्याचा प्रामाणिकपणे, समाजहिताच्या बुद्धीने, जिव्हाळ्याने व अत्यंत परिश्रमाने योग्य उपयोग करून घेतला तर ते निश्चित देशकल्याणाप्रत नेईल यात शंका नाही.

पंचायत व ग्रामीण शाळा ह्यांच्यात संपूर्ण सहकार असणे हे गावाच्या, पंचायतीच्या व शाळेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. ग्रामशाळेचा अभ्यास, गावाच्या गरजा व परिस्थिती यावर आधारित होणे आवश्यक आहे. पंचायत ग्रामीण गरजांबाबत शाळेला इष्ट ती माहिती जरूर पुरवू शकेल. शाळेला आपला अभ्यासक्रम त्याप्रमाणे आयोजित करता येईल. शाळेचा मळा हा शेतीच्या नव्या पद्धतीचे प्रयोगस्थान झाले पाहिजे. त्या प्रयोगांची परिणामकारकता अजमावून पंचायत ग्रामसभेमार्फत लोकांना त्यांची माहिती देऊ शकेल, त्यांचा प्रसार करू शकेल. पंचायतीकडून आर्थिक मदत, जमिनीची मदत, अनेक गोष्टींवर सल्ला इत्यादीची अपेक्षा राहील. यशस्वी लोकशाहीचे धडे पंचायतीने विद्यार्थ्यांसमोर ठेवले पाहिजेत, कारण कालांतराने तेच विद्यार्थी पंचायतीचे सदस्य होणार आहेत. पंचायतीचे हे अप्रत्यक्ष शिक्षण शाळेला अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. म्हणून पंचायतीचा कारभार सचोटीचा व प्रामाणिकपणाचा असलाच पाहिजे. अन्यथा त्याचा अनिष्ट परिणाम पुढच्या पिढीवर होऊन संपूर्ण राष्ट्रीय जीवनाला कीड लागल्यावाचून राहणार नाही.

## लोकशाहीच्या मूलतत्त्वांचा प्रसार :

या दृष्टीने विचार करता लोकशाहीला व सामाजिक प्रगतीला आधारभूत असलेल्या अशा गुणांची जोपासना संपूर्ण जनतेत होण्यासाठी एखादी प्रभावी यंत्रणा वा योजना असणे आवश्यक आहे. आजकाल आमचा लोकशाहीचा कारभार वाढत आहे, परंतु या लोकशाहीचा कारभार आखणारांनाच लोकशाहीची कल्पना नसते. भारतीय घटना ही आज आपल्या भारतीय समाजाची गीता आहे, पण हिच्यासंबंधीचे सर्वसाधारण ज्ञानही सर्वसामान्यच काय परंतु सुशिक्षित जनतेलाही नीट नाही. स्वाभाविकच हक्कांसाठी डोळे झाकून आरोळ्या ठोकताना घटनेने आपल्यावर कोणती जबाबदारी टाकली आहे. याची जाणीव सामान्य जनतेला व त्यांच्या छोट्या-मोठ्या पुढाऱ्यांना अजून व्यवस्थितरीत्या आलेली नाही. त्याबरोबरच प्रामाणिकपणा, स्वार्थत्याग, अविरत उद्योग ह्या तत्त्वांचा प्रसारही जनतेत न झाल्याने लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत लाचलुचपत भ्रष्टाचार व स्वार्थीपणा ह्यांची कीड आमच्या समाजाला लागलेली दिसते. ही कीड केवळ कायदेशीर उपाय योजून दूर होण्यासारखी नाही. यासाठी मूलतः प्रयत्न होणे फार आवश्यक आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रांत चर्च ही संस्था फार जागृत आहे व धार्मिक, नैतिक शिक्षणाचे ते एक प्रभावी केंद्रस्थान आहे. परदेशांत बहुतेक शाळांतून प्रत्यक्ष वा

अप्रत्यक्षरीत्या धार्मिक शिक्षण दिले जाते. कम्युनिस्ट राष्ट्रांत पक्षाच्या द्वारे पक्ष-निष्ठा, राष्ट्रनिष्ठा व मार्क्सवादी तत्त्वावरील निष्ठा जागरूक राखली जाते. शाळा-महाविद्यालयांतून सुद्धा साम्यवादाचा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात आलेला आहे. आमच्याकडे मात्र शोचनीय स्थिती आहे. पूर्वीची धर्मसंस्था मोडकळीस आली आहे व संतसंस्था लुप्त झाली आहे. धर्मातीततेचे तत्त्व आम्ही स्वीकारल्याने ह्या संस्थांचे पुनरुज्जीवन करणे कठीण झाले आहे. भारतीय घटना व लोकशाहीची मूलतत्त्वे यांचा सहेतुक व तीव्र प्रचार करणे व ती तत्त्वे विद्यार्थ्यांच्या व जनतेच्या मनात बिंबविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे या गोष्टींचा विचारही अजून गंभीरपणाने करण्यात आलेला नाही, मग प्रत्यक्ष उपाययोजनेची गोष्ट दूरच राहिली. हे काम खेड्यांमध्ये एक तर शिक्षक करू शकेल. परंतु त्याचा दर्जा त्यासाठी खूपच वाढविणे आवश्यक आहे. राजकीय संघटनांनाही हे काम करता येण्यासारखे आहे, परंतु त्यासाठी त्यांनी आपल्या वैयक्तिक व पक्षीय आचरणावर काही नैतिक बंधने स्वत: होऊन घालून घेणे आवश्यक आहे. हे काम करणारी एखादी स्वार्थत्यागाचा पायावर उभी राहिलेली डॅनिश लोकशाळेसारखी संघटना निर्माण झाली तर फारच चांगले. पण अशा संस्था तयार काराव्या लागत नाहीत. ह्या तळमळीतून उत्स्फूर्तरीत्या बाहेर येतात. उत्स्फूर्तपणे ग्रामीण कल्याणासाठी झटणारी चळवळ सुदैवाने भारतातही निर्माण झाली आहे. ती म्हणजे ग्रामदानाची. तिचा योग्य उपयोग करून घेतल्यास लोकशाहीचे गुण बिंबवणे व समाजविकासाचे प्रयोग चालू ठेवणे अधिक सुकर होईल. यात शंका नाही.

**ग्रामदान व समाजविकास :**

ग्रामदान-चळवळीची उभारणी मूलतः काही फार चांगल्या गोष्टींवर झाली आहे. विनोबाजींसारख्या भारतवंद्य श्रेष्ठ संताकडून या चळवळीला प्रेरणा मिळाली. खेड्यातील भूमिहीनांचा प्रश्न सोडविणे व तोही समाजाच्या दयाशील प्रवृत्तीला आवाहन करून ही त्यामागची प्रमुख भूमिका आहे. प्रथम विनोबाजींनी केवळ थोड्या फार भूमीचे दान मागितले. पुढे पुढे त्यांना संपूर्ण गावेच्या गावेसुद्धा दान म्हणून मिळू लागली. स्वाभाविकच अशा प्रकारे समाजहिताच्या बुद्धीने स्वेच्छेने केलेल्या दानातून ग्रामीण राज्याची कल्पना लौकर व्यवहारात येणे सहज शक्य आहे. ग्रामदान खेड्यासाठी ग्रामदान-कायदे आता राज्याराज्यातून होत आहेत व ग्रामीण विकासाचे प्रयोग येथे जोमाने सुरू होतील यात शंका नाही.

ग्रामदान-चळवळीचा विशेष म्हणजे ती पूर्ण ऐच्छिक आहे. जनतेच्या सद्भावनेला येथे जोरदार आवाहन करण्यात आले आहे. स्वार्थत्यागाच्या पायावर ह्या चळवळीची उभारणी आहे. विनोबाजींनी संपूर्ण देशात सतत–आठ वर्षे पदयात्रा करून हिला एक तेजस्वी नैतिक अधिष्ठान मिळवून दिले आहे. समाज-विकासाला योग्य अशी भूमी ग्रामदान खेड्यातून म्हणूनच मिळणे अगदी

स्वाभाविक आहे. तिचा उपयोग कौशल्याने करून घेतला पाहिजे. समाजविकासाचे प्रयोग ह्या खेड्यातून आणताना लोकांमध्ये जी स्फूर्ती, सहकारिता व सद्‌वृत्ती निर्माण झालेली आहे तिला सरकारी चाकोरीच्या रहाट्यात धक्का न लागेल ह्याची काळजी घेतली पाहिजे. दुसरे म्हणजे लोकशाही व घटना यांच्या मूलतत्त्वाचा प्रसार अशा ठिकाणी अधिक वेगाने होईल हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. किंवा ग्रामदान-चळवळीसाठी ज्यांनी आपले आयुष्य वा जीवनाचा काही कालखंड दिला त्यांच्याद्वारा हे काम केले पाहिजे. ग्रामदान-चळवळीच्या निःस्वार्थी कार्यकर्त्यांना अन्य ग्रामीण भागातही हे तत्त्वप्रसाराचे काम करण्यास उत्तेजन व प्रशिक्षण दिले पाहिजे. अर्थात केवळ एवढ्याने ह्या खंडप्राय देशाचा ग्रामशिक्षणाचा प्रश्न सुटण्यासारखा नाही. त्यासाठी प्राथमिक शाळेपासून ते विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या अभ्यासक्रमात ह्याचा कौशल्याने अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे.

## ग्रामशिक्षणाचा कारभार :

वरील विवेचनावरून एक गोष्ट सहज लक्षात येते की, शिक्षणाचा संबंध प्रचलित कालात सामाजिक परिस्थितीशी अत्यंत निकटचा येत आहे व तो अधिकाधिक निकटचा होत जाणार. ही गोष्ट अर्थातच फार चांगली आहे. परंतु ह्याचा परिणाम शिक्षणसंस्थांचा अभ्यासक्रम, कार्यक्रम, जबाबदारी, शिक्षकविद्यार्थी व शिक्षक-पालक-संबंध इत्यादी सर्वांवर होत आहे. विशेषतः ग्रामीण शाळा व ग्रामशिक्षक ह्यांच्या बाबतीत हे बदल झपाट्याने होत आहेत. यामुळे ग्रामशिक्षकाची जबाबदारी तर वाढली आहे, पण योग्य मार्गदर्शन, वरीष्ठांकडून अपेक्षित असलेली सहानुभूती व स्वतःच्या योजना कृतीत उतरविण्याचे स्वातंत्र्य यांचा बराचसा अभाव असल्याने नव्या समाजरचनेत काम करताना त्याची जास्त कुचंबणाच होत आहे. यासाठी ग्रामशिक्षणाच्या कारभारात मूलगामी परिवर्तन होणे आवश्यक आहे.

आमच्या शैक्षणिक व अन्य सरकारी कारभारात काही अत्यंत असामाजिक दोष ब्रिटिश पद्धतीमुळे शिरले. वरिष्ठांची शिरजोरी व हेकेखोरपणा, खालच्या लोकांस स्वतंत्र प्रयोग करण्याची बंदी, कागदी घोड्यांचा सुळसुळाट, छोट्या गोष्टीसही लागणारा व्यर्थ कालापहरण आणि कनिष्ठ लोकांकडे व जनतेकडे पाहण्याचा सहानुभूतिशून्य व तिरस्कारयुक्त दृष्टिकोन हे ब्रिटिश राजकर्त्यांचे दुर्गुण अजूनही आमच्या कारभारातून पार निघून गेलेले नाहीत. याच्या जोडीलाच वरून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ह्या तत्त्वांचा घोष करावयाचा व प्रत्यक्ष कृतीत व आचरणात त्यांनाच हरताळ फासायचा असा दांभिकपणाही शिरल्याचे आढळून येते. शिक्षणक्षेत्रातील अशा कारभारामुळे तर ग्रामीण शिक्षकाला आपली नवी जबाबदारी पार पाडणे अशक्य होऊन बसले आहे.

म्हणूनच आमच्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या वृत्तीत व शाळांची तपासणी घेण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी ग्रामशिक्षकाला ग्रामीण गरजांनुरूप शालेय अभ्यासक्रमात इष्ट तो बदल करण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. शिक्षणाचा दर्जा न घसरता ही गोष्ट कशी करता येईल याबाबतीत त्याने मार्गदर्शन केले पाहिजे. यासाठी ग्रामशिक्षण व ग्रामीण शाळा यांच्या विशिष्ट गावातील समस्या कोणत्या आहेत, त्या कशा रीतीने सोडविता येतील हे सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून त्याने पाहिले पाहिजे. गावाचा एक मूलभूत घटक या नात्याने आपली जबाबदारी शाळेस कशी पार पाडता येईल ह्याचे मार्गदर्शन शिक्षकाला मिळाले पाहिजे. अर्थातच त्यात नसता काटेकोरपणा, संकुचितपणा किंवा कागदी परिपत्रके व अहवाल यांना फाजिल महत्त्व देऊन चालणार नाही. शिक्षणाधिकाऱ्याला पंचायत, सहकारी संस्था इत्यादींच्या पदाधिकाऱ्यांशीं संबंध ठेवून ग्रामविकासाबाबत ग्रामशिक्षकाला शैक्षणिक व सामाजिक जबाबदारी कशी पार पाडता येईल ह्याचे वैयक्तिक प्रेमळ, सहानुभूतीचे व मित्रासारखे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

## भारतीय विद्यापीठे व ग्रामशिक्षण

ग्रामीण शिक्षक व ग्रामीण समाज ह्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी भारतीय विद्यापीठांचीही आहे. परंतु ब्रिटिश काळातल्याप्रमाणेच अद्यापही आमच्या विद्यापीठांचा जोर परीक्षा घेणे व शहरावर लक्ष केंद्रित करणे यावरच आहे. स्वातंत्र्योत्तर कालात स्थापन झालेली बहुतेक विद्यापीठे मोठमोठ्या शहरांच्याच वाट्याला आलेली आहेत. एवढेच नव्हे तर उच्च ग्रामीण संस्था म्हणून ज्या ग्रामीण शिक्षणाच्या व विकासाच्या हेतूने स्थापन करण्यात आल्या त्याहि गारगोटी येथील सारखा एखाद दुसरा अपवाद सोडल्यास मोठाल्या शहरांतून स्थापन करण्यात आलेल्या आहेत. लँड ग्रँट कॉलेजच्या धर्तीवर स्थापन होणारी विद्यापीठेही शहरांतूनच प्रामुख्याने स्थापन होत आहेत. याचा अर्थच हा की, आमचा सुशिक्षित व अधिकारपदस्थ वर्ग आंग्लकालीन मानसिक गुलामगिरीच्या जोखडात अजूनही जखडला गेला आहे. स्वाभाविकच आमच्या विद्यापीठांकडून ग्रामशिक्षणाच्या कार्याला जी चालना, प्रेरणा व मार्गदर्शन पाहिजे ती मिळू शकत नाही.

वास्तविक रीत्या विद्यापीठांनी ग्रामशिक्षणाचे कार्य करायला आता पुढे सरसावले पाहिजे. ग्रामीण शिक्षक व नेते यांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी विद्यापीठांना सहज घेता येईल. त्यांच्यासाठी नवनवीन सुट्टीतील अभ्यासक्रम ठेवून नवीन ज्ञानाशी त्यांना परिचित ठेवता येईल. ग्रामशिक्षण व ग्रामविकास ह्यांचे निरनिराळे प्रयोग आपल्या प्राध्यापकवर्गातर्फे करणे विद्यापीठांना सहज शक्य आहे. ग्रामीण विभागात आजकाल महाविद्यालये उघडू लागली आहेत. अशा महाविद्या-

ल्यांना मित्रत्वाचे मार्गदर्शन देणे व ग्रामीण विभागातील ज्ञानदानाची व प्रयोगाची ती केंद्रे बनतील हे त्यांनी पाहिले पाहिजे. ग्रामीण महाविद्यालयातील अभ्यासक्रम व ग्रामीण परिस्थिती ह्यांचा समन्वय घालण्याच्या दृष्टीने संशोधन व प्रयत्न करण्याची जबाबदारी या विद्यापीठांवरच आहे. प्रत्यक्ष स्वत: किंवा ग्रामीण महाविद्यालयांतर्फे शिक्षणाधिकारी व अन्य कर्मचारी, माध्यमिक शिक्षक, प्राथमिक शिक्षक व ग्रामीण समाज ह्यांना वाचनालये, व्याख्याने, परिसंवाद, चर्चा इत्यादी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी या विद्यापीठांची आहे. विद्यापीठ ही खऱ्याखुऱ्या अर्थाने विद्यापीठे झाली पाहिजेत व ही विद्याही केवळ पुस्तकी मूठभर लोकांसाठी नको, तर ती आम जनतेसाठी व प्रयोगक्षम अशी पाहिजे. या विद्येच्या द्वारा नीतिमान, सुसंस्कृत, स्वार्थत्यागी, समाजहितेषू व लोकशाहीवर निष्ठा असलेले राष्ट्राचे आधारस्तंभ निर्माण करण्याचे व्रत यांनी घेतले पाहिजे. त्यासाठी योग्य संस्कार, शिक्षण व मार्गदर्शन त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना केले पाहिजे. हे पदवी परीक्षेनंतर एखादे वर्ष का होईना, पण यांनी खेड्यात स्वेच्छेने वा सक्तीने काम करावे म्हणून एखादी योजना या विद्यापीठांनी आखली पाहिजे. या नव्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आजची परीक्षापद्धती, अभ्यासक्रम, शिस्तीची कल्पना, विद्यापीठे व महाविद्यालये यांचा कारभार ह्यात मूलगामी परिवर्तन होणे आवश्यक आहे.

**शेतकी महाविद्यालये व ग्रामशिक्षण :**

विद्यापीठांप्रमाणेच ग्रामशिक्षणाच्या बाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावण्याची जबाबदारी शेतकी महाविद्यालयांवर आहे. आमची शेतकी महाविद्यालये अजूनही खेड्यांबद्दल व शेतावरच्या कामाबद्दल नापसंती व घृणा वाटणारे शेतकी पदवीधर तयार करीत आहेत ही मोठी लज्जास्पद गोष्ट आहे. अमेरिकेतील लँड ग्रँट कॉलेजच्या धर्तीवर या महाविद्यालयांची रचना होणे आवश्यक आहे. ग्रामीण विस्तारकार्याचे प्रयोग व मार्गदर्शन ह्यांची केंद्रे येथेच असली पाहिजेत. शेती, पशुपालन, ग्रामोद्योग यांसंबंधी संशोधन करणे, अद्ययावत साधनांनी त्यात सुधारणा करणे, ग्रामीण उत्पादनवाढीचे निरनिराळे मार्ग सुचविणे, शास्त्रीय ज्ञान व प्रत्यक्ष व्यवहार ह्यांची सांगड घालणे, ग्रामीण शेतकऱ्याच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्याला मार्गदर्शन करणे, नवीन ज्ञानाचा परिचय किसानांना करून देणे अशी किती तरी कामे शेतकी महाविद्यालयांनी पार पाडली पाहिजेत. आमच्या ग्रामीण उच्च संस्था या शेतकी महाविद्यालयापासून पूर्ण विभक्त राहिलेल्या दिसून येतात. वास्तविक या दोहोंच्या कामात सहकार्य स्थापन करणे आवश्यक आहे व विस्तारकार्याची जबाबदारी या शेतकी महाविद्यालयांवर प्रामुख्याने टाकणे आवश्यक आहे.

शेतकी महाविद्यालयांकडून ग्रामशिक्षकालाही मार्गदर्शन मिळाले पाहिजे. विशेषत: प्रत्येक ग्रामीण शाळा शेतकी करण्याचे धोरण स्वीकारावयाचे ठरविले

तर शेतकी महाविद्यालयांना या ग्रामीण शिक्षकांना सतत मार्गदर्शन करणे व शाळेतील व एकंदर ग्रामीण शेती सुधारण्याच्या दृष्टीने प्रयोग व संशोधन करणे या गोष्टींची जबाबदारी उचलावी लागेल. ही जबाबदारी व्यवस्थित रीत्या पार पाडण्यासाठी शेतकी महाविद्यालये ग्रामीण विभागातच उघडण्यावर कटाक्ष दिला पाहिजे.

शेतकी महाविद्यालये व ग्रामशिक्षकांच्या प्रशिक्षण संस्था ह्यांचाही निकटचा संबंध असला पाहिजे. ग्रामशिक्षकांना प्रशिक्षण-काळातच शेतीचे शिक्षण मिळाले पाहिजे. हे काम एक तर संपूर्ण शेतकी महाविद्यालयांवर सोपविले पाहिजे किंवा प्रचलित प्रशिक्षण-संस्थांनी उपलब्ध असलेल्या शेतकी महाविद्यालयाचा प्रत्यक्ष उपयोग करून घेतला पाहिजे. जर प्रशिक्षण-संस्था व शेतकी महाविद्यालये एका ठिकाणी नसतील तर प्रशिक्षण-संस्थेतील शेतीशास्त्राच्या अध्यापकास शेतकी महाविद्यालयास प्रशिक्षणासाठी पाठविणे आवश्यक आहे. ग्रामीण शिक्षक तयार करणाऱ्या संस्थाही ग्रामीण विभागातच असणे अत्यंत हितावह आहे. अशा रीतीने ग्रामीण प्रशिक्षणाचा व शेतीशिक्षणाचा केंद्रबिंदू खेड्यात सरकविणे ग्रामविकासासाठी अनिवार्य आहे.

### मंदिरांचा सदुपयोग :

ग्रामशिक्षण व ग्रामविकास यांच्या स्वाभाविक प्रवृत्तींचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. भारतातील ग्रामीण लोकांची मूलतः प्रवृत्ती धार्मिक आहे. देव-देवता, नवस-सायास इत्यादींवर अद्याप त्यांचा विश्वास आहे. मंदिरांवर व देवदेवतांच्या उत्सवांवर अजूनही अफाट पैसा अशा दरिद्री अवस्थेतही त्यांच्याकडून खर्च होत असतो. ग्रामीण जनतेचा हा पैसा योग्य मार्गाला लावणे, भोंदू, देव-देवतांच्या तडाख्यातून त्यांची सुटका करणे आणि मंदिरे ही खऱ्या अर्थाने विद्येची व पावित्र्याची स्थाने बनविण्यास त्यांना प्रेरणा देणे ह्या गोष्टी ग्रामीण समाजशिक्षणात निश्चित येतात हे विसरून चालणार नाही. निधर्मी राजवटीत राहत असूनही मंदिर, मशीद किंवा चर्च ह्यांचा उपयोग समाजविकासाकडे करून घेणे आजच्या घडीस आवश्यक आहे. विशेषतः देव-देवळांच्या नावाखाली ग्रामीण जनतेत अज्ञानामुळे जे अयोग्य, किळसवाणे, घाणेरडे, बीभत्स व क्रूर प्रकार शिरले आहेत ते थांबवणे व त्याजागी मंदिराच्या परंपरेला, कल्पनेला व पावित्र्याला शोभतील अशा प्रवृत्ती व प्रेरणा आणणे आवश्यक आहे. ग्रामीण शिक्षक, पंचायत-समिती वा गावातील अन्य खाजगी संस्था अशा प्रकारचा कार्यक्रम हाती घेऊ शकेल. लोकांच्या संकुचित धार्मिक भावनेला चिथावणी देण्याऐवजी धर्मांतर्गत असलेली विशाल मानवता व अपार प्रेम ह्यांना आवाहन केल्यास समाजविकासाला पोषक भूमी सहजरीत्या निर्माण करता येऊ शकेल.

**जुन्या परंपरा – नवी वळणे :**

याचप्रमाणे आमच्या जुन्या परंपरा, जुने उत्सव ह्यांना नवी वळणे देऊन ग्रामशिक्षण व समाजविकास यांबाबतीत सबंध गावात उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न करता येऊ शकेल. उदाहरणार्थ, गुढीपाडव्याचा दिवस नवीन विद्यार्थ्यांच्या शालेय प्रवेशाचा दिवस म्हणून सर्व गावात मोठ्या धूमधामपणे व उत्साहाने पार पाडता येण्यासारखा आहे. दसऱ्याच्या दिवशी खेड्यातून परगावी शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्व गावातर्फे सत्कार व निरोपसमारंभ करून पूर्वीच्या 'शिलंगणाला' जाण्याच्या कल्पनेला नवे वळण देता येण्यासारखे आहे. गणपति-उत्सव वा शारदोत्सव यांच्या प्रसंगी ग्रामीण कलाकारांना आपले कलाचातुर्य दाखविण्यास पूर्ण वाव सहज देता येईल. लग्नसमारंभातले खर्च कमी करून ग्रामविकासाच्या कामाला त्यांपैकी काही पैसा लावता येणे शक्य आहे. योजकता व कल्पकता यांचा उपयोग केला तर एक नवे वळण जुन्या परंपरांना देता येणे शक्य आहे. यामुळे ग्रामशिक्षणाची नवी वाटचाल चालायला नवा जोम निश्चित मिळेल.

**नवा उत्साह – नवी दृष्टी :**

ग्रामीण जनतेचा वाढता उत्साह राजकीय बाबतीतही दिसून येतो. ग्रामीण जनता ही सर्वसामान्यतः जास्त श्रद्धाळू व संवेदनक्षम असते. पुढाऱ्याच्या सूचनेचा ( Suggestion ) परिणाम तिच्यावर अधिक लौकर होतो. त्यामुळे निवडणुका, मिरवणुका, मोर्चे इत्यादी बाबतीत अडाणी व निरक्षर जनता उत्साहाने भाग घेताना दिसून येईल. ग्रामीण जनतेचा हा उत्साह ग्रामशिक्षण व ग्रामविकास ह्यांच्या उपयोगासाठी कसा करून घेता येईल याचा विचार गंभीर-पणाने केला पाहिजे.

दुसरे म्हणजे ग्रामीण राजकारणात आजकाल बऱ्याच वेळा खेड्यातील दोन-चार लब्ध-प्रतिष्ठित लोकांची मक्तेदारी दिसते. कधी कधी गावा-तील पक्षोपपक्षातील भांडणामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे हाती आलेल्या सत्तेचाही ग्रामविकासासाठी नीट उपयोग केला जात नाही. स्वाभाविकच निवडणुकांच्या वेळी लोकांत दिसून आलेला उत्साह ओसरू दिला जातो. ह्या उत्साहाला नवी दृष्टी देणे आवश्यक आहे. निदान ग्रामविकास व ग्रामशिक्षण ह्या गोष्टी अशा आहेत की, ज्या वेळी सर्व पक्षांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. या दृष्टीने जुलै १९६४ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय पंचायत परिषदेच्या ४ थ्या अधिवेशनात पंचायत राज्यातील निर्णय एकमताने घेतले जाण्याचे शिक्षण जनतेला द्यावे असा जो ठराव करण्यात आला तो महत्त्वाचा आहे. सर्व राजकीय पक्ष ग्रामविकासाच्या बाबतीत आपल्या मतात थोडीफार तडजोड करू लागले व

संपूर्ण सहकार्य देऊ लागले तर सोन्याहून पिवळे होईल. यामुळे ग्रामीण जनतेचा अधिकच जागरूक असलेला उत्साह अधिक उसळून उफाळेल व ग्रामशिक्षणाच्या कार्याला चांगली तीव्र गती मिळेल यात शंका नाही.

**ग्रामोद्धाराची चळवळ :**

सर्व जनतेत उत्साह किंवा चैतन्य निर्माण करणे हा ग्रामशिक्षण व ग्रामविकास ह्यांच्या कार्याचा मूळ पाया असला पाहिजे. ग्रामीण जनतेच्या अशा उत्स्फूर्त उत्साहाशिवाय व सक्रिय सहकार्याशिवाय ग्रामोद्धाराचे विशाल कार्य सफल होऊ शकणार नाही. ह्यासाठी एक देशव्यापी चळवळ ह्या दृष्टीने या कार्याकडे पाहिले पाहिजे व देशापुढील ती एक आणीबाणीची समस्या आहे असे समजून एकजुटीने, जोमाने व सर्व शक्ती एकवटून ती सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी सर्व प्रकारच्या साधनांचा सर्वतोपरीने उपयोग केला पाहिजे.

ग्रामीण शाळा व ग्रामशिक्षक ह्यांच्या यशस्वी कार्याचे वृत्तान्त वर्तमानपत्रांत प्रमुख भागी झळकले पाहिजेत. गावे साक्षर व स्वयंपूर्ण होण्यासाठी स्पर्धा लावल्या पाहिजेत. अशा गावांचा सत्कार झाला पाहिजे. विकासयोजनेत त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. रेडिओवरून अशा वृत्तान्तांना प्रसिद्धी दिली पाहिजे. गावा-गावातील सहकार्य क्रीडा-स्पर्धा, उत्सव-समारंभ, भेटी-गाठी ह्यांनी वाढविले पाहिजे. प्रभातफेऱ्या, घोषणा, स्पर्धा, परिपत्रके, पुस्तिका, वर्तमानपत्रे, रेडिओ, व्याख्याने, परिसंवाद, चर्चा, चित्रपट, इत्यादी भिन्न भिन्न साधनांचा सतत व प्रभावी उपयोग करून ग्रामविकासाबाबतचा लोकांचा उत्साह कायम ठेवला पाहिजे. जसजसा ग्रामविकास होईल तसतशी ग्रामशिक्षणाची निकड लोकांना अधिकाधिक पटत जाईल. त्याचप्रमाणे ग्रामशिक्षणाच्या विकासामुळे ग्रामविकासाला अधिक जोराची चालना मिळेल. स्वाभाविकच गावाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दर्जा उंचावत जाईल व सुखी ग्रामजीवनाचे स्वप्न प्रत्यक्ष व्यवहारात साकार झाल्याचे दिसून येईल.

# ग्रामीण विद्यापीठे : १०

## पूर्वेतिहास :

कोणतीही नवी संस्था निघाली की तिचे प्रचलित रूप, भावी संवर्धनाची दिशा यांचा शोध घ्यावयाचा असेल तर त्या संस्थेच्या गतकालीन इतिहासाचे धागे-दोरे तपासावे लागतात. ग्रामीण विद्यापीठांचे स्वरूप आणि भविष्य पाहताना भारतातील विद्यापीठांच्या उदयास्ताचा असाच विचार आपल्याला करावा लागेल. कोणतीही सामाजिक संस्था घेतली की तिच्या अंगोपांगांवर, घडणीत, विकासात किंवा विनाशात सामाजिक घडामोडींचा हात असतोच. विद्यापीठ ही सामाजिक संस्था आहे. तिचे रूप-परिवर्तन समाज-निरपेक्ष नसते. तिच्या मर्यादाही तत्कालीन समाजाच्या, म्हणजे त्या संस्थेशी निगडित असलेल्या व्यक्तींच्या मर्यादा असतात. तिचे क्रांतिदर्शी स्वरूपही काही व्यक्तींच्या विशाल दृष्टिकोणाचा परिपाक असतो. समाज अशा संस्थेची सतत परीक्षा करीत असतो, तिची तपासणी करतो, तिचे मूल्यमापन करतो, याचा अर्थ समाजाच्या त्या संस्थेकडून काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षांच्या संदर्भात ही क्रिया सतत घडत असते.

प्राचीन भारताच्या तीन हजार वर्षांच्या कालखंडात हिंदू, बौद्ध आणि मुसलमान यांनी विद्याज्ञानाचे जे कार्य केले त्यात विद्याकेंद्रे निर्माण केली हे सर्वश्रुत आहे. या विद्येच्या प्रसारामागे धर्म-भावना ही अत्यंत प्रबल प्रेरणा होती. मोक्ष-

विचाराला प्राधान्य होते. हिंदूंची **गुरुकुले,** बौद्धांचे **मठ, नालंदा, वल्लभी, विक्रमशीला** ही विद्याकेंद्रे, आणि मुसलमानी अमलातील **मक्तब** आणि **मदरसा** या शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या. या संस्थांचे ठळक विशेष आजही लक्षणीय ठरतात. शिक्षण आणि शिक्षक यांना पूर्ण स्वातंत्र्य, विद्यार्थी, शिक्षक यांचे अनौपचारिक संबंध, समाजाने, राज्यकर्त्यांनी वाहिलेली चरितार्थाची, रक्षणाची काळजी अशा काही विशेषांबरोबर, सलणाऱ्या मर्यादाही जाणवत होत्या. कर्मकांड, धार्मिक एकांतिकता, स्मरणावरचा भार, आध्यात्मिक जीवनावरच सारे लक्ष केंद्रित झालेले, साचेबंद नियम, अशा मर्यादा निर्देशित करता येतील. पण अशा सर्व परिस्थितीतही जातक, औषध, तत्त्वज्ञान, व्याकरण, खगोल, आदि शास्त्रांचा विकास झाला. पण ऋतुचक्रांच्या फेऱ्यात हे सारे ज्ञान, ही केंद्रे, या परंपरा अक्षरशः नामशेष झाल्या. अगदी अलिकडे उत्खननाच्या प्रयत्नातून या प्राचीन विद्याकेंद्रांचे अवशेष हाती लागत आहेत. संशोधक हाती येणाऱ्या साधनांच्या साहाय्याने तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करून आपले विचार समोर मांडू लागले आहेत. परंतु या मधल्या सुमारे ६०० वर्षांच्या कालखंडात हे सारे नष्ट झालेले पाहून मन उदास होते यात शंका नाही.

**ईस्ट इंडिया** कंपनीने भारतात व्यापार सुरू केल्यापासून तो इंग्रजी राज्य-स्थापनेनंतरच्या कालखंडात शिक्षणाच्या क्षेत्रात जे कार्य झाले ते मदतीच्या स्वरूपाचे होते. ईस्ट इंडिया कंपनीने एतद्देशीयांच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यावी हे ठरावाने मान्य होऊनही त्याची जबाबदारीने कधीच अंमलबजावणी झाली नाही. **धार्मिक तटस्थता** आणि **लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्या-संबंधीची असमर्थता** हे इंग्रजांच्या शिक्षणविषयक धोरणातील प्रमुख घटक होते. **पाझर पद्धतीचा** ( Downward-filtration Theory ) अवलंब करून, आम्ही काही निवडक लोकांचे शिक्षण करू, ते मग आपल्या परीने आपल्या देशबांधवांचे शिक्षण करतील या दृष्टिकोणामुळे तर जनशिक्षणाचा प्रश्न डावलला गेला. २ फेब्रुवारी १८३५ मध्ये **मेकॉले** या पंडिताने, पाश्चात्य विद्येचा प्रसार **इंग्रजी** भाषेच्या द्वारे करावा हा पक्ष बळकट करून भारतीय शिक्षण-क्षेत्रातील अवशिष्ट शिक्षणाच्या खुणा पुसून टाकल्या. १८४० साली इंग्रजांनी, भारतातील शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी **बोर्ड ऑफ् एज्युकेशन** ही संघटना स्थापन केली. या सर्व घडामोडींतून १८५५ साली **सर चार्लस वूड** याने आपला प्रसिद्ध खलिता सादर केला. हा खलिता म्हणजे भारतातील नव्या शिक्षण-प्रणालीची पायाभरणी होय. या ठिकाणी दोन अत्यंत मूलभूत गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. पहिली म्हणजे सर चार्लस वूडला पाझर पद्धतीने शिक्षणप्रसार होईल ही कल्पनाच मान्य नव्हती. भारतात त्याने शिक्षण सर्वदूर पोचेल हा भ्रम आहे असे स्पष्ट म्हटले. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे माध्यमिक शाळांतून

देशी भाषांतून शिक्षण द्यावे अशी त्याची शिफारस होती. या दोन्ही गोष्टी घडल्या तर आजचा भंडावून सोडणारा भाषेचा प्रश्न निर्माण झाला नसता. भारतात शिक्षणप्रसारही सर्वत्र झाला असता. देशी भाषा किती तरी पटीने विकसित होऊन समृद्ध झाल्या असत्या. परंतु हे घडले नाही. माध्यमिक शिक्षण देशी भाषांतून द्यावे या कल्पनेला १९३७ साली मान्यता मिळाली. ८२ वर्षे भारतीय भाषा अज्ञातवासात राहिल्या. या काळात शिक्षणही कुचंबले. देश, भाषा आणि संस्कृती यांना भारतवासी मुकले. या भूमीशी असलेला संबंधच तुटला. जणू परंपरेची, स्वत्वाची, जिव्हाळ्याची, अस्मितेची, एकनिष्ठेची पाळेमुळे खणून काढली गेली. भूमिपुत्र दुरावले आणि जी मने विकसित झाली, त्यांच्या आविष्काराला मर्यादा पडल्या. वाघिणीच्या दुधाने वेगळे वाघच्चे निर्माण केले. याच खलित्यात भारतात विद्यापीठे निर्माण करण्याची सूचना होती. ती विद्यापीठे **लंडन** विद्यापीठाच्या धर्तीवर असावीत अशी शिफारस होती. १८५७ साली **मुंबई, मद्रास** व **कलकत्ता** येथे नवी विद्यापीठे स्थापन झाली.

या विद्यापीठांच्या स्थापनेमुळे कोणत्या परंपरा दृढमूल झाल्या हे पाहणे आवश्यक आहे :

(१) ही विद्यापीठे **संलग्न** (Affiliating) स्वरूपाची असल्यामुळे परीक्षा घेणे हेच महत्त्वाचे कार्य ठरले गेले.

(२) या विद्यापीठांशी संलग्न अशी महाविद्यालये शहरांतून स्थापन झाली.

(३) या विद्यापीठांतील शिक्षणाची **बोधभाषा इंग्रजी** होती. ज्या शाळांतून तत्कालीन **मॅट्रिक्युलेशन** परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करण्यात येऊ लागले, त्यांना विद्याखाते आणि ही विद्यापीठे अशा उभयतांची मंजुरी घ्यावी लागे.

(४) माध्यमिक शाळांची शिक्षणाची **बोधभाषा** इंग्रजीच असल्याने त्यांची निर्मिती शहरांतूनच झाली.

या घडामोडींचा स्पष्ट अर्थ असा की विद्यापीठे, महाविद्यालये, विद्यापीठातलि प्राध्यापक यांचा भारतातील ग्रामीण जीवनाशी कसलाही संबंध उरला नाही. हा नवा शिक्षित वर्ग आणि जनता यांच्यात केवळ भौगोलिक अंतर निर्माण झाले नाही तरी मोठी मानसिक, वृत्ति-विषयक दरी निर्माण झाली.

जनसामान्यापासून विद्यापीठे, त्यांची यंत्रणा, त्यांत काम करणाऱ्या व्यक्ती सर्व दृष्टीने दुरावल्या गेल्या. यातूनच नवे पूर्वग्रह, समजुती, भ्रांत कल्पना, उपेक्षा-वृत्ती, अज्ञान, संकुचितपणा असे अनेक भोवरे उद्‌भवतात म्हणजे विद्यापीठे आणि जनता यांत निर्माण झाले. याचा पुरावा दूर शोधायला नको. चालू घडीला विद्यापीठाची बोधभाषा, प्राध्यापक आणि समाज, महाविद्यालये आणि

ग्रामीण परिसर, युवक आणि जनता विद्यापीठाची यंत्रणा, विद्यापीठाचे जनतेतील स्थान व कार्य, असे अनेक प्रश्न पुनः तपासावे लागत आहेत, त्यावर तळमळीने चर्चा होत आहे. हाच तो पुरावा होय. जनता विद्यापीठाभिमुख होणार नसून विद्यापीठांनी जनताभिमुख झाले पाहिजे या चालू युगमानाच्या अपरिहार्य प्रेरणेमुळे तर या प्रश्नांना मूलभूत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. हस्तिदंती मनोऱ्यात ( Ivory Tower ) विद्यापीठाशी निगडित असलेल्या व्यक्तीला राहून चालणार नाही. ही काळाने गरज निर्माण केलेली आहे. लोकशाही समाज-निर्मितीच्या उद्दिष्टात तर या साऱ्या विचारमंथनाला नवे उधाण न आले तरच नवल. हा सारा इतिहास, मर्यादा, पूर्वग्रह घेऊन १८५७ ते १९३७ पर्यंतच्या काळात या पेशात विद्यापीठे वाढली. ८२ वर्षांच्या कालखंडातील चार पिढ्यांना हे असे वळण लागले. यातून विद्यापीठाच्या नव्या विकासाचा मार्ग शोधायचा आहे. ग्रामीण विद्यापीठ ही अलीकडे विकसित झालेली कल्पना आहे. तिच्या निर्मितीत, संघटनेत, विकासात या परंपरांतून काय स्वीकारायचे, कोणते समूळ सोडून द्यायचे, कोणते तडजोडीने मान्य करायचे असे मोठे प्रश्न आहेत. आणि हे सारे प्रश्न ७० टक्के निरक्षर असलेल्या देशातले प्रश्न आहेत हा संदर्भ तर कधीही दृष्टिआड होता कामा नये.

## दोन लक्षणीय घटना :

भारतीय शिक्षणाचा विचार करीत असताना १९३७ या वर्षाला एक लक्षणीय टप्पा म्हणून महत्त्व आहे. इंग्रज सरकारने **प्रांतिक स्वायत्तता** जाहीर केली आणि ११ प्रांतांतून काँग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली. याच्या जोडीने घडलेली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे गांधीजींनी **वर्धाशिक्षण योजना** या नावाने एक देशव्यापी शिक्षण-योजना लोकांसमोर मांडली. वर्धा शिक्षण-योजनेचा अन्यत्र विचार केलेला आहे. प्रस्तुत ठिकाणी ग्रामीण उच्च शिक्षणाच्या दृष्टीने गांधीजींच्या कल्पना कोणत्या होत्या तेवढ्याच पहायच्या आहेत.

गांधीजींनी पुरस्कृत केलेल्या शिक्षणयोजनेत ग्रामीण विद्यापीठे असा स्पष्ट उल्लेख नाही. तरी देखील १५ ते १८ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी **उत्तर बुनियादी** ( Post Basic ) संस्था स्थापन करून उच्च पातळीवरून मूलोद्योगी शिक्षण देण्याची व्यवस्था असावी असे त्यांनी नमूद केलेले आहे. या संस्था केवळ शिक्षण देणाऱ्या राहणार नव्हत्या तर त्यांच्या द्वारा ग्रामीण जीवन आमूलाग्र सुधारण्याचा कार्यक्रम अभिप्रेत होता. मूलोद्योगी शाळांतून ७ वर्षांचे शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी या संस्था होत्या. नवा उत्पादक व्यवसाय शिकविण्याची योजना यात समाविष्ट केलेली होती.

( १ ) शेती, फळबागा, पशुसंवर्धन, ( २ ) अन्नोत्पादन शास्त्र ( Food

Technology ), ( ३ ) ग्रामीण उद्योगधंदे, ( ४ ) ग्रामीण आरोग्य, ( ५ ) ग्रामीण शिक्षण, ( ६ ) ग्रामीण स्थापत्य शाखा.

या विषयांचा अभ्यासक्रम अंतर्भूत केलेला होता. जीवनाच्या गरजांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे संशोधन ( Action Research ) या संस्थांतून व्हावे अशी कल्पना होती. याच ठिकाणी, भारतात ग्रामीण विद्यापीठे निघावीत व त्यांचे स्वरूप कसे असावे याबद्दल विचार करणारे **ऑर्थर इ. मॉर्गन** यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या मते प्रचलित विद्यापीठे खेड्यात राहणाऱ्या जनतेसाठी काहीही करीत नाहीत. ७५ टक्के विद्यापीठीय शिक्षण घेतलेले लोक परत आपल्या गावाकडे जात नाहीत. ही **मॉर्गन** यांच्या मते फार मोठी राष्ट्रीय हानी होय. खेडेगावातील नैसर्गिक संपत्ती आणि मनुष्यबळ यांची पराकाष्ठेची आबाळ होऊन या दोन्ही शक्ती वाया जात आहेत.

**विद्यापीठ शिक्षण महामंडळ :** (University Education Commission; डॉ. राधाकृष्णन् अध्यक्ष; १९४९ चा अहवाल )

भारतीय विद्यापीठांची आमूलाग्र पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळात मध्यवर्ती शासनाने, डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली एक मंडळ नेमले. या मंडळाने भारतातील विद्यापीठांची पहाणी करून अहवाल तयार केला. या अहवालात त्या मंडळाने **ग्रामीण विद्यापीठाच्या** निर्मितीविषयी सूचना केलेल्या आहेत. ग्रामजीवनाची झालेली उपेक्षा, नैसर्गिक संपत्ती व मनुष्यबळ यांचा ऱ्हास, उत्पादक शिक्षणावर भर, नवा सांस्कृतिक दृष्टिकोण निर्माण करण्याची आवश्यकता इत्यादी गोष्टींची सविस्तर चर्चा केलेली आहे. ग्रामीण महाविद्यालये व विद्यापीठे यांना अवश्य असणाऱ्या शासन-व्यवस्थेसंबंधी सूचना या मंडळाने केल्या. यानंतर मध्यवर्ती सरकारने नेमलेल्या **माध्यमिक शिक्षण महामंडळाने** ( Secondary Education Commission, १९५२; डॉ. मुदलियार अध्यक्ष. ) खेडोपाडी माध्यमिक शिक्षणाच्या सोयी व्हाव्यात अशी आग्रहाने शिफारस केलेली होती. भारत सरकारने १९५४ साली ग्रामीण विभागातील उच्च शिक्षणाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी एक समिती ( The Committee on Higher Education, Rural Institutes ) नेमली. डॉ. के. एल्. श्रीमाळी या समितीचे निमंत्रक होते. या समितीकडे ग्रामीण विद्यापीठे निर्माण करण्याच्या दृष्टीने सूचना करण्याचे काम सोपविले.

**ग्रामीण उच्च शिक्षण-समितीच्या महत्त्वाच्या शिफारसी :**

ग्रामीण उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट, आशय ( Content ) आणि संघटन ( Organization ) या दृष्टीने समितीने शिफारसी केल्या. या करतान

माध्यमिक आणि मूलोद्योगी ( Post Basic ) शिक्षणाचे व या उच्च शिक्षणाचे संबंध स्पष्ट केले. पुढील अभ्यासक्रम या समितीने सुचविले :

( १ ) ३ वर्षांचा **ग्रामीण कार्यविषयक** ( Diploma प्रशस्तिपत्र ) अभ्यासक्रम.
( २ ) १ वर्षाचा **शिक्षक** होण्यासाठी अभ्यासक्रम.
( ३ ) १ वर्षाचा **शिक्षक** होण्यासाठी, प्रशस्तिपत्र, अभ्यासक्रम.
( ४ ) २ वर्षांचा **स्त्रियांच्यासाठी** ग्रामीण आरोग्यविषयक अभ्यासक्रम.
( ५ ) २ वर्षांचा मुकादम ( Overseer ) कार्य अभ्यासक्रम.
( ६ ) २ वर्षांचा **शेती शास्त्रविषयक** अभ्यासक्रम.

ग्रामीण विद्यापीठाच्या निर्मितीबाबत समितीने केलेल्या आणखी काही महत्त्वाच्या शिफारसी :

( १ ) निवडलेल्या केंद्रस्थानी संशोधन, ग्रंथालय, प्रयोगशाळा, अध्ययन आदि सोयी व या केंद्राभोवती महाविद्यालयांची आखणी. प्रत्येक महाविद्यालयात अधिकाधिक ३०० विद्यार्थी व विद्यापीठ धरून, एका केंद्रात २५०० विद्यार्थी असावेत.
( २ ) स्थानिक परिस्थितीशी समवाय करणारा अभ्यासक्रम.
( ३ ) प्रत्यक्ष काम आणि शिक्षण यांची सांगड.
( ४ ) ग्रामीण परिस्थितीवर प्रकाश टाकणारे अहवाल, संशोधन व नवे ज्ञान आणि तंत्र ( Technology ) यांचा परिचय.
( ५ ) ग्रामीण शिक्षणासंबंधी धोरण व तपशील ठरविण्यासाठी प्रत्येक प्रांतात **ग्रामीण शिक्षण सभा** ( Rural Education Council ) व या सर्वांचे एकसूत्रीकरण व्हावे म्हणून **अखिल भारतीय ग्रामीण शिक्षण सभा** ( All India Rural Education Council ) स्थापन करावी.

**ग्रामीण विद्यापीठाचा कारभार :**

( १ ) **दोन** नियामक मंडळे : **कार्यकारी मंडळ** ( Executive Council ) व **विद्वत्सभा** ( Academic Council ) विद्वत् सभेत १२ सभासद असावेत.
( २ ) **कुलगुरू** कृति–विभागाचे अध्यक्ष व खजिनदार यांच्या साहाय्याने दैनंदिन कारभार पाहतील.
( ३ ) ग्रामीण विद्यापीठाशी राज्य सरकारच्या आरोग्य, शेतकी, वन, सहकार, दूध–योजना, ग्रंथालय, पशुसंवर्धन, आदि खात्यांचे सहकार्य व्हावे.

डॉ. राधाकृष्णन् व डॉ. श्रीमाळी यांच्या अध्यक्षतेने ज्या समित्यांचे कार्य झाले व त्यांनी ज्या सूचना केल्या त्यावरून **ग्रामीण उच्च शिक्षण मंडळ,** सरकारने स्थापन केले. भारतात **१९५६** मध्ये **११** संस्था स्थापन होऊन वरील-प्रमाणे **उच्च ग्रामीण शिक्षण** देण्याच्या कार्याला प्रारंभ झाला.

**शिक्षण महामंडळ :** ( The Education Commission : १९६४–६६ )

भारतीय शिक्षणाचा आणि अनुषंगाने ग्रामीण शिक्षणाचा पुनर्विचार करताना एक महत्त्वाची घटना घडली, आणि ती म्हणजे केंद्र सरकारने, डॉ. डी. एस्. कोठारी यांच्या अध्यक्षतेने, समग्र भारतीय शिक्षणाचा विचार करण्यासाठी एक महामंडळ, १४ जुलै १९६४ रोजी नेमले. या महामंडळाचा अहवाल आता प्रसिद्ध झाला आहे. या महामंडळाला सर्व प्रकारच्या शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून शिफारशी करण्याचे काम कायमचे होते. महामंडळाने अत्यंत परिश्रम करून आपले कार्य पूर्ण केले व शिफारशीसकट आपला अहवाल, २९ जून १९६६ रोजी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना सादर केला. साहजिकच या मंडळाने ग्रामीण भागातील शिक्षणाचा विचार केलेला आहे. विद्यापीठांच्या संदर्भात व एकूण शिक्षणाला अनुकूल मंडळाने केलेल्या शिफारसी अशा आहेत.

**शिक्षण आणि उत्पादन :**

( १ ) भौतिक शास्त्रांचे शिक्षण हा शालेय शिक्षणाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे व विद्यापीठीय पातळीवरील सर्व अभ्यासक्रमाचे ते अंग बनले पाहिजे.

( २ ) प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणे हा सर्वच शिक्षणाचा अंगभूत भाग मानून तो मिळण्याची सोय.

( ३ ) तंत्र-विद्या, औद्योगीकरण आणि शेतीसह सर्व उत्पादन-प्रक्रियांत विज्ञानाचा वापर यांच्याशी शिक्षण निगडित होणे.

( ४ ) माध्यमिक शिक्षणाचे **बहुव्यवसायी** शिक्षणात क्रमशः रूपांतर व उच्च शिक्षणात शेती व तांत्रिक शिक्षणावर भर.

शिक्षण महामंडळाने सर्व प्रकारचे शिक्षण **उत्पादनाभिमुख** असावे ही मूलभूत कल्पना, भारताची वर्तमान स्थिती डोळ्यासमोर ठेवून अग्रभागी ठेवलेली आहे. ही उत्पादनाभिमुखता शहर आणि ग्राम अशा दोन्ही विभागांसाठी अभिप्रेत आहे. गांधीजींनी आपल्या वर्धा-शिक्षण-योजनेचा प्राण हाच मानला होता. मंडळाने हे स्पष्ट केले आहे की, कोणत्याही एका विशिष्ट अवस्थेला '**मूलोद्योगी**' असे म्हणण्याचे कारण नाही. सर्वच शिक्षण कृतिमूलक, उत्पादक

आणि जीवनाशी समवाय साधून प्रगतीकडे नेणारे असे असावे हा मंडळाचा दृष्टिकोण आहे. शेती आणि शिक्षण यांची दृढ सांगड घातली गेली पाहिजे याची जाणीव शिक्षण महामंडळाला आहे. आपल्या अहवालातील १४ वे संपूर्ण प्रकरण ( Educaion For Agriculture ) या शेतीविषयक शिक्षणाचा आराखडा स्पष्ट करते. शेती हा विषय केवळ ग्रामजीवनाशी निगडित ठेवून उपयोगी नाही या तीव्र जाणिवेने अहवालात म्हटले आहे की :

"But if agricultural development is to receive the impetus it needs, education for agriculture must become a major concern of the entire national system .of education whose responsibilities go beyond the training of specialised personnel. An orientation towards agriculture must be given in all educational institutions. " ( पृ. ३४९ )

हे सारे कशासाठी याचाही खुलासा महामंडळाने केलेला आहे. शेतीशी संबंध येणाऱ्या अनेक प्रकारच्या व्यक्तींना, मग ते प्रशासक असोत, वकील असोत, बँकर्स असोत, पुढारी असोत किंवा नवे उद्योगधंदे काढणारे असोत या सर्वांना शेतीशी निगडित असलेल्या प्रश्नांचे, समस्यांचे डोळस ज्ञान हवे. याबरच उत्पादनक्षमता, पीक-विमा-योजना, सामूहिक शेती, सहकारी कोठारे, सहकारी पतपेढ्या इत्यादी अनेक उपक्रमांचे यश अवलंबून आहे. यासाठी महामंडळाने पुढील शिफारशी केलेल्या आहेत :

( १ ) प्रत्येक राज्यात एक तरी **कृषी विद्यापीठ** असावे. यात व अन्य विद्यापीठांत निकटचे संबंध राहावेत.

( २ ) शेतीला केंद्र मानून या विद्यापीठाचे क्षेत्र चालू गरजा भागविण्यास उपयोगी पडणारे अभ्यासक्रम विकसित करावेत.

( ३ ) **भूस्तर शास्त्रे** आणि **मूलभूत शास्त्रे** यांच्या विद्याशाखा शक्य तितक्या लवकर या विद्यापीठात विकसित व्हाव्यात.

( ४ ) काही **समाजशास्त्रज्ञ**ही या विद्यापीठात असावेत.

( ५ ) राज्य शेतकी खाते आणि कृषी विद्यापीठ यांच्यात कामाच्या जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी असावी.

( ६ ) योग्य प्रशिक्षित अध्यापकवर्ग असलेल्या विभागांतून **पदव्युत्तर शिक्षणकार्य** हे वैशिष्ट्य व्हावे.

( ७ ) आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या विभागांतून पदव्युत्तर शिक्षणासाठी जास्त विद्यार्थी निवडले जावेत. त्यांच्या शिक्षणाचे कार्य निवडक व उत्कृष्ट संस्थांकडे सोपविण्यात यावे.

(८) योग्य शिक्षणतज्ज्ञांच्या समितीने शिफारस केल्यावरच संशोधन व पदव्युत्तर शिक्षण देण्याची सोय करावी.

(९) I. A. R. T. ( इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूट ), I. V. R. I. ( इंडियन व्हेटरनरी रिसर्च इन्स्टिटयूट ), N. D. K. I. ( दि नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिटयूट ) आणि कृषी विद्यापीठे. यांसारख्या मध्यवर्ती संशोधनसंस्था या पदव्युत्तर शिक्षणासाठी सोयीच्या ठरतील. या संस्थांचे परस्पर सहकार्य एका बाजूने व दुसऱ्या बाजूने I.C.A.R. ( इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चशी सहकार्य प्रस्थापित करावे.

(१०) पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश फक्त शेतकी पदवीधरापुरताच मर्यादित केला जाऊ नये. विविध क्षेत्रांतील गुणवत्ता उपयोगात आणावी.

(११) १० वर्षांच्या शालेय अभ्यासक्रमानंतर पदवीसाठी ५ वर्षांचा अभ्यासक्रम असावा. स्थानिक परिस्थितीनुसार यात बदल करण्यास वाव असावा.

विद्यापीठ अनुदान मंडळाने उपलब्ध केलेल्या सर्व सोयी, वेतनश्रेणी, कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांना मिळण्याची शिफारस केलेली आहे. सर्व साधन-सामग्रीने अद्यावत अशी ही विद्यापीठे असावीत व त्या दृष्टीने विकास व्हावा ही अपेक्षा महामंडळाने व्यक्त केली आहे. येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी **किमान २५ टक्के** विद्यार्थ्यांना **विद्यावेतन** देण्याची शिफारस आहे. तद्वतच प्रत्येक विद्यापीठाला ५०० एकर लागवडीखालील असलेली व १००० एकर क्षेत्र असलेली **शेतकी फार्म** जोडलेली असावीत. अशा शेतीकेंद्रावर किमान **१ वर्ष अनुभवादाखल काम केल्यावर पदवी देण्यात यावी.** प्रत्येक राज्यात एक **कृषी–संघटना** स्थापन व्हावी व आज प्रस्थापित असलेल्या एखाद्या विद्यापीठाला अशी मान्यता देणे शक्य आहे काय याचा विचार व्हावा. या विद्यापीठाचे सर्व कार्य एकाच आवारात चालावे व त्याला **संलग्न महाविद्यालये** असू नयेत. अपरिहार्य कारणामुळे अशी बाहेरील महाविद्यालये जोडावी लागली तर ती विद्यापीठाची घटक मानून एकाच यंत्रणेखाली चालावीत. **तांत्रिक** महाविद्यालये व I. I. T. ( इंडियन इन्स्टिटयूट ऑफ् टेक्नॉलॉजी ) अशा संस्थांशी या विद्यापीठाचा घनिष्ठ संपर्क राहावा. **यानंतर नवी शेतकी महाविद्यालये न काढता,** कृषीविषयक, **पदवीपूर्व** व **पदव्युत्तर अभ्यास** कृषी विद्यापीठामार्फत व्हावा. यानंतर महामंडळाने नवा उपक्रम सुचविला तो असा :

**शेतकी तंत्र-विद्यालये** ( Agricultural Polytechnics ) :

( १ ) **शालांत परीक्षेनंतर** शेतीविषयक सर्व शिक्षण देणाऱ्या **शेतकी तंत्रशाळा** संघटित करण्याचे कार्य अग्रहक्काने हाती घ्यावे.

( २ ) ही तंत्र-विद्यालये कृषी विद्यापीठाला **जोडली** जाऊन सुमारे १००० विद्यार्थी घेऊ शकतील अशा शाळा राज्यात निर्माण कराव्यात. आज ग्रामीण विभागातील तंत्र-शाळांतून शेतकी अभ्यास सुरू केला तर ताबडतोबीची गरज भागेल.

( ३ ) ही तंत्र-विद्यालये **बहूद्देशी** ( Multi purpose ) असून शेती व संबंधित विषयांचे शिक्षण तेथे देण्याची सोय व्हावी. तरुण शेतकरी, ग्रामीण विभागातील **स्त्रिया** व **मुली** यांच्यासाठी **छोटे अभ्यासक्रम** शिकविण्याची सोय असावी.

( ४ ) या तंत्र-विद्यालयातील अभ्यासक्रम लहान ( Terminal ) असावेत व ते विशिष्ट व्यवसायासाठी राहावेत. हुषार विद्यार्थ्यांची सोय अधिक वेळच्या प्रगत अभ्यासक्रमाद्वारे करण्यात यावी.

**शाळेतील शेती–शिक्षण :**

( १ ) प्राथमिक व माध्यमिक शाळांतून शेतीचे व्यवसाय-शिक्षण देण्याचे आजवर जे प्रयत्न झाले ते यशस्वी झाले नाहीत, त्यामुळे यापुढे असे प्रयोग स्थगित करावेत.

( २ ) शेतीमध्ये जे अपरिहार्य बदल होणार आहेत ते लक्षात घेता माध्यमिक शाळांतून शेतीऐवजी **गणित** व **शास्त्र** या विषयांवर भर देऊन शिक्षण देणे योग्य आहे.

( ३ ) लहान वयात अपुरे व्यवसाय-शिक्षण किंवा खास ( specialised ) शिक्षण देणे योग्य नाही.

( ४ ) प्राथमिक शेतकी शाळा मोठ्या संख्येने काढणे योग्य नाही. या मार्गात अनेक अडचणी आहेत. हा विचार सोडून देणे आवश्यक आहे.

( ५ ) सर्वसाधारण शिक्षणाच्या अभ्यासक्रमात प्राथमिक शाळांत शहरी विभागातही, शेतीविषयक स्थूल कल्पना देण्याइतपत अभ्यासक्रम अंतर्भूत करावा.

( ६ ) शेतकी व ग्रामीण प्रश्नांचे शिक्षण सर्व **शिक्षक-प्रशिक्षण-संस्थांतून** द्यावे.

**विकास-प्रसार कार्यक्रम :**

(१) ग्रामसेवक व अन्य अधिकारी यांचा व्यावसायिक व तांत्रिक दर्जा वाढविण्यासाठी कृषी विद्यापीठ व तंत्र-विद्यालयांनी सर्व तऱ्हेची मदत करावी व तशी सोय उपलब्ध असावी. मुख्यतः शिक्षक पुरेसे उपलब्ध व्हावेत व अभ्यासक्रम तयार करण्यासाठी सोय असावी.

(२) शिक्षक पुरेसे उपलब्ध झाले की प्रसारकार्य कृषी विद्यापीठाकडे सोपवावे. शेतकी खात्याचे विकासकार्य व अन्य कार्याशी घनिष्ठ संबंध ठेवावा.

(३) प्रत्येक **विकासगटात** सायकलवरून जाता येईल इतक्या अंतरावर एक आदर्श केंद्र असावे असे उद्दिष्ट राहावे.

(४) या केंद्रावरील शिक्षकाचे ज्ञान ग्रामीण शेतकऱ्यांपेक्षा अधिक दर्जाचे असावे. कृषी विद्यापीठाने त्यांना मार्गदर्शन व सहाय्य करावे.

(५) यशस्वी शेतकऱ्यांचा ज्ञानाचा फायदा या विकासगटातील केंद्रांनी मिळवून द्यावा.

(६) या विकासकेंद्रात ग्रामीण शेतकऱ्यांना शिक्षण द्यावे व त्यांच्यामार्फत अन्य शेतकऱ्यांचे अभ्यासवर्ग खेड्यात चालवावेत.

(७) ग्रामीण विभागातील शेतकरी व जनता यांना शिक्षण देण्यासाठी चित्रपट, आकाशवाणी या साधनांचा उपयोग करावा.

**भारतीय शेती-संशोधन मंडळ व विद्यापीठ अनुदान मंडळ यांचे कार्य :**

शिक्षणक्रम, संशोधन आणि विकासकार्यात कृषी शिक्षण योग्य तऱ्हेने अंतर्भूत होत आहे हे पाहण्याची जबाबदारी या मंडळाची आहे.

कृषी विद्यापीठाच्या निर्मितीला सर्वत्र हार्दिक पाठिंबा मिळत आहे ही लक्षणीय घटना आहे. अनेक राज्यांतून कृषी विद्यापीठ निर्माण करण्याच्या दृष्टीने कार्याला प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाच्या संदर्भात आज अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. विद्यापीठात प्रवेश कोणाला द्यावा, शिक्षणाची बोध-भाषा कोणती असावी, ग्रामीण परिसरातील महाविद्यालयाची भूमिका कोणती, महाविद्यालयीन प्राध्यापक आणि समाज यांचे परस्पर संबंध, ग्रामीण भागातील महाविद्यालयातील युवकांचे प्रश्न, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा आणि महाविद्यालये यांच्यांतील नवे नाते व भूमिका, असे किती तरी प्रश्न आज आपल्यासमोर आहेत. महाविद्यालयांचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा पर्यायाने विद्यापीठीय प्रश्नांचा विचार करीत असतो. शहरी विभागातील महाविद्यालयांचे आणि ग्रामीण परिसरातील महाविद्यालये यांच्यासमोर काही प्रश्न समान आहेत तर काही खास

असे प्रश्न ग्रामीण परिसरातील महाविद्यालयांचे आहेत. या सर्वांमागे एक विशिष्ट अशी भूमिका कोणती असावी याचाही विचार अपरिहार्य आहे. गेल्या पंधरा वर्षांत अनेक नवी विद्यापीठे स्थापन झाली. आणि त्याहून अधिक महाविद्यालये त्या त्या विद्यापीठांशी संलग्न म्हणून उभी राहिली. आमच्या तालुक्यात महाविद्यालय हवे ही ओढ का निर्माण झाली याचाही विचार होणे अवश्य आहे. या संबंधात **कोठारी महामंडळाने** केलेल्या शिफारशींच्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे.

## विद्यापीठांची उद्दिष्टे :

ज्ञानसाधना, संशोधन, नव्या ज्ञानक्षेत्रांचा शोध, नेतृत्वनिर्मिती, समता, सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना या सर्वमान्य गोष्टींच्या बरोबरीने भारतातील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात पुढील उद्दिष्टे समोर ठेविली पाहिजेत. विद्यापीठाने आता लोकाभिमुख होऊन कार्य केले पाहिजे ही जाणीव महामंडळाने पुढील कार्यक्रम सुचवून स्पष्ट केली आहे—

(१) They (विद्यापीठे) should develop programmes of adult education in a big way and to that end, envolve a widespread net-work of part-time and correspondence courses.

(२) They should assist the schools in their attempts at qualitative self-improvement.

या शिफारशी अत्यंत मूलगामी स्वरूपाच्या आहेत. कारण त्यामुळे विद्यापीठांची भारतासारख्या अप्रगत देशातील भूमिका कोणती हे स्पष्ट होते. विद्यापीठे आणि प्रौढ शिक्षण, विद्यापीठे आणि शाळा यांच्यातील वास्तविक संबंध स्पष्ट होतात. हा विचार अंगीकृत करताना आणखी एका तितक्याच मूलगामी विचाराने आपण आत्मनिरीक्षणास प्रवृत्त होतो. हा विचार पुनः एकदा 'विद्यापीठ' म्हणजे काय, विद्यापीठ या कल्पनेत (concept) कशाचा अंतर्भाव होतो, याविषयीचा आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटलच्या कालखंडापासून चालत आलेली ही विचारधारा लुप्त झालेली नाही. विचारवंत आज असा प्रश्न पुनः एकदा उपस्थित करतात की, "विद्यापीठ ही संस्था तरी आज अस्तित्वात आहे काय?" प्लेटो–ॲरिस्टॉटल यांची विद्यापीठाची कल्पना आज शिल्लक आहे का? केवळ सत्य आणि अंतिम मूल्ये यांचा विचारसंघर्ष, आपण ज्याला विद्यापीठ मानतो, तिथे चालू आहे का? हवी असलेली तयार वस्तू निर्माण करणाऱ्या ठिकाणाची कळा विद्यापीठाला आली नाही का? म्हणून या विचारधारेचा रोख असा आहे की, विद्यापीठाने (University) आपल्या

काही जबाबदाऱ्या नव्या योग्य वारसदार संस्थेकडे म्हणजे बहुलक्ष्यी विद्यापीठाकडे ( Multiversity ) सोपवाव्यात. ही नवी संस्था ज्ञान व सत्य शोधनाच्या कार्यात तज्ज्ञ अशा खास तज्ज्ञांचीच राहील. विविध क्षेत्रांतील बुद्धिमान तज्ज्ञ या नव्या संस्थेला वाहून घेतील. भौगोलिक, राष्ट्रीय, प्रांतीय किंवा भाषिक, सांस्कृतिक मर्यादांनी या सत्यान्वेषकांचे जीवन मर्यादित केले जाणार नाही. आंतरराष्ट्रीय, एकात्म जगाच्या पातळीवर त्यांचे चिंतन, मनन, संशोधन चालू राहील. अशा अत्युच्च, सर्वातीत, निरपेक्ष संस्थेचा विकास म्हणजेच प्रचलित विद्यापीठ या संस्थेची नैसर्गिक परिणती होय. साहजिकच प्रचलित विद्यापीठांनी सारे **पदव्युत्तर** कार्य या नव्या संस्थेच्या हाती सोपविणे अगत्याचे झाले आहे. याचे कारण असे की, प्रचलित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली महाविद्यालये यांना नवी भूमिका आता पार पाडावयाची आहे.

**नवी भूमिका :**

गेल्या पंचवीस वर्षांत विज्ञान आणि तंत्र-विद्या या क्षेत्रांत जी अद्‌भुत आणि मूलभूत प्रगती झाली त्यामुळे आधुनिक जीवनात प्रत्येक व्यक्तीवर एक फार मोठी जबाबदारी येऊन पडली. आधुनिक जीवनात डोळसपणे भाग घ्यायचा असेल तर आता केवळ प्राथमिक सात वर्षांचे शिक्षण उपयोगी पडणार नाही. तर माध्यमिक शिक्षणाचे क्षेत्रही **सक्तीच्या** शिक्षणक्षेत्राखाली आणावे लागेल. नव्हे महाविद्यालयीन शिक्षणही आवश्यक मानावे लागेल. या दृष्टीने जगातील प्रगत देशांनी सक्तीच्या शिक्षणाची कालमर्यादा वाढविली हे लक्षणीय आहे. आपल्याकडेही शहरी आणि ग्रामीण भागातील महाविद्यालयांत विद्यार्थ्यांची संख्या भरमसाठ वाढत असलेली दिसते. ही संख्यात्मकता स्वागतार्ह मानली पाहिजे ती दोन मुख्य कारणांनी. पहिले कारण असे की, वर्षानुवर्षे ज्यांना शिक्षणाचा मार्गच बंद होता, ज्यांना कसलाच सांस्कृतिक वारसा नव्हता अशी मुले आता महाविद्यालयाच्या परिसरात येत आहेत. त्यांना तसे येऊ देणे समाजशास्त्रीय भूमिकेवरून न्याय्य ठरते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे वर सांगितलेले. आजच्या आधुनिक जीवनात जर समर्थपणे भाग घेणे आवश्यक असेल तर अशा शिक्षणाची तीव्र गरज आहे. हा महाविद्यालयीन शिक्षणाचा **ऱ्हास** ( deterioration ) नाही, **अपव्यय** ( wastage ) नाही. आज कमीत कमी एवढे उच्च शिक्षण घेतले तरच व्यक्तीला आधुनिक जीवनात भाग घेता येईल, त्या जीवनाच्या प्रेरणा समजावून घेता येतील. हे उच्च शिक्षण कसे **आशयसंपन्न** करायचे हा प्रश्न वेगळा आहे. तो तातडीने सोडवायलाच हवा. पण त्याआधी या शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट रेखीवपणे डोळ्यासमोर हवे. त्याबरोबरच हे **सारे पदवीधर विशेष ज्ञानी, संशोधक, विचारवंत, शास्त्रज्ञ होणार आहेत ही अपेक्षाही विसंगत, अनाठायी आहे.** इंग्लंडसारख्या प्रगत देशात प्रत्येक **पाच पदवीधरां-**

मागे **एक पदव्युत्तर** अभ्यास, संशोधन, तत्त्वशोधन याकडे वळतो. उरलेले शेकडा ८० टक्के नुसते पदवीधर असतात. पण म्हणून त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण वाया गेले असे नाही. हाच निकष भारतासारख्या अप्रगत देशात तर किती तरी पटीने आग्रहाने लावला पाहिजे. ज्ञानाची क्षितिजे आज अपरिमित विस्तारलेली आहेत. तेथे सर्वचजण संशोधन करतील ही अपेक्षाच चूक आहे. या पदवी-शिक्षणाचा अभिप्राय, रोख, दिशा तशी हवी हे मान्य. पण बाकीचे सारे पदवीधर आपापल्या छोट्यामोठ्या गावांतून नव्या जीवनाचे प्रवाह आणून सोडणार आहेत. हे सांस्कृतिक परिवर्तन मूलभूत अगत्याचे आहे. हेच विद्येचे पुनरुज्जीवन आहे. ही सांस्कृतिक क्रांती आहे. काही काळ पदवीचे आकर्षण, मानापमानाच्या कल्पना, उच्च-नीचतेच्या कल्पना, काही गंड असे प्रकार होणारच. पदवीधरांबद्दलचे पूर्वग्रह नष्ट होण्यास वेळ लागेल. पण हेही पदवीधरांनीच घडवून आणण्याचे आवश्यक परिवर्तन आहे हे आपण विसरता कामा नये. माध्यमिक शाळांत परीक्षेला जे लक्षावधी विद्यार्थी बसत आहेत ते महाविद्यालयात येणार हे उघड आहे. शालान्त परीक्षा कशी असावी, त्यातील अपव्यय कसा टाळावा हे या प्रश्नाशी निगडित पण वेगळे प्रश्न आहेत. पदवीधर शेकड्यांनी नव्हे हजारोंनी निर्माण होणार हे अपरिहार्य नव्हे तर नैसर्गिक आहे. या साऱ्यांच्यासाठी विद्यापीठांनी नव्या भूमिकेत बद्ध-परिकर होणे अत्यंत जरूरीचे आहे.

नव्या कृषी विद्यापीठाला इतर विद्यापीठांशी समवाय राखून हे काम फार दक्षतेने करावे लागेल. ही विद्यापीठे आर्थिक दृष्टीने ‘ पांढरे हत्ती ’ ठरून चालणार नाही. आज प्रचलित विद्यापीठांचा खर्च इतक्या प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे तो कमी, वाजवी करणे अत्यंत आवश्यक आहे. वास्तविक त्या दृष्टीने शिक्षण महामंडळाने **‘ प्रधान विद्यापीठे ’** निर्मितीची कल्पना मांडली. दुर्दैवाने या क्रांतिकारक कल्पनेवर टीका झाली. मूळ कल्पनेचा विपार्यास झाला. इतर विद्यापीठांच्या पोटात अकारण दुजाभाव निर्माण झाला. वास्तविक या खास संस्थांना **प्रधान विद्यापीठे** न म्हणता Multiversities ( बहुलक्ष्यी विद्यापीठ ) म्हटले असते तर कदाचित् गैरसमज न होता आंतरराष्ट्रीय पातळीवरची ही नवी विविध विद्याकेंद्रे फार उपयुक्त ठरती. याच उच्च शिक्षणाच्या संदर्भात शिक्षण महामंडळाने युवकांच्या संगोपनाचे जे विचार व्यक्त केले आहेत ते महत्त्वाचे आहेत. हे युवकच नवा भारत घडविणार आहेत. शिक्षण महामंडळाच्या या सूचना ग्रामीण जीवनाच्या पुनरुज्जीवनाच्या संदर्भातही लक्षणीय आहेत.

## युवकांचे शिक्षण :

भारतात ग्रामीण भागातील युवकांच्यासाठी पहिल्यानेच कार्यक्रम आखण्याचे कार्य पश्चिम बंगालमध्ये **विश्व भारतीच्या** कार्यकर्त्यांनी **श्रीनिकेतन**

येथे केले. १९५३–५४ सालात, अमेरिकेतील 4H क्लबच्या धर्तीवर देशात ग्रामीण युवकांच्या दृष्टीने काही योजना प्रत्यक्षात आणल्या गेल्या. **दि प्लॅनिंग रिसर्च अँड् ॲक्शन इन्स्टिटयूट, लखनौ,** (उत्तर प्रदेश) या संस्थेने **बालिआ, इटावा** व **सहाराणपूर** या उत्तर प्रदेशातील जिल्ह्यांत प्रायोगिक स्वरूपाच्या युवक-शिक्षण-योजना सुरू केल्या. **पंजाब** व **म्हैसूर** येथेही अशा प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात आले. तरी देखील राष्ट्रीय पातळीवरून ग्रामीण युवकांसाठी कार्यक्रम आखण्याचे प्रयत्न अजून झालेले नाहीत. विकासयोजनांच्या कार्यक्रमात '**युवकसभा**' ही संघटना निर्माण करण्यात आलेली आहे व तिचे संचालन गटविकासाधिकाऱ्यातर्फे केले जाते. ग्रामीण भागात दोन प्रकारचे युवक आढळतात. एक शाळांत, महाविद्यालयांत जाणारे व दुसरे कोणत्याही संस्थांशी निगडित नसलेले युवक. हे जे दुसऱ्या गटातील युवक आहेत ते वडिलोपार्जित व्यवसाय करतात, काही शहरात नोकऱ्यांसाठी जातात तर काही जमेल तो उद्योग जमेल तसा करून आपले जीवन कसे तरी घालवीत असतात. शहरातही असे गट आहेतच. या सर्व युवकांच्या संदर्भात सामग्र्याने विचार होणे अगत्याचे आहे. विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचा प्रश्न या प्रश्नाशी निगडित आहे. या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केल्याचे अनेक घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे. भारतीय युवकाचे प्रश्न मुळातून समजावून घेण्यास ऐतिहासिक पार्श्वभूमीची फार गरज आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

पारतंत्र्याच्या काळात युवकांच्या क्रांतिकारक संघटना स्थापन झाल्या. पुढे राजकीय पक्षांनी आपापल्या युवक संघटना बांधल्या. यांतील बहुतेक युवकांनी स्वातंत्र्य-संग्रामात भाग घेतला. स्वातंत्र्योत्तर काळात, एखाद-दुसरा अपवाद वगळता, या युवक-संघटनांचे कार्य थंडावले. पण याच काळात देशातील विद्या-पीठांशी निगडित असलेल्या युवकांनी आपापल्या संघटना बांधल्या. पण या संघटनांचे नेतृत्व बहुंशी राजकीय कार्यकर्त्यांनीच केले. विद्यापीठ, महाविद्यालये आणि शाळा यांतील शिक्षक या संघटनांत प्रकट-अप्रकटपणे भागीदार झाले. पण त्यांचे नेतृत्व या शिक्षकांनी केले नाही. पारतंत्र्यात आणि स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणप्रसार झाला, युवकांच्या शिक्षणाची जाणीव निर्माण झाली, पण या सर्व घडमोडींत राजकारण हा प्रमुख निर्णायक घटक होऊन बसला.

विद्यार्थ्यांच्या बेशिस्त वर्तनाची मीमांसा अनेकांनी केली. त्या मीमांसेत बहुंशी.एकदेशीयपणा दिसून येतो. परंतु या युवकांच्यासाठी काही तरी भरीव केले पाहिजे, ही निर्माण झालेली जाणीव महत्त्वाची आहे. शाळा-महाविद्यालये यांत युवकांच्या प्रज्ञेची, शारीरिक सामर्थ्याची, अभिरुचीची, वृत्तींची योग्य जडण-घडण झाली पाहिजे हा विचार आता स्थिर झालेला आहे. **शिक्षण**

**महामंडळाच्या** अहवालात यासंबंधीची चर्चा येणे अपहार्य होते. शिक्षण महामंडळाच्या **निवडक शिफारसी** अशा :

(१) विद्यार्थी कल्याण-योजना अमलात आणण्यासाठी विद्यापीठात, **शाखा-प्रमुख** ( Dean ) असावा.

(२) आपल्या विद्यार्थी संघटनेचे काम कसे चालावे याबद्दल प्रत्येक विद्यापीठाने योजना निश्चित करावी. या बाबतीत प्रयोगाला वाव असावा व त्याचे स्वागत व्हावे.

(३) विद्यार्थी संघटनेचे सदस्यत्व प्रत्येक विद्यार्थ्याला आपोआप प्राप्त व्हावे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी कृति-क्षेत्र ( activity ) निवडले पाहिजे.

(४) या विद्यार्थी संघटनेत शिक्षकांनीही सहभागी व्हावे.

(५) विद्यापीठे व महाविद्यालयातील अशा विद्यार्थी-संघटनांच्या प्रतिनिधींची वार्षिक परिषद भरविण्याच्या कामी विद्यापीठ अनुदान मंडळाने पुढाकार घ्यावा.

वसतिगृहे, शासनात भागीदारी, आरोग्य पहाणी, कमी खर्चात चांगले अन्न, स्वयंशिस्त-योजनेचे पालन, व्यवसाय व नित्य मार्गदर्शन, सेवाकार्य, विविध उपक्रम-शीलता अशा अनेक शिफारसी महामंडळाने केलेल्या आहेत. या संदर्भात महाराष्ट्रात **शिवाजी विद्यापीठाने** आघाडी मिळवून विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना केलेली असून, प्रतिवर्षी विद्यार्थी—प्रतिनिधींची परिषदही विद्यापीठाच्या जागेवर, कोल्हापूर येथे भरत असते. **महाराष्ट्र राज्याने युवक कल्याण समिती** नेमली व या समितीचा अहवालही जून १९६७ मध्ये प्रकाशित झालेला आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांत काय परिस्थिती आहे याचे स्पष्ट चित्र या अहवालात दिसून येते.

**महाराष्ट्र राज्य युवक कल्याण समितीच्या महत्त्वाच्या शिफारशी :**

(१) विद्यापीठाच्या कुलगुरूने या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या कार्यात जातीने रस घेऊन मार्गदर्शन करावे.

(२) विद्यार्थी, शिक्षक आणि संस्थाचालक यांचे प्रतिनिधी असलेली एक सर्वसमावेषक समिती महाविद्यालयीन पातळीवर निर्माण करण्यात यावी.

(३) महाविद्यालय किंवा विद्यापीठ यांच्या कार्यक्षेत्रात बाहेरील कोणत्याही संघटनेला कार्य करण्यास परवानगी नसावी.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेच्या उद्‌बोधनासाठी **शिवाजी विद्यापीठाने** अंगीकृत केलेली **खेडे दत्तक घेणे** योजना अत्यंत महत्त्वाची व विधायक कार्याला आव्हान देणारी आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अनेक महाविद्यालयांनी ही योजना राबविण्यास प्रारंभ केलेला आहे. उच्च शिक्षण लोकाभिमुख होत असल्याची ही प्रसादचिन्हे होत. याच संदर्भात महाराष्ट्रात **अहमदनगर** येथील **अहमदनगर** महाविद्यालयाने प्रचलित केलेल्या **"ग्रामीण जीवनविकास आणि संशोधन प्रकल्प"** योजनेचा अगत्याने उल्लेख करण्यास हवा. अत्यंत उपयुक्त कार्य या महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सिद्ध केलेले आहे. या उपक्रमाची माहिती महाविद्यालयाने प्रकाशित केलेल्या **"New Horizens in University Education"** या पुस्तिकेत पहावयास मिळते.

**विद्यापीठाची बोधभाषा :**

१९४७ मध्ये भारतात २० विद्यापीठे होती. १९६६ मध्ये ७० विद्यापीठे निर्माण झाली. याशिवाय विद्यापीठ अनुदान मंडळाने, विद्यापीठात रूपांतर होऊ शकेल अशा काही संस्था मान्य केलेल्या आहेत. याच्या जोडीने आता प्रत्येक राज्यात **कृषी** विद्यापीठ निर्माण झाले तर विद्यापीठांची संख्या वाढेल. या सर्व विद्यापीठीय शिक्षणाची **बोधभाषा** कोणती असावी हा अकारण गुंतागुंतीचा प्रश्न होऊन बसलेला आहे. अकारण म्हणण्याचे कारण ज्या बाजूने विचार मांडले जातात त्यात एकांतिकता फार आढळून येते. वास्तवाचे भान विसरलेले दिसते. ७० टक्के निरक्षर लोक असलेल्या देशातील ही विद्यापीठे आहेत. येथील लोकभाषा म्हणजे देशी भाषा विकसित होत आहेत. **सर्व देशातील सर्व शिक्षणाची बोधभाषा एकच होणे नजीकच्या काळात अशक्य आहे.** इंग्रजीसारख्या जगन्मान्य आणि संपन्न भाषेचा संपूर्ण त्याग केव्हाही करता येणार नाही. त्याचबरोबर रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच यांसारख्या प्रगतभाषांचा अभ्यासही हाती घ्यावा लागेल. भाषांची तुलना करून अमूक श्रेष्ठ किंवा ही कनिष्ठ असे ठरवून हा प्रश्न सुटणार नाही. त्याचबरोबर विद्यापीठांनी लोकाभिमुख व्हायचे असेल तर त्यांची बोधभाषा लोकभाषा असणे अपरिहार्य आहे हे विसरता कामा नये. भाषिक दुरभिमान झटकून टाकणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सर्वांना बहुभाषिक करण्याचा अट्टाहासही सोडून द्यावा लागेल. सर्व भाषा **सक्तीच्या** करून विद्यार्थ्यांचे कल्याण होणार नाही. यासाठी **विविधलक्ष्यी विद्यापीठांची बोधभाषा इंग्रजी** राहाणे भारतीय बौद्धिक जीवनाच्या दृष्टीने अगत्याचे आहे. **विविधलक्ष्यी** ( Multiversity ) विद्यापीठास सर्व विद्यार्थी जाणार नाहीत तर संशोधनपर कार्य करू शकणारेच विद्यार्थी जातील. उरलेल्या विद्यापीठांत त्या त्या प्रदेशाची भाषा आणि पूरक भाषा म्हणून इंग्रजी अशी

व्यवस्था करावी लागेल. कारण या विद्यापीठांची ( University ) मूलभूत भूमिकाच बदललेली आहे. भाषिक शक्ती ( Language ability ) पाहून माध्यमिक शिक्षणात विद्यार्थ्याला भाषा शिकण्याचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे लागेल. सर्व भाषा सर्वांना सक्तीच्या करून काय होते याचा कटू अनुभव पुरेसा आलेला आहे. त्या अनुभवाचा धडा घेतला पाहिजे. कृषी विद्यापीठांना देखील बोधभाषा स्वीकारताना हा विचार करावा लागेल. देशाचे ऐक्य, भावनात्मक एकता असले अमूर्त प्रश्न ( abstract problems ) या प्रश्नांशी न जोडता विचार करणे आवश्यक आहे. जोवर हा संपूर्ण देश शंभर टक्के साक्षर होत नाही तोवर एकाच राष्ट्रभाषेचा विचार बाजूला ठेवून केवळ दळणवळण ( communication ) हेच तात्पुरते उद्दिष्ट मानावे लागेल. या परस्पर संबंधांचा आणि एकात्मक बौद्धिक जीवनाच्या प्रश्नाचा घोटाळा करून चालणार नाही. हे प्रश्न वेगळे आहेत. या प्रश्नांच्या पातळ्याच वेगवेगळ्या, त्यांचे स्वरूप वेगळे, त्यांची उद्दिष्टेही वेगळी आहेत. सर्व प्रश्नांचा गोपालकाला करून भाषेचा प्रश्न सुटणार नाही.

**नवे आह्वान :**

भारतीय विद्यापीठे, मग ती ग्रामीण भागातील असोत किंवा नागर भागातील असोत, त्यांनी आपला कायापलट नव्या उद्दिष्टांच्या संदर्भात केला पाहिजे. शेती जर या भारतीय जीवनाचा महाप्राण आहे तर त्या प्राणाचे चैतन्य ज्यायोगे प्रदीप्त राहील ते ते सर्व विद्यापीठांनी केले पाहिजे ही काळाची गरज नाही तर हा मूलभूत अस्तित्वाचा प्रश्न आहे. भारतीय विद्यापीठे, त्यांतील शिक्षक हे आह्वान स्वीकारतील आणि सारे कर्तृत्व या आदिमातेच्या, भूमातेच्यासाठी वेचतील तर सारे श्रम सार्थकी लागतील.

♧ ♧ ♧

# परिशिष्टे

: १ :

## भारतातील ग्रामीण उच्च शिक्षण-संस्था

**या संस्थांचा उद्देश–** ( १ ) ग्रामीण युवकांना ग्रामीण परिसरात उच्च शिक्षण देणे व त्यांच्यामध्ये समाजाची सेवा करण्याची भावना वाढीस लावणे व ग्रामीण जीवनाविषयी सहानुभावाचा दृष्टिकोण त्यांच्यामध्ये निर्माण करणे.

( २ ) ग्रामीण परिस्थिती आणि गरजा, त्यांच्याशी निगडित असलेला शिक्षणाचा सोपान तयार करणे व त्या द्वारा विशिष्ट शिक्षण घेतलेला व्यापक दृष्टिकोणाचा माणूस तयार करणे. हे शिक्षण देताना त्याचा दर्जा कोणत्याही बाबतीत कमी असणार नाही याची काळजी घेणे.

( ३ ) ग्रामीण विभागातील विकास-कार्यक्रमासाठी लागणारे ग्रामीण युवक कार्यकर्ते तयार करणे.

( ४ ) सामूहिक विकासाची व योजनांची केंद्रे तयार करणे व त्यांच्या मार्फत विस्तारयंत्रणा सुरू करणे. ग्रामीण जनतेमध्ये नव्या कल्पना व नव्या कार्य-पद्धती रूढ करण्यासाठी प्रात्यक्षिक केंद्रे चालविणे.

ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून भारतात प्रथम ११ संस्था १९५६ मध्ये सुरू करण्यात आल्या. त्यानंतर या संस्थेत ३ संस्थांची भर पडली असून नुकतीच १ संस्था बंद पडल्याचे समजते. म्हणजे आज भारतात अशा एकूण १३ संस्था काम करीत आहेत. या सर्व संस्थांची माहिती आम्ही पुढे देत आहोत :

### ( १ ) शिवाजी लोकविद्यापीठ रूरल इन्स्टिटयूट,

अमरावती ( महाराष्ट्र ).

ही संस्था ७ जुलै १९५६ रोजी सुरू झाली. या संस्थेत आज पुढील अभ्यासक्रम शिकविले जातात :

( १ ) **तीन वर्षांचा रूरल सर्व्हिस डिप्लोमा कोर्स** : या विभागात पुढील ऐच्छिक विषय :—( अ ) सहकार ( Co-operation ), ( ब ) सार्व-जनिक शासन ( Public Administration ), ( क ) समाजकार्य ( Social-work ), ( ड ) गृहशास्त्र ( Home Science ), ( इ ) ग्रामीण उद्योगधंदे

( Village Industry ). सुतारकाम, लाकुडकाम, लोहारकाम. या प्रमुख उद्योगांपैकी एक व साबण तयार करणे, तेल काढणे या दुय्यम उद्योगांपैकी एक.

( २ ) तीन वर्षांचा सिव्हिल व रूरल इंजिनियरिंग डिप्लोमा.

( ३ ) दोन वर्षांचा शेतीशास्त्राचा सर्टिफिकेट कोर्स.

( ४ ) वरील तिन्ही कोर्सना प्रवेश मिळवून देणारा मॅट्रिकनंतरचा एक वर्षाचा प्रिपरेटरी कोर्स.

संस्थेचा पत्ता : शिवाजीनगर, अमरावती ( महाराष्ट्र ).

**( २ ) बलवंत विद्यापीठ रूरल इन्स्टिटयूट, बिजपुरी,** आग्रा.
स्थापना १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.
( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस ३ वर्षे.
( ३ ) डिप्लोमा इन् सिव्हिल व रूरल इंजिनियरिंग ३ वर्षे.

पत्ता : बिजपुरी, आग्रा. ( उत्तरप्रदेश ).

**( ३ ) इन्स्टिटयूट फॉर हायर लर्निंग, बिरोली** ( BIRAULI ).
बिहार. स्थापना : १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.
( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस ३ वर्षे.

पत्ता : बिरोली ( बिहार ).

**( ४ ) श्री रामकृष्ण मिशन रूरल इन्स्टिटयूट, कोइमतूर**
स्थापना : २९ ऑगस्ट १९५८.

अभ्यासक्रम : ( १ ) तीन वर्षांचा डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस.
( २ ) शेती सर्टिफिकेट कोर्स २ वर्षे.
( ३ ) सिव्हिल व रूरल इंजिनियरिंग.
( ४ ) प्रिपरेटरी १ वर्ष.

पत्ता : रामकृष्ण मिशन विद्यालय. पेरियानायकम्, पल्यायम् ,
कोइमतूर ( मद्रास ).

**( ५ ) गांधीग्राम रूरल इन्स्टिटयूट.**

स्थापना : जुलै १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.
( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस.

( ३ ) शेती सर्टिफिकेट कोर्स २ वर्षे.

( ४ ) सॅनिटरी इन्स्पेक्टर्स कोर्स १ वर्ष.

( ५ ) पोस्ट डिप्लोमा कोर्स इन् कम्युनिटी डेव्हलपमेंट.

पत्ता : गांधीग्राम, जिल्हा : मदुराई ( मद्रास ).

**( ६ ) श्री मौनी विद्यापीठ, रूरल इन्स्टिटच्यूट, गारगोटी,**

( जि. कोल्हापूर ) स्थापना : १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.

( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिसिस ३ वर्षे; यास को-ऑपरेशन : सोशल वर्क व एज्युकेशन असे स्वतंत्र अभ्यासक्रम आहेत.

( ३ ) डिप्लोमा इन् सिव्हिल व रूरल इंजिनिरिंग ३ वर्षे.

पत्ता : श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी. जि. कोल्हापूर ( महाराष्ट्र ).

**( ७ ) जामिया रूरल इन्स्टिटच्यूट, दिल्ली.**

स्थापना : जुलै १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.

( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस ३ वर्षे.

( ३ ) डिप्लोमा इन् रूरल ॲन्ड रूरल इंजिनियरिंग ३ वर्षे.

पत्ता : जामियानगर ओखला, नवी दिल्ली २५.

**( ८ ) विद्याभवन रूरल इन्स्टिटच्यूट, उदयपूर.**

स्थापना : १५ ऑगस्ट १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्ष.

( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस ३ वर्षे.

( ३ ) डिप्लोमा इन् रूरल ॲड सिव्हिल इंजिनियरिंग ३ वर्षे.

( ४ ) सॅनिटरी इन्स्पेक्टर्स कोर्स १ वर्षे.

( ५ ) शेती सर्टिफिकेट कोर्स २ वर्षे. ( हा १९६३ जुलै मध्ये सुरू झाला. )

( ६ ) रूरल सोशियॉलॉजी व कम्युनिटी डेव्हलपमेंट या विषयातील २ वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम.

पत्ता : विद्याभवन, उदयपूर ( राजस्थान. )

**( ९ ) लोकभारती, सणोसरा.**

स्थापना : जून १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्षे.

( २ ) शेती सर्टिफिकेट २ वर्षे.

पत्ता : लोकभारती, सणोसरा, जिल्हा भावनगर ( गुजरात ).

**(१०) श्रीनिकेतन रूरल इन्स्टिटयूट.**

स्थापना : १९५६.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्षे.

( २ ) रूरल सर्व्हिस.

( ३ ) सिव्हिल व रूरल इंजिनियरिंग सर्टिफिकेट कोर्स, ( श्रीनिकेतनने ऑगस्ट १९६३ पासून आपली रूरल इन्स्टिटयूट बंद केली आहे. )

**(११) कस्तुरबा सेवा मंदिर, राजपुरा ( पंजाब )**

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी.

( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिस ३ वर्षे.

पत्ता : कस्तुरबा सेवा मंदिर, राजपुरा ( पंजाब ).

**(१२) रूरल इन्स्टिटयूशन, वर्धा.**

स्थापना : १५ जुलै १९६१.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी.

( २ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिसेस.

( ३ ) शेती सर्टिफिकेट २ वर्षे.

( ४ ) रूरल अँड सिव्हिल इंजिनियरिंग डिप्लोमा

पत्ता : वर्धा – सिव्हिल लाईन्स ( महाराष्ट्र ).

**( १३ ) रूरल इन्स्टिटयूट, हनुमनमट्टी ( धारवाड )**

स्थापना : २–१०–१९६१.

अभ्यासक्रम : ( १ ) प्रिपरेटरी १ वर्षे.

( २ ) शेती सर्टिफिकेट २ वर्षे.

( ३ ) डिप्लोमा इन् रूरल सर्व्हिसेस.

( ४ ) डिप्लोमा इन् रूरल ॲण्ड सिव्हिल इंजिनियरिंग.

पत्ता : हनुमनमट्टी; जिल्हा धारवाड ( म्हैसूर राज्य )

(१४) **कस्तुरबा ग्राम रूरल इन्स्टिटयूट,** (खास स्त्रियांसाठी) इंदूर.

स्थापना : २५ जुलै १९६३.

अभ्यासक्रम : (१) प्रिपरेटरी १ वर्ष.

(२) रूरल सर्व्हिसेस ३ वर्ष.

पत्ता : कस्तुरबा नगर, इंदूर (मध्यप्रदेश)

: २ :

## १. खेड्यातील ग्रामपंचायतीची पाहणी

**प्रश्नावली :**

(१) [अ] खेड्याचे नाव, [ब] तालुका, [क] जिल्हा.

(२) ग्रामपंचायतीखाली येणारी गावे.

(३) [अ] केव्हा स्थापन झाली ? [ब] पंचायतीस स्वतःची इमारत आहे का ?

(४) **मिळकतीची बाजू :** (१) [अ] कर, [ब] सरकारी अनुदान, [क] पंचायतीच्या स्थावर स्वरूपाच्या मालमत्तेतून मिळालेले, [ड] इतर, [इ] कर-वसुलीत राहिलेली बाकी ?

(५) **सभासद :** (अ) संख्या (ब) निवडपद्धती (१) सर्व बिनविरोध आले काय ? (२) सर्व सविरोध निवडणूक लढवून आले का ? (३) काही सविरोध...त्यांची संख्या ? (४) काही अविरोध...त्यांची संख्या ? (क) सभासद लागोपाठ किती वेळा निवडून येतात ? (१) दोनदा निवडून आलेले सभासद (संख्या) ? (२) दोनहून अधिक वेळा निवडून आलेले सभासद (संख्या) ? (ड) सभासद जातवारी... (१) ब्राह्मण व तत्सम पुढारलेले समाज, (२) मराठा, (३) इतर जाती (अनुस्यूत जातीजमाती वगळून), (४) अनुसूचित जातीच्या आणि अनुसूचित जमातीच्या सभासदांची प्रत्येकी संख्या. (इ) सभासदांची आर्थिक स्थिती, (आकड्यात.) (१) खूप श्रीमंत ? (२) श्रीमंत ? (३) गरीब ? (क) सभासदांची शैक्षणिक पातळी ? (संख्येत) (१) अशिक्षित...(२) प्राथमिक सात इयत्तांपर्यंत शिकलेले...(३) माध्यमिक शालेय वा इतर शिक्षण घेतलेले...(ग) पंचायतीचे कामकाज...(अ) वर्षांत घेतलेल्या सभांची संख्या ? (ब) गेल्या तीन सभांतील हजेरी (प्रत्यकी) व टक्केवारी. (क) (१) दप्तर–व्यवस्था व्यवस्थित, (२) अव्यवस्थित, (३) मुळातच नाही.

( ६ ) **पंचायतीने केलेले कार्य:—**

( अ ) ( १ ) रस्ते-बांधणी, ( २ ) सांडपाणी-व्यवस्था, ( ३ ) दिवाबत्ती, ( ४ ) पाणीपुरवठा— नळाने–विहिरीने–तळी बांधून–नदीवर पाणवठा बांधून.

( घ ) **केरकचऱ्याची विल्हेवाट**......( १ ) कंपोस्ट खते–खड्डे ? ( २ ) असल्यास किती ? ( ३ ) नसल्यास घाण कुठे टाकली जाते ?

( क ) **संडास**—( १ ) सार्वजनिक आहेत का ? ( २ ) वापरले जातात का ? ( ३ ) त्यांची निगा राखली जाते का ? ( ४ ) संडास असल्यास कोणत्या प्रकारचे ?

( ७ ) **इतर गोष्टी :** ( १ ) पंचायतीने प्रथमोपचारासाठी व्यवस्था ठेवली आहे काय ? ( २ ) सुधारलेली शेतीची अवजारे ठेवली आहेत का ? ( ३ ) पंचायतीचे वाचनालय आहे का ? ( ४ ) पंचायतीने इतर काही सोयी केल्या आहेत काय ?

( ८ ) संपूर्ण खेड्याचे त्या पंचायत कारभाराविषयी एकूण सर्वसामान्य मत काय आहे ?

( ९ ) गावात राजकीय पक्ष कोणते आहेत ? व हे राजकीय मतभेद पंचायतकारभारात कितपत व कसे प्रतीत होतात ?

## २. खेड्यातील सहकारी सोसायटींची पाहणी

**प्रश्नावली :**

( १ ) खेड्याचे नाव, ( २ ) वस्ती, ( ३ ) तालुका, ( ४ ) जिल्हा ( ५ ) या खेड्यात किती सहकारी सोसायट्या काम करीत आहेत ? ( ६ ) सोसायट्यांचा प्रकार कोणता ? ( अ ) पतपेढी...( ब ) सेवा...( क ) नॉन्-क्रेडिट ( ७ ) अ, ब, क प्रत्येकी रजिस्ट्रेशनच्या तारखा. ( ८ ) प्रत्येक सोसायटीची सभासद-संख्या. ( ९ ) बिगर सभासद ( अ ) सभासद-संख्या, ( ब ) बिगर-सभासद संख्या, (१०) ( अ ) कर्ज आवश्यक नसणाऱ्या सदस्यांची संख्या. ( ब ) कर्जमागणी न केलेल्या सदस्यांची संख्या. ( ११ ) अर्थव्यवस्था, ( अ ) ( १ ) वर्किंग कॅपिटल, ( २ ) शेअर कॅपिटल, ( ३ ) रिझर्व फंड, ( ४ ) इतर फंड, ( ब ) गेल्या तीन वर्षांतील प्रत्येक वर्षाचे वर्किंग कॅपिटल, ( १२ ) देवघेव...गेल्या आर्थिक वर्षात सदस्यांची किती रकमेचे कर्ज दिले ? ( अ ) कमी मुदतीची कर्जे. ( ब ) मध्यम मुदतीची कर्जे, ( १३ ) शिल्लक, ( अ ) ज्यांनी सोसायटीकडे ठेव ठेवली आहे अशा सदस्यांची संख्या. ( ब ) ज्या बिगर सभासदांनी सोसायटीकडे ठेव ठेवली आहे अशांची संख्या. ( १४ ) गेल्या चार आर्थिक वर्षांतील डिव्हिडंडचा दर. ( १५ ) आतापर्यंत जास्तीत जास्त कोणत्या वर्षी किती टक्केपर्यंत डिव्हिडंड दिला गेला ? ( १६ ) **कर्जफेड :** ( अ ) नियमित कर्ज-हप्ते भरणाऱ्यांची संख्या. ( ब ) मधूनमधून कर्ज

चुकविणाऱ्यांची संख्या ( क ) नियमितपणे कर्ज ( habitual ) चुकविणाऱ्यांची ( १७ ) कर्ज व्यवहारावर दखरेखीसाठी नियुक्त यंत्रणा. ( १८ ) कर्जफेड न करणाऱ्या सदस्यांवर करण्यात येणारी कायदेशीर उपाययोजना व अशा सदस्यांची संख्या. ( १९ ) गेल्या आर्थिक वर्षात न फिटलेले एकूण कर्ज ( २० ) सोसायटीची व्यवस्था ( अ ) कार्यकारी मंडळाची एकूण सदस्य-संख्या. ( ब ) गेल्या वर्षांत घेतल्या गेलेल्या का. क. मंडळाच्या एकूण सभा किती? ( क ) गेल्या तीन सभांना हजर राहिलेल्या सदस्यांचे आकडे ? ( ड ) सेक्रेटरीची लायकी ? (qualifications). ( इ ) सेक्रेटरीचा पगार (फ) चेअरमनची लायकी ( qualificaion ) ( ग ) सध्याच्या चेअरमनची कामाची कालमर्यादा. ( ह ) एकूण कर्मचाऱ्यांची संख्या. ( २१ ) सर्वसाधारण सभा. ( अ ) गेल्या तीन वर्षांत घेण्यात आलेल्या एकूण सभांची संख्या. ( ब ) गेल्या तीन सभांना हजर राहिलेल्या सदस्यांची संख्या व त्या आकड्यांची एकूण सदस्य-संख्येशी टक्केवारी. ( २२ ) **दप्तर** : ( अ ) व्यवस्थित ठेवलेले आहे ? ( ब ) अव्यवस्थित आहे ? ( क ) ठेवले नाही ? ( २३ ) गेल्या तीन वर्षांत सोसायटीला मिळालेला दर्जा. ( २४ ) इतर महत्त्वाच्या गोष्टी.

## ३. खेड्यातील शाळा व समाज यांचे संबंध यांची पाहणी :

**प्रश्नावली :**

( १ ) ज्या कार्यक्रमात समाजातील काही गट पृथक्पणे वा संयुक्तपणे सहभागी होऊ शकतील असे काही कार्यक्रम शाळेतर्फे आखण्यात येतात का ? कोणत्या गटासाठी ?—( अ ) प्रौढ पुरुष. ( ब ) प्रौढ स्त्रिया. ( क ) युवक. ( ड ) युवती. ( इ ) बालवाडीतील मुले.

( २ ) शाळेची मुले व शिक्षक ज्यात सहभागी होऊ शकतील असे काही कार्यक्रम समाजातर्फे आखले जातात का ?

( ३ ) शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयी पालकांना सुस्पष्ट कल्पना आहे का ?

( ४ ) शाळेच्या अभ्यासक्रमाबाबत पालक वा स्थानिक पुढारी काही सूचना करतात का ? शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयी त्यांचे काय मत आहे ?

( ५ ) पालक वा गावचे पुढारी शाळांना समाजाने आखलेल्या कार्यक्रमात सहभागी होण्यास सांगतात का ? तसे असल्यास कोणत्या प्रकारच्या कार्यक्रमात ते भाग घ्यावयास सांगतात ?

( ६ ) शाळा व समाज एकत्रित येऊन प्रदर्शने, जत्रा, मेळावे, करमणुकीचे कार्यक्रम, श्रमदान, सफाई, आरोग्यविषयक कार्यक्रम, घडवून आणतात का ?

घडवून आणत असल्यास त्यांपैकी कोणते कार्यक्रम समाजाच्या दृष्टीने, शाळेच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील ?

( ७ ) गावातील स्थानिक पुढारी किंवा पालक यांनी शाळेची इमारत बांधण्यासाठी, सुधारण्यासाठी, सुशोभित करण्यासाठी काही मदत केली का ?

( ८ ) ग्रामविकासाच्या कामात अथवा एखादे मोठे पाहुणे गावास भेट देण्यास आले असता त्यांचा शैक्षणिक उपयोग मुलांना व्हावा म्हणून समाजाने मुलांकरिता कांही विशेष कार्यक्रम आखले का ?

( ९ ) समाजाने शाळेकरिता काही साहित्य तयार करून दिले का ? विकत घेऊन दिले का ?

(१०) आपल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने शिक्षकाने गावातील प्रौढ व युवक यांना शाळेच्या कामात रस घ्यावयास लावण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न केले काय ?

(११) समाजाच्या विकासासाठी वा मदतीसाठी गावात चालू असलेल्या प्रकल्पांत शिक्षक मदत करतात का ? रस घेतात का ? घेत असल्यास त्याचा दृश्य परिणाम कोणता दिसून येतो ? घेत नसल्यास कारणे कोणती ?

(१२) शाळा चालू असता गावचे लोक शाळांना भेटी देतात का ? देत असल्यास कोणत्या कारणास्तव ?

(१३) शिक्षकाने पालकदिनाचा कार्यक्रम आखण्याचा कधी प्रयत्न केला का ? किंवा इतर कोणत्या मार्गाने पालक वारंवार शाळेस भेट देतील असे प्रयत्न केले का ?

(१४) गावातील पुढारी व विद्यार्थ्यांचे पालक शिक्षकांना आपल्या घरी घरगुती समारंभासाठी किंवा जेवणासाठी वगैरे बोलावतात का ?

(१५) गावातील पंचायतीमार्फत वा सहकारी सोसायटीतर्फे शिक्षकाला मदतीसाठी बोलावण्यात येते का ?

(१६) शिक्षक प्रौढ शिक्षक आपल्या फावल्या वेळात, वाचनालय, बालवाडी, युवक-संघटना यांपैकी कोणतीही एक किंवा अधिक संघटना स्वतःहून चालवतात काय ?

(१७) समाजविकासासाठी अधिकारी वा बिनअधिकारी अशा तज्ज्ञांचा फायदा लोकांना मिळवून देण्याच्या दृष्टीने काही शिक्षकाने प्रयत्न केले आहेत काय ?

(१८) शाळेच्या कारभाराकडे लक्ष देण्यासाठी स्थानिक समिती आहे काय ?

(१९) शाळेच्या इमारतीचा समाजकेंद्र, संस्कारकेंद्र म्हणून वापर केला जातो काय ?

(२०) शाळा व स्थानिक समाज यांच्या संबंधाविषयी तुमचे सर्वसामान्य काय मत बनले ते नमूद करा.

## ४. खेड्यातील कुटुंबाची पाहणी–( सामाजिक– आर्थिक– शैक्षणिक ).

### ( १ ) कुटुंबाचा अभ्यास :

( १ ) कुटुंब-प्रमुखाचे नाव :—

( २ ) प्रमुखाचे कुटुंबाशी नातेः–( बाप, आई, आजोबा, आजी, इतर नातेवाईक म्हणून ).

( ३ ) **कुटुंबांतील इतर मंडळी**— १ ते ६ महिन्यांची मुले किती ? मुलगे–मुली, ६ महिने ते ४ वर्षे ? मुलगे–मुली ५ ते १४ वर्षे ? मुलगे–मुली १५ ते २४ वर्षे. पुरुष–स्त्रिया.

२५ ते ३४/३५ ते ४९/५० ते ६४ व ६५ च्या वर पुरुष–स्त्रिया.

( ४ ) **साक्षरता**–साक्षर, पुरुष–स्त्रिया ( १४ वर्षांवरील ). शाळेत जाणारी मुले–मुलगी व मुली ( ६ ते ११ ) व ( ११ ते १४ ) वरील वयाची शाळेत न जाणारी मुले, मुलगे, मुली.

मुले शाळेत का जात नाहीत— घरकामामुळे— पालकांच्या बेपर्वाईने— आजारपणामुळे— इतर.

( ५ ) कुटुंबाच्या उपजीविकेचे मुख्य साधन– दुय्यम साधन. या उभय व्यवसायांतून कुटुंबप्रमुख, स्त्रिया व मुले काम का करतात ? असल्यास कोणते ?

( ६ ) कुटुंबाचा आर्थिक व्यवहार कोण पाहते ? बाप– आई– आजोबा– आजी, मुलगा– मुलगी– इतर असल्यास कोण ?

( ७ ) पाणी व जळण कोण आणते ? वृद्ध स्त्रिया– वृद्ध पुरुष, १४ वर्षांखालील मुलगे– मुली.

( ८ ) स्त्रिया पडदा पाळतात का ?

( ९ ) शेजाऱ्यांशी संबंध– कामात सहकार्य करतात का ? केवळ गप्पा मारण्यासाठी शेजारी जमतात का ?

(१०) कुटुंबातील खरेदी– संसाराला लागणाऱ्या मालाची खरेदी कोठून ? गावात– गावाबाहेर. धान्य, भाजीपाला, कापड, दूध ( प्रत्येकी ).

(११) कुटुंबियांची करमणूक कोणत्या प्रकारची ? खेड्यात–खेड्याबाहेर– पुरुषांची-स्त्रियांची.

(१२) **उत्पन्नाची साधने**–प्रमुख धंद्यापासून–वार्षिक रक्कम. दुय्यम धंद्यापासून-वार्षिक रक्कम इतर साधनांपासून-वार्षिक रक्कम.

(१३) **कर्ज** : गेल्या वर्षात काढले का ? असल्यास कोणाकडून ?
( मित्र–शेजारी–सावकार–सहकारी पतपेढी–इतर ).
कोणत्या कारणास्तव कर्ज काढले होते ?

(१४) गावातील कार्यक्रमात कुटुंबाचा भाग—
कार्यक्रमाचे नाव– वर्षातून किती वेळा भाग घेतला ?

(१५) **आरोग्य** : गेल्या वर्षातील आरोग्याचा आढावा.
आजारी कोण ? आजराचा प्रकार ?
कारणे ? औषधोपचाराची योजना ?
अंदाजे झालेला खर्च–घरात कायमची काही औषधे ठेवली जातात का ?

**( २ ) घर व घराभोवतील स्वच्छता :**

( १ ) घराचे क्षेत्रफळ : खोल्यांची संख्या.
( २ ) घर कोणत्या प्रकारचे : विटांचे–दगडांचे–पत्र्यांचे–झावळ्यांचे इ.
( ३ ) स्नानाची स्वतंत्र व्यवस्था आहे का ? मोरीमध्ये–स्नानगृहात–उघड्यावर.
( ४ ) सांडपाण्याची व्यवस्था लावली आहे का ? असल्यास कोणती ?
( ५ ) गुरे घरात बांधतात का ? कोठे ?
( ६ ) खताचे खड्डे आहेत का ?
( ७ ) खिडक्या किती ? उजेडाची व्यवस्था काय ?

**( ३ ) कुटुंबाची जिंदगी ( Assets ) :**

( अ ) गाई, बैल, म्हशी, कोंबड्या, बकऱ्या, मेंढ्या, घोडे, गाढवे, डुकरे यांची प्रत्येकी संख्या.
( ब ) घरातील सामानसुमान–
खाटा, खुर्च्या, टेबले, बाके, सायकली, स्टोव्ह, ग्रामोफोन, रेडिओ, पेट्रोमॅक्स, शिवणयंत्र, बैलगाडी, लाकडी नांगर, लोखंडी नांगर इत्यादी प्रत्येक वस्तूची संख्या.

**( ४ ) आर्थिक परिस्थिती :**

( १ ) कुटुंब सहकारी सोसायटीचा सभासद आहे का ? असल्यास कोणत्या प्रकारच्या ? क्रेडिट / बहुविध कार्यकारी / सेवा.
( २ ) कुटुंबाने तयार केलेला माल कसा विकला जातो ? गावात–गावाबाहेर ?

(३) कुटुंबाच्या मालकीची जमीन किती? कुटुंब कसत असलेली जमीन किती? भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, वरी, गहू, चणे, इतर कडधान्ये, ऊस, टॉमॅटो, भाजीपाला यांचे पीक काढणारी जमीन किती? यापैकी कोणते उत्पन्न घराकरिता ठेवले जाते? कोणते बाहेर विक्रीस पाठवले जाते? ते कुठे विकले जाते? कुणाला? अंदाजे उत्पन्न?

(४) शेतीवरील विहिरींची संख्या? शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची इतर व्यवस्था. गुरांसाठी लागणारा चारा भरपूर प्रमाणात स्वतःच्या शेतावरून मिळतो का? अन्यत्र मिळतो का?

### (५) धार्मिक :

कुटुंबात कोणते धार्मिक उत्सव साजरे होतात? आजारात कोणते नवस किंवा इतर श्रद्धा-उपाय केले जातात? हा कुटुंब पाहणीचा नमुना परिस्थितीनुसार बदलता येईल. शिक्षणसंस्थांना त्यानुसार ग्रामीण परिसरांच्या गरजा स्पष्ट होतील व त्यानुसार गरजेनुसार विस्तार कार्य-क्रमाची आखणी करता येईल.

## एक-शिक्षकी शाळा

भारतासारख्या खेड्यांच्या देशात एक-शिक्षकी शाळा ही संस्था असणे हे अगदी नैसर्गिक आहे. भौगोलिक, आर्थिक व सामाजिक कारणांमुळे अशी शाळा ही महत्त्वाची गरज ठरते. त्या ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षकाच्या वाट्याला अक्षरशः असिधाराव्रत आलेले असते. आपल्या देशातील एकूण प्राथमिक शाळांच्यापैकी ४० टक्के शाळा एक-शिक्षकी शाळा आहेत. उरलेल्या शाळांत एका वर्गास एकच शिक्षक शिकवितो अशा शाळांचे प्रमाण कमी आहे. एकूण प्राथमिक शिक्षकांपैकी ५० टक्यांहून अधिक शिक्षकांना एकापेक्षा अधिक वर्गास शिकवावे लागते. सर्वत्र मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेमुळे एक-शिक्षकी शाळा ही संस्था मूळ धरून बसलेली आहे. ४० मुलांमागे एक शिक्षक हा सरकारचा नियम आहे. शिक्षकांची शाळेतील संख्या मुलांच्या संख्येवरून ठरविली जाते. ७ ते ११ या गटातील वयोमानाच्या मुलांची संख्या, एकूण लोक-संख्येच्या १२·५ टक्के असते, असा आकडेशास्त्रज्ञांचा गृहीतांक असतो. भारत सरकारच्या १९५६–५७ च्या अहवालात, ५० टक्यांहून अधिक एक-शिक्षकी शाळा आहेत, त्यांतील शिकणाऱ्या मुलांची टक्केवारी पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

| राज्य | शाळांची टक्केवारी | पट-संख्येची टक्केवारी |
|---|---|---|
| आसाम | ६१·४ | ४०·५ |
| बिहार | ६१·८ | ४१·३ |
| मुंबई | ५१·१ | १९·८ |
| मध्यप्रदेश | ५३·१ | ३०·२ |
| म्हैसूर | ५१·४ | २५·३ |
| ओरिसा | ५७·१ | ३७·६ |
| राजस्थान | ५५·६ | ४२·६ |
| नेफा | ५४·५ | ३४·७ |
| एकूण भारत | ४०·५ | १७·६ |

एक-शिक्षकी शाळेत एका शिक्षकास चार वर्ग, इयत्ता पहिली ते चौथी शिकवावे लागतात. त्यामुळे अध्यापनपद्धती, शिस्त, वेळापत्रक असे अनेक प्रश्न

निर्माण होतात. साहजिकच **वर्ग-रचनेस** या शाळेत मूलगामी महत्त्वाचे स्थान आहे. पहिली ते चौथी अशा चार इयत्ता असल्या तरी त्यांना **एकात्म,** म्हणजे **एकच** वर्ग मानून शाळा चालवावी लागते. एका वयाची, समान शारीरिक व बौद्धिक वाढीची मुले एका गटात अशी विभागणी करावी लागते. शिवाय निरनिराळ्या वर्गांतील मुलांमध्ये निकटचा संबंध यावा म्हणून, **समान कार्यक्रमासाठी** सर्व वर्गांतील मुले एकत्र येतील.

| इयत्ता | पहिला गट | दुसरा गट | तिसरा गट | चौथा गट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | ३ | २ | ३ | २ | = १० |
| दुसरी | २ | ३ | २ | ३ | = १० |
| तिसरी | ३ | २ | ३ | २ | = १० |
| चौथी | २ | ३ | २ | ३ | = १० |
| एकूण | १० | १० | १० | १० | |

आडव्या रेषेवरील वर्ग व उभ्या रेषेवरील आकडे गट आहेत. पहिलीतील १० मुले, ३, २, ३, २ याप्रमाणे चार गटांत वाटली गेली आहेत. त्याचप्रमाणे पहिल्या गटात ३, २, ३, २ या क्रमाने चारही इयत्तांतील मुले आहेत.

**गटवारी व वर्गवारी रचना :**

**गटवारी**



### वर्गवारी



गटपद्धतीत भिंतीस लागून चौकोनाकृती गट बसतील. मधली जागा व्यवसायासाठी मोकळी. वर्गवारीत प्रत्येक वर्ग एकेका कोपऱ्यात बसून त्या त्या ठिकाणी फळा आहे. शिक्षक क्रमाने फिरत राहून शिकवीतील.

**एक-शिक्षकी शाळेचा कार्यक्रम :**

**सकाळचे सत्र** ( ७–३० ते १०–३० )

७–३० ते ७–४५ सफाई.
७–४५ ते ८–०० समूहगान.
८–०० ते ८–१५ उपस्थिती नोंद.
८–१५ ते ८–३० वार्ता-वाचन.
८–३० ते ९–०० मुलांची आरोग्याच्या दृष्टीने तपासणी.
९–०० ते ९–३० बागकाम.
९–३० ते १०–०० सामान्यज्ञान चर्चा.
१०–०० ते १०–३० कथाकथन, नाट्यीकरण.

**दुपारचे सत्र** ( ३–०० ते ५–३० )

३–०० ते ४–०० अंकगणित.
४–०० ते ५–०० भाषा.
५–०० ते ५–३० खेळ.

* सकाळच्या सत्रात मुले **गटवारीने** बसतील व दुपारच्या सत्रात **वर्गवारी** पद्धतीने बसतील.

## एक-शिक्षकी शाळेस लागणारे शिक्षण-साहित्य :

फळे, गुंडाळी फळे, बुलेटिन बोर्ड, बाग-कामाचे साहित्य, देश व राज्याचे नकाशे, राष्ट्रीय नेत्यांची छायाचित्रे, राष्ट्रध्वज, गोष्टी व पाठ्य-पुस्तकांच्या पेट्या, गोष्टीची चित्रे, नाट्यीकरणास मुखवटे, या बरोबरच जरूरीप्रमाणे आवश्यक त्या साधनांची जोड द्यावी लागेल.

## अध्यापनपद्धतींचे विशेष :

एक-शिक्षकी शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकाचे कार्य अनेक दृष्टींने अवघड असते. एका वर्गास शिकविताना, इतर वर्ग कामात, व्यवसायात वा स्वाध्यायात गुंतवून ठेवावे लागतात. प्रत्यक्ष वर्गातच सर्व अभ्यास व कृती करवून घेऊन पक्क्या कराव्या लागतात. गृहपाठासाठी वेगळे काम नेमून देण्याची आवश्यकता नसते. या व्यवसायात जितकी विविधता अधिक तितकी मुले रमून जातात व त्यांच्या हातून उत्तम कार्य घडते. अभ्यासावर आधारलेली स्वाध्याय-मालिका विद्यार्थ्यांने पूर्ण केली की, तो वरच्या वर्गात जाण्यास पात्र ठरला पाहिजे. या पद्धतीमुळे पास-नापास होण्यामुळे, शाळेतील हजेरीवर होणारे दुष्परिणाम नाहीसे करता येतील. खेडेगावातील' शाळेत हजेरीचा प्रश्न फार मोठा असतो. विद्यार्थ्यांची **गळती** आणि **कुचंबणा** थांबविणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सामान्यज्ञान, माहिती, छोटे-समारंभ, यांसारख्या प्रसंगाचे चारी वर्ग एकत्र येतील व सर्वांना समान अशी माहिती देता येईल. यामुळे एकूण सर्व मुलांमध्ये निर्माण होणारी **एकसंधतेची,** एकात्मतेची भावना वाढीला लागून, या शाळेचे एकूण कार्य परिणामकारक होईल. निराळ्या शब्दांत या शाळेतील अध्यापन-पद्धतीचे वैशिष्ट्य सांगायचे तर **व्यवसाय केंद्रित अध्यापन** हे सूत्र प्रमुख आहे.

जी. के. इन्स्टिट्यूट ऑफ् रूरल एज्युकेशन, श्री मौनी विद्यापीठ गारगोटी, ( जि. कोल्हापूर ) या संस्थेत एक-शिक्षकी शाळेच्या सर्वांगीण कार्य-पद्धतीविषयी प्रयोग करण्यात आले. भारतातील सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ व भारत सरकारचे शिक्षणविषयक सल्लागार श्री. जे. पी. नाईक यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने प्रयोग हाती घेण्यात आला. १९६२–६३ मध्ये प्रयोगाला सुरुवात झाली व १९६५–६६ मध्ये गारगोटी विस्तार क्षेत्रातील २० शाळांत हाच प्रयोग करण्यात आला. या प्रयोगाच्या फलनिष्पत्तीची चर्चा करून पुनः मूल्यमापन करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९६६ ते २५ नोव्हेंबर १९६६ या काळात N. C. E. R. T. या केंद्रीय संशोधन संस्थेतर्फे चर्चासत्र भरविण्यात आले. **भोपाळ** व **श्रीनगर** येथील विस्तार सेवा केंद्राने त्यांच्या परिसरातील एक-शिक्षकी शाळांसाठी पाहणी केली व योजना तयार केल्या.

## एक-शिक्षकी शाळांचा प्रश्न

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, स्वीडन, इजिप्त यांसारख्या अनेक देशांत या प्रकारच्या शाळा आहेत. या शाळांतून काम करणाऱ्या शिक्षकांना दृक्-श्राव्य साधने, ध्वनि-मुद्रक ( Tape recorder ), यासारखी साधने पुरविण्यात येतात व त्यांची कार्यक्षमता वाढविण्यात येते. याच नव्हे पण उपलब्ध साधनांचा मुबलक पुरवठा या शाळांना केला पाहिजे. या शाळांतून काम करणाऱ्या शिक्षकांना सुधारलेली वेतन-श्रेणी देऊन, त्यांचा गौरव करून, अधिक सुख-सोयी पुरवून त्यांना साहाय्य करणे अगत्याचे आहे. याच शाळा साक्षरतेची ज्योत दूरवरच्या खेड्यांत जागती ठेवणार आहेत. मेक्सिकोसारख्या देशात '**फिरती शाळा**' ( School on Wheels ) उत्कृष्ट कार्य करीत आहे. शाळेची इमारत देखील घडीकरून ( Folding ) आणता येते, उभारता येते. अत्यंत अवघड जागी देखील ही शाळा पोचू शकते व शिक्षण करू शकते.

♣ ♣ ♣

## UNIVERSITY OF POONA

### B. Ed. Revised Course

SPECIAL FIELDS OF EDUCATION

1. Village life in Ancient and Medieval India – Indian Village at the advent of British Rule – Causes of decay of Indian Rural life during the British rule.
2. The Village of today – economic, social, cultural, and administrative conditions.
3. Different ideologies put forward for the reconstruction of Rural life.
4. Objectives of Rural Education – Rural and Urban Education at different levels.
5. Special Problems:— Single teacher schools. Wastage and stagnation. Provision of alternative courses. Central Schools.
6. Recruitment and Training of teachers.
7. The School and Community development.
8. The idea and scope of Rural Universities.
9. Broad out-line of Rural life and Education in U. S. A., Australia, Turkey, Japan and Denmark.

RURAL EDUCATION ( Practical work : 50 Marks )

1. Study of a rural Education, problems and submission of a detailed report thereon.
2. Socio-economic and Educational Survey as a group project ( Every student should survey about 10 houses ).
3. A visit to Rural Institution.
4. Participation in the activities of a Commuity Development Project or a National Extension Block for not less than 3 days.

♧ ♧ ♧

# SHIVAJI UNIVERSITY

## SYIIABUS

### Paper V ( 1 ) **Rural Education**

1. Need for considering rural education as a special field in education.

   ( i ) Differences between the characteristics of rural and urban areas in economic and social patterns of working and living.

   ( ii ) The role of education in presrving basic human values as well as in giving a desirable direction to social change in rural areas.

2. The Rural Community :—

   ( i ) Characteristics of a rural community :

   ( a ) Location, ( b ) Population, ( c ) Social organization ( d ) Religious and ceremonial life, ( e ) Economic life, ( f ) Psychological peculiarities with special reference to India.

   ( ii ) Informal educational forces in rural communities.

3. ( i ) Problem of rural development:—

Ideologies and methods suggested by pre–independeence reforms. Post–indepence trends in developing rural communities.

Progress of commnity development through formal and informal education of villagers of both sexes and all ages, such as adult classes, Youth Clubs, Farmers' Clubs, Mahila Mandals, Trade Schools, Leadership Camps etc.

4. ( a ) Formal Education in villages:—

(i) Pre–primary education Schools (ii) Primary Schools ( iii ) Secondary Schools ( iv ) Gram Shikshan Mohim ( v ) Rural Institutes (vi) Rural Universities ( vii ) Ashram Schools.

( b ) Special Problems :—

Single teachers Schools. Wastage and stagnation, Provision of alternative Courses, Central Schools.

5. Training of teachers and educational administration for rural areas:—

( i ) Objectives, content and methods of training,

( ii ) Our present needs in regard to man–power for rural education and the problems of recruitment and training as related to them.

( iii ) Measures for improving the efficiency and living conditions of rural teachers.

6. Democratic Decentralisation and Rural Education :

( i ) Programmes of democratic decentralisation. Their broad significance for programmes of rural education.

( ii ) Relations between the school and the community for mutual improvement. The modern concept of the community centred school.

( iii ) A comparative study of experiments for spread of education in rural areas in—

( a ) India ( b ) Turkey, ( c ) U. S. A.
( d ) Denmark, ( e ) USSR and ( f ) Australia.

**Practical Work**

1. One Comprehensive village-study.
2. Evaluation of one rural school.

3. Interviewing ( a ) a rural teacher, ( b ) a rural leader, ( c ) a rural parent and ( d ) an administrator of education to find out their opinions on education for the village and the problems they have to meet.

( All studies to be carried out as group work, suitably adjusted, from the stage of preparation of questionnaries and check-lists to that of writing the report. Assessment of individual work should be done on the basis of an observation chart for noting individual contributions, to be maintained by the guiding professor. )

## निवडक संदर्भ-ग्रंथ


1. The Rural Institutes of Higher Education—
Louis Smith Ministry of Education, Govt. of India- 1958.
2. Research and Experiment in Rural Education—
J. P. Naik Ministry of Education, Govt. of India- 1953.
3. Rural Institutes—
Ministry of Education, Govt. of India- 1956.
4. Rural Primary Teachers—
E. A. Pires, Education Ministry, Govt. of India- 1956.
5. Handbook of Suggestions for Teachers in Small Rural Schools—
Mintstry of Education, Govt. of India- 1954.
6. School and the Community—
Ministry of Education, Govt. of India- 1961.
7. Aspects of Education in India and Abroad—
Austin A. D' Souza, Orient Longmans- 1958.
8. Higher Education and Rural India—
Dr. S. N. Mukerjee, Acharya Book Depot, Baroda- 1956.
9. The Indian Rural Problem—
M. B. Nanavati & J. I. Aujaria, Vora & Co., Bombay-1951.
10. Facilities for Education in Rural Areas—
UNESCO Publication- 1958.
11. Rural Reconstruction in Action—
H. B. Allen, Cornell, University Press, New York- 1953.
12. Folk High Schools of Denmrk—
Holger, Begtrup and others Oxford University Press, London- 1949.
13. Teacher 's Handbook of Social Education—
Ministry of Education, Govt. of India.
14. Education for Peace—
Deo Prakash Narayan, Atma Ram & Sons, Delhi-6-1952.

15. Rural School Teachers in the United States of America—
H. G. Wyatts, Govt. Printing Press, Calcutta- 1923.
16. Rural Education : Community Backgrounds—
Burton W. Kreitlow Harper & Brother, New York- 1954
17. Peport of the Committee an Rural Education—
Ministry of Education, Govt. of India- 1959.
18. Community Development in India—
V. T. Krichnamachari, Publication Division, Govt. of India- 1958.
19. Introduction to Rural Sociology in India—
A. R. Desai, Indian Society of Agricultural Economics, Bombay.
20. Fact Finding with Rural People—
Food and Agriculture Organization of the United Nations 1955.
21. A Guide to Community Development—
Dr. Douglas Ensminger, Ministry of Community Development, Govt. of India- 1957.
22. Modern Education in Small Rural School—
Wufford K. V., Macmillan & Co., New York- 1943.
23. India-1961 : The Publication, Goot. of India, New Delhi- India- 1961.
24. Three Basic Institutes—
Ministry of Community Development, Govt. of India.
25. History of Education in India—
Syed Narullah and J. P. Naik Macmillan & Co., Bombay- 1951.
26. Tends in Soviet Education—
Ministry of Education, Scientific Research, Govt. of India- 1957.
27. Soviet Education To-day, Deana Levin, London, Staples Press- 1959.

28. Soviet Russia Goes to School—
Beatrice King, Peoples, Publishing House Ltd., Delhi-1956.

29. Education in the U. S. S. R.—
F. Korolev, Soviet Land Booklets, New Delhi- 1958.

30. Comparative Education—
A. H. Moehlman, J. S. Roucet, Henry Holt & Company Inc. New York.

31. Ten Years of Freedom—
Ministry of Education & Scientific Publication, Govt. of India- 1957.

32 Hand book for Training Institutes for Primary Teachers—
K. N. Shrivastao, Ministry of Education of Com. D. Development & Co-operation Govt. of India- 1962.

33. Community Development–India—
of Information & Broadcasting Govt. of India- 1958.

34. First Five Year Plan—

35. Second Five Year Pian—

36. Third Five Year Plan—
Govt. of India, Planning Commission.

37. The Educational System of Denmark—
Govt. of India- 1959.

38. Report 1958-1559— Ministry of Education, Govt. of India- 1959.

39. How the Agrarian Problem has been Solved in the U. S. S. R.— D. S. Kolpakov.
Information Dept. of the U. S. S. R.— Embassy in India, New Delhi- 1958.

40. Report of the Seminar on Education Administration—
All India Council for Secondary Education, New Delhi- 1956.

४१. महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना—
दांडेकर व जगताप, गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणे. ( १९५६)

४२. ग्रामीण बालशिक्षण व त्यांचे प्रश्न—
सं.–स. आ. केळकर जोगळेकरवाडी, मुंबई २३. ( १९५६ )

४३. एक-शिक्षकी शाळा—
जे. पी. नाईक व व्ही. बी. कर्णिक, जगताप-कारले प्रकाशन, पुणे. (१९५३)

४४. ग्रामीण पुनर्रचना व शिक्षण—
वा. ब. कर्णिक व मधुसूदन गोखले, ठोकळ प्रकाशन, पुणे. ( १९६३ )

४५. सेवा सहकारी संस्था— भारत सरकार द्वारा प्रकाशित.

४६. पंचायत राज्यद्वारा सामूहिक विकास— एस्. के. डे ,,

४७. आपली पंचायत समृद्ध करा— ,,

४८. लोकसभेपासून ग्रामसभेपर्यंत— ,,

♧ ♧ ♧

# सूची


अकबर–२६
अखिल भारतीय काँग्रेस समिती–६५
अखिल भारतीय ग्रामीण शिक्षण सभा–१४४
अखिल भारतीय पंचायत परिषद (१९६४)–१३७
अखिल भारतीय सूतकार परिषद (१९२३)–५७
ॲग्रिकल्चरल ॲकेडेमी–१०१
ॲग्रिकल्चरल ट्रेनिंग सेंटर्स–१०५
ॲग्रिकल्चरल पॉलिटेकनिक्स–१४८
ॲग्रिकल्चरल लेबर इन्क्वायरी (१९५०-५१)–३९
अचीसन, बर्क्ले–११३
ॲटमिस व निष्ठ प्राथमिक शाळा–१००
ॲडम–४७
अथेन्स–११२
अंदमान–३५
अधिक धान्य पिकवा मोहीम चौकशी-समिती–७२
अप्रगत विभाग-समिती–५१
अंबाला–७१
अमेरिकन इन्स्टिटयूट–११३
अमेरिकन ब्यूरो–९८
अमेरिकन मिशन–११२
अमेरिकन रूरल लायब्ररी सर्व्हिस–९८
अमेरिकन सरकार–७१
अमेरिका–३५–३७, ४६, ५९, ९३–९७, १०७, १११, १५३
अरिस्टॉटल्–१५०
ॲली, राल्फ एच्.–११३
अल्बानिया–११३
अल्लाउद्दिन–२६
अहमद कासीम–११४
अहमदनगर महाविद्यालय–१५५
आग्रा–२७
आदर्श सेवा संघ–६३
आफ्रिका–९
आसाम–३२, ३६
ऑस्ट्रेलिया–१०७, १०८, १२४
इक्वेडर–११०
इंग्लंड–१४, २०, ३०, ३५, ३६, ४६, १०३, १०४, १५१
इजिप्त–३७
इटावा (उ. प्रदेश)–६७-७०, १५३
इंडियन ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट (IART)–१४७
इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT)–१४७
इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च (ICAR)–१४७
इंडियन व्हेटरनरी रिसर्च इन्स्टिटयूट (IVRT)–१४७
इंपिंग्टन–१०२
इराण–१११
इरिगेशन कमिशन–३०
ईस्ट इंडिया कमिशन–१, १४०
उत्तर प्रदेश–३४, ५१, ६३, ६७, १५३
उत्तर बुनियादी संस्था (पोस्ट बेसिक)–१४२
उत्तर राजपुताना–३४

उषाग्राम–६१
१९१९ चा कायदा–३२
एल्फिन्स्टन–२७, ४७
एल्मइर्स, लिओनार्ड–५९
एल्सिनो–१०६
ओटावा-करार–३१
ओरिसा–२७, ३६
ओल्खेन, एडवर्ड जी.–९५
औंक्रेश्वर–६१
कमिटी ऑन हायर एज्युकेशन
रूरल इन्स्टिटय़ूट्स्–१४३
कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम–५, १७, ७२
कर्ज तडजोड कायदा–५५
कर्ज नियंत्रण कायदा–५५
कर्झन, लॉर्ड–१४–१६, ४८, ४९
कलकत्ता–१४१
कलकत्ता विद्यापीठ समिती ( १९१७-१९ )–४५, ४६
कल्चरल मिशन–१०९
कांग्रे–३४
कॉंग्रेस मंत्रिमंडळ–५०, ५७, १४२
कावेरी–३४
किंडर गार्टन व मॉंटेसरी शाळा–७७
किसान युवक शाळा–१०१
कुक–९५
कुरुक्षेत्र–७०
कुरुक्षेत्र ( मासिक )–७१
कूळकायदा–३८, ६६
कृषिविद्यापीठ–१४६, १५२, १५५, १५६
कृष्णम्माचारी, व्ही. टी.–५२, ५४, ५६, ७२
कृष्णा-गोदावरीचे खोरे–३४
केतपाडी–६१
केरळ–३५, ५५
को-ऑपरेटिव्ह ॲग्रिकल्चरल
एक्स्टेन्शन ॲक्ट–९५
कोचीन–६१
कोठारी, डॉ. डी. एस्.–१४५
कोठारी महामंडळ ( १९६४ )–९, १४५, १५०
कोल्ड खिश्चन–१०६
कोल्हापूर–१५४
कोसंबा केंद्र–५४–५६, ६१
कोस्किनिडस, ॲपोस्टोलोस–१११, ११२
खंडनियंत्रण कायदा–५५
खरेदी-विक्री संघ–३
गंगा–३४
गांधीजी–७, ८, १०, २१, २२, ४१, ५७, ५८, १४२, १४३
गांधी सेवासंघ–५८
गायकवाड, सयाजीराव–५२, ५४
गारगोटी ( कोल्हापूर )–१३४
गीता–१३१
गुजरात–३४
गुरगांव ( पंजाब )–५२, ५३, ५६
गोदावरी–३४
गोसाबा ( बंगाल )–६३, ६४
गोसाबा सहकारी मध्यवर्ती बॅंक–६३
ग्रॅंज ( संघटना )–९७
ग्रामदान चळवळ–१३२, १३३
ग्रामविकास प्रांतिक परिषद–५०
ग्रामशिक्षण-समिती ( १९५९ )–७५
ग्राम सर्वोदय समिती–६६
ग्रामीण उच्च शिक्षणमंडळ–१४५
ग्रामीण उच्च शिक्षण समिती–१४३

ग्रामीण जीवन विकास आणि संशोधक प्रकल्प–१५५
ग्रामीण पुनर्रचना–५०, ५७, ६०, ६२–७०
ग्रामीण विकास परिषद–५१
ग्रामीण शिक्षण सभा कौन्सिल–१४४
ग्रीस–१११
ग्रुंडट्विग, बिशप निकोलाय–१०६
ग्वाल्हेर–६३
चिली–१०९
चीन–२
जपान–३५, ३७
जमीनसुधारणा कायदा–५५
जर्मनी ( पश्चिम )–३५
जिल्हा विकास सभा–९१
जिल्हा सर्वोदय समिती–६६
जेना–४६
जेफर्सन–९३
ज्युनिअर कॉलेज व कम्युनिटी कॉलेज–९७
ज्युनिअर रेडक्रॉस–१०८
झार–९९
टागोर, रवींद्रनाथ–२२, ४६, ५८
टास्मानिया–१०७
टेट ( शिक्षणतज्ज्ञ )–१०७
डॅनिश लोकशाला–१३२
डे, एस. के.–७०
डेन्मार्क–१०५, १०६
ड्युई, प्रा. जॉन–४६
तापी–३४
तालुका विकास परिषद–५१, ५५
तालुका सर्वोदय समिती–६६
तुकडेबंदी कायदा–३८, ५५
तुघलख–२६
त्रावणकोर–६१
दशवार्षिक विकास योजना ( १९४० )–६३
दिल्ली–३४, ३५, ७१
द्विदल राज्यपद्धति–३०, ५०
नभोवाणी शेतकरी मंडळ–३
नॅशनल इनकम् कमिटी रिपोर्ट ( १९५४ )–३८
नॅशनल एक्स्टेन्शन योजना–७२
नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिटयूट ( N. D. K. I. )–१४७
नॅशनल सँपल सर्व्हे ( १०५४–५५ )–३७
नालंदा–१४०
निअर ईस्ट फाउंडेशन–१११
नियोजन-समिती–७९
निलोखेरी–७०, ७१
नेअर मिशन हॉस्पिटल–६२
नेदर्लंड–३५
न्यूझीलंड–३६
न्यू होरायझन्स इन युनिव्हर्सिटी एज्युकेशन ( पुस्तिका )–१५५
पंचवार्षिक योजना–५, १७, १९, ६६, ७२, ७३, ७९, ८०, ८३, ८५, ८६, ८८, ८९
पंजाब–२७, २८, ३३, ३४, ४८, ५२, ७१, १५३
पॅलेस्टाईन–११३
पशु-वृक्ष प्रेमिक मंडळ–१०८
पाकिस्तान–२, ७०
पाझर पद्धति–७, १४०
पाटणचेरी–६१
पुणे–३
पुराण–१

पुराणिक, पंडित–६३
पेन्झा प्रदेश–१००
पेशवे–२६
पेस्टॉलॉट्झी–१०
पोहरी ( ग्वाल्हेर )–६३
प्रधान विद्यापीठ (बहुलक्ष्यी विद्यापीठ)–१५२
प्रशिक्षण व प्रचार-समिती–५०
प्रांतिक सर्वोदय समिती–६६
प्रोसेस ऑफ सोशलायझेशन–१२
प्लॅनिंग रिसर्च अँड ॲक्शन इन्स्टिटयूट, लखनौ–१५३
प्लेटो–१५०
फॅमिन कमिशन–३०
फॅसिलिटीज फॉर एज्युकेशन इन् रूरल एरियाज् ( यूनेस्को )–२२
फार्म ब्यूरो–९८
फार्मर्स युनियन–९७, ९८
फिजिकल ट्रेनिंग अँड रिक्रिएशन ॲक्ट–१०३
फिंडले, प्रा.–४६
फिर्का योजना–६६, ६७
फिलिपाईन्स–१०९, ११०
फिलिपाईन्स कम्युनिटी स्कूल–११०
फिल्डन प्रायोगिक शाळा–४६
फोक हायस्कूल–१०५
फोर एच् क्लब–१५३
फोर्ड फौंडेशन–७२
फ्रान्स–१०४, १०१
फ्रोबेल–१०
बंगाल–१४, २७, २८, ३३–३५, ४७, ४८, ६३
बडोदें–५२, ५४, ५५
बॉबे व्हिलेज पंचायत ॲक्ट ( १९२० )–३२
बार एलिअस–११२
बालकवाडी ( बालकमंदिर )–७७, ७८
बालकांची सनद–९४
बालवीर चळवळ–६०, १०८
बालिआ–१५३
बिहार–२७, ३३–३६, ५०
बेल्जम–३५
बेसिक ॲग्रिकल्चरल स्कूल्स–७४
बोमन, हंफ्रे–११३, ११४
बोर्ड ऑफ एज्युकेशन–१४०
बोर्ड ऑफ रेव्हेन्यूज : मद्रास–२७
ब्रह्मपुत्रा–३४
ब्राझिल–१०९
ब्रायन, एफ. एल.–५२–५४, ५६
ब्लॅक हेड-जोन्स ॲक्ट–९६
भारतीय ग्रामीण उद्योग परिषद–५८
भारतीय शेती संशोधन मंडळ–१४९
मक्तब ( शिक्षणसंस्था )–१४०
मॅंचेस्टर–४६
मजदूरमंझील–७१
मणिपूर–३५
मदरसा ( शिक्षणसंस्था )–१४०
मद्रास–२७, २८, ३२, ३३, ४७, ६३, ६६
मध्य आशिया–११२
मध्यपूर्व–१११
मध्यप्रदेश–१४, १५, ३३, ४७, ४८, ६३
मध्यवर्ती खादी विद्यालय ( सेवाग्राम ) ५८
मध्यवर्ती शेती संशोधनमंडळ–२१

मन्रो, पॉल–४७, ११३
मयनूर ग्रामीण केंद्र– ६३
मॅसिडोनिया– ११२
महाभारत– ४२
महाराष्ट्र– ११५, १५४, १५५
मॉटेग्यु चेम्सफर्ड अहवाल (१९१९)–
३२
मॉन्टेसरी–१०
मान्द्रा–११२
माध्यमिक शिक्षण महामंडळ (१९५२)–
१४३
मामाझान–१११
मायर्स, अल्बर्ट–६७,६८
मॉरिल ॲक्ट–९५
मॉरिस, हेन्री–१०३
मॉर्गन, ऑर्थर इ०–१४३
मार्जे–११२
मार्तंडम् केंद्र (केरळ)–५५,६१, ६२
मिरज–६२
मिशनरी शिक्षण संस्था–४६
मिश्रा, श्रीराम-निवास–१२९
मुदलियार, डॉ.–१४३
मुदलियार कमिशन–२३
मुंबई–३, १४, १५, २७, २८, ३२,
३३, ४७–५०, ६३, ६६, १४१
मेकॉले–१४०
मेक्सिको–१०८, १०९
मेयो ठराव (१८७०)–३२
मेहता, बलवंतराय–८५
मेहता समिती–८५
मोगल–२६
मोगा–६१
मोदीलीज़ करार– ३१
मोहेंजोदारो-हडाप्पा संस्कृति– २५
म्हैसूर– ५१, १५३
युनिसेफ–११०
युरोप–१०४
युवक कल्याण समिती-अहवाल (१९६७)
–१५४
युवक शिक्षण योजना–१५३
युवकसभा–१५३
यूनेस्को–२२
योजना आणि विकास कार्यक्रम-समिती
(मेहता-समिती)– ८५
रशिया–९९, १०१-१०३
रसेल रिपोर्ट–३१
राजस्थान–३५
राधाकृष्णन्, डॉ.–१४३, १४५
राधाकृष्णन् कमिशन–२२, २३,
७३–७५
रामायण–४२
रॉयल कमिशन–३०
राष्ट्रसंघटना–५
राष्ट्रीय विकास समिती–८८
रिझो– १११
रिपन, लॉर्ड–३२
रिस्लिंग–१०६
रूरल इन्स्टिटयूट–७३
रूरल कम्युनिटी स्कूल–९५
रूसो–१०
रेन, प्रो.–४६
लॅंकेशायर–३१
लखनौ–१५३
लघु उद्योग समिती–५०
लॅटिन अमेरिका– १०९
लॅंड ग्रॅंट कॉलेज (अमेरिका)–१३४,
१३५
लंडन मिशन–६२

म. ग्रं. सं. ठाणे
दा. क्र. १५९६४

लंडन विद्यापीठ–१४१
लिंटन–१०४
लिंडसे कमिशन ( खिश्चन उच्च शिक्षण )–६१
लुधियाना–६२
लेबानन–११२
वर्धा–७, ५८
वर्धा-शिक्षण-योजना (मूलोद्योगी शिक्षण, जीवन शिक्षण)–७–१०, २१, ५७, ७६, १४२, १४५
वल्लभी–१४०
वाय. एम्. सी. ए –६१
विक्रमशीला–१४०
विंटर ॲग्रिकल्चरल स्कूल–१०५
विद्यापीठ अनुदान मंडळ–१५४
विद्यापीठ शिक्षण महामंडळ–१४३
विद्यार्थी कल्याण मंडळ–१५४
विविधलक्ष्यी विद्यापीठ–१५५
विश्वभारती–१५२
वुड, सर चार्लस–१४९
वुडखलिता ( १८५४ )–७, १४०
वेलोद–६२
वोल्कर, डॉ.–३०
वोल्करचा रिपोर्ट ( १८८९ )–३०
व्हाइट हाऊस कॉन्फरन्स–९४
व्हिलेज कम्युनिटी कॉलेज–१०३
शांतिनिकेतन–५९
शिकागो विद्यापीठ शाळा–४६
शितोळे, कर्नल राजराजेंद्र–६३
शिवाजी विद्यापीठ–१५४, १५५
शिक्षणमहामंडळ–१४५, १५३, १५४
शिक्षण सल्लागार समिती ( मध्य० सरकार : १९४४ )–१५
शेती व जीव-धन समिती–५०
शेरशहा–२६
श्रीनिकेतन–४६, ५८–६०, १५२
श्रीमाळी, डॉ. के. एल्.–१४३, १४५
श्रीमाळी कमिशन–२१, २२, ७३
सक्तीच्या शिक्षणाचा कायदा–५५
सर्वोदय–९, १०, ६६
सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी–६३
सहकार कमिटी ( १९१५ )–३०
सहकारी अंडी-विक्री सोसायटी–६२
सहारा–३४
सहाराणपूर–१५३
सामूहिक विकास व राष्ट्रीय विस्तार योजना–७१–७३, ७५, ७९–८१, ८४, ८५, १२७
सार्जंट कमिशन–५७
सिंधु–३४
सीझनल ॲग्रिकल्चरल स्कूल–१०५
सेवाग्राम–५८
स्थानिक स्वराज्य-योजना–३२
स्मिथलिव्हर ॲक्ट–९६
स्मिथ ह्यूग्ज् ॲक्ट–९६
हॅच, डॉ. स्पेन्स–६१, ६२
हन्ना खाउरी–११२
हॅमिल्टन, सर डॅनिअल–६३, ६४
हायस्कूल ॲक्ट ( १९४२ )–१०६
हेडेन–१११
ज्ञानेश्वरी–४

❀ ❀ ❀

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय. निजंध
क्रमांक ...... दि: ......

REFBK-0015964
REFBK-0015964

## विकास-गटाची आजची प्रत्यक्ष यंत्रणा




* [ हे शिक्षण गटाधिकारी प्रत्येक गटास ३ ते ४ असतात, पूर्वी जे भागाधिकारी ( A. D. E. I. ) व समाजशिक्षण संघटक ( S. E. O. ) म्हणून काम करीत होते त्यांना आज 'शिक्षण-विस्तार अधिकारी' असे संबोधिण्यात येते. याखेरीज प्रत्येक गटाला स्त्रियांचे व मुलांच्या कल्याणाचे काम पाहण्यासाठी एक मुख्य सेविका नेमण्यात येते. तिला पण शिक्षण-विस्तार-अधिकारी म्हणूनच संबोधले जाते. ]

## विकास-गटाची आजची प्रत्यक्ष यंत्रणा

- १ जिल्हा–परिषद
  - प्रमुख प्रशासक ( शासकीय मुख्याधिकारी )
- २ पंचायत समिती
  - विकास गटाधिकारी ( Block Development officer : शासकीय मुख्याधिकारी )
    - विस्तार अधिकारी. ( Extension officer : तांत्रिक सल्लागार )
      - १ शेती अधिकारी ( Agriculture officer )
      - २ सहकारी अधिकारी ( Co-operative officer )
      - ३ ग्रामीण स्थापत्याधिकारी ( Rural Engineer )
      - ४ उद्योगधंदे अधिकारी ( Industrial officer )
      - ५ शिक्षणाधिकारी * ( Educational officer )
      - ६ तालुका पंचायत अधिकारी ( Taluka Panchayat officer )
      - ७ पशुपालनाधिकारी ( Animal Husbandry officer )
      - ८ गणनाधिकारी ( Statistical Assistant )
- ३ ग्रामपंचायत
  - ग्रामसेवक
    - तलाठी
    - उपग्रामसेवक
    - ग्रामपंचायत चिटणीस

* [ हे शिक्षण गटाधिकारी प्रत्येक गटास ३ ते ४ असतात, पूर्वी जे भागाधिकारी ( A. D. E. I. ) व समाजशिक्षण संघटक ( S. E. O. ) म्हणून काम करीत होते त्यांना आज ' शिक्षण-विस्तार अधिकारी ' असे संबोधिण्यात येते. याखेरीज प्रत्येक गटाला स्त्रियांचे व मुलांच्या कल्याणाचे काम पाहण्यासाठी एक मुख्य सेविका नेमण्यात येते. तिला पण शिक्षण-विस्तार-अधिकारी म्हणूनच संबोधले जाते. ]